महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

वीज निर्मिती - पिढ्यान् पिढ्यांसाठी

# वार्षिक अहवाल २०१७-२०१८

महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## वार्षिक अहवाल

## २०१७-२०१८

# वार्षिक अहवाल २०१७-२०१८

## अनुक्रमणिका


| तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| संचालक मंडळ (वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत) | ०१ |
| संचालक मडंळाचा अहवाल | ०२ |
| महानियंत्रक व महालेखा परिक्षक यांचे भाष्य | ३५ |
| लेखा परिक्षकांचा अहवाल (स्वायत्त) | ४६ |
| ताळेबंद (स्वायत्त) | ५८ |
| नफा-तोटा विवरण (स्वायत्त) | ५९ |
| रोकड प्रवाह विवरण (स्वायत्त) | ६० |
| समभाग भांडवलाचे विविरणपत्र (स्वायत्त) | ६२ |
| वित्तिय विवरण पत्रातील अनुसूची (स्वायत्त) | ६३ |
| लेखा परिक्षकांचा अहवाल (एकत्रित) | १०१ |
| ताळेबंद (एकत्रित) | ११२ |
| नफा-तोटा विवरण (एकत्रित) | ११३ |
| रोकड प्रवाह विवरण (एकत्रित) | ११४ |
| समभाग भांडवलाचे विविरणपत्र (एकत्रित) | ११६ |
| वित्तिय विवरण पत्रातील अनुसूची (एकत्रित) | ११७ |
| दिर्घ मुदतीची कर्जे | १५६ |
| अल्प मुदतीची कर्जे | १६३ |
| प्रकल्प वैशिष्ट्ये | १६४ |

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## संचालक मंडळ

**(१-०४-२०१७ पासून वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यत)**

| | |
|---|---|
| **अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक** | श्री. बिपिन श्रीमाळी (०५.०१.१५ पासून)<br>श्री. अरविंद सिंग (अतिरिक्त कार्यभार) |
| **संचालक** | श्री. अरविंद सिंग (२२.०२.२०१७ पासून) |
| **संचालक (खनिकर्म)** | श्री. श्याम वर्धने (१४.०९.२०१६ ते १२.११.२०१८)<br>श्री. पी.व्ही.जाधव (अतिरिक्त कार्यभार १४.११.२०१८ पासून) |
| **संचालक (संचलन)** | श्री. सी.एस.थोटवे (१९.०९.२०१६ पासून) |
| **संचालक (वित्त)** | श्री. जे.के.श्रीनिवासन (२६.०५.२०१४ ते ११.०८.२०१७)<br>श्री. एस.जे.आंबेरकर (११.०८.२०१७ पासून) |
| **संचालक (प्रकल्प)** | श्री.व्हि.एम.जयदेव (१९.०९.२०१६ पासून) |
| **संचालक** | श्रीमती इरावती दानी (२६.०६.२०१४ ते ३१.०५.२०१७)<br>श्रीमती जुईली वाघ (१५.०६.२०१८ पासून) |
| **संचालक** | श्री. विश्वास पाठक (२१.०७.२०१५ पासून) |

## संचालकांचा अहवाल

प्रिय सदस्य,

दि.३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वर्षाचा लेखा परिक्षित १३ वा वार्षिक अहवाल सादर करण्यास आपल्या कंपनीच्या संचालकांना आनंद होत आहे.

**वित्तीय निष्कर्ष : (स्वायत्त)** (₹ कोटीत)

| तपशील | २०१७-१८ | २०१६-१७ पुनर्लिखित |
|---|---|---|
| उत्पन्न | | |
| वीज विक्री पासून महसूल (निव्वळ) | २१०६२ | १८३५५ |
| इतर उत्पन्न | २५६ | २०० |
| एकत्रित ठोक उत्पन्न | २१३१८ | १८५५५ |
| खर्च | | |
| वापरलेल्या सामानाची किंमत | ११५६१ | ११०२३ |
| इतर खर्च | २२९१ | २०१८ |
| कर्मचारी खर्च | १४०८ | १२३९ |
| घसारा | २६५६ | २१०७ |
| वित्त खर्च | ३३२१ | २९०७ |
| पूर्व कालीन बाबी (निव्वळ) | | |
| कर पूर्व नफा | ८१ | (७३९) |
| कर (निव्वळ) (स्थगित कर प्राप्तीनंतर चालू निव्वळ कर) | ६४२ | ६ |
| निव्वळ नफा - करोत्तर | ७२३ | (७३३) |
| नफा आणि तोट्यात पूनर्वर्गीकरण न होणाऱ्या बाबी (इतर सर्वंकष उत्पन्न) | | |
| व्याख्यांकित लाभ योजनांची पूनर्प्राप्ती | (३५) | (५८) |
| इतर सर्वंकष उत्पन्नाच्या बाबींवर कर खर्च | १२ | २० |
| कालावधीतील एकत्रित सर्वंकष करोत्तर उत्पन्न | ७०० | (७७१) |

### अ) वित्तीय कामगिरी :

आढावा वर्षात, वीज विक्रीच्या उत्पन्नात १४.७४ टक्के वाढ झाली. मागील वर्षाच्या ₹ १८,३५५ कोटीवरुन या वर्षी ते ₹ २१,०६२ कोटी असे वाढले. या वर्षी महसूलात झालेली वाढ ही आपण प्रामुख्याने जादा दक्षलक्ष युनीट (६.६८%) वीज निर्मिती केल्यामुळे झाली आहे. मागील वर्षाच्या ४६१३५ दशलक्ष यूनीट वरून ४९२२१ दशलक्ष यूनीट अशी जास्त वीज निर्मिती झाली. तसेच देयकांवरील अधिभार वाढल्याने महसूलात वाढ झाली आहे. या काळात इतर उत्पन्नात २८ टक्के वाढ झाली ते ₹ ५६ कोटीने वाढले. त्यामुळे एकत्रित उत्पन्न १४.८९ टक्क्याने वाढले. वापरलेल्या मालाची खर्चाची किंमत ११०२३ कोटी रुपयांवरून वाढून ११५६१ कोटी रुपये झाली आहे. जी ४.८८ टक्क्यांनी वाढली आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे पाणी आकार वाढला. वित्त खर्चात १४.२४ टक्के वाढ होऊन तो ₹ २९०७ कोटी वरून ₹ ३३२१ कोटी इतका झाला. त्याचे मुख्य कारण कोराडी, चंद्रपूर आणि परळी येथील नवीन संच कार्यान्वित झाल्याने व्याजाचा पूर्ण भार लागू झाला. कर्मचारी खर्चात ₹ १२३९ कोटी वरून ₹ १४०८ कोटी (१३.६४%) अशी वाढ झाली आणि उपदानाची वरची मर्यादा वाढल्याने वेतन व रोजंदारी खर्च ₹ ४४ कोटीने वाढले. रजा रोखीकरण आणि उपदान दायित्त्वाच्या विमागणिती मूल्यांकनात वाढ झाल्याने त्यांचा खर्च ₹ ११३ कोटीने वाढ झाली. कोराडी, चंद्रपूर व परळी येथे नव्याने संच कार्यान्वित केल्यामुळे त्याचा घसारा पूर्णपणे लागू झाला आणि घसारा / कर्जफेड तरतूद या खर्चात २६.०५ टक्क्याने वाढ झाली. इतर खर्चात १३.५२ टक्के वाढ होऊन तो ₹ २०१८ कोटी वरुन ₹ २२९१ कोटी वर पोहोचला. परिणामी कर पूर्व नफा ₹ ८२ कोटी झाला. मागील वर्षी ₹ ७३९ कोटी तोटा झाला होता. (भारतीय लेखा मानकानुसार

पुनर्लिखित करण्यात आले.) आयकरासाठी तरतूद केल्यानंतर आपल्या कंपनीचा एकूण निव्वळ नफा ₹ ७०० कोटी झाला आहे. मागच्या वर्षी निव्वळ तोटा ₹ ७७१ कोटी होता (भारतीय लेखा मानकानुसार पुनर्लिखित केले आहे.)

**ब) प्रवर्तन कामगिरी :**

महानिर्मिती कंपनीची एकूण स्थापित क्षमता, ३१ मार्च २०१८ रोजी १३६०२ मे.वॅ. झाली.

- वर्ष २०१७-१८ मधे कोळसा औष्णिक केंद्रांचा सरासरी उपलब्धता अंक ६९.७५ टक्के होता. मागील वर्षी तो ६८.५१ टक्के होता.
- संयत्र भार अंक ५३.९३ टक्के झाला. मागील वर्षी तो ५२.७४ टक्के होता.
- या वर्षी २०१७-१८ मधे प्लॅन्ट आउटेज अँड फोर्स आउटेज फॅक्टर हे अंक अनुक्रमे ९.०५% टाणि ५.७१% होते. या आधीच्या वर्ष २०१६-१७ मधे हे अंक अनुक्रमे १२.९५% आणि ७.३५% होते.
- बाह्य कारणांमुळे बंद (आउटेज) (महावितरणचे झिरो शेड्यूल, इको. शटडाऊन, पाणी टंचाई आणि कोळसा न मिळणे) अंक १५.४९% होता.

चंद्रपूरचे संच पाणी टंचाईमुळे खालील कालावधीत बंद होते.

अ) चंद्रपूर - ३ - ०१/११/१७ ते ३१/३/१८ आणि

ब) चंद्रपूर - ४ - ०१/११/१७ ते ३१/३/१८

याशिवाय चंद्रपूरचे युनीट ५, ६ व ७ पाणी टंचाईमुळे जानेवारी २०१८ ते मार्च २०१८ दरम्यान अनियमीतपणे चालू होते, पुढील एप्रिल २०१८ ते जुन २०१८ मधील मागणी विचारात घेऊन असे करावे लागते.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार आर्थिक कारणास्तव खालील संच बंद ठेवावे लागले.

अ) परळी युनीट ४ - ०१/०४/२०१७ ते ३१/०३/२०१८

ब) परळी युनीट ५ -०१/०४/२०१७ ते ३१/०३/२०१८

खालील युनीट नुतनीकरण व आधुनिकीकरण खालील मुदतीत करण्यात येत आहे :

कोराडी युनीट - ६ ०१/०४/२०१७ ते ३१/०३/२०१८.

खालील युनीटस्चे काम थांबवून ती निवृत्त करण्यात आली.

अ) भुसावळ युनीट - २ ०१/०४/२०१७ पासुन

ब) राधानगरी ४.८ मे.वॅ. (४×१.२ मे.वॅ.) - २०/०४/२०१७ पासून

वायू आधारित निर्मिती केंद्राची सरासरी उपलब्धता ९४.८३ टक्के होती. वायू कमी उपलब्ध झाल्याने सयंत्र भार अंक ५४.५७ टक्के होता.

प्रवर्तन कामगिरीचे इतर घटक खालीलप्रमाणे होत :-

- चालू वर्षी कोळसा प्राप्ती ५९.३६ टक्के होती. गतवर्षी ती ७४.९६ टक्के होती.
- चालू वर्षी निश्चित कोळसा वापर ०.७५२ किलोग्रॅम / केडब्ल्यू एच होता. मागील वर्षी तो ०.७३९ किलोग्रॅम / केडब्ल्यू एच होता. गेल्यावर्षाच्या तुलनेत या वर्षी कोळशाचा दर्जा खराब होता. त्यामुळे त्याचा वापर वाढला. चालू वर्षी जाळलेल्या कोळश्याचा सरासरी एकत्रित कॅलरॉफिक मूल्य ३२४३ किलो कॅलरी / किलोग्रॅम होती. गतवर्षी ती ३३७४ किलो कॅलरी / किलोग्रॅम होती.
- चालू वर्षी बॉयलर ट्यूब गळतीची टक्केवारी २.२२% होती. गतवर्षी ती ३.०८ टक्के होती.
- चालू वर्षी विशिष्ट तेल वापर १.४८ मि.लि./केडब्ल्यू एच होते. मागील वर्षी १.१५ एम एल / केडब्ल्यू एच होती. हे संचावर आंशिक भारामुळे घडले. आंशिक भारासाठी एल डी बॅक डाऊन, कोळसा टंचाई व कमी दर्जाचा कोळसा ही कारणे आहेत.
- सहयोगी वीज वापर चालू वर्षी ८.०९ टक्के होता. मागील वर्षी तो ८.३५ टक्के होता.
- उष्णता दर चालू वर्षी २४५३ किलो कॅलरी / के डब्ल्यू एच होता.
- चालू वर्षी कोळसा वहन हानी ०.७६ टक्के झाली. गतवर्षी ती १.०६ टक्के होती.

## संचालकांचा पाच कलमी कार्यक्रम :

- **सर्व औष्णिक विद्युत केंद्रात संचालकांचा खालीलप्रमाणे पाच कलमी कार्यक्रम सुरु केला.**
  - ➢ विशिष्ट कोळसा वापर कमी करणे.
  - ➢ सहयोगी वीज वापर कमी करणे
  - ➢ झिरो कोल डिमरेज
  - ➢ कार्यपरिसरात सुधारणा
  - ➢ नवीन संशोधन
- **झिरो डिमरेज :**
  - ➢ डिमरेजचे तास वर्ष २०१७-१८ मधे १७५५९ तास इतके कमी केले. मागील वर्षी ते ५३२८२ तास होते.
- **कार्य परिसर सुधारणा :**

  निर्मिती केंद्र आणि त्यांच्या निवासी वसाहती यांच्या परिसरात सुधारणा करण्यासाठी खालील उपक्रम करण्यात आले:
  - ➢ प्रत्येक वीज केंद्रात परिसर सुधारणा समित्यांची स्थापना करणे.
  - ➢ वीज केंद्र व परिसरात स्वच्छता व कचरा विल्हेवाटीची जागृती निर्माण करणे
  - ➢ भंगार माल निश्चित करून तो काढून टाकण्यासाठी सर्व प्रमुख भांडारात कार्य करणे व ई-लिलावाचा कार्यक्रम आखणे
  - ➢ सर्व वीज निर्मिती केंद्रात वृक्ष लागवड करणे
  - ➢ विद्युत केंद्र परिसरात शून्य पाणी सोडण्याचे धोरणाची कडक अंमलबजावणी करणे.
- **नवीन संशोधन :**
  - ➢ तंत्रज्ञ व अभियंत्रे यांनी भौलिक नवीन कल्पना शोधुन वापर यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे. त्यातून औष्णिक विद्युत केंद्राच्या स्तरावर गुणवत्ता वृद्धीचे पुरस्कार देणे.
  - ➢ नवीन कल्पना व संशोधन यांच्या मूल्यांकनासाठी विशेष समित्यांची स्थापना.
  - ➢ ओ.आर.टी. बैठकीत निवडक कल्पनांचे सादरीकरण.

  संचालकांच्या उपरोक्त पाच कलमी कार्यक्रम अंमलात आणल्याने आपण सहयोगी वीज वापर व डिमरेजचा वेळ कमी करु शकलो. परिसर सुधारणा कार्यक्रमामुळे पर्यावरण जागृती वाढली. वीज केंद्रातील कर्मचारी नवीन कल्पना घेऊन पुढे येऊ लागले व त्यामुळे विद्युत केंद्राच्या कामकाजात सुधारणा होत आहे.
- **वर्ष २०१७-१८ मधील महानिर्मिती कंपनीच्या कार्याची ठळक वैशिष्टे महानिर्मितीची एकत्रित वीज निर्मिती (दशलक्ष यूनीट)**

| अनु. क्र. | निर्मिती प्रकार | २०१६-१७ | २०१७-१८ | वाढ/घट (%) |
|---|---|---|---|---|
| १. | औष्णिक | ४१७६६ | ४६०६४ | + १०.२९ % |
| २. | वायू | ३२९५ | ३२१२ | - ०२.५२ % |
| ३. | जल | ४४५० | ३५४६ | - २०.३३ % |
| ४. | सौर | २९० | २८२ | - ०२.५४ % |
| | **एकूण** | **४९८०१** | **५३१०५** | **+ ०६.६३ %** |

**महानिर्मितीच्या वीज निर्मिती केंद्रांची एकत्रित वीज निर्मिती आत्तापर्यंत सर्वाधिक आहे. तसेच औष्णिक विद्युत निर्मिती सुद्धा या वर्षी सर्वात जास्त आहे.**

- ➢ सहयोगी वीज वापर ८.०९ टक्के इतकी सर्वात कमी आहे.
- ➢ सर्वात कमी उष्णता दर २४५३ के.कॅलरी / प्रती युनीट साध्य झाला आहे.
- ➢ महानिर्मितीच्या औष्णिक केंद्राचा संयत्र भार घटक

| तपशील | २०१६-१७ | २०१७-१८ |
|---|---|---|
| केंद्रीय वीज प्राधिकरणानुसार पी एल एफ (%) | ५२.७४ | ५३.९३ |
| (बंद वीज संचांचा पी एल एफ वगळून) पी एल एफ (%)<br>(पाणी, कोळसा यांची टंचाई, इको/रिझर्व शट डाऊन आणि बॅकींग डाऊन या बीब विचारात घेऊन) | ८०.१३ | ८२.१४ |

**लाभांश :**

चालू वर्षी आपल्या कंपनीने ₹ ८२ कोटी इतका करपूर्व नफा मिळविला आहे. मागील दोन वर्षे वगळता त्याआधी वर्षानूवर्षे आपली कंपनी जादा महसूल अधिक्य मिळवित आहे. मात्र महावितरण कंपनीकडून अनियमीतपणे व अपूरा पैसा मिळत असल्याने आपल्याला रोखीचे आधिक्य निर्माण करता येत नाही.

भविष्यात आपणाला प्रचंड भांडवली खर्चाची वीज निर्मिती केंद्रे उभारावयाची आहेत. परिणामी समभाग भांडवली निधीची मोठी गरज आहे. यामुळे आपल्या संचालकांनी असा निर्णय घेतला आहे की, जर काही रोख निर्मिती झाली तरी ती पुन्हा नवीन विस्ताराच्या आणि भविष्यातील भांडवली खर्चाच्या योजनेत गुंतवावी. म्हणून आपल्या संचालकांनी आढावा वर्षात लाभांशाची शिफारस केलेली नाही.

**नवीन क्षमतेची भर :**

महाराष्ट्र राज्याची वाढती वीज मागणी पूर्ण करण्यासाठी महानिर्मिती कंपनीने राज्यातील आणखी वीज निर्मिती केंद्रे अमलात आणण्याचे ठरविले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**अ) विद्यमान प्रकल्प :**

**१) भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रातील युनीट ६ (१×६६० मे.वॅ.)**

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र.प्रकल्प - २०१०/प्र.क्र.३/ऊर्जा-४ दि.०५/१०/२०१० नुसार भुसावळ येथे १×६६० मे.वॅ. क्षमतेचा प्रकल्प उभारणीस मंजुरी दिली आहे. यासाठी मे. बी एच इ एल यांना दि.१७/०१/२०१८ रोजी कार्य आदेशाचे पत्र दिले आहे.

**२) कोराडी युनीट - ६ चे नुतनीकरण व आधुनिकीकरण :**

कोराडी येथील युनीट ६ चे आधुनिकीकरण व नुतनीकरण करण्याचे काम आपल्या कंपनीने सुरु केले आहे. या प्रकल्पास जागतिक बँकेचे कर्ज मिळाले आहे. कर्जाच्या वैधतेची मुदत २९/३/२०१८ रोजी संपली. ती २९/९/२०१८ पर्यंत वाढवून घेतली. दुरुस्ती व देखभालीची कामे ऑगस्ट २०१५ मधे सुरु झाली असुन ती प्रगतीपथावर आहेत. वर्ष २०१७-२०१८ मध्ये खालील प्रमुख कामे करण्यात आली :

अ) बॉयलर हायड्रालिक परिक्षण - १९/११/२०१७ रोजी

ब) बॉयलर प्रज्वलन - २८/१२/२०१७ रोजी

क) बॅरींग गियर ऑपरेशन - १०/०१/२०१८ रोजी

**ब) भविष्यातील प्रकल्प :**

**उमरेड पीट हेड औष्णिक वीज निर्मिती केंद्र (१×८०० मे.वॅ.)**

उमरेड कोळसा खाणीच्या जवळ १ × ८०० मे.वॅ. क्षमतेचा वीज निर्मिती प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव महानिर्मितीने तयार केला आहे. त्यासाठी सल्लागारांना १५/०६/२०१७ पासुन पत्रे देऊन प्रकल्पाचा जीवन क्षमतेचा पूर्व अभ्यास, शक्यता अहवाल आणि तपशील प्रकरण अहवाल देण्यास सांगितले होते. सल्लागाराने सादर केलेला प्रकल्प शक्यतेचा अहवाल महानिर्मितीने स्वीकारला असुन तपशीलांचा प्रकल्प अहवाल तयार करणे चालू आहे.

**इतर प्रकल्प :**

**१) पाईप वहन योजना : चंद्रपूर - महा औष्णिक विद्युत केंद्र :**

महानिर्मिती कंपनीने डब्ल्यू सी एल भाताडी येथील कोळसा खाणी पासून पद्मापूर येथील विद्यमान वॅगन भरणा केंद्रापर्यंत ६००० टन कोळसा प्रतिदिन वाहून नेणारा ६.१ कि.मी. लांबीची पाईप वाहक योजना उभारणीचे काम सुरु केले आहे. ही पद्धती पर्यावरण स्नेही आणि रस्ता वाहतुकीस विश्वासार्ह पर्याय देणारी आहे.

- इ.पी.सी. कामाचे कंत्राट मे. थायसेनकृप, पुणे या कंपनीस दि.१४/२/२०१७ रोजी देण्यात आले.
- काम प्रगतीपथावर आहे. स्थापत्य कामे ४० टक्के पूर्ण झाली आणि तांत्रिक पुरवठा सुरु झाला.

- ही योजना १४ मे २०१८ रोजी पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र खाजगी जमीन संपादनात उद्‌भवलेल्या अडचणींमुळे या कामास ३०/०९/१९ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे.

**२) पाईप वहन योजना : कोराडी आणि खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रे :**

महानिर्मिती कंपनीने डब्ल्यू सी एल च्या गोंडेगाव, भानेगाव, इंदर आणि कामटी आणि सिनगोरी या ठिकाणच्या खाणीतून दररोज १६८०० टन कोळसा खापरखेडा व कोराडी वीज केंद्राला मिळावा यासाठी एकुण १९ कि.मी. लांबीच्या पाईपाद्वारे वहन रचना उभारणीचे काम सुरु केले. हा पर्यावरण स्नेही व रस्ता वाहतूकीस चांगला पर्याय आहे.

- या कामाचा इ.पी.सी. कंत्राट मे.आय.एस.जी.इ.सी हेवी इंडस्ट्रीज लिमिटेड नॉयडा यांना दि.१/२/१८ रोजी दिला.
- कामे प्रगतीपथावर आहेत. पोलादी संरचनेचा पुरवठा सुरु झाला. कोराडी व खापरखेडा येथे यासाठी बांधकामे सुरु झाली.
- डब्ल्यू सी एल च्या क्षेत्रात करावयाच्या अभियांत्रिकी कामे डब्ल्यू सी एल सोबत सामंजस्य करार झाल्यावर सुरु होतील.
- ही योजना दि.०१/११/२०१९ रोजी पूर्ण होण्याचे नियोजित केले आहे.

**३) महानिर्मितीच्या २५० मे.वॅ. व त्यावरील युनीट्‌ससाठी एफ जी डी प्रणाली :**

महानिर्मितीच्या संचालक मंडळाने कंपनीच्या विविध औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात खालील एफ.जी.डी प्रकल्प स्थापित व कार्यान्वित करण्यासाठी कृती कार्यक्रमाची अंमलबजवणी करण्यास तत्वतः मान्यता दिली आहे. संदर्भ क्र. एम एस पी जी सी एल / सी एस / बी एम १७२ / १७२.६ दि. २२/८/२०१७ :

| अनु.क्र. | तपशील | युनीट | मे.वॅ. |
|---|---|---|---|
| १ | चंद्रपूर २ × ५०० मे.वॅ. | ८ आणि ९ | १००० |
| २ | चंद्रपूर ३ × ५०० मे.वॅ. | ५, ६ आणि ७ | १५०० |
| ३ | भुसावळ २ × ५०० मे.वॅ. | ४ आणि ५ | १००० |
| ४ | पारस २ × २५० मे.वॅ. | ३ आणि ४ | ५०० |
| ५ | परळी ३ × २५० मे.वॅ. | ६, ७ आणि ८ | ७५० |
| ६ | खापरखेडा १ × ५०० मे.वॅ. | ५ | ५०० |
| | **एकूण औष्णिक विद्युत केंद्रातील १३ युनीटस्** | | **५२५०** |

**४) पारस युनीट ३ व ४ राख हाताळणी प्रकल्प विस्तार वाढ :**

पारस येथील युनीट ३ व ४ (२ × २५० मे.वॅ.) येथील तळातील राखेचा गाळ व फ्लाय अ‍ॅश काढण्याच्या पंपींग व पाईपींग सिस्टमची क्षमता वाढविण्याचे काम मेसर्स मॅक्वबर बी के इंडीया प्रायव्हेट लिमिटेड नॉयडा यांना दि.३/३/१७ रोजी देण्यात आले. कंत्राटानुसार काम पूर्ण करण्याची मुदत १५/१२/२०१८ होती. प्रकल्पाचे कार्यान्वयन डिसेंबर २०१८ मधे अपेक्षित होते. कामे प्रगतीपथावर आहेत त्यांची सद्यस्थिती अशी :-

- अभियांत्रिकी तपशीलवार कामे ९० टक्के पूर्ण
- साहित्य पुरवठा - ६० टक्के पूर्ण
- स्थापत्ये कामे चालू - ५ टक्के पूर्ण

## सौर वीज निर्मिती

**महानिर्मितीने स्थापन केलेले सौर वीज प्रकल्प**

| अनु. क्र. | प्रकल्पाची जागा | क्षमता (मे.वॅ.) | कार्यान्वयनाची तारीख | अपेक्षित निर्मिती दशलक्ष युनिट/प्रति वर्ष | कार्यान्वयनापासून मार्च २०१८ पर्यंतची वीज निर्मिती दशलक्ष युनिट |
|---|---|---|---|---|---|
| १ | चंद्रपूर | १ | ०९.०४.२०१० | १.५६७ | ५.२५२ |
| २ | चंद्रपूर | २ | १२.०२.२०१२ | ३.३६६ | १०.३४० |
| ३ | चंद्रपूर | २ | १८.१०.२०११ | २.९१९ | ११.३७६ |
| ४ | शिवाजीनगर, ता.साक्री, जि.धुळे | ५० | २९.०३.२०१३ | ८२.१७ | ३१८.८५७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | शिवाजी नगर, ता.साक्री, जि.धुळे | ७५ | २९.०३.२०१३ | १२४.२४५ | ४७९.६४१ |
| ६ | शिरसूफल, ता. बारामती, जि.पुणे | ३६ | १९.१२.२०१४ | ५९.२०२ | २००.११६ |
| ७ | शिरसूफल, ता. बारामती, जि.पुणे | १४ | ३१.०३.२०१५ | २२.७७ | ६६.३०२ |

- **महाराष्ट्र शासनाचे धोरण :**

  महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागाने एक नवीकरण योग्य ऊर्जा धोरण - २०१५ प्रकाशित केले. या धोरणानुसार ७५०० मे.वॅ. क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प निर्माण करणे त्यामधील २५०० मे.वॅ. महानिर्मिती कंपनी मार्फत सार्वजनिक - खाजगी - भागीदारी पद्धतीतून विकसित केले जातील व नवीनकरण योग्य वीज निर्मितीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात येईल. उर्वरित ५००० मे.वॅ.चे प्रकल्प इतर विकासकांतर्फे केले जातील.

- **कार्यपद्धतीचे अंतिमीकरण :**

  महानिर्मितीच्या संचालक मंडळाने सौर वीज प्रकल्पाच्या विविध प्रकारच्या अमलबजावणीच्या कार्यपद्धतींना मंजुरी दिली व प्रत्येकाची क्षमता निश्चित केली ती अशी:

| अनु. क्र. | कार्यपद्धती | क्षमता (मे.वॅ.) | वर्णन |
|---|---|---|---|
| १ | स्पर्धात्मक बोली | १००० | महानिर्मिती महाराष्ट्र शासनाकडून जमीन मिळवून खाजगी विकासकांना भाड्याने देण्यात येईल. जमिनीच्या खर्चावर आधारित महसूलाची योग्य विभागणी आणि समभागात रुपांतरणाचा विचार केला जाईल. |
| २ | प्रकल्प आधारित शेतीसाठी वीज वाहिन्या | १५०० | महाराष्ट्र शासनाचा निर्णय सौर प्रकल्प -२०१६ / प्र.क्र.३५४ / ऊर्जा -७ दि.१४/०६/१७ - "मुख्यमंत्र्यांची शेतकऱ्यांसाठी सौर कृषी वाहिनी योजना" |
| ३ | इ.पी.सी. | ५०० | महानिर्मितीच्या ताब्यातील जमिनींवर महानिर्मिती इ.पी.सी. प्रकल्प सुरु करील |
| ४ | नवीन कल्पना / प्रकार | २५० | महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागांसोबत नवीन तंत्रज्ञानाच्या वापराने अमलबजावणी करणे |
| ५ | सौर उद्याने | ९५० | महाराष्ट्र राज्यात विविध जागेवर केंद्र शासनाची सौर उद्यानयोजनेनुसार सौर उद्याने विकसीत करणे - खाजगी विकासक स्पर्धात्मक बोलीमध्ये भाग घेतील. |

  महाराष्ट्र सूत्रधारी कंपनीने ही कार्यपद्धती मंजूर केली आहे.

- **स्पर्धात्मक बोलीद्वारे आणि कृषि वाहिनी आधारित प्रस्तावित प्रकल्प :**
- **मा.मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना :**

**वर्णन :**

- मा.मुख्यमंत्री कृषि आधारित योजना दि.१४.०६.२०१७ ची वैशिष्ट्ये
  १. शेती ग्राहकांना कमी खर्चाची वीज उपलब्ध करुन देणे
  २. दिवसा वीज उपलब्ध करणे
  ३. औद्योगिक आणि वाणिज्यक ग्राहकांची क्रॉस सबसिडी कमी करणे.
- महानिर्मिती कंपनी, मेडा ही संस्था आणि महावितरण यांच्या सहकार्याने पी.पी.पी. पद्धतीद्वारे राळेगण सिद्धी (अहमदनगर जिल्हा) आणि कोळम्बी (यवतमाळ जिल्हा) येथे पथदर्शक प्रकल्प सुरु करील.
- राज्यात ११ केव्ही आणि १३२ के व्ही च्या उपकेंद्र पासून ३ कि.मी. (अपवादात ५ कि.मी.) त्रिज्येच्या परिघात सौर ऊर्जा प्रकल्प स्थापन करणे. कृषि वाहिन्यांवरील (जेथे त्या विलग केल्या आहेत तेथे) भारानुसार सौर वीज प्रकल्पाची क्षमता निश्चित केली जाईल.
- राज्य शासन / अन्य प्राधिकरणे यांची सर्व शूल्के / आकार / उपकर इ. या प्रकल्पांना माफ केले जातील.
- **१५०० मे.वॅ. कृषि वाहिनी :**

  **महानिर्मितीने महाराष्ट्रात विविध जागी १५०० मे.वॅ. कृषि वीज वाहिनी सौर वीज प्रकल्प स्थापन करण्याचे ठरविले आहे.**

➢ **संस्थेच्या जबाबदाऱ्या :**

**१. महानिर्मिती :**

अ) महानिर्मिती टप्पा १ - २०० मे.वॅ. प्रकल्पासाठी जमीन व पायाभूत सुविधा विकसीत करील.

ब) टप्पा -२-३०० मे.वॅ. आणि टप्पा - ३ ५० मे.वॅ. यातील जमीन व पायाभूत सुविधा या सौर वीज विकासक व्याप्ती मधे आहेत.

क) महानिर्मितीने महावितरण सोबत पी एस ए आणि एस पि डी बरोबर २५ वर्षासाठी संबंधीत बोलीदार उलट बोली प्रक्रीयेतील सर्वात कमी दराने वीज खरेदी करार करील.

**२. महावितरण :**

अ) महावितरण टप्पा - १ प्रकल्प २०० मे.वॅ. साठी वीज बाहेर घेण्याची सुविधा करील.

ब) वीज बाहेर काढण्याचा खर्च मेडा हरीत उपकर निधीतून करील.

क) टप्पा - २ - ३०० मे.वॅ. आणि टप्पा - ३- ५० मे.वॅ. साठी वीज बाहेर नेण्याच्या व्यवस्था विकासक करतील.

**३. मेडा (महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण)**

अ) मेडा या प्रकल्पाची नोंदणी ''मुख्यमंत्री कृषि वाहिनी योजना'' अंतर्गत विनामूल्य करील आणि वीज बाहेर काढण्याच्या व पायाभूत सुविधा विकासासाठी व्ही.जी.एफ. हे सौर प्रकल्प टप्पा-१ साठी पुरवेल.

**४. सौर प्रकल्प विकासक :**

अ) सौर प्रकल्प विकासक हे प्रकल्प संचालन सुव्यवस्थेसह २५ वर्षासाठी विकसीत करील. (कार्यान्वयनाच्या तारखेपासून)

**अ) स्पर्धात्मक बोली पद्धती आणि कृषि वाहिनी आधारित प्रकल्प या अंतर्गत खालील सौर प्रकल्प सुचविण्यात आले आहेत :**

**अ) कोळंबी आणि राळेगणसिद्धी पथदर्शक प्रकल्प (प्रत्येकी २ मे.वॅ.)** - महानिर्मितीने २ मे.वॅ. क्षमतेचे सौर आधारित कृषि वाहिन्यांचे दोन प्रकल्प अनुक्रमे राळेगणसिद्धी जि.अहमदनगर, (पी पी पी पद्धतीने) आणि कोळंबी (जि.यवतमाळ) येथे स्थापित केले. हे प्रकल्प संकलित करुन वीज जाळ्याशी २४/८/१८ रोजी जोडण्यात आले. यासाठी पी एस ए करार महावितरण व महानिर्मिती यांच्यात २८/८/१८ रोजी झाला.

**ब) राळेगणसिद्धी जिल्हा अहमदनगर येथील प्रकल्पाचा ३ मे.वॅ. विस्तार** - राळेगणसिद्धी येथील शेतीची प्रकल्प भार लक्षात घेऊन तेथील प्रकल्पाची क्षमता ३ मे.वॅ. ने वाढविण्याचा प्रस्ताव आहे. याची बोली प्रक्रीया चालू आहे.

**क) (टप्पा -१ : एकत्रित २०० मे.वॅ.)- विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्र (प्रत्येकी ५० मे.वॅ.):** महानिर्मितीने विदर्भ, उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्र यामधे पी पी पी मॉडेल मधुन कृषि वीज वाहिन्यां सौर विजेचा पुरवठा २५ वर्षे करण्यासाठी प्रत्येकी ५० मे.वॅ. क्षमतेचे प्रकल्प विकसित करण्यासाठी स्वीकारपत्रे दिली आहेत. विदर्भ, उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्र या विभागासाठी मे.संगम ॲडव्हाय जर्स लिमिटेड यांना आणि मराठवाडासाठी मे. पूजा एंटरटेनमेंट इंडिया लिमिटेड यांना पत्रे दिली.

**ड) टप्पा -२ : विदर्भ, मराठवाडा, आणि पश्चिम महाराष्ट्र (एकूण ३०० मे.वॅ.)** - महानिर्मिती कंपनी विदर्भ मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या विभागात वीज जाळ्या सोबत जोडली जाणारी प्रत्येकी ५० मे.वॅ. सौर वीज क्षमता विकसित करीत असून ती कृषि वीज वाहिन्यांना सौर विजेचा पुरवठा २५ वर्षे करील. ही क्षमता पी.पी.पी. मॉडेलनुसार विकसीत केली जाईल. प्रत्येकी ५० मे.वॅ. साठी पुढीलप्रमाणे स्वीकार पत्रे दिली आहेत. मे.आझूरे पॉवर इंडिया यांना पश्चिम महाराष्ट्रातील 'बी' हा भाग, विदर्भातील 'ए' व बी भाग आणि मराठवाडा यासाठी पत्रे दिली. महावितरण कंपनीकडून वीज दरासाठी समती घेतली आणि मे.आझूरे पॉवर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांचेकडून रिव्हर्स बिडींग मिळविण्यात आले. ते असे - विदर्भ 'अ' भाग (₹ ३.०८ / के.डब्ल्यू.एच) विदर्भ 'ब' (₹ ३.००/ के.डब्ल्यू.एच) मराठवाडा (₹ ३.०२ / के.डब्ल्यू.एच)

यावर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची समती मिळविण्यासाठी महावितरणने विनंती अर्ज सादर केला आहे. (सौर प्रकल्प मुख्यमंत्री कृषि वाहिनी साठी सौर वीज योजना क्षमता १५० मे.वॅ. अंतर्गत) पुढील कार्यवाही चालू आहे.

**इ) टप्पा - ३ ए ५० मे.वॅ. उत्तर महाराष्ट्र :** उत्तर महाराष्ट्रातील कृषि वीज वाहिन्यांना सौर वीज पुरविण्यासाठी महानिर्मिती कंपनी ५० मे.वॅ. क्षमतेचा वीज जाळ्याशी निगडीत सौर ऊर्जा प्रकल्प विकसीत करेल. त्याची बोली प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. महावितरणने यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे मंजुरीसाठी विनंती अर्ज सादर केला आहे. (मुख्यमंत्री कृषि वीज वाहिनीसाठी सौर वीज पुरवठा) पुढील कामे चालू आहेत.

**फ) खाजगी जमिनीसाठी इ ओ आय (१०० मे.वॅ.)-** विदर्भ, मराठवाडा, पश्चिम व उत्तर महाराष्ट्र या क्षेत्रांत कृषि वीज वाहिन्यांचा भार सौर वीज प्रकल्प / अन्य १०० मे.वॅ. क्षमतेचे प्रकल्प यातून पुरविण्यासाठी पथदर्शक तत्त्वावर सुरु करण्यासाठी महानिर्मिती कंपनीने स्वारस्य प्रकटनाची प्रक्रीया केली.

रिव्हर्स बिडींग प्रक्रीये दरम्यान खालील बोलीदारांनी सर्वात कमी दर दिले.

| बोलीदाराचे नाव | क्षमता | दर ₹ प्रती युनीट |
|---|---|---|
| मेसर्स श्री श्री फार्मर्स पॉवर जन. को.ऑप. सोसायटी लि. | २ मे.वॅ. | ₹ २.९३ / युनीट |
| मे. थिंक एनर्जी पार्टनर्स सोलर इंडिया एल एल सी | १०० मे.वॅ. | ₹ ३.१० / युनीट |
| मे. जी आर ओ सोलर एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड | ५ मे.वॅ. | ₹ ३.१८ / युनीट |
| मे. शापूरजी पालॉनजी इन्फ्रास्ट्रक्चर कॅपीटल कंपनी प्रा.लि. | ५० मे.वॅ. | ₹ ३.१८ / युनीट |

मे. श्री श्री शेतकरी ऊर्जा निर्मिती सहकारी संस्था लि. (₹ २.९३ / युनीट) यांच्या रिव्हर्स आणि मे.थिंक एनर्जी पार्टनर्स कंपनी यांच्या रिव्हर्स बिडींग करून दर मिळाल्यानंतर (₹ ३.१०/युनीट) महावितरण कडून पी एस ए करण्यासाठी संमती मिळविण्यात आली. महावितरणने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे मंजरीसाठी विनंती अर्ज सादर केले. (कृषि वीज वाहिनीसाठी बोलीदाराच्या जागेवर १०२ मे.वॅ. क्षमतेचे सौर वीज प्रकल्प उभारण्यासाठी) पुढील कामे चालू आहेत.

**ग) ग्रिन शू अंतर्गत कृषि वाहिन्यांसाठी ७५० मे.वॅ. + २५० मे.वॅ. चे प्रकल्प :** महाराष्ट्रात ग्रिन शू या पर्यायातून ७५० मे. वॅ. चे संचीत सौर विजेचे आणि त्यांची क्षमता २५० मे.वॅ. ने वाढविण्याचे प्रकल्प उभारण्यात येतील यासाठी निविदा दि.२०/६/१८ रोजी प्रसिद्ध केली. पुढील प्रक्रीया चालू आहे.

## ब) इ पी सी पद्धतीच्या सौर प्रकल्पांचे प्रस्ताव :

**अ) ५० मे.वॅ. कौडगाव जि. उसमानाबाद:** इ पी सी पद्धती अंतर्गत -महानिर्मिती ५० मे.वॅ. क्षमतेचा सौर प्रकल्प कौडगांव जि. उस्मानाबाद येथे उभारत आहे. बोली प्रक्रीयेमधे मे. बी एच इ एल यांनी सर्वात कमी ₹ ४.२५ कोटी / मे.वॅ. असा दर दिला. महानिर्मितीने महावितरणला ₹ ३.०० / के डब्ल्यू एच या प्रस्तावित दराने वीज खरेदी करार करण्याची विनंती केली. त्यावर महावितरणने कौडगाव (जि.उस्मानाबाद) यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मंजुरीच्या अधीन राहून संमती दिली. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे विनंती अर्ज पाठविण्याची प्रक्रीया चालू आहे.

**ब) साक्री जि. धुळे येथील २५ मे.वॅ. प्रकल्प:** साक्री येथे उपलब्ध असलेल्या जादा ४४ हेक्टर जमीनीवर २५ मे.वॅ. चा प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव आहे.

## क) नव्या पद्धतीचे प्रस्तावित सौर प्रकल्प खालीलप्रमाणे :

**अ) महाऔष्णिक केंद्रातील राख बंधाऱ्यावर १०० मे.वॅ.प्रकल्प** - चंद्रपूर येथील महाऔष्णिक प्रकल्पाच्या राखेच्या जागेवर (ॲश बंड) १०० मे.वॅ. क्षमतेचा सौर विजेचा प्रकल्प उभारण्यासाठी स्वारस्याची अभिव्यक्ती मागविण्याची सूचना प्रकाशित केली.

**ब) सोलर मोड्यूल्स उत्पादनाचे कारखाने:** महाराष्ट्रात सौर विजेसाठी सोलर मोड्यूल्सच उत्पादन करणारे कारखाने स्थापन करण्यासाठी स्वारस्याची प्रकटने मागविण्यासाठी सूचना प्रसिद्ध करण्यात आली पुढील कामे चालू आहेत.

**क) शेतीच्या उद्यानांसाठी सौर वीज प्रकल्प (१० मे.वॅ.)** - महाराष्ट्रात ग्रिन हाऊस / पॉली हाऊस यांच्यासाठी १० मे.वॅ. क्षमतेचे सौर विजेचे प्रकल्प उभारणे आणि तेथे शेती उत्पादन करणे. तसेच २५ वर्ष मुदतीत संचालन व सुव्यवस्था करणे. यासाठी पथदर्शक तत्त्वावर प्रकल्प उभारणीसाठी स्वारस्याची अभिव्यक्ती, महानिर्मितीने मागविली आहे.

## ड) सौर वीज उद्यांनाचे सौर प्रकल्प खालील ठिकाणी उभारण्याचे प्रस्ताव आले.

**अ) दोंडायचा सोलर पार्क ५०० मे.वॅ. :**

- भारत सरकारच्या नवीन व नवकरणीय ऊर्जा मंत्रालयाने दोंडायचा येथे ५०० मे.वॅ. क्षमतेचे सौर उद्याने उभारण्यास तत्त्वतः संमती दिली आहे.
- यासाठी सुमारे ८२४.९४ हेक्टर जमीन निश्चित केली असून त्यापैकी ५२१.८१ हेक्टर ही यापूर्वीच महानिर्मितीच्या ताब्यात आहे आणि उर्वरित ३०३.१३ हेक्टर जमीन ताब्यात घेण्याची प्रक्रिया चालू आहे. वरील ८२४.९४ हेक्टर जमीनी व्यतिरिक्त प्रकल्पासाठी जवळची आणखी १९० हेक्टर जमीन आवश्यक आहे. संपादनासाठी प्रयत्न चालू आहेत.
- ५.४४ हेक्टर जमीन महापारेषण कंपनीकडे सूपूर्द केली. यावर 'बलसाणे' येथे ४००/२२० केव्ही क्षमतेचे वीज उपकेंद्र

आणि २२०/३३ केव्हीचे पुलींग सबस्टेशन बांधण्यात येतील. ४००/२२० केव्ही बलसाणे उपकेंद्र वर्ष २०२१-२२ मध्ये पूर्ण होईल. दरम्यान महापारेषण २५० मे.वॅ साठी लिलो या रचनेतून वीज बाहेर नेण्याची हंगामी व्यवस्था उपलब्ध करून देणार आहे.

- या ५०० मे.वॅ. सौर वीज उद्यानाच्या विजेचे वीज जाळ्यात जोडणी करण्यास महापारेषण कंपनीने तत्त्वतः मान्यता दिली आहे.
- वीज बाहेर काढण्याच्या उपरोक्त मर्यादांमुळे, ५०० मे.वॅ. दोंडायचा हे सौर वीज उद्यान खालील दोन टप्प्यात पूर्ण केले जाईल.

  १) टप्पा -१-२५० मे.वॅ. - मार्च २०२० पर्यंत

  २) टप्पा - २-२५० मे.वॅ. वर्ष २०२१-२२ मधे
- टप्पा -१ - २५० मे.वॅ. सौर वीज उद्यान प्रकल्पाच्या पायाभूत सुविधांसाठी ₹ १६६.०८ कोटी खर्च होतील. त्यात केंद्रिय नवकरणीय ऊर्जा मंत्रालयाचे अर्थसहाय्य ₹ ३० कोटी आहे. ते १२.०० लाख / प्रती मेगा वॅट या दराने असेल. याशिवाय महाराष्ट्र शासनाचे समभाग ₹ २०.४१ कोटीचे असतील.

**ब) वाशिम सौर उद्यान - क्षमता १७० मे.वॅ. :**

- खालील ५ ठिकाणी १७० मे.वॅ. क्षमतेची सौर उद्यान विकसीत करण्याचा प्रस्ताव आहे. दि.२१/०६/२०१८ रोजी नव व नवकरणीय ऊर्जा मंत्रालयाने या सौर उद्यानास तत्त्वतः मान्यता दिली आहे. त्याचा तपशीलवार अहवाल तयार करण्यासाठी या मंत्रालयाकडून ₹ १५.०० लाखाचा अग्रिम (सी एफ ए) मिळाला आहे.
- बाभूळगाव (२० मे.वॅ.), पारडी-ताकमोर (३० मे वॅ), सायखेडा (२० मे वॅ) दुधखेडा (६० मे वॅ) आणि कानझरा (४० मे वॅ)
- अहवाल तयार करण्यासाठी मे. तूल्स कार्पो प्रायव्हेट लिमिटेड यांची निवड केली असुन कामास प्रारंभ झाला आहे.

**क) यवतमाळ सोलर पार्क - (क्षमता ७५ मे वॅ) :**

- खालील तीन जागेवर ७५ मे.वॅ. क्षमतेचे प्रस्ताव केले आहेत. दि.२१ जून २०१८ रोजी नवीकरण ऊर्जा मंत्रालयाने त्यास तत्त्वतः मान्यता दिली. त्यासाठी मंत्रालयाने ₹ १० लाखाचा अग्रिम हा अहवाल तयार करण्यसाठी दिला.
- मंगला देवी (२५ मे वॅ), पिंपरी - इजारा (२५ मे वॅ), मालखेड (२५ मे वॅ)
- अहवाल तयार करण्यासाठी मे.टी. यू. व्ही एस यू डी (दक्षिण आशिया) यांची निवड केली.

**ड) लातूर सौर उद्यान क्षमता ६० मे.वॅ. :**

- लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यात 'सिंदाला लोहारा' या गावी ६० मे.वॅ. क्षमतेचा सौर वीज प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव आहे. केंद्राच्या नवीकरण ऊर्जा मंत्रालयाने त्यास २१ जुन २०१८ रोजी तत्त्वतः मान्यता दिली असुन, त्यांचेकडून अहवाल तयार करण्यासाठी ₹ १०.०० लाखाचे साह्य मिळाले.
- मे. टी.यु.व्ही.-एस.यू.डी. (दक्षिण आशिया) यांची अहवाल तयार करण्यासाठी निवड केली आहे.

**इ) कचराला सौर उद्यान १४५ मे.वॅ.**

- चंद्रपूर जिल्ह्याच्या भद्रावती तालूक्यात 'कचराला' या गावी १४५ मे.वॅ. क्षमतेचे सौर वीज उद्यान उभारणीचा प्रस्ताव केला आहे. हा प्रस्तावा दि.२९/०६/२०१८ रोजी महाराष्ट्र शासनाला सादर केल्यानंतर त्यांनी तो दि.३/०८/२०१८ रोजी नवीकरण ऊर्जा मंत्रालयाकडे पाठविला.

## नवीन प्रकल्पासाठी निधी :

नियोजित क्षमता वाढीच्या सर्व प्रकल्पांना कर्ज व समभाग याप्रकारे वित्त पुरवठा ८०:२० या गुणोत्तरात केला जाईल. आपली कंपनी तिची महसूल संसाधने उपलब्ध रोखीच्या प्रमाणात वापरून या विस्तार प्रकल्पामधे समभागाचे अंशदान करील. एकूण प्रकल्प खर्चाच्या ८० टक्के निधी वित्तीय संस्था आणि बँकातून उभा केला उर्वरित २० टक्के समभाग महाराष्ट्र शासनाकडून मिळतील.

## इंधन सुरक्षा :

### अ) इंधन पुरवठा करार :

महानिर्मितीने कोळसा कंपन्यांशी पुरवठ्याचे करार केले आहेत. औष्णिक विद्युत केंद्रे निहाय जोडणी खालीलप्रमाणे: आर्थिक वर्ष २०१७-१८ मधील माहिती अशी (संस्था : एम एम टी पी ए मधे)

| औष्णिक विद्युत केंद्राचे नाव | डब्ल्यू सी एल | एम सी एल | एस इ सी एल | एस सी सी एल | एफ एस ए संख्या |
|---|---|---|---|---|---|
| चंद्रपूर | ११.८९ | ० | ०.९१ | ० | १२.८ |
| कोराडी | ०.५ | १.१ | १.८५१ | ० | ३.४५१ |
| खापरखेडा | १.४३२ | ३.८७९ | २.००१ | ० | ७.३१२ |
| नाशिक | २.३५४ | ० | ०.७२४ | ० | ३.०७८ |
| भुसावळ | ४.४५१ | ० | २.३१२ | ० | ६.७६३ |
| परळी | ३.४१९ | ० | ० | २.२६* | ५.६७९ |
| पारस | २.५०३ | ० | ० | ० | २.५०३ |
| **एकूण** | **२६.५४९** | **४.९७९** | **७.७९८** | **२.२६** | **४१.५८६** |

* एफ एस ए वर अद्याप स्वाक्षरी केलेली नाही.

### ब) जोडणीचे सामंजस्य करार :

आर्थिक वर्ष २०१७-१८ मधे पुरवठा जोडणी व संख्या खाली दिली आहे.

| औष्णिक विद्युत केंद्राचे नाव | डब्ल्यू सी एल (जी ८ - जी १०) एम एम टी मधे | एस सी सी एल (जी ९) एम एम टी मधे | आर्थिक वर्ष २०१७-१८ मधे एकूण |
|---|---|---|---|
| **वर्ष** | **१७-१८** | **१७-१८** | **१७-१८** |
| कोराडी ३ × ६०० मे.वॅ. (८०% डब्ल्यु सी एल कडुन) (२०% एस सी सी एल कडून) | ५.२०८ | १.३ | ६.५०८ |
| चंद्रपूर २ × ५०० मे.वॅ. | ३.४७ | ०० | ३.४७ |
| परळी १ × २५० मे.वॅ. | ०० | ०.८६५ | ०.८६५ |
| अल्प मुदतीचे सामज्यस करार | २.०० | ३.०० | ५.०० |
| **एकूण** | **१०.६७८** | **५.१६५** | **१५.८४३** |

### क) महानिर्मितीला आर्थिक वर्ष २०१७-१८ मधील कोळसा पुरवठा :

कोळसा कंपनी निहाय जोडणी आणि त्यासोबत प्रत्यक्ष प्राप्ती व टक्केवारी याची माहिती अशी: (पुरवठा जोडणी समाविष्ट)

| कोळसा पुरवठा स्त्रोत | जोडणी करार | प्राप्ती (प्रत्यक्ष) | प्रकार प्राप्तीची टक्केवारी मधे |
|---|---|---|---|
| डब्ल्यू सी एल | ३८३०१ | २५३४५ | ६६.१७ |
| एम सी एल | ४५९२ | २५३२ | ५५.१३ |
| एस इ सी एल | ७५५५ | १९५७ | २५.९१ |
| एस सी सी एल | ६१२३ | ३७४५ | ६१.१६ |
| आयात कोळसा | ० | ० | ०.०० |
| **महानिर्मिती एकूण** | **५६५७१** | **३३५७९** | **५९.३६** |

### १) आयात कोळसा :

महानिर्मितीच्या औष्णिक विद्युत केंद्राची कोळशांची एकूण गरज मागणी आणि प्रत्यक्ष झालेला पुरवठा यातील फरक भरुन काढण्यासाठी कोळसा आयात करण्यास परवानगी मिळावी म्हणून केंद्रिय विद्युत प्राधिकरण, वीज मंत्रालय, भारत व महाराष्ट्र शासन यांचेकडे पत्रव्यवहार करण्यात आला. त्यास केंद्रिय विद्युत प्राधिकरण आणि वीज मंत्रालय, भारत सरकार यांनी अनुक्रमे २७/०४/२०१८ आणि ४/०७/२०१८ रोजी तत्त्वतः मान्यता दिली. महाराष्ट्र शासनानेही १३/०७/२०१८ रोजी मागणीस पाठिंबा दिला. त्यानुसार कोराडी, चंद्रपूर आणि भुसावळ केंद्रांसाठी परदेशातून २ एम एम टी कोळसा आयात करण्यासाठी निविदा सूचना भारतीय तसेच जागतिक -

आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रात अनुक्रमे २५/०८/२०१८ आणि ३०/०८/२०१८ रोजी प्रकाशित करण्यात आल्या. ऑन लाईन तांत्रिक वाणिज्य बोली व त्याची प्रत्यक्ष कागदपत्रे २६/०९/२०१८ रोजी उघडण्यात आली त्यांचे तांत्रिक वाणिज्य छाननीचे काम चालू आहे.

**२) उरण येथील विद्यमान निर्मिती केंद्रास वायू पुरवठा :**

स्थापित क्षमता : ६७२ मे.वॅ. (जी टी - ४ × १०८ मे.वॅ.) + (डब्ल्यु एच आर पी २ × १२० मे.वॅ.)

वायूची गरज : ३.५ एम एम एस सी एम डी

मे.गेल सोबत डी सी क्यू : ३.५ एम एम एस सी एम डी (एकूण उत्पादनाचे प्रमाण)

'ए पी एम' या वायूचे पुरवठा कमी झाल्याने मे. गेल कडून प्रत्यक्ष आवश्यक पुरवठा ३.५ एम एम एस सी एम डी पेक्षा खूप कमी आहे. याशिवाय आर.आयू.एल - के.जी. बेसीन यांचा पुरवठा १ मार्च २०१३ पासून थांबला आहे.

नॅचरल गॅस (नैसर्गिक वायू) याचा मे. गेल येथून होणारा पुरवठा मे. ओ एन जी सी कडून होणाऱ्या वरील उपलब्धतेवर अवलंबून असल्याने तो कमी - जास्त प्रमाणात उपलब्ध होतो. ए पी एम वायूची कमतरता असल्याने, महानिर्मितीने - ए पी एम व्यतिरिक्त अन्य वायू स्वीकारण्यास दि.१० एप्रिल २०१४ पासून सुरुवात केली.

मागील काही वर्षातील वायू केंद्रे उरण येथील सरासरी वायू प्राप्ती खालीलप्रमाणे आहे:

| आर्थिक वर्ष | सरासरी वायू प्राप्ती (एम एम एस सी एम डी) | | |
|---|---|---|---|
| | ए पी एम वायू | ए पी एम व्यतिरिक्त अन्य | एकूण वायू प्राप्ती |
| २०१४ - १५ | १.५५ | ०.७३ | २.२८ |
| २०१५ - १६ | १.५३ | ०.४४ | १.९७ |
| २०१६ - १७ | १.८० | ०.४० | २.२० |
| २०१७ - १८ | २.१५ | ०.००२१ | २.१५२१ |
| २०१८-१९ (एप्रिल ते सप्टेंबर २०१८) | १.८५२ | ० | १.८५२ |

याशिवाय १ ऑक्टोबर २०१८ पासून पेट्रोलियम व नॅचरल गॅस मंत्रालय, भारत सरकार यांनी देशातील नैसर्गिक वायूची किमत ३.३६ यू एस डी / एम एम बी टी यू - जी सी व्ही (१ ऑक्टोबर २०१८ ते ३१ मार्च २०१८ साठी) वाढविला. यापूर्वी ती ३.०६ यु एस डी / एम एम बी टी यू - जी सी व्ही (१ एप्रिल २०१८ ते ३० सप्टेंबर २०१८ साठी) अशी होती.

देशातील वायू कमी उपलब्ध असल्याने महानिर्मितीने पर्यायी स्त्रोतांचा शोध घेतला आणि मे.गेल सोबत स्पॉट गॅस सेल करार दि.१८/०१/२०१७ रोजी केला व त्यातून स्पॉट गॅस (नॅचरल गॅस / रिगॅसीफाईड लिक्वीड नॅचरल गॅस) उरण केंद्रासाठी घेण्यात प्रारंभ केला. त्यामुळे वायू टंचाई काळात पर्याप्त वीज निर्मिती करता येईल. त्यापूर्वी त्याची आर्थिक वित्तीय जीवक्षमता विचारात घेण्यात येईल. वायू प्राप्तीत सुधारणा न झाल्यास वित्तीय वर्ष २०१८-१९ मधे १.३ ते १.५ एम एम एस सी एम डी ची तूट पडेल.

**महानिर्मितीची कोळसा साठ्याची गंभीर स्थिती सुधारण्यासाठी वित्तीय वर्ष २०१७-१८ मधील उपाय योजना**

- **रेल्वे मंडळासोबत बैठक दि.१५/०५/२०१७ :**
  - ➢ कोळशासाठी महानिर्मितीच्या औष्णिक विद्युत केंद्रात रेक उभारावेत यासाठी रेल्वे बोर्ड (नवी दिल्ली) येथे १५ मे २०१७ रोजी एक बैठक घेण्यात आली. यावेळी कोल इंडिया लिमिटेड डब्ल्यू सी एल रेल्वे आणि महानिर्मितीचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी कोल इंडिया यांनी आश्वासन दिले की, त्याच्या उपकंपन्या मार्फत २४.५ रेक्ची गरज (डब्ल्यू सी एल १८, एस इ सी एल ३.५ आणि एम सी एल -३) पूर्ण केली जाईल.
- **मा.सचिव, कोळसा मंत्रालय यांचे सोबत बैठक दि.३०/०६/२०१७**
  - ➢ मा.सचिव, कोळसा मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे ३०/०६/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत मा.सचिवांनी सूचना केली की, किमान २२ दिवस पुरेल इतका कोळसा साठा वीज उत्पादकांनी केला पाहिजे. महानिर्मितीच्या औष्णिक विद्युत केंद्रांना २२ दिवसांकरिता एकूण ३० लाख मेट्रीक टन कोळसा लागतो.
  - ➢ त्यानुसार महानिर्मितीने आपल्या औष्णिक विद्युत केंद्रात ३० लाख मेट्रीक टन कोळसा साठा करण्याची सज्जता केली. कमी मागणीचा काळ व पावसाळा या ऋतूत हा साठा करण्यात येतो. तसे कोल इंडियाच्या अध्यक्षांना कळविले.
  - ➢ मात्र तसे करूनही अपेक्षित स्तरावर कोळसा प्राप्ती झाली नाही. जून २०१७ ते सप्टेंबर २०१७ या काळात फक्त ५६ टक्के कोळसा प्राप्ती होऊ शकली. ही वस्तूस्थिती सुद्धा कोल इंडियांच्या अध्यक्षांच्या नजरेस आणली.

- **रस्त्याने आणि रस्ता व रेल्वे या दोन्ही मार्गाने कोळसा वाहतूक :**
  - ➢ मा.सचिव (कोळसा) कोळसा मंत्रालय, भारत सरकार, यांनी २१/०९/२०१७ रोजी सूचना केली की, कोळसा साठा करण्यासाठी रस्त्याने आणि रस्ते सह रेल्वे (आर सी आर) या मार्गे कोळसा वाहतूक करावी.
  - ➢ केंद्रिय वीज प्राधिकरणानेसुद्धा खाणीच्या भोवती ६० कि.मी. त्रिज्येच्या परिघातील क्षेत्रातील औष्णिक विद्युत केंद्रात अधिक कोळसा वाटप ठरवून दिले.
  - ➢ त्यानुसार महानिर्मितीने कोळसा वाहतूक रस्त्याने सुरु करून कोळसा प्राप्ती वाढविण्याचे काम सुरु केले त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यादेश दिले.

| अनु. क्र. | खाण जागा | औष्णिक विद्युत केंद्र | संख्या (एल एम टी) | प्रतिदिन संख्या (एम टी) |
|---|---|---|---|---|
| १ | इंदर | खापरखेडा | २.५ | ६९४ |
| २ | इंदर | कोराडी | १.० | ८३३ |
| ३ | गोंदेगांव | खापरखेडा | ६.० | १६६७ |
| ४ | गोंदेगांव | कोराडी | ४.० | २२२२ |
| ५ | भाने गांव | खापरखेडा | ५.० | १३८८ |
| **एकूण (लाख मेट्रीक टन)** | | | **१८.५** | **६८०४** |

- **मा.मुख्यमंत्री यांनी केलेला पत्र व्यवहार :**
  - ➢ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी महानिर्मितीला भेडसावणाऱ्या कोळशा टंचाई बाबत दि.०६/१०/२०१७ रोजी मा.कोळसा मंत्री भारत सरकार यांना पत्र दिले आणि या अपूर्ण साठ्यांमुळे महाराष्ट्रात कमी वीज निर्मिती होऊन भार नियमन करावे लागते या वस्तूस्थितीकडे लक्ष वेधले आणि मा.कोळसा मंत्र्यांना विनंती केली की त्यांनी संबधितांना सूचना देऊन महानिर्मितीच्या औष्णिक विद्युत केंद्राना कोळसा नियमितपणे करावा.
  - ➢ मा.प्रधान मंत्री, भारत सरकार यांनाही मा.मुख्यमंत्र्यांनी पत्र पाठवून महाराष्ट्रातील कोळसा पुरवठा सुधारणासाठी हस्तक्षेप करण्याची विनंती केली.
- **मा.मुख्यमंत्र्यांची दि.०७/१०/१७ रोजी आढावा बैठक :**
  - ➢ मा.मुख्यमंत्र्यानी दि.०७/१०/२०१७ रोजी कोळसाची कमतरता संदर्भात आढावा बैठक घेतली.
  - ➢ या बैठकीत कोल इंडिया कंपनीने महानिर्मितीला १,१९,००० एम.टी. कोळसा पुरविण्याचे आश्वासन दिले.
- **महानिर्मिती मुख्यालयात १७/११/२०१७ रोजी बैठक :**
  - ➢ दि.१७/११/२०१७ राजी प्रकाशगडात सकाळी ११.०० वा. बैठक झाली. त्यात कोल इंडियाचे मा.अध्यक्ष आणि अन्य अधिकारी उपस्थित होते. त्यात महानिर्मितीच्या नाशिक व भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रातील गंभीर कोळसा परिस्थिती वर चर्चा झाला. पुढील डिसेंबर व जानेवारी महिन्यात कमी मागणीच्या वेळी कोळसा पुरवठा कसा व्हावा यावर चर्चा झाली.
  - ➢ या बैठकीत डब्ल्यू सी एल या कंपनीने कोल इंडिया आणि एस सी सी एल यांच्या वतीने २६ रेक्स / प्रती दिन कोळसा रेल्वे मार्गाने पुरविण्याचे आश्वासन दिले. रोपवे मार्गाने तो पुढे ५००० एम टी ते ७००० एम टी असा वाढविण्याचे आणि एम.जी. आर. मार्फत २००० एम टी करण्यात येईल असे सांगितले.
  - ➢ संचालक (संचलन) यांनी सर्व कोळसा कंपन्यांना तसेच रेल्वे कार्यालयात वारंवार भेटी देऊन कोळसा पुरवठा व वापराची चौकट निश्चित केली

## वार्षिक परताव्याचा उतारा

कायद्यातील कलम ९२ चे उपकलम (३) अंतर्गत दिलेल्या 'वार्षिक विवरणपत्राचा उतारा संबंधीचा नमूना एम जी टी -९ यात दिला असून तो या संचालक अहवालाचे **परिशिष्ट - एक (१)** येथे जोडला आहे.'

**मंडळाच्या बैठकीची संख्या:**

२०१७-१८ या वर्षात महानिर्मिती कंपनीच्या संचालक मंडळाच्या एकूण ११ मंडळ बैठका पार पाडल्या.

**संचालकांच्या नियुक्तीचे धोरण :**

महानिर्मिती कंपनीचे संचालक आणि स्वतंत्र संचालक यांची नियुक्ती महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी लिमिटेड तर्फे करण्यात येते. कार्याची जबादारी सांभाळणाऱ्या संचालकांच्या नियुक्तीसाठी पात्रता आणि इतर निकष कंपनीच्या संस्थापना नियमावलीत नमूद केलेले आहेत.

**कलम १८६ अंतर्गत कर्ज हमी आणि गुंतवणूकींची माहिती :**

महानिर्मिती कंपनी ही पायाभूत सुविधांच्या व्यवसायात कार्य करणारी संस्था आहे. त्यामुळे कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १८६ नुसार, कर्जे, हानी किंवा दिलेल्या प्रतिभूती या संबंधीच्या कायदेविषयक तरतुदी महानिर्मितीला लागू नाहीत. महानिर्मितीने तिच्या उपकंपन्यांना प्रवर्तन कार्यासाठी कर्जे पुरविली आहेत. गुंतवणूकीबाबतची माहिती स्वायत्त वित्तीय विवरण पत्राची टिपणी क्र.३ यात सादर केली आहे.

**संबंधितांशी केलेल्या कंत्राटांची तपशील :**

महानिर्मिती कंपनीने निर्माण केलेली वीज तिचे एकमेव ग्राहक म्हणजे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड कंपनीस विकण्यात येते. महावितरण ही महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी लिमिटेड ची उपकंपनी आहे. या वीज विक्रीचे दर विद्युत अधिनियम २००३ च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग निश्चित करते.

**वित्तीय वर्ष समाप्ती आणि वित्तीय अहवालाच्या तारखे दरम्यान वित्तीय स्थितीवर परिणाम करणारे काही प्रत्यक्ष मोठे बदल झाले असल्यास त्याची माहिती :**

वित्तीय वर्ष समाप्ती व अहवालाची तारीख या मधल्या काळात वित्तीय स्थितीवर परिणाम करतील असे कोणतेही मोठे प्रत्यक्ष बदल आणि वचनबद्धता याचे प्रसंग झालेले नाहीत.

**मानव संसाधन व्यवस्थापन :**

कर्मचारी वृंद ही कोणत्याही संस्थेची सर्वात मौल्यवान मत्ता असते. म्हणून त्यांची सर्जनशीलता, नवे उन्मेष आणि उत्कृष्ट कामगिरी पार पाडण्याची उमेद आदी गुणांना प्रोत्साहक अनुकूल वातावरण आवश्यक आहे. महानिर्मिती कंपनीने आपल्या कर्मचाऱ्यांची पात्रता वाढविण्याकडे लक्ष केंद्रित केले आहे. सक्षम, प्रशिक्षित, अष्टपैलू व अभ्यासू कर्मचारी हे आपल्या कंपनीचे मोठे भांडवल आहे. असे कर्मचारी त्यांच्या पुढील जबाबदाऱ्यांची आव्हाने पार पाडू शकतात. आपली कंपनी संघटनात्मक उत्कृष्टता साध्य करण्यसाठी मानवी संसाधनाचा उपयोग करते. ''कर्मचारी व्यक्तींना प्रथम प्राधान्य'' असा दृष्टिकोन बाळगते कर्मचाऱ्यांच्या सामर्थ्याने कंपनी तिच्या उद्योग व्यवसायाच्या योजना पूर्ण करील असा दृढ विश्वास ठेवते.

**औद्योगिक संबंध :**

यावर्षभरात कंपनीने आपल्या कर्मचाऱ्यांशी संबंध स्नेहाचे व सुसंवादाचे ठेवले आहेत. कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात काम करण्यास प्रोत्साहने देण्यात आली. त्यांचे कल्याणाचे काम केले. कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधिसाठी कार्यशाळा घेतल्या. त्यात व्यवसायातील बदलते वातावरण कंपनीपुढील संधी, धोके व आव्हाने याविषयी जाणीव करून दिली. कंपनीतील औद्योगिक संबंध सलोख्याचे सुसंवादी आणि परस्पर विश्वासाचे होते.

**संचालक :**

या वर्षी दि.११/०८/२०१७ रोजी श्री.एस.जे.आंबेरकर यांची संचालक (वित्त) या पदावर श्री.जे.के.निवासन् यांच्या जागी निवड झाली. तसेच दि.१५/०६/२०१८ रोजी सौ.जुईली एम वाघ यांची संचालक पदी नियुक्ती झाली.

**लेखा परिक्षण समिती :**

महानिर्मितीच्या लेखा परिक्षण समितीत सर्वश्री विश्वास पाठक (अध्यक्ष), श्री.सी.एस.थोटवे आणि श्री.एस.जे.आंबेरकर या सदस्यांचा समावेश होता. लेखापरिक्षण समितीच्या वर्ष २०१७-१८ मध्ये एकूण ५ बैठका झाल्या.

**कंपनीची सामाजिक जबाबदारी :**

महानिर्मिती कंपनीने कंपनीची सामाजिक जबाबदारी (सी एस आर) यासाठी समितीची रचना केली आहे. या समितीमधे श्री.बिपीन श्रीमाळी (अध्यक्ष) असून श्री.सी.एस.थोटवे, श्री.व्ही.एम.जयदेव, श्री.एस.जे.आंबेरकर आणि श्री.श्याम वर्धने हे सदस्य आहेत. या समितीने व मंडळाने कंपनीच्या सामाजिक जबाबदारीच्या धोरणास मान्यता दिली. या धोरणात पुढील ध्येय व उद्दिष्टे आहेत.

१. प्रकल्पग्रस्त व्यक्ती (पी ए पी एस) यांची सामजिक - आर्थिक स्थिती सुधारणे

२. कायमस्वरूपी सुधारणांसाठीच्या संधी पुढील क्षेत्रात पुरविणे - उत्पन्नाची निर्मिती, आरोग्य, शिक्षण, पाणी व वीज, स्वच्छता, संवाद व इतर क्षेत्रे.

३. प्रकल्पग्रस्तांच्या सामुदायिक विकासासाठी व्यापक दृष्टीकोन बाळगणे आणि अशा क्षेत्रात प्रकल्पग्रस्तांना किमान त्यांची पूर्वीची जीवनशैली पुन्हा प्राप्त होईल याची हमी घेणे.

४. सामुदायिक विकासाची कामे पारदर्शक व सहभागाच्या पद्धतीने अमलात आणणे.

५. स्थानिक लोक प्रतिनिधींच्या सहभागाने व सल्ल्याने समितीच्या कामाचे आयोजन करण्याची हमी घेणे आणि प्रकल्पाग्रस्त क्षेत्रे व वीज केंद्राचा परिसर यात कंपनीच्या सामाजिक जबाबदारीच्या कार्यासाठी (सी एस आर) संस्थात्मक स्वरूपाची यंत्रणा तयार करणे.

महानिर्मितीने कंपनीच्या सामाजिक जबाबदारीचा निधी खर्च करण्यासाठी अर्थसंकल्पीय पद्धत वापरली. महानिर्मितीचा मागील तीन वर्षातील सरासरी नफा विचारात घेऊन (त्याच्या दोन टक्के) कंपनीच्या सामाजिक जबाबदारीच्या निधी वाटपाचा अर्थ संकल्प तयार केला जातो. कंपनीच्या विविध निर्मिती केंद्राद्वारे सी एस आर समितीकडे प्रस्ताव येतात. समितीने अभ्यास करून संमती दिल्यावर मंडळ त्याला मान्यता देते आणि तशी पत्रे संबंधित वीज निर्मिती केंद्राना दिली जातात. तेथील मुख्य अभियंते त्यांना दिलेल्या अधिकारानुसार सी एस आर ची अंमलबजावणी करतात. महानिर्मिती स्वतः एक अभियांत्रिकी कंपनी आहे. त्यामुळे सामाजिक जबाबदारीचे काम ती स्वतःच पार पाडते. या प्रक्रीयेत काही नेम सी एस आर समितीने शिफारस केलेली कामे एका वर्षात पूर्ण होऊ शकत नाही व त्याचा निधी पूर्णपणे वापरला जात नाही आणि तो निधी पुढील वर्षात जमा केला जातो. परंतु कोणत्याही परिस्थितीत, अर्थ संकल्पीय पद्धतीमुळे, कंपनी सामाजिक जबाबदारीची कामे त्याच वर्षी किंवा पुढील वर्षी पूर्ण करण्याची खात्री महानिर्मिती कंपनी करते.

**वित्तीय वर्ष २०१७-१८ मधील कंपनीच्या सामाजिक जबाबदारीचे खर्च** (₹ कोटीत)

| अनु. क्र. | खर्चाचे लेखाशीर्ष | २०१७-१८ | २०१६-१७ |
|---|---|---|---|
| १ | समाज विकास व समाज कल्याण कार्याचे खर्च | २.३० | ३.२३ |
| २ | शिक्षण खर्च | ०.०७ | ०.५१ |
| ३ | वृक्षारोपण | ०.३६ | ०.०० |
| ४ | मृत्यूसाठी भरपाई आणि सुरक्षा रक्षकांना विद्यावेतन | ०.१६ | १.०६ |
| ५ | पाणी पुरवठा व त्याचे बांधकामे, नलिका विहिरी दुरुस्ती, हातपंप स्थापना इ. | ५.२० | ०.७९ |
| ६ | रस्ते, कुंपणाच्या भिंती, आर सी सी ड्रेन इ. | २.११ | ३.८६ |
| | **एकूण** | **१०.२०** | **९.४५** |

कंपनीच्या सामाजिक जबाबदाऱ्यांचा तपशीलवार माहिती अहवाल **परिशिष्ट - २** यामधे जोडली आहे.

दर महानिर्मिती कंपनीने पर्यावरण स्थिती या अंतर्गत केलेली सी एस आर ची कामे यासाठी प्रकल्पाच्या अर्थसंकल्पात वेळी तरतूद करणे बंधनकारक केले आहे. आणि कंपनी कायद्यांतर्गत नफा आधारित सी एस आर कामे संचालन व सूव्यवस्था अर्थसंकल्पात घेतली जातात. यामुळे सी एस आर कार्याच्या अंमलबजावणीसाठी मोठ्या प्रमाणात निधी मिळतो.

## संचालकांच्या जबाबदारींचे निवेदन

कंपनी अधिनियमाचे २०१३ चे कलम १३४(३)(सी) नुसार, कंपनीच्या संचालकांच्या जबाबदारीचे विविरणपत्राच्या संदर्भात खालील बाबींची हमी देण्यात येते :-

१. कंपनीला लागू होणाऱ्या लेखा मानकांचे अनुसरण करण्यात आले आहे. जर काही प्रत्यक्ष विचलन झाले असेल तर, त्याबाबत योग्य स्पष्टीकरणे देण्यात आली आहेत.

२. निवडलेली लेखा धोरण सातत्याने लागू केली होती आणि दि.३१/०३/२०१८ रोजी कंपनीच्या स्थितीचे रास्त आणि योग्य दर्शन घडावे यासाठी न्याय्यबुद्धीने तसेच सुज्ञतेने निर्णय घेण्यात आले व अंदाज करण्यात आले.

३. कंपनीच्या मत्तांचे संरक्षण करणे तसेच लबाडी व अनियमितता रोखणे यासाठी कंपनी अधिनियम २०१३ मध्ये ज्या तरतुदी केल्या आहेत. त्यानुसार लेख्यांचे अभिलेखांचे जतन करण्यासाठी महानिर्मिती कंपनीच्या संचालकांनी योग्य प्रकारे आणि पुरेशी काळजी घेतली आहे.

- ''महानिर्मिती'' ही सतत कार्यस्त असलेली संस्था आहे या तत्त्वांच्या आधारे वार्षिक लेखे तयार करण्यात आलेले आहेत.
- कंपनीला लागू होणारे सर्व कायद्यातील तरतूदीचे अनुपालन करण्याची हमी मिळावी या दृष्टीने योग्य कार्य पद्धतीची रचना, संचालकांनी केलेली होती आणि ही कार्यपद्धती पुरेशी असून प्रभावी पणे कार्यरत होती.

## ऊर्जा संवधर्न, तंत्रज्ञानाचा वापर आणि परदेशी चलनातील मिळकत व खर्च

कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम १३४ (एम) - ज्याचे सहवाच कंपनी (लेखे) नियमावली १९८८ यातील नियम क्र.८(३) या सोबत

होते. त्यानुसार ''ऊर्जा, संवर्धन, तंत्रज्ञान स्वीकार आणि परदेशी चलनातील मिळकत व खर्च'' या संबंधीची आवश्यक असलेली माहिती या अहवालाचा भाग असलेले, '**परिशिष्ट - ३**' यामध्ये दिलेली आहे.

### सांविधिक लेखा परिक्षक यांची निरीक्षणे / अभिप्राय यांची उत्तरे

सांविधक लेखा परिक्षक यांनी त्यांच्या लेखापरिक्षण अहवालात लिहिलेली निरीक्षणे व अभिप्राय यांना कंपनीने दिलेली उत्तरे या अहवालाचे **'परिशिष्ट - ४'** यामधे जोडली आहेत.

### मुदतीच्या ठेवी

अहवालाच्या वर्षात कंपनीने जनतेकडून कोणत्याही मुदतीच्या ठेवी मागविल्या नाहीत / स्वीकारल्या नाहीत.

### खर्च लेखापरिक्षक

महानिर्मिती कंपनीने दि.३१.०३.२०१८ रोजी संपणाऱ्या वर्षासाठी कंपनीचे ''खर्च लेखा परिक्षक'' म्हणून मेसर्स ए.जी.अनिखिंडी, ॲन्ड कंपनी यांची नेमणूक केली आहे. वित्तीय वर्ष २०१६-१७ चे 'खर्च लेख परिक्षण अहवाल' कंपनी व्यवहार मंत्रालयात ०३.११.२०१७ रोजी सादर केला.

### सांविधिक लेखापरिक्षक

भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखा परिक्षक यांनी मेसर्स के.एस.अय्यर अँड कंपनी मुंबई, मेसर्स आर एस व्ही ए अँड कंपनी मुंबई, आणि मेसर्स एस सी बाफना अँड कंपनी मुंबई, यांची वित्तीय वर्ष २०१७-१८ या वर्षासाठी संयुक्त सांविधिक लेखा परिक्षक म्हणून नेमणूक केलेली आहे.

### बाह्य कंपनी सेक्रेटरी कृत परिक्षण

महानिर्मिती कंपनीच्या संचालक मंडळाने वित्तीय वर्ष २०१७-१८ साठी स्वतंत्र कंपनीचे सेक्रेटरी यांचेकडून परिक्षण करण्यासाठी मेसर्स ए.वाय.साठे अँड कंपनी या कंपनी सेक्रेटरी (सी/२०२, कोहीनूर अपार्टमेंटस्, दुसरा माळा, एन. सी. केळकर मार्ग, कबूतरखान्याजवळ, दादर (पश्चिम), मुंबई - ४०० ०२८ यांची) नियुक्ती केली आहे. त्यांचा अहवाल **परिशिष्ट-५** यामध्ये आहे.

### बाह्य कंपनी सेक्रेटरी कृत निरक्षणांना व्यवस्थापनाची उत्तरे

सेक्रेटरीयल ऑडीट रिपोर्ट यातील निरिक्षणांना उत्तरे खालीलप्रमाणे आहेत :

महानिर्मिती कंपनीच्या आर्टिकल ऑफ असोसिएशन यातील तरतुदीनुसार कंपनीच्या संचालक मंडळावर संचालकांची नियुक्ती महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी लिमिटेड तर्फे केली जाते. महानिर्मिती कंपनीने महिला स्वतंत्र संचालकांच्या रिक्त पदा बाबतचे संदर्भ महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी लिमिटेडकडे पत्र क्रमांक एमएसपीजीसीएल / सीएस / ०३७०१ दि.२७.०३.२०१७ नुसार आधीच कळवले होते.

### ऋणनिर्देश

महानिर्मिती कंपनीला आपल्या कार्यामधे विविध केंद्रीय व राज्य शासनाची मंत्रालय / विभाग / संस्था यांचे तसेच वित्तीय संस्था आणि बँका, सांविधिक लेखा परिक्षक, खर्च लेखा परिक्षक, भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक, नवी दिल्ली तसेच महालेखापाल (वाणिज्य) मुंबई, केंद्रीय / राज्य विद्युत नियामक, प्राधिकारी, सेक्रेटरीयल ऑडीटर्स, अपीलासाठीची न्यायाधिकरणे आणि कंपनीचे भागधारक यांनी जी मदत व सहकार्य केले त्याबद्दल संचालक त्यांची कृतज्ञतापूर्वक प्रशंसा व धन्यवाद नोंदवित आहेत. तसे कंपनीच्या सर्व कर्मचाऱ्यांनी तळमळीने व समर्पित वृत्तीने त्याचे कार्य केले त्याबद्दल मंडळ त्यांची प्रशंसा करीत असून ती तेथे नोंदवित आहे.

संचालक मंडळाच्या वतीने

**(अरविंद सिंग)**
**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (प्रभारी कार्यभार)**

दिनांक : ३१ डिसेंबर २०१८
स्थळ : मुंबई

## संचालकांचे अहवालाचे परिशिष्ट क्र.१

### फॉर्म नं. एम. जी. टी. -९

### वार्षिक विवरणाचा सारांश

**३१.०३.२०१८ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाची स्थिती**
**(कंपनी अधिनियम २०१३ चे कलम ९२ (३) आणि कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) नियमावली २०१४ यातील नियम १२ (१) याला अनुसरून)**

### १. नोंदणी व अन्य तपशील :

| | | |
|---|---|---|
| १ | सी आय एन | यू ४०१०० एम एच २००५ एस जी सी १५३६४८ |
| २ | नोंदणीची तारीख | ३१.०५.२००५ |
| ३ | कंपनीचे नाव | महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित |
| ४ | कंपनीची श्रेणी / उपश्रेणी | शासकीय कंपनी |
| ५ | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व संपर्क तपशील | प्रकाशगड, प्रो.अनंत काणेकर मार्ग, वान्द्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ |
| ६ | कंपनी यादीवरील (लिस्टेड) आहे का ? होय / नाही | नाही |
| ७ | रजिस्टर व ट्रान्सफर एजंटचे नाव पत्ता, जर असल्यास | लागू नाही |

### २. कंपनीचे प्रमुख उद्योग कार्य : कंपनीच्या उलाढालीमध्ये १० टक्के किंवा त्याहून जास्त योगदान देणाऱ्या सर्व औद्योगिक व्यवहाराची माहिती देणे.

| अनु. क्र. | मुख्य उत्पादित / सेवांची नांवे | वस्तू / सेवा यांचा एन आय सी कोड | कंपनीच्या एकूण उलाढालीत टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वीज निर्मिती | लागू नाही | १०० टक्के |

### ३. सूत्रधारी, उपकंपन्या व सहयोगी कंपन्यांचा तपशील :

| अनु. क्र. | कंपनीचे नाव व पत्ता | सी आय एन / जी एल एन | सूत्रधारी / उपकंपनी / सहयोगी | शेअर्सची टक्केवारी | लागू होणारा विभाग |
|---|---|---|---|---|---|
| १ | मराविमं सूत्रधारी कंपनी लिमिटेड | यू४०१००एमएच२००५एसजीसी १५३६४९ | सूत्रधारी | १०० | २(८७) |
| २ | महागुज कोलायरीज लिमिटेड | यू१०१०२एमएच२००६एसजीसी १६५३२७ | उपकंपनी | ६० | २(८७) |
| ३ | धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड | यू४०१०८एमएच२००७एसजीसी १६८८३६ | उपकंपनी | १०० | २(८७) |
| ४ | महाराष्ट्र अॅश मॅनेजमेंट सर्विसेस लिमिटेड | यू४०१०५एमएच२००७एसजीसी १७३४३३ | उपकंपनी | १०० | २(८७) |

### ४. शेअर धारणेचे स्वरुप (समभाग भांडवलाची विभागणी, एकूण समभागाच्या टक्केवारीनुसार)

**१) श्रेणी निहाय भाग धारणा**

| भाग धारकांची श्रेणी | वर्षाच्या आरंभी धारण केलेल्या भागांची संख्या | | | | वर्षाच्या शेवटी धारण केलेल्या भागांची संख्या | | | | वर्ष भरातील बदलाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | डीमॅट | प्रत्यक्ष | एकूण | एकूण भागाची टक्केवारी | डीमॅट | प्रत्यक्ष | एकूण | एकूण भागाची टक्केवारी | |
| **अ. प्रवर्तक** | | | | | | | | | |
| **१) भारतीय** | | | | | | | | | |
| अ) व्यक्ती / एच. यु.एफ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ब) केंद्र सरकार | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| क) राज्य शासन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ड) संस्था मंडळ | ० | २४८५४३३६७८८ | २४८५४३३६७८८ | १०० | ० | २५२४७१२६१२६ | २५२४७१२६१२६ | १०० | |
| इ) बँका / वित्तसंस्था | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| फ) इतर | ० | ० | | | ० | ० | ० | ० | |
| उपबेरीज (अ) (१) | | २४८५४३३६७८८ | २४८५४३३६७८८ | १०० | ० | २५२४७१२६१२६ | २५२४७१२६१२६ | १०० | १.५८ |
| **२) परदेशी** | | | | | | | | | |
| अ) अनिवासी भारतीय व्यक्तीगत | | | | | | | | | |
| ब) इतर व्यक्ती | ० | ० | | | ० | ० | ० | ० | |
| क) संस्था, मंडळ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ड) बँका / वित्तसंस्था | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| इ) इतर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| उपबेरीज (अ) (२) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| **एकूण प्रवर्तकांची भागधारणा (अ) = (अ) (१) + (अ) (२)** | **०** | **२४८५४३३६७८८** | **२४८५४३३६७८८** | **१००** | **०** | **२५२४७१२६१२६** | **२५२४७१२६१२६** | **१००** | **१.५८** |
| | | | | | | | | | |
| **ब. सार्वजनिक भागधारणा** | | | | | | | | | |
| **१. संस्था** | | | | | | | | | लागू नाही |
| अ) म्युचुअल फंड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ब) बँका / वित्तसंस्था | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| क) केंद्र सरकार | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ड) राज्य शासन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| इ) साहसी भांडवल निधी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| फ) विमा कंपन्या | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ग) वित्तीय संस्थाकडून | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ह) परदेशी साहसी भांडवल | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ज) इतर (स्पष्ट करा) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| उपबेरीज (ब) (१) | | | | | | | | | |
| **२. संस्था व्यतिरिक्त** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | |
| अ) संस्था | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| १. भारतीय | | | | | | | | | |
| २. परदेशी | | | | | | | | | |
| ब) व्यक्तिगत | | | | | | | | | |
| १) व्यक्तिगत भागधारक नाममात्र ₹ १ लाखापर्यंत भाग भांडवल धारणा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| २) व्यक्तिगत भागधारके ₹ १ लाखापेक्षा जास्त नाममात्र भाग धारणा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| क) इतर (स्पष्ट करा) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उपबेरीज (ब) (२) | | | | | | | | | |
| **बेरीज सार्वजनिक भागधारणा (ब) - (ब) (१) + (ब) (२)** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | |
| **क. जी डी आर आणि ए डी आर यांच्या रखवालदाराने धारण केलेले भाग** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | लागू नाही |
| **एकूण बेरीज (अ + ब + क)** | **०** | **२४८५४३३६७८८** | **२४८५४३३६७८८** | **१००** | **०** | **२५२४७१२६१२६** | **२५२४७१२६१२६** | **१००** | **१.५८** |

## २. प्रवर्तकांची भाग धारणा

| अनु. क्र. | भाग धारकांचे नाव | वर्षाप्रारंभीची भाग धारणा | | | वर्षाअखेरची भाग धारणा | | | वर्षभरातील बदलाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी | गहाण असलेल्या भागाची एकूण भागांमध्ये टक्केवारी | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी | गहाण असलेल्या भागाची एकूण भागांमध्ये टक्केवारी | |
| १ | मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड (राज्य शासनाची कंपनी) | २४८५४३३६७८८ | १०० | ० | २५२४७१२६१२६ | १०० | ० | १.५८ |
| | **एकूण** | **२४८५४३३६७८८** | **१००** | **०** | **२५२४७१२६१२६** | **१००** | **०** | **१.५८** |

## ३. प्रवर्तकांच्या भागधारणातील बदल (जर बदल नसेल तर कृपया तसे स्पष्ट करावे)

| अनु. क्र. | भाग धारकांचे नाव | वर्षाप्रारंभीची भाग धारणा | | वर्षभरातील संचित भाग धारणा | |
|---|---|---|---|---|---|
| | | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी |
| वर्षाच्या आरंभी | मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड | २४८५४३३६७८८ | १०० | | |
| दिलेले भाग (०४.०७.२०१७) | मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड | ३९२७८९३३८ | १.५८ | २५२४७१२६१२६ | १.५८ |
| वर्षाच्या अखेरीस | मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड | २५२४७१२६१२६ | १०० | २५२४७१२६१२६ | १०० |

## ४. पहिल्या दहा भागधारकांच्या भागधारणेचे स्वरूप (संचालक, प्रवर्तक जी डी आर व ए डी आर धारका व्यतिरिक्त)

| अनु. क्र. | भाग धारकांचे नाव | वर्षाप्रारंभीची भाग धारणा | | वर्षभरातील संचित भाग धारणा | |
|---|---|---|---|---|---|
| पहिल्या दहा भागधारकांसाठी प्रत्येकी | | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी |
| वर्षाच्या आरंभी | मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड | २४८५४३३६७८८ | १०० | | |
| दिलेले भाग (४/७/२०१७) | मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड | ३९२७८९३३८ | १.५८ | २५२४७१२६१२६ | १.५८ |
| वर्षाच्या अखेर किंवा जर वर्षभरात अलग झाले असतील तर अलग होण्याच्या तारखेला | मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड | २५२४७१२६१२६ | १०० | २५२४७१२६१२६ | १०० |

## ५. संचालक आणि व्यवस्थापनातील महत्त्वाच्या व्यक्तींची भागधारणा

| अनु. क्र. | संचालक आणि व्यवस्थापनातील महत्त्वाच्या व्यक्तींची नावे | वर्षाप्रारंभीची भाग धारणा | | वर्षभरातील संचित भाग धारणा | |
|---|---|---|---|---|---|
| प्रत्येक संचालक व व्यवस्थापनातील महत्त्वाच्या व्यक्ती यांचेसाठी | | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी |
| वर्षाच्या आरंभी | श्री.बिपीन श्रीमाळी<br>श्री.जे.के.श्रीनिवासन<br>श्री.व्ही.एम.जयदेव<br>श्री.सी.एस.थोटवे<br>(मराविमं सूत्रधारी नामनिर्देशित) | २०<br>१०<br>१०<br>१० | ०.००००००७८<br>०.००००००३९<br>०.००००००३९<br>०.००००००३९ | २०<br>१०<br>१०<br>१० | ०.००००००७८<br>०.००००००३९<br>०.००००००३९<br>०.००००००३९ |
| वर्षभरात प्रवर्तकांच्या धारणेत झालेली वाढ / घट त्यांच्या स्पष्ट कारणासह (उदा.वाटप / बोनस श्रमासाठी समभाग / स्वेट इक्विटी) | | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| वर्षाच्या अखेरीस | श्री.बिपीन श्रीमाळी<br>श्री.अरविंद सिंग<br>श्री.एस.जे.आंबेरकर<br>श्री.व्हि.एम.जयदेव<br>श्री.सी.एस.थोटवे<br>(मराविमं सूत्रधारी नामनिर्देशित) | १०<br>१०<br>१०<br>१०<br>१० | ०.००००००३९<br>०.००००००३९<br>०.००००००३९<br>०.००००००३९<br>०.००००००३९ | १०<br>१०<br>१०<br>१०<br>१० | ०.००००००३९<br>०.००००००३९<br>०.००००००३९<br>०.००००००३९<br>०.००००००३९ |

## ५. ऋणे

**कंपनीची ऋणे वित्तीय संस्था आणि बँकाकडील (दिर्घकालीन कर्ज) यामध्ये थकीत / उपार्जित परंतु देय नसलेले व्याज समाविष्ट आहे.**

(₹ कोटीत)

| तपशील | प्रतिभूत कर्जे (ठेवी वगळता) | अप्रतिभूत कर्जे | ठेवी | एकूण कर्जे |
|---|---|---|---|---|
| आर्थिक वर्षाच्या आरंभीचे कर्ज | | | | |
| १) मुद्दल | २५६९५.६६ | ८२५.४४ | ० | २६५२१.११ |
| २) देय पण न भरलेले व्याज | ०.०० | ०.०० | ० | ०.०० |
| ३) उपार्जित पण देय नसलेले व्याज | २३८.३२ | ४.०२९ | ० | २४२.३५ |
| **बेरीज (१+२+३)** | **२५९३३.९९** | **८२९.४७** | **०** | **२६७६३.४६** |
| आर्थिक वर्षात कर्जातील बदल | | | | |
| भर | २१६०.६६ | ३८.०५ | ० | २१९८.७१ |
| घट | २०८४.९८ | ७२.१७ | ० | २१५७.१६ |
| निव्वळ बदल | ७५.६७ | (३४.१२) | ० | ४१.५४ |
| आर्थिक वर्षाच्या अखेरचे कर्ज | | | | |
| १) मुद्दल | २५७७१.३३ | ७९१.३२ | ० | २६५६२.६५ |
| २) देय पण न भरलेले व्याज | ०.०० | ० | ० | ०.०० |
| ३) उपार्जित पण देय नसलेले व्याज | २२६.१३ | ४.४६ | ० | २३०.५९ |
| **बेरीज (१+२+३)** | **२५९९७.४७** | **७९५.७८** | **०** | **२६७९३.२५** |

### ६. संचालक व व्यवस्थापनातील महत्त्वाचे कर्मचारी यांचे परिश्रमिक

### अ. व्यवस्थापकीय संचालक, पूर्णवेळ संचालक आणि / किंवा व्यवस्थापक यांचे परिश्रमिक

(₹ कोटीत)

| अनु. क्र. | परिश्रमिकाचा तपशील | व्यवस्थापकीय संचालक / पूर्ण वेळ संचालक / व्यवस्थापक यांची नावे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बिपीन श्रीमाळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | श्री.एस.जे. आंबेरकर (वित्त संचालक) | व्ही.एम. जयदेव (संचालक प्रकल्प) | सी.एस. थोटवे (संचालक संचलन) | श्यामसुंदर वर्धने (संचालक खाणी) | एकूण रक्कम |
| १ | ठोक वेतन | २८०२५३९ | १६५६०४७ | २९३२५५९ | २८५९३४७ | १५९६५२६ | ११८४७०१८ |
| | (अ) आयकर कायदा १९६१ च्या कलम १७ (१) च्या तरतुदीप्रमाणे वेतन | निरंक | निरंक | ४१८१८८ | ४०३९९० | २१३५७१ | १०३५७४९ |
| | (ब) आयकर कायदा १९६१ च्या कलम १७ (२) नुसार वेतनेतर लाभाचे मूल्य | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| | (क) आयकर कायदा १९६१ च्या कलम १७ (३) नुसार वेतनाऐवजी नफा | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| २ | स्टॉक पर्याय | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ३ | स्वेट इक्विटी | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ४ | कमिशन<br>- नफ्याची टक्केवारी<br>- इतर (स्पष्ट करावे) | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ५ | इतर (कृपया स्पष्ट करावे) | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| | **एकूण (अ)** | **२८०२५३९** | **१६५६०४७** | **३३५०७४७** | **३२६३३३७** | **१८१००९७** | **१२८८२७६७** |
| | कायद्यानुसार मर्यादा | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

### ब. इतर संचालकांचे परिश्रमिक

| परिश्रमिकाचा तपशिल | संचालकांची नावे | | | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ३. स्वतंत्र संचालक | श्री.विश्वास पाठक | श्रीमती इरावती दाणी | लागू नाही | लागू नाही |
| मंडळ / समिती यांच्या बैठकीस उपस्थित राहण्याचे शुल्क | ७५००० | २०००० | | ९५००० |
| दलाली | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| इतर (कृपया स्पष्ट करावे) | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| उपबेरीज (१) | **७५०००** | **२००००** | | **९५०००** |
| ४. इतर अकार्यकारी संचालक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| मंडळ / समिती यांच्या बैठकीस उपस्थित राहण्याचे शुल्क | | | | |
| दलाली | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| इतर (कृपया स्पष्ट करावे) | | | | |
| उपबेरीज (२) | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| **एकूण बेरीज (ब) = (१+२)** | **७५०००** | **२००००** | **निरंक** | **९५०००** |
| एकूण व्यवस्थापकीय परिश्रमिक | ७५००० | २०००० | निरंक | ९५००० |
| कायद्याप्रमाणे एकूण मर्यादा | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

**क. व्यवस्थापकीय संचालक / व्यवस्थापक / पूर्ण वेळ संचालक या व्यतिरिक्त महत्त्वाच्या व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांचे परिश्रमिक**

| अनु. क्र. | परिश्रमिकाचा तपशील | महत्त्वाचे व्यवस्थापकीय कर्मचारी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| | | कंपनी सेक्रेटरी | |
| १ | एकूण वेतन | | |
| | अ) आयकर कायदा १९६१ च्या कलम १७(१) यातील तरतुदीनुसार वेतन | १६९१८८९ | १६९१८८९ |
| | ब) आयकर कायदा १९६१ च्या कलम १७(२) यातील वेतनेनंतर प्राप्तीचे मूल्य | २२८२७२ | २२८२७२ |
| | क) आयकर कायदा १९६१ च्या कलम १७(३) नुसार वेतना ऐवजी नफा | निरंक | निरंक |
| २. | स्टॉक पर्याय | निरंक | निरंक |
| ३ | स्वेट इक्विटी | निरंक | निरंक |
| ४ | दलाली<br>- नफ्याच्या टक्केवारीमधे<br>- इतर स्पष्ट करावे | निरंक | निरंक |
| ५ | इतर, कृपया स्पष्ट करावे | निरंक | निरंक |
| | **बेरीज (अ)** | **१९२०१६१** | **१९२०१६१** |

**७. गुन्हे प्रशमन करण्याबद्दल दंड / शिक्षा**

| प्रकार | कंपनी कायद्याचे कलम | संक्षिप्त वर्णन | गुन्हे प्रशमन करण्याबद्दल दंड / शिक्षा | प्राधिकारी (आर डी / एनसीएलटी / न्यायालय) | अपिल केले असल्यास (तपशील देणे) |
|---|---|---|---|---|---|
| दंड | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| शिक्षा | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| गुन्हे प्रशमन | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| **क. कसुर करणारे इतर अधिकारी** | | | | | |
| दंड | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| शिक्षा | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| गुन्हे प्रशमन | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

संचालक मंडाळाच्या वतीने

(अरविंद सिंग)
**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (प्रभारी कार्यभार)**

दिनांक : ३१.१२.२०१८
स्थळ : मुंबई

## संचालकांचे अहवालाचे परिशिष्ट क्र. २
## महानिर्मिती कंपनीचे सामाजिक उत्तर दायित्त्वाच्या कार्यक्रमाचे इतिवृत्त
## (संचालक मंडळाच्या अहवालात समाविष्ट करण्यासाठी दिलेल्या नमुन्याप्रमाणे)

१. महानिर्मिती कंपनीने सामाजिक उत्तरदायित्वाच्या धोरणाची संक्षिप्त रुपरेषा येथे देण्यात आली आहे. यामध्ये घ्यावयाचे कार्यक्रम व प्रकल्प आणि या धोरणाची वेब लिंक यांचाही समावेश केला आहे.

आपल्या कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्वाचे ध्येय पुढीलप्रमाणे आहे:

स्थानिक सामुदायाशी निगडित सामाजिक व आर्थिक विकास करण्यासाठी सक्रीय योगदान देणे, (यामध्ये कंपनीचे कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय यांचाही अंतर्भाव आहे) जेणेकरून त्यांच्या जीवनाचा दर्जा सुधारणे आणि राज्यातील मानव संसाधनाचा निर्देशांक उंचावणे. कंपनीच्या या विषयीच्या धोरणात शिक्षण, पिण्याचा पाण्याचा पुरवठा, आरोग्याची निगा, पर्यावरण, सामाजिक सबलीकरण, पायाभूत सोयींचा विकास करणे, खेळ व सांस्कृतिक कार्यक्रम या क्षेत्रात लक्ष केंद्रीत केले जाईल. कंपनीच्या प्रकल्पाच्या परिसरातील समुदायाची जीवनाच्या सर्व क्षेत्रात प्रगती व्हावी; तो समृद्ध व्हावा यासाठी सर्वांगिण विकासाचे काम करण्याचा प्रयत्न राहील. कंपनीचे सामाजिक उत्तरदायित्वाचे धोरण पुढील वेबसाईटवर उपलब्ध आहे.

http:/www.mahagenco.in/uploads/CSR/MSPGCL%20New%20CSR%20policy.pdf

२. संचालक मंडळाची सी एस आर समिती दि.३१ मार्च २०१८ रोजीची रचना खालीलप्रमाणे आहे :

श्री.बिपीन श्रीमाळी, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक — श्री.सी.एस.थोटवे (संचालक - संचलन)

श्री.व्ही.एम.जयदेव, (संचालक - प्रकल्प) — श्री.एस.जे.आंबेरकर (संचालक - वित्त)

श्री.श्याम वर्धने संचालक (खाणकाम)

३. कंपनीची मागील तीन वर्षांतील सरासरी निव्वळ नफा/(तोटा) ₹ (२९०६.९७) कोटी

४. विहित कंपनीचे सामाजिक उत्तरदायित्त्वे यासाठी विहित खर्च (वरील बाब क्र.३ मधील रकमेच्या २ टक्के) : निरंक कारण कंपनीला नफा झालेला नाही.

५. वित्तीय वर्षातील सी एस आर कार्यक्रमावरील खर्चाचा तपशील

अ) वित्तीय वर्षात खर्च करावयाची रक्कम : लागू नाही

ब) खर्च न केलेली रक्कम (जर काही असल्यास) : लागू नाही

क) वित्तीय वर्षात खर्च केलेल्या रकमेचा तपशील खालील तत्त्यात दिलेला आहे.

| अनु. क्र. | सी एस आर प्रकल्पासाठी निश्चित केलेले कार्य | प्रकल्पाचा समावेश केलेले क्षेत्र | प्रकल्प किंवा कार्यासाठी १) स्थानिक जागा व २) या जागेचा जिल्हा व राज्य स्पष्ट करावे | प्रकल्प / कार्यक्रमाच्या खर्चाची रक्कम (₹ कोटीत) (अर्थसंकल्प) | प्रकल्प कार्यक्रम खर्चाचे उपशीर्षक १) प्रकल्पावर थेट खर्च २) वर खर्च (₹ कोटीत) | अहवाल काळातील संचित खर्च (₹ कोटीत) | रक्कम थेट खर्च केली किंवा अन्य कार्यकारी संस्थांमार्फत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रुग्णालय इमारतीचे नूतनीकरण | आरोग्य निगा | कोराडी २४० | ०.९२८२ | थेट खर्च ०.९२८२ | ०.९२८२ | थेट |
| २. | पंजारा, वारेगांव, सुरादेवी, बोखारा, कौठा आणि मासला पाणी पुरवठा | सुरक्षित पाणी पुरवठा | कोराडी २४० | ४.५५०६ | थेट खर्च ४.५५०६ | ४.५५०६ | थेट |
| ३. | वृक्षारोपण | पर्यावरण रक्षण | कोराडी २४० | ०.३६०४ | थेट खर्च ०.३६०४ | ०.३६०४ | थेट |
| ४. | जोडरस्ता आणि अंतर्गत रस्ते | पायाभूत सुविधा विकास | कोराडी २४० | ०.९००९ | थेट खर्च ०.९००९ | ०.९००९ | थेट |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | स्मशान | पायाभूत सोयी विकास | कोराडी २४० | ०.८११५ | थेट खर्च ०.८११५ | ०.८११५ | थेट |
| ६. | कोराडी, नंदा आणि खासरा येथे हायमास्ट लाईटींग | जीवन साधनेत वाढ करणे | कोराडी २४० | ०.२८७८ | थेट खर्च ०.२८७८ | ०.२८७८ | थेट |
| ७. | दुकानाचे संकूल | पायाभूत सुविधा विकास | कोराडी २४० | ०.००७५ | थेट खर्च ०.००७५ | ०.००७५ | थेट |
| ८. | कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या परिसरातील गांवात प्री कास्ट आर सी सी बाक पुरवून ती स्थापित करणे | जीवन साधनोत वाढ करणे | कोराडी २४० | ०.०४५८ | थेट खर्च ०.०४५८ | ०.०४५८ | थेट |
| ९ | पुनर्वसित गाव कोराडी येथील बाजार ओटा जवळ स्त्री पुरुषांसाठी मुत्रीघरे बांधणे | आरोग्याची निगा | कोराडी २४० | ०.०१९७ | थेट खर्च ०.०१९७ | ०.०१९७ | थेट |
| १० | महानिर्मिती कोराडीत तलाव क्र.३ सह भिमेट हाऊस जवळील मातीचा बांध बांधणे | पायाभूत सुविधांचा विकास | कोराडी २४० | ०.०१११ | थेट खर्च ०.०१११ | ०.०१११ | थेट |
| ११ | सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधणे | पायाभूत सुविधांचा विकास | चंद्रपूर महा औष्णिक विद्युत केंद्र - ११० | ०.४८०६ | थेट खर्च ०.४८०६ | ०.४८०६ | थेट |
| १२ | दुर्गापूर आणि पदमापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे नुतनीकरण | आरोग्याचे निगा | चंद्रपूर महा औष्णिक विद्युत केंद्र - ११० | ०.०७५७ | थेट खर्च ०.०७५७ | ०.०७५७ | थेट |
| १३ | ऊर्जा नगर, प्रभाग -१ (समता नगर) येथे आंगणवाडी साठी सुरक्षा भिंत उभारणे | जीवन साधनात विस्तार करणे | चंद्रपूर महा औष्णिक विद्युत केंद्र - ११० | ०.०३९४ | थेट खर्च ०.०३९४ | ०.०३९४ | थेट |
| १४ | दुर्गापूर प्रभाग २, चंद्रपूर येथे आर सी सी ड्रेन बांधणे | आरोग्य निगा | चंद्रपूर महा औष्णिक विद्युत केंद्रे ११० | ०.०३८३ | थेट खर्च ०.०३८३ | ०.०३८३ | थेट |
| १५ | अपघात ग्रस्त खाजगी कामगारांना पैसे देणे | आरोग्य निगा | चंद्रपूर महा औष्णिक विद्युत केंद्र - ११० | ०.०२ | थेट खर्च ०.०२ | ०.०२ | थेट |
| १६ | सुरक्षा रक्षकांना विद्या वेतन | आरोग्य निगा | औष्णिक विद्युत केंद्र कोराडी १२० | ०.०९८४ | थेट खर्च ०.०९८४ | ०.०९८४ | थेट |
| १७ | पिण्याच्या पाण्याच्या ए टी एम मार्फत पेय जल पुरविणे | सुरक्षित पेय जल | औष्णिक विद्युत केंद्र कोराडी १२० | ०.६४६० | थेट खर्च ०.६४६० | ०.६४६० | थेट |
| १८ | औष्णिक विद्युत केंद्र परळी वैजनाथ येथील नवीन माध्यमिक शाळेत आय पी एस वर्क व रंगकाम करणे | शिक्षण | औष्णिक विद्युत केंद्र परळी १३५ | ०.०२९३ | थेट खर्च ०.०२९३ | ०.०२९३ | थेट |
| १९ | मौजे तळेगाव ता.परळी वैजनाथ येथे डब्ल्यू बी एम रोड, आर सी सी, ड्रेन व स्मशान भूमीचे बांधकाम | आरोग्य | औष्णिक विद्युत केंद्र परळी १३५ | ०.०१०२ | थेट खर्च ०.०१०२ | ०.०१०२ | थेट |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | मौजे सेतू ता.सोनपेठ, जि.परभणी येथे काँक्रिट रोड व स्मशानभूमीचे बांधकाम | पायाभूत सोयी | औष्णिक विद्युत केंद्र परळी १३५ | ०.००७९ | थेट खर्च ०.००७९ | ०.००७९ | थेट |
| २१ | खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र जवळ सुरादेवी ते कवठा गांव पर्यंत रस्ता बांधणे व दुरुस्ती त्यासोबत वारेगाव येथे अॅश बंड | पायाभूत सोयी | औष्णिक विद्युत केंद्र खापरखेडा १३६ | ०.३२८६ | थेट खर्च ०.३२८६ | ०.३२८६ | थेट |
| २२ | परमजीत कौर यांना मृत्यू भरपाई | आरोग्य सेवा | स्थापत्य बांधकाम चंद्रपूर २५० | ०.०४०० | थेट खर्च ०.०४०० | ०.०४०० | थेट |
| २३ | डब्ल्यू बी एम रस्त्याचे बांधकाम काँक्रिट रोड | पायाभूत सुविधा | स्थापत्य बांधकाम चंद्रपूर २५० | ०.३४३९ | थेट खर्च ०.३४३९ | ०.३४३९ | थेट |
| २४ | तुळसी नगर येथे शीत शवाघर उभारणे | जीवन साधने वाढविणे | स्थापत्य बांधकाम विभाग चंद्रपूर २५० | ०.०११३ | थेट खर्च ०.०११३ | ०.०११३ | थेट |
| २५ | तुळसी नगर मधील मातामंदिर ते उदार गृह या रस्त्याच्या कडेला आर सी सी ड्रेन बांधणे (चंद्रपूर केंद्र टी -०७) | आरोग्य निगा | स्थापत्य बांधकाम चंद्रपूर २५० | ०.००३९ | थेट खर्च ०.००३९ | ०.००३९ | थेट |
| २६ | काडोली येथे समाज मंदिराचे बांधकाम (चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्र) | पायाभूत सोयी | स्थापत्य बांधकाम चंद्रपूर २५० | ०.०४७० | थेट खर्च ०.०४७० | ०.०४७० | थेट |
| २७ | मौजे गुडगांव (माल येथे) रंगमंचाचे बांधकाम चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्र | जीवन साधने वाढविणे | स्थापत्य बांधकाम चंद्रपूर २५० | ०.०५४३ | थेट खर्च ०.०५४३ | ०.०५४३ | थेट |
| | **एकूण** | | | **१०.१९९५** | **१०.१९९५** | **१०.१९९५** | |

* अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेची माहिती : लागू नाही

६. जर कंपनी मागील तीन वर्षातील सरासरी नफा याच्या २ टक्के किंवा त्यांचा कोणताही भाग प्रत्यक्ष खर्च करण्यात अयशस्वी झाली असेल तर कंपनी ही रक्कम खर्च न केल्याची माहिती मंडळ अहवालात देईल : लागू नाही

७. सी एस आर समितीने जबाबदारीचे विवरणपत्रक द्यावे की सी एस आर धोरणाची अंमलबजावणी व त्याकडे लक्ष देणे ही कामे कंपनीचे सी एस आर उद्दिष्टे व धोरण याला अनुसरुन केले आहे.

(अरविंद सिंग)

**अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक (प्रभारी कार्यभार)**

**अध्यक्ष : सी एस आर समिती**

दिनांक : ३१/१२/२०१८

स्थळ : मुंबई

## संचालकांचे अहवालाचे परिशिष्ट क्र. ३
## (कंपनी (लेखे) नियमावली २०१४ नुसार आवश्यक तपशील)

**अ. ऊर्जा संवर्धन**

वर्ष २०१७ -१८ दरम्यान ऊर्जा संवर्धनासाठी खालीलप्रमाणे कार्य करण्यात आली आहेत.

- पुढील क्षेत्रामध्ये अंतर्गत ऊर्जा अंकेक्षण करण्यात आले. क्रॉम्प्रेस्डे एअर, फिड वॉटर, कुलींग वॉटर सिस्टम, हिटर्स इत्यादी क्षेत्रे.
- वीज निर्मिती केंद्रात कर्मचाऱ्यांची जागरुकता वाढावी म्हणून सतकर्तता / प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला.
- ऊर्जा संवर्धनाची जागृती निर्माण करण्यासाठी भित्ती पत्रके / निबंध स्पर्धा इत्यादी आयोजन.
- महानिर्मिती कंपनीकडे प्रशिक्षित अभियंताचा ताफा आहे. ते ऊर्जा अंकेक्षण आणि प्रमाणित ऊर्जा व्यवस्थापक आहेत. त्यांचे ज्ञान केंद्राच्या संचालन व सुव्यवस्थेच्या नित्य कामात उपयोगात आणण्यात येते.
- कर्मचाऱ्यांना वर्षातून दोन वेळा एल ई डी बल्बचे विनामूल्य वाटप केले जाते. कर्मचाऱ्यांना एल ई डी बल्ब सवलतीच्या दराने देण्यात येतात.

**सहाय्यक वीज वापर**

- साह्यकारी वीज वापराची अचूक मोजणी करण्याकरिता ०.२ वर्गाचे एनर्जी मिटर्स वापरले जातात.
- दिवसाच्या प्रकाशाचा पूरेपूर उपयोग करण्यात येतो.
- यंत्र व उपकरणे यांचा निरउपयोगी वापर टाळणे.
- ऊर्जा कार्यक्षम दिव्यांचा वापर करण्यासाठी प्रकाश यंत्रणेत सुधारणा केल्या जातात.
- कॉम्प्रेस्ड एअर, स्टिम पाईप, कुलींग वॉटर सिस्टम व इलेक्ट्रीक सिस्टम यातील गळतीला आळा घालण्यात येतो.
- डी.एम. वॉटर फ्लो मिटर्सची स्थापना केली.
- उरण येथील जी.टी.युनीटस् साठी नैसर्गिक शितकरणाची व्यवस्था.
- सर्व स्थितीवर लक्ष देणे व साह्यकारक सामग्रीची प्रतिबंधात्मक देखभाल करणे.
- कोराडी युनीट-७ मधील बीएफपी बदलून अधिक उर्जा कार्यक्षम बीएफपी ची स्थापना करणे.
- वीज निर्मिती केंद्रात पंपासाठी व्ही एफ डी, कॉम्प्रेसर व पंखे बसविणे
- खापरखेडा २१० मे.वॅ. युनीट मधील सी इ पी इंपेलर स्टेज मधे कपात.

**प्रकाश योजना :**

- एच.पी.एम.व्ही.लॅम्प बदलून त्याजागी एल.ई.डी. लॅम्पचा वापर.
- इलेक्ट्रॉनीक बलास्ट व सी.एफ.एल. प्रकाश साधनांचा वापर.
- सेवेच्या इमारतीमधील जीने, टर्बाइन बेसमेन्ट आदी क्षेत्रात प्रकाश व्यवस्थेची व्यक्तीशः चालू / बंद करता येणारी बटणे लावण्यात आली.

**उष्णता ऊर्जा :**

- ऑन लाईन कंडेसर ट्यूब क्लिनिंग सिस्टमवर योग्य लक्ष.
- औष्णिक रोधके वेळेवर दुरुस्ती करणे.
- एअर - प्रीहिटर्स व भट्ट्या शक्य तेव्हा स्वच्छ करणे.
- बायलर एक्सेस एअरचा योग्य वापर.

**वंगणे :**

- सर्व वीज केंद्रात शून्य गळतीची संकल्पना सुरू केली.
- गळणारे इंधन तेल पुनः प्राप्त करण्यासाठी ऑईल स्किमर्स व्यवस्था विकसित केली.
- भुसावळ व नाशिक केंद्रात टर्बाइन व बी एफ पी तेल केंद्रावर्ती पद्धतीने गाळून घेणे.

**डीएम वॉटर**

- डी.एम. वॉटर, फिड लाईन व स्टिम गळती यांच्याकडे अग्रक्रमाने लक्ष दिले जाते.
- खापरखेडा केंद्रात सोनिक बॉयलर डिटेक्शन सिस्टीम स्थापन केली.

**अन्य पाण्याचा वापर**

- कोराडी, नाशिक, खापरखेडा, चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रातील राखेच्या पाण्याचा पूर्नवापर केला जातो.

- आग विझविण्यासाठी लावलेले पाण्याचे नळ पूर्वी जमिनीच्या आत असत. त्यातील गळती तात्काळ दुरुस्ती करता यावी म्हणून ते जमिनीच्या वर लावण्यात आले.

**ब. तंत्रज्ञानाचा अंगिकार आणि नवीन शोध स्वीकार**

अ) तंत्रज्ञान समाविष्ट करण्याचे प्रयत्न

- कोराडी ६६० मे.वॅ.युनीटसाठी नागपूरच्या प्रक्रीयायुक्त सांडपाण्याचा वापर
- कोराडी युनीट - ६ मधे ऊर्जा कार्यक्षम असे नुतनीकरण व आधुनिकीकरण केले.
- अमोनिया इंजेक्शन फ्ल्यू गॅस कंडीशनींग सिस्टम (ए.एफ.जी.सी.) स्थापित केला.
- महानिर्मिती मुख्यालय व वीज केंद्रे येथे साहित्य प्रापणासाठी इ-निविदा संकल्पना सुरु केली.
- खापरखेडा युनीट - २ मधे डी व्ही आर सिस्टीम स्थापन केला.
- कोराडी ६६० व खापरखेडा ५०० मे.वॅ.युनीटमध्ये लो नॉक्स बर्नरची स्थापना

**समाविष्ट संबधीच्या माहितीचे प्रकटन**

- अमोनिया इंजेक्शन फल्यू गॅस कंडिशनींग सिस्टम (ए.एफ.सी.जी.) स्थापित केली.
- परळी केंद्रातील युनीट क्र.३ येथील संचालन प्रणालीचा (डी.सी.एस.) दर्जा उंचावला.
- महानिर्मिती मुख्यालय व वीज केंद्रे येथे साहित्य प्रापणासाठी निविदा संकल्पना सुरु केली.

**संशोधन व विकास**

१. कंपनीने संशोधन व विकासाची क्षेत्रे निश्चित केली :
कुलींग वॉटरचे अझोनायझेशन, ए एफ जी सी सिस्टीम, आयलँडींग व ब्लॅकस्टार्ट सुविधा उरण येथे सुरु केल्या. निरॉफेन अॅकॉस्टिक क्लिनिंग सिस्टम अँट एअर हिटर्स, ट्यूब गळतीसाठी शोध यंत्रणा, कोळसा गिरण्यासाठी एम पी एस पी सिस्टम, तेल गाळण्यासाठी व तेल पूर्नवापरासाठी ऑईल स्किम्पर मशीन व खाली पडणारे तेल पुनः मिळविण्यासाठी प्रयत्न.

२. वरील संशोधन व सुव्यवस्थेमुळे झालेले लाभ
ओझोनायझेशन : परंपरागत पद्धतीपेक्षा खर्च कमी लागतो. धातूची झीज कमी होते, हाताळणी सुरक्षित, कुलींग वॉटर सिस्टीममधील लिजीओनेला जंतूचा स्तर नष्ट होतो.
ए.एफ.जी.सी. : औ.वि. केंद्रातील एस पी एम चा स्तर प्रदुषण नियंत्रण मंडळाने प्रमाणित केल्याप्रमाणे १५० एमजी/एनएम क्युब पेक्षा कमी राखला जातो.
आयलँडींग सिस्टम : प्रणालीत अडथळे येणे / बंद पडणे अशा प्रकरणी अलग करण्याची आयलॅडींग सिस्टम सेवेमध्ये येईल व जी टी पी एस स्थानिक व क्षेत्र ग्रीड पासून वेगळे होईल.
ब्लॅक स्टार्ट फॅसिलिटी : जर वीज जाळ्याला काही धक्का बसला किंवा ते अलग झाले नाही तर ब्लॅक स्टार्ट सुविधामुळे युनिटस् पूर्वपदावर आणता येतात व क्षेत्रातील वीज पुरवठा अल्प वेळेत सुरु करता येतो.

३. भविष्यातील योजना :

- ए.एफ.जी.सी. प्रणाली औष्णिक विद्युत केंद्रात स्थापित करण्यात येईल.
- ऑनलाईन ऊर्जा व्यवस्थापन स्थापना
- सौर पी व्ही ऊर्जा केंद्र परिसर वापरणे.

४. संशोधन व सुव्यवस्था खर्च : निरंक

ब) कंपनीने कोणतेही आयात केलेले तंत्रज्ञान वापरलेले नाही.

**क. परकीय चलनातील मिळकत व खर्च**

अ) निर्यातीची कामे, निर्यात वाढीसाठी प्रयत्न, उत्पादित व सेवांसाठी नवी निर्यात बाजारपेठ आणि निर्यात योजना : निरंक

ब) एकूण परकीय चलनाचा वापर व कमाई :

| अनु. क्र. | वापरलेले, कमावलेले परकीय चलन | ₹ |
|---|---|---|
| १ | परकीय चलनातील खर्च | |
| | सी आय एफ तत्त्वानुसार भांडवली मालाचे मूल्य | २८८७६०१८० |
| २. | मिळालेले परकीय चलन | निरंक |

## संचालक अहवालाचे परिशिष्ट - चार

## सांविधिक लेखापरिक्षकांच्या निरिक्षणांना कंपनीचा उत्तरे

| अनु. क्र. | मुख्य निरिक्षण | कंपनीचे उत्तर |
|---|---|---|
| १ | *महानिर्मिती कंपनीने, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण (महावितरण) कंपनी सोबत केलेल्या वीज खरेदी करारातील अटीनुसार विलंबाने भरलेल्या रकमेचे व्याज ₹ २,०४७.३१ कोटी (मागील वर्षी ₹ १,६९७.६४ कोटी) या उत्पन्नाला "ग्राहकांच्या अधिभाराचे उत्पन्न" या लेखा शीर्षाखाली मान्यता दिली. महावितरण कंपनीने या अधिभाराची एकूण रक्कम ₹ ७,४८५.६१ कोटी (मागील वर्षी ₹ ५,४३८.३० कोटी) भरलेली नाही. दि.३१ मार्च २०१८ पर्यंत ती थकीत आहे. महावितरणने मागील बऱ्याच वर्षात भरणा केलेला नसल्याने या थकीत रकमेची वसुली निश्चित नाही.*<br>*वरील अनिश्चिती विचारात घेऊन महानिर्मितीच्या व्यवस्थापनाने यावर्षी अंदाजित, अपेक्षित पत तोटा म्हणुन ₹ २८५.९६ कोटीची तरतूद केली आहे. आणि त्याची आजपावेतो सदर तरतूद एकूण ₹ ९८२.२८ कोटी झाली आहे.*<br>*उपरोक्त व्यापारी येण्याची वसूलीची क्षमता आणि त्यासाठी अपेक्षित पत तोटा यामधे केलेल्या अंदाजित तरतूद पुरेशी असणे किंवा कसे यावर कोणतेही भाष्य करण्यास आम्ही असमर्थ आहोत.* | वीज खरेदी करारातील संमत अटींप्रमाणे महानिर्मिती कंपनीने महावितरण कंपनीकडे अधिभाराची देयके पाठविली आहेत आणि ती महावितरणवर बंधनकारक आहेत. ही कंत्राटानुसार येणी आहेत.<br>याशिवाय सुधारित बहुवर्षीय वीज दर नियमनात नेहेमीच्या वीज दराच्या वरील अधिभारास मान्यता देण्याची तरतूद आहे. त्यामुळे कंपनीची भुमिका न्याय ठरते.<br>तसेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने कंपनीचे दर कमी केल्यामुळे कंपनीच्या उत्पन्नावर मागील वर्षाच्या अधिभाराच्या प्रमाणात तडाखा बसला आहे. मा.आयोगाने त्यांच्या सुधारित नियमनात कंपनीच्या मताला पाठिंबा दिला असल्याने आता मिळू शकणाऱ्या अधिभारा विरोधात तरतूद करुन नफा व तोटा यावर आघात करणे योग्य नाही.<br>मात्र भारतीय लेखा मानक - वित्तीय विलेख - यांची पूर्तता करण्याकरिता, कंपनीने मागील वर्षाप्रमाणे ३१.०३.२०१८ रोजीच्या ₹ ९८२.२८ कोटी रकमेची कपात करणे यासाठीची वित्तीय विलेख तरतूद मान्य केली आहे. (वेळेनुसार पैशाचे मूल्य यासाठीची अपेक्षित पत हानी मान्य केली आहे)<br>कंपनीने महावितरण सोबत मेळ केला असून तो अहवाल वर्षात लेखापरिक्षकांना दाखविला आहे. |
| | *वित्तीय विवरणपत्रातील स्थगित कर दायित्त्वाची (निव्वळ) ₹ ८८५.४४ कोटी या मागील वर्षीच्या चुकीचे पुनर्निवेदन कंपनीने त्या वर्षाच्या अखेरीस म्हणजे ३१/०३/२०१७ रोजी केलेले नाही. मागील वर्षाच्या चालू करांचा हिशेब करताना कंपनीने पात्र गुंतवणूक भत्त्याची रक्कम ₹ २,५५८.४९ कोटी वजावट विचारात घेतली नव्हती. यामुळे मागील वर्षी तेवढ्या प्रमाणात आशोषित तोटा कमी नोंदला. तसेच या कारणासाठी मागील वर्षी स्थगित कर मत्ता ₹ ८८५.४४ कोटी निर्माण केली नव्हती. परिणामी मागील वर्षअखेर स्थगित कर दायित्त्व (निव्वळ) ही ₹ ८८५.४४ कोटीने जादा नोंदली गेली.*<br>*चालू वर्षाच्या 'नफा व तोटा पत्रकात' वरील स्थगित कर मत्तेची रक्कम ₹ ८८५.४४ कोटी मान्यता देऊन नोंदण्यात आली. त्यामुळे वर्षाचा करोत्तर नफा तेवढ्या रकमेने जादा नमूद केलेला आहे.*<br>*वरील लेखा प्रक्रीया ही 'भारतीय लेखा मानक क्र.८, 'लेखा धोरणे व लेखांचे अंदाज व चुका यांचे बदल' यातील आवश्यकतेनुसार नाही."* | कंपनीने आयकर प्राधिकाऱ्यांकडे यापूर्वीच्या वर्षांसाठी दाखल केलेला आयकर परताव्यातील अंतिम अशोषित तोटा / घसारा यांच्या रकमा परत घेणे आणि त्याचा उपयोग येत्या वर्षी पुढे नेण्याच्या अशोषित तोटा घसाऱ्यातल्या हिशेबासाठी करणे. असा अशोषित तोटा / घसारा कंपनीच्या संबधित स्थगित कर मत्ताच्या निर्मितीसाठी वसुली योग्य प्रमाणशीर निश्चितीच्या आधारे, पात्र असतो. आयकर दाखले सादर करताना बदल झाल्यास कोणतीही सुधारणा करावी लागली तर त्याचा परिणाम चालू वर्षाच्या स्थगित कर गणनेवर होईल.<br>वित्तीय वर्ष २०१६-१७ मधे कंपनीने प्रथमच तिच्या भारतीय लेखा मानकानुसार वार्षिक लेखांचे अंतिमीकरण केले. त्यापूर्वी कंपनीने वित्तीय वर्ष २०१६-१७ चा आयकर दाखला त्याच्या विहित वेळेत सादर केला होता. मात्र वित्तीय वर्ष २०१६-२०१७ चा आयकर दाखल भरतांना कंपनीने कलम ३२ (एसी) अंतर्गत, गुंतवणूक मत्ता - भरपाई ₹ २५५८ कोटीचा लाभ घेतला. हा लाभ मुदतीपूरता असतो आणि नंतरच्या वर्षात मिळत नसतो.<br>प्रचलित कार्यपद्धतीनुसार वित्तीय वर्ष २०१७-१८ च्या स्थगित कर दायित्त्वाचा हिशेब करताना कंपनीने अशासुधारित अवशोषित हानीला, गुंतवणूक भरपाईचा घटक तयार करुन मान्यता दिली. यामुळे वित्तीय वर्ष २०१७-१८ मधे ₹ ८८५ कोटीची स्थगित कर मत्ता निर्माण झाली आणि नंतर त्यामुळे स्थगित कर दायित्त्व तेवढ्याने कमी झाले. सदर स्थगित कराची प्राप्ती वित्तीय वर्ष २०१७-१८ च्या नफा तोटा पत्रकात दर्शविली आहे. |

| | | |
|---|---|---|
| २. | *कर्ज व अग्रिम, अनामती आणि व्यापारी देणी यांच्या शिल्लक रकमा या संबंधितांकडून कायम होणे आणि / किंवा प्रकरणानुसार मेळ करणे यांच्या अधीन आहेत. असे कायम आणि मेळ करणे प्रलंबित असल्याने त्याचे परिणामस्वरुप समायोजन करता आले नाही.*<br>*मात्र महानिर्मिती कंपनीने तिचे विक्रेते पुरवठादार यांना याबाबत पत्रे धाडली आहेत. अशी माहिती आम्हास देण्यात आली व या शिल्लकी कायम असल्याचे पत्रे मिळाल्यावर त्याचा मेळ केला जातो व मेळ करण्याची प्रक्रिया कंपनीत सतत चालू असते अशी माहिती आम्हास मिळाली.*<br>*लेखापरिक्षणासाठी पुरेसे व योग्य पुरावे नसल्याने या शिल्लकीची स्थिती व कंपनीचा वर्षाचा नफा (जर असल्यास) यावर होऊ शकणाऱ्या परिणामावर मत देण्यास आम्ही असमर्थ आहोत.* | कंपनीचे आकारमान आणि विविध प्रकारची कामे विचारात घेतल्यास, कंपनीचे विविध विक्रेत्यांशी खूप व्यवहार होता. कंपनीने बऱ्याच ग्राहक / विक्रेते कर्ज देणारे इ. यांना पत्रे पाठवून शिलकी कायम करण्याविषयी पत्रे दिली आहेत. अशा विक्रेत्यांशी मेळ करणे ही कंपनीची सतत चालणारी प्रक्रीया आहे. मात्र अनेक कारणांमुळे - विक्रेते व इतरांशी मेळ / समायोजनेत करण्यात वेळ लागतो. ही कारणे अशी विक्रेत्यांची बीजके विलंबाने मिळणे, शिलकीच्या मेळ बाबतच्या विनंती पत्रांना प्रतिसाद न मिळणे, विक्रेत्यांनी चुकीची माहिती देणे, दावे / प्रतिदावे इ. मुळे मेळ / समायोजन होण्यास विलंब लागतो.<br>कंपनी, जेथे आवश्यक आहे तेथे, विक्रेत्यांच्या शिलकी संबंधी आवश्यक तरतूदी करते.<br>मात्र सदर निरिक्षण विचारात घेऊन येत्या वर्षात मेळ समायोजन करण्याची प्रक्रिया अधिक गतिशील करील. |
| | *कंपनीची मालमत्ता, कारखाने आणि साधने या संदर्भात कंपनीचे लेखाधोरणे टिपा क्र.५(९), टिपा क्र.५ (१०) आणि ५(११) यांचेकडे तसेच घसारा व कर्ज परतफेड या संबंधीची टिपा ११ (बी) (३) याकडे लक्ष वेधण्यात येते. आमच्या लेखा परिक्षणात या लेखाधोरणापासून काहीसे विचलन झाले असल्याचे आमच्या निदर्शनास आले. विशेषतः (१) वस्तूमालाची सुची आणि मालमत्ता, कारखाने व साधने यांच्या व्याख्येनुसार सुटे भाग यांचे वर्गीकरण म्हणजेच ''मालमत्ता, कारखाने व साधने यांची परिभाषा पूर्ण करणाऱ्या गोष्टीचे वर्गीकरण'' ''वस्तू माल साठा'' यात केले असून त्यांचे कंपनीने ''भांडवलीकरण'' केलेले नव्हते. (२) बदललेल्या सुट्या भागांची नफा व तोटा पत्रकात आकारणी करणे यामधे कंपनीने बदललले जुने सुटे भाग ''मालमत्ता, कारखाने व साधने'' यांचे कमी होत गेलेले मूल्य याची मान्यता काढून घेतलेली नव्हती किंवा बदललेल्या भागाचा मूल्य खर्च नफा व तोटा पत्रकात आकारलेला नव्हता आणि त्यांची मान्यता काढल्यावरही काही बाबतीत त्यांचा दोघांच्या उर्वरित उपयुक्त आयुष्यासाठीचा घसारा काढणे चालू राहिले होते आणि (३) सुट्या भागांचे त्यांच्या कारखान्यासोबत संलग्नीकरण केलेले नव्हते. त्यामुळे संबंधित मालमत्ता, कारखाने व साधने यांच्याशी कोणताही संदर्भ न देता अशा सुट्या भागांचा आणि मालमत्ता, कारखाने व साधनातील भरावरील घसाऱ्याची आकारणी करणे चालूच राहिले होते. याबाबत व्यवस्थापनाच्या परिपूर्ण व तपशीलवार कामाचा अभाव असल्याने, त्याचा कंपनीच्या वित्तीय विवरणपत्रांवर काय परिणाम होतो; यावर मत देण्यास आम्ही असमर्थ आहोत.* | लेखा परिक्षणाच्या काळात, लेखा परिक्षकांनी काही भांडवली सुटे भाग / मत्ता यांचा घसारा आणि त्यांचे आयुष्य यांच्या विषयी निरिक्षणे केली. या समस्या सोडविण्यासाठी कंपनीने भांडवली सुटे भाग / मत्ता आधार यांचा सर्वंकष आढावा घेण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यातून त्यांच्या घसाऱ्याच्या दराची अचूकता, बदलेल्या बाबींची नफा तोटा पत्रकात आकारणी करणे, अभिलेखांप्रमाणे उर्वरित आयुष्य निश्चित करणे आणि योग्य लेखा प्रक्रीया करणे या कृती आगामी वर्षात करून आवश्यक त्या सुधारणा केल्या जातील. |

| | | |
|---|---|---|
| | *४ लेखा (अकांऊट) युनीट्सचा संबंध असलेली मालकीची जमीन, जिचे प्रचलीत मूल्य वर्षाच्या अखेरीस ₹ ४५.६२ कोटी होते, ती आणि अन्य एका लेखा युनीट्सची भाडेपट्टीची जमीन, जिचे प्रचलीत मूल्य वर्षाच्या अखेरीस ₹ १२.१८ कोटी होते, या सर्व जमीनी अद्यापही पूर्वीच्या ''महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ'' यांच्याच नावे आहेत. आम्हाला असे सांगण्यात आले की, या जमीनी हस्तांतरण योजनेनुसार आणि महाराष्ट्र शासनाच्या आदेशातील अटींनुसार कंपनीकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत.*<br>*दोन लेखा युनीटस् संबंधित मालकीच्या जमिनी, ज्यांचे एकूण ठोक मूल्य, ₹ ३१६.५१ कोटी आहे, या ''महानिर्मिती'' आणि ''महाराष्ट्र थर्मल पॉवर स्टेशन'' या नावे धारण केलेल्या आहेत. त्या कंपनीच्या संस्थापन समयलेखानुसार कंपनीला दिलेल्या आणि रजिस्ट्रार ऑफ कंपनी, मुंबई यांचेकडे नोंदणी केलेल्या नावावर नाहीत.* | काही जमिनीच्या नांवांचे विलेख पूर्वीच्या 'महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या नांवे किंवा' 'महानिर्मिती' (महाजनकोचे मराठी रुपांतर) आदि नांवाने आहेत. याबाबत सर्व मत्तांच्या नांवाचे विलेख कंपनीच्या नोंदणीकृत नावाने करण्यासाठी कंपनी कार्यवाही करील. |
| | आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे आणि आमच्या लेखापरिक्षणाच्या आधारे दि.३१ मार्च २०१८ रोजी खालील दुर्बल जागा आढळल्या.<br>१) कंपनीच्या स्थिर मत्तांचे वेळेवर भांडवलीकरण करणे आणि त्यांच्या परिसमापनातील नुकसानांचे समायोजनाचे लेखे करणे याबाबत अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचे कार्य प्रभावी नाही. या दुर्बलतेमुळे कंपनीच्या स्थिर मत्ता, प्रगतीपथावरील कामांचे भांडवलीकरण, घसारा आणि खर्च याचे प्रत्यक्षात गैर विवरण होण्याची शक्यता आहे.<br>२) कंपनीचे साहित्य प्रापण व त्यांचे लेखेकरण, कर्मचारी व भांडार याच्या उप-अहवालांचे जतन करणे, पुरवठादारांच्या अग्रिमांचे आणि दायित्वाचे वेळेवर समायोजन करणे, सूक्ष्म, लघु, व मध्यम उद्योजकांचे व्याज देणे याबाबत अंतर्गत वित्तीय नियंत्रणे प्रभावीपणे कार्यरत नाहीत. कोळशाच्या पुरवठ्यातील विलंब आणि अपूरी प्राप्ती यांचे हिशेब व लेखेकरण पुरेसे नाहीत. या परिणामकारक दुर्बलतेमुळे कंपनीची दायित्वे व मत्ता यांचे सदोष मूल्यांकन होऊ शकते.<br>३) कंपनीतील वस्तूसूचीचे अभिलेख जतन करणे, वित्तीय खात्यासोबत मेळ करणे आणि वस्तुमालाचे मुल्यांकन यासाठी अंतर्गत नियंत्रणे परिणामकारक नाहीत. या दुर्बलतेमुळे वस्तुसूची मुल्यांचे गैर विवरण होण्याची शक्यता आहे. | १) कामाच्या कार्यवाहीत विलंब कंत्राटदारामुळे झाला आणि विलंबाचे प्रमाण निश्चित केल्यानंतर परिसमापनातील नुकसानाचे अंतिमीकरण केले जाते. याशिवाय मोठ्या प्रकल्पात कृती बंद करण्यास काही वेळ लागतो. परिणामी मत्ता कार्यान्वित झाल्याबरोबर त्यांची लेखा नोंद लेखा वह्यात जरी केली, तरी परिसमापनातील नुकसानाचे परिणाम फक्त अंतिमीकरणानंतरच घेतले जाते.<br>२) कोळसा पुरवठादारांसोबत ज्यांच्या दर्जा घसरणे, कमी पुरवठा होणे आदि दावे आणि मानलेली पोहोच / कार्यक्षमता प्रोत्साहने आणि दाव्यांचे व्याज इ. बाबतचे प्रतिदावे यांचे पूर्ण समझोते अद्याप करणे आहे. त्यामुळे कंपनीने कोळसा कंपनीच्या वादग्रस्त देण्यांना 'आकस्मिक दायित्व' अशी मान्यता दिली आहे. याचप्रमाणे कंपनीने आकस्मिक दायित्वे सुद्धा योग्यप्रकारे प्रकट केली आहेत. अग्रिमे व दायित्वे यांची माहिती / समायोजने वेळेवर नोंदविणे या कामासाठी कंपनी आगामी वर्षात अधिक गती देईल. सूक्ष्म, मध्यम व लघू उद्योजकांच्या देण्यातील विलंबासाठी व्याजाची तरतूद आणि त्याची प्रकटने कंपनीने केले आहे. कंपनीने कर्मचाऱ्यांच्या दुय्यम नोंदीचे अभिलेख सॅपमधे केले आहेत. त्याचे केंद्रीय नियंत्रण केले जाते. कंपनीने वेतन प्रक्रियेचे केंद्रिकरण करण्याची प्रक्रिया या वर्षी सुरु केली.<br>कंपनी सॅप प्रणालीत कार्य करते. त्या प्रणालीच्या कालमर्यादा आहेत. प्रारंभीची प्रत्यक्ष माहिती नोंद (डेटा एंट्री) ही मर्यादित आहे. लेख्यांची डेटा एंट्री लेखा बंद होईपर्यंत चालू असते. जर प्रत्यक्ष डेटा एंट्री वेळेवर झाली नाही तर, लेख्यांमधे लेखा नोंदी करुन ते बंद करावे लागतात. वेळेच्या मर्यादेमुळे त्यांचा परिणाम संबधित प्रत्यक्ष नोंदीवर दिसण्याऐवजी, लेखे बंद केल्यानंतर ती नोंद त्याचा परिणाम लेखा संहितेवर (अकाऊंट कोड) दिसतो. मात्र आगामी वर्षात अशा आवश्यक व्यवहारांची नोंद विशिष्ट कालमर्यादेतच वेगाने करण्यासाठी कंपनी उपाययोजना करील. |

## संचालकांचे अहवालाचे परिशिष्ट क्र.५
## फॉर्म नं. एम आर ३
## सेक्रेटरीयल लेखापरिक्षण अहवाल
## ३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षासाठी

*कंपनी अधिनियम २०१३ चे कलम २०४ (१) आणि कंपन्यांची नियमावली २०१४ यातील नियम क्र.९ (व्यवस्थापकीय कर्मचारी वृदांची नियुक्ती व परिश्रमिक) यानुसार*

**प्रति,**

**मा.सदस्य,**

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड**

प्रकाशगड, भूखंड जी-९,

प्रा.अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व),

मुंबई - ४०० ०५१.

मी अजित वाय. साठे, मालक ए.वाय.साठे अँड कंपनी आणि व्यावसायिक कंपनी सेक्रेटरी, मुंबई, आपणास नमूद करतो की, **मी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड (सीआयएन-यु४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४८)** (यापुढील मजकुरात हिचा उल्लेख कंपनी असा केला आहे.) या कंपनीकडून तिला लागू होणाऱ्या सांविधिक तरतूदीचे पालन आणि कंपनी व्यवसायाला धरून राहण्याची निष्ठा यासाठी सेक्रेटरीयल ऑडीट केले. या कंपनीच्या व्यावसायिक वर्तनाचे / सांविधिक अनुपालनाचे मुल्यांकन करण्यासाठी मला योग्य आधारतत्त्व मिळावे आणि त्यावर अभिप्राय द्यावा या प्रकारे मी हे परिक्षण केले.

मी कंपनीची लेखा वह्या - पुस्तके, कागदपत्रे, इतिवृत्त नोंदणीच्या वह्या, प्रपत्रे आणि कंपनीने दाखल केलेली निवेदन पत्रे, व इतर अभिलेख नोंदी यांची पडताळणी केली. तसेच कंपनी आणि तिचे अधिकारी, अधिकृत प्रतिनिधी आणि एजंट यांनी मला माहिती दिली. त्या सर्वांच्या आधारे मी अहवाल देतो की, या परिक्षणाच्या कालावधीत म्हणजे दि.३१ मार्च २०१८ (परिरक्षण कालावधी) रोजी संपलेल्या वित्तीय वर्षात, महानिर्मिती कंपनीने येथे खालील यादीमध्ये नमूद केलेल्या सांविधिक तरतूदींची पूर्तता केलेली आहे. तसेच या कंपनीकडे योग्य प्रकारची मंडळ प्रक्रिया आणि त्या मर्यादेत आणि कार्यपद्धतीत अनुपालन करण्याची यंत्रणा अस्तित्वात आहे आणि ती खालील अहवालाच्या अधीन आहे.

यां कंपनीने ३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षासाठी जी लेखा पुस्तके - वह्या, कागदपत्र, इतिवृत्त नोंद वह्या, प्रपत्रे विवरणे आणि अन्य अभिलेख जतन केली आहेत; त्याचे मी पुढील कायदे व नियामके आदिच्या तरतुदींनुसार परिक्षण केले.

१. कंपनी अधिनियम २०१३ (हा कायदा), कंपनी अधिनियम १९५६ (लागू होणाऱ्या मर्यादेपर्यंत) आणि त्या अंतर्गत केलेल्या नियमावली

२. दि सिक्युरीटीज कॉंट्रक्ट (रेग्युलेशन) कायदा १९५६ आणि त्या अंतर्गत केलेल्या नियमावली, (मात्र ही कंपनी पब्लीक अनलिस्टेड कंपनी असल्याने तिला लागू नाहीत.)

३. दि डिपॉझीटरी ॲक्ट १९९६, त्याची नियमावली आणि उप-निधी (कंपनीचे शेअर्स प्रत्यक्ष स्वरुपात असल्याने लागू नाही.)

४. परकीय चलन व्यवस्थापन अधिनियम १९९९ आणि परदेशी थेट गुंतवणूक, परकीयांची थेट गुंतवणूक आणि बाह्य देशातून केलेले वाणिज्यक स्वरूपात उसनवारी (कंपनीला लागू नाहीत.)

५. सिक्युटरीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया कायदा १९९२ (सेबी कायदा), यातील खालील नियामके आणि मार्गदर्शक सूचना या महानिर्मिती कंपनी ही पब्लीक अनलिस्टेड कंपनी असल्याने तिला लागू नाहीत :

   ए) दि सिक्युरीटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (शेअर्स संपादन व ताब्यात घेणे) नियामके २०११.

   बी) दि सिक्युरीटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (प्रोहिबीशन ऑफ इनसायडर ट्रेडींग) रेग्युलेशन्स २०१५

   सी) दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (भांडवल देणे व प्रकटने यांच्या आवश्यकता प्रकटने) नियम २००९.

   डी) दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सुची बंधने आणि आवश्यकता) नियमने २०१५

   इ) दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (एम्प्लॉयी स्टॉक ऑप्शन स्कीम अँड एम्प्लॉयी स्टॉक परचेस स्कीम गाईड लाईन १९९९) आता त्यांचे नाव दि सिक्युरीटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (शेअर्स बेस्ड एम्प्लॉयी बेनिफिट) नियमने २०१४ आणि दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (शेअर्स बेस्ड एम्प्लॉयी बेनिफिट दुरुस्ती नियमने २०१५)

एफ) दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (कर्जे व प्रतिभूत देणे व त्याचे लिस्टींग करणे) नियमने २००८

जी) दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (रजिस्टार टू ॲन इशू अँड शेअर ट्रान्स्फर एजंट्स) नियमने १९९३ कंपनी अधिनियम व अशील सोबत व्यवहार या संबंधी

एच) दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (डीलिस्टींग ऑफ इक्युटी ऑफ शेअर्स) नियमने २००९ आणि

आय) दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (बाय बॅक ऑफ सिक्युरिटीज) नियमने १९९८.

६. कंपनीस स्पष्टपणे लागू होणाऱ्या इतर कायद्याच्या संदर्भात खाली नमूद केलेले इतर कायदे निश्चितपणे लागू होतात.

**विद्युत अधिनियम २००३ :**

मी खालील बाबींच्या लागू होणाऱ्या खंडाच्या पूर्ततेचेही परिक्षण केले.

१. इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरी ऑफ इंडिया यांनी जारी केलेले सेक्रेटरीयल मानके (०१ जुलै २०१५ पासून आणि ऑक्टोबर २०१७ पासून लागू)

२. कंपनीने बी एस इ लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांचे सोबत यादीवर घेण्याबाबतचे (लिस्टींग) करार (हे करार लेखापरिक्षणाच्या कालावधी मध्ये लागू नव्हते, कारण कंपनी पब्लिक अनलिस्टेड आहे.)

आढावा वर्षात कंपनीने उपरोक्त कायदे नियमावली, नियामके, मार्गदर्शक सूचना, मानके इ. ची पूर्तता केली असून ती खालील निरीक्षणे / पूर्तता न होणे याच्या अधीन आहेत :

**कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत :**

कंपनीने १ जून २०१७ ते १४ जून २०१८ या कालावधीत महिला संचालक नियुक्त केली नव्हती.

मी, माझ्या ऑडीटच्या कालावधीत कंपनीने दिलेली माहिती / आणि अभिलेख यावर विसंबून होतो आणि माझा अहवाल त्या मर्यादित आहे.

**यापुढे मी खालील प्रमाणे अहवाल देत आहे**

कंपनीच्या संचालक मंडळाची रचना योग्य प्रकारे केली आहे. त्यात कार्यकारी संचालक, नॉन - कार्यकारी संचालक आणि स्वतंत्र संचालक यांचा योग्य समतोल साधला आहे. *फक्त वरती नमूद केलेल्या निरीक्षण वगळता* या कालावधीत संचालक मंडळाच्या रचनेमध्ये करण्यात आलेले बदल हे कायद्यातील तरतूदीनुसार करण्यात आले आहेत.

सर्व संचालकांना बैठकीचे वेळापत्रक, कार्यक्रम पत्रिकेवर आणि त्यावरील विषयाबाबत तपशीलवार टिपा या, बैठकीचे किमान सात दिवस आधी पाठविण्यात आल्या होत्या. तसेच कार्यक्रम पत्रिकेवरील विषयांबद्दल अधिक माहिती व स्पष्टीकरणे मंडळाच्या बैठकीपूर्वी देण्यासाठी आणि अर्थपूर्ण व्हावी यासाठी दक्ष असलेली कार्यपद्धती या कंपनीस प्रभावीरित्या अस्तित्वात आहे.

निर्णय हे बहुमताने घेतले जातात आणि काही सदस्यांची असहमती दर्शक मते जर असली तर ती विचारात घेतली जातात. त्यांची नोंद इतिवृत्तात करण्यात येते.

**मी, यापुढे अहवाल देतो की** कंपनीस लागू होणारे कायदे, नियमावली नियमाके आणि मार्गदर्शक सूचना यांच्या अनुपालनाची खातर जमा करणारी आणि कंपनीच्या आकारमानाशी आणि प्रवर्तनाशी अनुरूप असलेली प्रणाली व कार्यपद्धती पुरेशा प्रमाणात आहे.

**मी यापुढे अहवाल देतो की,** महानिर्मिती कंपनी ही मराविमं सूत्रधारी कंपनीच्या संपूर्ण मालकीची उपकंपनी आहे आणि मराविमं सूत्रधारी कंपनी ही संपूर्णतः महाराष्ट्र शासनाच्या मालकीची संस्था आहे आणि शासन हक्काच्या तत्त्वावर दर्शनी ₹ १०/- प्रत्येकी या किमतीचे समभाग काढून देण्यात आलेले आहेत. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| वाटणी दिल्याची तारीख | शेअर्सची संख्या | स्वरूप | शासन निर्णय क्रमांक |
|---|---|---|---|
| ०४/०७/२०१७ | ३९,२७,८९,३३८ | रोख | इएलए / १००३ / पीआरके / ८५८८ / ऊर्जा-५ |

मी, यापुढे अहवाल देतो की, या परिक्षणाच्या कालावधीत पुढील प्रकार घडलेले नाहीत :

१. सार्वजनिक / प्राधान्याने शेअर्स / ऋणपत्रे / स्वेट इक्विटी इत्यादी वाटप.

२. प्रतिभूतींचे विमोचन / पुनखरेदी

३. कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १८० नुसार सदस्यांनी महत्त्वाचे निर्णय घेणे.

४. विलिनीकरण / एकत्रीकरण / पुनर्रचना इत्यादी.

५. परदेशीय तांत्रिक सहयोग करणे.

**ए.वाय.साठे अँड कं. यांचे करिता**
***कंपनी सेक्रेटरीज***

**सी.एस.अजित साठे**
**मालक**
एफ सी एस नं.२८९९ सी ओ पी नं.७३८

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : ५/१२/२०१८**

हा अहवाल आमचे समान तारखेचे पत्र या सोबत वाचावा. हे पत्र जोडपत्र १ येथे दिले असून ते या अहवालाचा अविभाज्य भाग आहे.

## सेक्रेटरियल लेखापरिक्षणाचे अहवालाचे जोडपत्र क्र.१

**प्रती,**
**मा.सदस्य,**
**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड**
प्रकाशगड, भूखंड जी-९,
प्रा.अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१

आमचा समान तारखेला अहवाल या पत्रासोबत वाचण्यात यावा.

१. सेक्रेटरीयल संबंधित कामाचे अभिलेख जतन करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. या अभिलेखांचे परिक्षण करून त्या आधारे अभिप्राय व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.
२. सेक्रेटरीयल संबंधित अभिलेखामधील आशय अचूक असल्याची हमी मिळविणे या हेतुसाठी आम्ही परिक्षणाच्या कार्यपद्धती व प्रक्रीया यांचे अनुसरण केले. या अभिलेखात दर्शविलेल्या बाबींची वस्तूनिष्ठता अचूक असल्याची खात्री मिळावी म्हणून आम्ही प्रायोगिक तत्त्वांवर पडताळणी केली. आम्ही अनुसरलेल्या प्रक्रीया व कार्यपद्धती या आमची मते तयार करण्यासाठी पुरेसा व योग्य प्रमाणात तत्त्वाधार देतात असा आमचा विश्वास आहे.
३. या कंपनीचे वित्तीय अभिलेख आणि लेख्यांची वह्या - पुस्तके यातील अचूकता व योग्यता यांची आम्ही तपासणी / पडताळणी केलेली नाही.
४. जेथे आवश्यकता आहे तेथे, कायदे, नियमावली, नियामक व घडलेल्या घटना इत्यादी, यांच्या पूर्ततेबद्दल आम्ही व्यवस्थापनाची निवेदने मिळविली आहेत.
५. कंपनी कायदा आणि इतर लागू होणारे कायदे, नियम मानके इ. यातील तरतुदींची पूर्तता करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. आमचे परिक्षण या प्रक्रियांची प्रायोगिक तत्त्वावर पडताळणी करणे या मर्यादेमध्ये केलेले आहे.
६. हे सेक्रेटरीयल ऑडीट म्हणजे कंपनीच्या भविष्यातील जीवन क्षमता याची हमी नाही किंवा कंपनीच्या व्यवस्थापनातर्फे तिचे व्यवहार किती कार्यक्षमतेने अथवा प्रभावीपणे करण्यात येत आहेत याबद्दलचे आश्वासन नाही.

**ए.वाय.साठे अँड कं. यांचे करिता**
***कंपनी सेक्रेटरीज***

**सी.एस.अजित साठे**
**मालक**
एफ सी एस नं.२८९९ सी ओ पी नं.७३८

स्थळ : मुंबई
दिनांक : ५/१२/२०१८

## भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी, कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (६) (बी) अंतर्गत महाराष्ट्र राज्य वीज निर्मितीकंपनी लिमिटेड, मुंबई या कंपनीच्या दि.३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रकांवर दिलेला अभिप्राय:

कंपनी अधिनिमय २०१३ यात विहित केलेल्या वित्तीय अहवालाच्या आकृतीबंधानुसार '**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड, मुंबई**' या कंपनीच्या **दि.३१ मार्च २०१८** रोजी संपलेल्या वर्षाचे स्वायत्त वित्तीय विवरणपत्रके तयार करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी सदर अधिनियमाच्या कलम १३९ (५) नुसार नियुकत केलेले सांविधिक लेखापरिक्षक यांचेवर अधिनियमाचे कलम १४३ नुसार त्यांच्या स्वतंत्र लेखापरिक्षणाच्या आधारे आणि या अधिनियमाचे कलम १४३ (१०) यात विहित केलेली लेखापरिक्षणाची मानके याला सुसंगत अशाप्रकारे या वित्तीय विवरणपत्रकावर अभिप्राय व्यक्त करण्याची जबाबदारी आहे. त्यांनी हे कार्य पूर्ण केले आहे असे त्यांचा लेखा परिक्षण अहवाल **दि.२८ सप्टेंबर २०१८** यावरून दिसून येते.

मी, भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांच्यावतीने **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड,** मुंबई यांचे **३१ मार्च २०१८** रोजी संपलेल्या वर्षाच्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रकाचे पूरक लेखा परिक्षण सदर अधिनियमाच्या कलम १४३ (६) (ए) यानुसार केले, हे पूरक लेखापरिक्षण स्वतंत्रपणे आणि सांविधिक लेखापरिक्षक यांचेकडील कामकाजाची कागदपत्रे प्राप्त न करता केले आहे आणि ते सांविधिक लेखापरिक्षक आणि कंपनीचे कर्मचारी वृंद यांचेकडे केलेल्या विचारणा आणि लेखासंबंधी दस्तऐवजांचे निवडक परिक्षण करणे या मर्यादेत केलेले आहे.

मी केलेल्या या पूरक लेखापरिक्षणाच्या आधारे मला अधिनियमाचे कलम १४३ (६) (ब) यानुसार माझ्या लक्षात आलेल्या महत्त्वाच्या बाबींकडे लक्ष वेधू इच्छितो. माझ्या मते कंपनीची वित्तीय विवरणपत्रके व संबंधित लेखा परिक्षण अहवाल हे योग्य प्रकारे समजावून घेण्यासाठी ते आवश्यक आहे.

**१) नफ्यासंबंधी अभिप्राय :**

**खर्च**

**वापरलेल्या मालाचा खर्च (टिपा क्र.२५)**

**कोळसा ₹ १०,५४७.७८ कोटी**

१. इंधन पुरवठा करारातील अटी आणि शर्तीनुसार कंपनीने २०१७-१८ मधील कोळसा प्राप्णाचे पैसे देण्यास विलंब केल्याबद्दल कोळसा कंपन्यांना ₹ १८.८१ कोटी व्याजासाठी[१] देणे होणे त्यासाठी तरतूद केली नसल्याने ''खर्च'' आणि ''वित्तीय दायित्त्वे'' (इतर चालू वित्तीय दायित्त्वे)'' यांचे तेवढ्या रकमेने कमी विविरण आणि नफ्याचे ₹ १८.८१ कोटीने जादा विवरण झालेले आहे.

**पाणी ₹ १९३.४९ कोटी**

२. कंपनीने एप्रिल २०१८ मधील पाण्याचा आकार नागपूर महानगरपालिकेला (मे २०१८) मधे भरला. त्याची लेखा नोंद चुकीने 'पूर्वी भरलेले खर्च' अशी वर्ष २०१७-१८ मधे करण्यात आली आहे. त्यामुळे 'खर्चाचे' तेवढे कमी विवरण झाले. तर ''चालू मत्ता (इत्तर चालू मत्ता - आधी भरलेले खर्च)'' आणि ''नफा'' यांचे ₹ ८३.३३ लाखाने जादा विवरण झालेले आहे.

३. कंपनीने (मार्च २०१३ मध्ये) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद या सोबत सामंजस्य करार केला. त्यानुसार परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या पाणी पुरवठ्यासाठी माजलगाव लिफ्ट योजनेचे बांधकाम करावयाचे होते. सामंजस्य कराराच्या अटी आणि शर्थीनुसार, कंपनीने भांडवली योगदान ₹ १९९.८६ कोटी जमा करण्यास संमती दिली. विद्यमान पाणी आकार प्रमाणशीर हप्त्यात कमी होणार होता. कंपनीने (जून २०१३ ते जानेवारी २०१५) याचे योगदान ₹ १४२ कोटी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडे भरले आणि ही योजना महाराष्ट्र शासनाने (सप्टेंबर २०१५) तहकूब केली. त्यामुळे कंपनीने जमा केलेल्या रकमेला गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाला दिलेली अग्रिम असे मानले. त्यामुळे संपूर्ण रक्कम पून्हा परत मिळण्यास योग्य होती. ज्याअर्थी सदर भांडवली योगदान हे महाराष्ट्र शासनाकडून पून्हा मिळण्यास / परतावा घेण्यास योग्य असल्याचे मानल्याने पाण्याचा आकार जल संपदा विभागाच्या देयकाप्रमाणे पूर्णपणे भरावयास हवा होता. भरलेला भांडवली योगदानाच्या प्रमाणात कपात करावयास नको होती. सदर कंपनीने मात्र सवलतीच्या दराने एकतर्फी देयके भरली त्यामुळे, ₹ ३७.८८ कोटीचा कमी भरणा झाला; त्याला आकस्मिक दायित्त्वे असे प्रकट केले. हे चुकीचे होते. यामुळे ''खर्चाचे'' आणि ''वित्तीय दायित्त्वे'' (इतर चालू वित्तीय दायित्त्वे) यांचे ₹ ३७.८८ कोटी कमी विवरण तर परिणामी नफ्याचे तेवढेच जादा विवरण झाले.

१. एस.बी.आय.च्या प्राईम लोडींग रेट या दराने आहे.

४. नाशिक औष्णिक विद्युत केंद्राच्या प्रकरणी जल संसाधन विभागाने (मार्च २०१८) ₹ ४५.६७ कोटीची मागणी केली. (यात मूळ पाणी आकार आणि उपकर याचे ₹ ३०.३६ कोटी अधिक दंड / व्याज / आश्वासित आकार याचे ₹ १५.३१ कोटी) कंपनीने (जुलै २०१८) ₹ ३०.३६ कोटी (मुद्दल रक्कम) जल संसाधन विभागाकडे[२] भरले. दंड, व्याज आणि आश्वासन आकार सोडून द्यावा यासाठी सदर प्रकरण महाराष्ट्र शासनाकडे पाठवावे असा निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी वर्ष २०१७-१८ च्या वित्तीय विवरण पत्रात आवश्यक तरतूद केली नव्हती. यामुळे ''खर्च'' आणि इतर ''वित्तीये दायित्त्वे'' (इतर चालू वित्तीय दायित्त्वे) यांचे कमी विवरण झाले तर ''नफ्याचे'' तेवढेच म्हणजे ₹ ३०.३६ कोटीचे जादा विवरण झाले आहे.

**२) वित्तीय स्थितीवर अभिप्राय :**

**मत्ता**

**चालू नसलेल्या मत्ता**

**मालमत्ता, कारखाने आणि साधने (टिपा क्र.१) : ₹ ४०,८१८.०९ कोटी**

५. यामधे कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या संदर्भात जो संचालक मंडळाने मान्य केलेल्या एका कंत्राटदाराच्या जादा दाव्याची (फेब्रुवारी २०१८) रक्कम ₹ २८.१२ कोटी समाविष्ट नाही. यामुळे चालू नसलेल्या मत्तांचे (मालमत्ता, कारखाने आणि साधने) आणि ''चालू वित्तीय दायित्तवे'' (इतर वित्तीय दायित्त्वे) यांचे ₹ २८.१२[३] कोटीने कमी विवरण झाले आहे.

**प्रगतीपथावरील भांडवली कामे : ₹ १३१६.४३ कोटी**

**वजा : निकामी मालासाठी तरतूद : ₹ (२४.२४ कोटी)**

**निव्वळ : प्रगतीपथावरील भांडवली कामे : ₹ १२९२.१९ कोटी**

६. यामधे एका युनीटचे (कोराडी औष्णिक विद्युत केंद्र) नुतनीकरण आणि आधुनिकीकरण यासाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे ₹ १.३८ कोटी समाविष्ट नाहीत. यामुळे ''खर्च'' (कर्मचारी लाभ खर्च)'', यांचे ₹ १.३८ कोटीने जादा विवरण झाले आहे. तर ''चालू नसलेल्या मत्ता (प्रगतीपथावरील भांडवली कामे)'' आणि ''नफा'' यांचे तेवढ्याच रकमेने कमी विवरण झालेले आहे.

७. वरील बाबीत चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रात मार्च २०१८ या महिन्यात पूर्ण केलेल्या एका कामाची खर्च रक्कम ₹ १.२४ कोटी[४] समाविष्ट आहे. यामुळे या मत्तेच्या पूर्ण कामाचे भांडवलीकरण झाले नसल्याने ''मूर्त मत्ता (मालमत्ता, कारखाने आणि साधने (ठोक))'' यांचे कमी विवरण झाले तसेच ''घसाऱ्याचे'' कमी विवरण झाले. परिणामी नफ्याचे ₹ ०.०७ लाखाने[५] जादा विवरण झाले आहे.

**चालू नसलेली व्यापारी देणी**

**अप्रतिभूत, चांगली मानलेली : ₹ ५२४७.५५ कोटी.**

८. विलंब भरणा आकार या कारणास्तव होणारे उत्पन्न हे महिन्याच्या तत्त्वावर आधारलेले असते / तसा हिशेब केला जातो आणि हा आकार भरला नाही तरी त्याच्यावर दंडात्मक व्याज नव्हते. त्यानुसार कंपनीने अंगिकारलेल्या तरतूदीच्या मेट्रीक्सनुसार थकीत विलंब भरणा आकारावर अपेक्षित पत हानी याची तरतूद करावयास हवी होती. ती हिशेबानुसार ₹ १,०९०.५५ कोटी झाली आहे. कंपनीने मात्र अपेक्षित पत हानी साठी ₹ ९८२.२८ कोटीची तरतूद केली. ती १०८.२७ कोटीने कमी आहे. (चालू वर्षी ₹ ४३.४६ कोटी आणि मागील काळातील ₹ ६४.८१ आहे) यामुळे ''चालू नसलेली व्यापारी येणी'' यात ₹ १०८.२७ कोटीचे जादा विवरण आणि वर्षातील ''खर्च'' ''अपेक्षित पत हानी साठी मत्ता'' याचे ₹ ४३.४६ कोटीने आणि पूर्व कालीन खर्चाचे ₹ ६४.८१ कोटीने कमी विवरण झाले. त्यामुळे वर्षाच्या नफ्याचे ₹ ४३.४६ कोटीने जादा विवरण आणि ''ठेवून घेतलेली मिळकत (नकारात्मक निगेटीव्ह)'', यांचे कमी विवरण झाले आहे. त्यामुळे ''समभाग'' यांचे ₹ ६४.८१ कोटीने जादा विवरण झाले.

**इतर चालू नसलेल्या मत्ता (टिपा - ५) : ₹ १०८८.९८ कोटी**

**स्थगित भाडे (जलविद्यूत प्रकल्प) : ₹ ७००.०६ कोटी**

९. भारतीय लेखा मानक (भाडेपट्टी) यानुसार, प्रवर्तनीय भाडेपट्टी अंतर्गत भाडेपट्टीची भरलेली रक्कम याला सरळ रेषा पद्धतीने भाडेपट्टीच्या मुदतीसाठी खर्च म्हणून मान्यता दिली जाईल. (जर वापर कर्त्याच्या लाभाचा व वेळेसंबंधी अधिकार प्रतिनिधीत्त्व करणारी पद्धतशीर आधार नसला तर)

२. दंड, व्याज आणि आश्वासित आकार यांच्या उर्वरित रकमा सोडून देण्यासाठी हे प्रकरण महाराष्ट्र शासनाकडे नेले आहे.
३. मत्ता निहाय तपशील नसल्याने घसारा आणि नफ्यावरील प्रभाव याचा अंदाज करता येत नाही.
४. युनीट ५ व ६ एक्स आर पी १०४३ कौल मिलच्या मिल बॉडीच्या आतील वेअर रेझिस्टंट लाईनरर्स यांचे उत्पादन, पुरवठा आणि रिट्रोफिटींग करणे.
५. ₹ १.२४ कोटी यावर एका महिन्यासाठी ५.२८ टक्के

कंपनी ही जिच्याा दराचे नियमन केले जाते अशी संस्था आहे आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने, महाराष्ट्र शासनाच्या मालकीची जी विविध जलविद्युत केंद्रे कंपनीने चालविण्यासाठी भाड्याने घेतली आहेत, त्यांच्या वार्षिक भाड्यांची निश्चिती / मंजूरी केली आहे. (डिसेंबर २०१२ / एप्रिल २०१२). सदर मंजुरीत भाडे हा खर्च असून त्याची मागणी महावितरणकडून मासिक देयकात केली जाते. त्याचे लेखे वीज विक्रीच्या महसूलात केला जातो आणि तो कंपनीच्या वार्षिक महसूल आवश्यकता यांचा भाग असतात असे आयोगाचे नियमन आहे. कंपनीने मात्र, वित्तीय वर्ष २०१४-१५ ते २०१७-१८ या कालावधीत भाडेपट्टी खर्च सरळ रेषा पद्धतीने (₹ ४५२.०८ कोटी, प्रतीवर्षी) निर्देशित केला आहे. यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशाप्रमाणे देय भाडे खर्च ₹ ७००.०६ कोटी, (चालू वर्षासाठी ₹ ६२.४१ कोटी) यास खर्च मानण्याऐवजी ''स्थगित भाडे'' असे मानण्यात आले. यामुळे ''चालू नसलेल्या मत्ता (स्थगित भाडेपट्टीचे भाडे)'' यांचे ₹ ७००.०६ कोटीने जादा विवरण झाले आणि ''खर्च (जल विद्युत केंद्रे)'' यांचे कमी विवरण झाले. परिणामी वर्षाचा ''नफा'' याचे ₹ ६२.४१ कोटीने जादा विवरण झाले. तर ''ठेवून घेतलेल्या मिळकती (नकारात्मक)'' यांचे कमी विवरण होऊन ''समभागाचे'' ₹ ६३७.६५ कोटीने जादा विवरण झाले आहे.

**दायित्त्वे**

**चालू दायित्त्वे**

**आर्थिक दायित्त्वे**

**इतर चालू आर्थिक दायित्त्वे (टिपा १९) - ₹ ७२०३.४७ कोटी**

**संबधितांची देणी : ₹ ६८९.८९ कोटी :**

१०. ''युसीएम कोल कंपनी लिमिटेड'' ही संयुक्त साहस कंपनी (ऑक्टोबर २०१८ मधे) गठीत केली. तिचा उद्देश चेंदी पाडा या मिळालेल्या कोळसा खाणीच्या जागेचा विकास व कार्य करणे असा असून त्यात महानिर्मितीचे १८.७५ टक्के शेअर्स आहेत. यासाठी ''अंदानी एंटरप्रायझेस लिमिटेड'' या कंपनीची खाण विकासक व कार्य प्रवर्तक म्हणून निवड (फेब्रुवारी २०११ मधे) झाली. त्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयाने (सप्टेंबर २०१४) कोळसा खाण जागेचे वाटप रद्द केले. अदानी कंपनीने लवादाच्या मार्फत युसीएमसीसीएल विरोधात ₹ ४९४.७६ कोटीचा दावा केला. तसेच (ऑक्टोबर २०१६ मधे) लवादाकडे अर्ज करुन ₹ ७३.९४ कोटीची अंतरिम साह्य प्रतिवादीने देण्याची मागणी केली. ती लवादाने मान्य केली. यामुळे अदानी कंपनी लिमिटेड ला ₹ १३.८६ कोटी (१८.७५ टक्के) चे आपले योगदान देण्याचे दायित्त्व कंपनीवर आहे. त्यासाठी वित्तीय विवरण पत्रात आवश्यक तरतूद केलेली नाही.

यामुळे ''चालू वित्तीय दायित्त्वे'' आणि ''वित्तीय मत्ता (उपकंपन्या, संयुक्त साहसी व सहयोगी - कंपन्या यांच्यात क्वासी इक्विटी गुंतवणूक करणे)'' याचे ₹ १३.८६ कोटीने कमी विवरण झाले.

**इतर चालू दायित्त्वे (टिपा क्र.२०) ₹ २३.०० कोटी**

**सांविधिक देय : ₹ २३ कोटी**

११. अ) यामधे ''कोराडी, चंद्रपूर आणि परळी येथील नवीन प्रकल्पाच्या बांधकामासाठीच्या खर्चावरील कामगार उपकराची'' महाराष्ट्र शासनास देय असलेला ₹ १५५.८० कोटी[६] समाविष्ट नाही. ती ३१ मार्च १८ रोजी देय होती. यामुळे ''चालू दायित्त्वे (सांविधिक देणी)'' आणि ''खर्च'' याने ₹ १५५.८० कोटीने कमी विवरण झाले आहे आणि नफ्याचे तेवढे जादा विवरण झाले.

**३) सांविधिक लेखापरिक्षकांचे अहवालावर अभिप्राय :**

११. (ब) स्वतंत्र लेखापरिक्षकांचे अहवालाचे जोडपत्र क्र.२ यामधे उपरोक्त वस्तूस्थितीवर प्रकाश टाकलेला नाही. यामुळे लेखापरिक्षकांचा अहवाल हा वास्तविकरित्या त्या मर्यादेत चुकीचा / सदोष व उणिवायुक्त आहे.

**४) इतर अभिप्राय :**

**महसूल**

**प्रवर्तनातील महसूल**

**वीज विक्री (टिपा क्र.२२) : रू.१९,०११.०३ कोटी**

१२. भारतीय लेखा मानक १० नुसार कंपनीने अहवाल कालावधीच्या[८] नंतरच्या घटनांचे समायोजन[७] करुन त्या रकमा वित्तीय विवरण पत्रात

६. कोराडी, चंद्रपूर आणि परळी येथील बी टी जी आणि बी ओ पी कंत्राटदारांना दिलेल्या ₹ १५,५८०.२२ कोटीच्या एकूण भरण्याच्या एक टक्के झाली.

७. अहवाल कालावधीनंतरच्या घटनांचे समायोजन म्हणजे, अहवाल वर्ष मुदतीच्या अखेरीस असलेल्या स्थितीचे पुरावे देतात अशी समायोजने.

८. अहवाल कालावधीनंतर घटना म्हणजे, अहवालाची मुदत संपल्यानंतर मंडळाने मंजूर करण्यापर्यंतच्या काळात घडलेल्या अनुकूल आणि प्रतिकूल घटना.

दाखवायच्या असतात. कंपनीच्या ३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वर्षाची वित्तीय विवरण पत्रके दि.२८ सप्टेंबर २०१८ रोजी मंजूर करण्यात आली आहेत.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने त्या वित्तीय वर्षात २०१५-१६ (अंतिम), २०१६-१७ (अंतिम) आणि २०१७-१८ (हंगामी) यांच्या वार्षिक महसूल आवश्यकतांचे समायोजना संबधीचा आदेश दि.०१/०९/२०१८ यात नमूद केले आहे की, महानिर्मितीने महावितरणला ₹ १२७५.१२ कोटी इतके जास्त देयक आकारले होते. त्याचे समायोजन वित्तीय वर्ष २०१८-१९ मधील महावितरणच्या महसूलात करावे. या वस्तूस्थितीचे प्रकटन वित्तीय विवरण पत्रात नाही, ही बाब भारतीय लेखा मानक - १०च्या तरतुदीच्या विरोधात आहे.

**विक्री / विल्हेवाटीच्या मत्तांचे वर्गीकरण (टिपा १ बी) : २०७.३१ कोटी :**

१३. दि.३१ मार्च २०१८ रोजी कंपनीच्या अकार्यान्वित केलेल्या दोन युनीटस् (भुसावळ युनीट क्र.२ आणि राधानगरी जलविद्युत केंद्र) यांचा पुढे नेलेला खर्च मत्तांमधून (मालमत्ता, कारखाने आणि साधने) वजा केलेला नव्हता. ही कृति भारतीय लेखा मानक १६ चा भंग करणारी आहे. यापैकी एक युनीट विकणे / विल्हेवाट लावणे यासाठी कंपनीने निर्णय घेतला होता (जून २०१८) त्याचा समावेश विक्री / विल्हेवाटी साठी वर्गवारी केलेल्या मत्तांमधे नाही. यामुळे भारतीय लेखा मानक १०५ (विक्री / विल्हेवाटीसाठी काढलेल्या आणि प्रवर्तन खंडित केलेल्या मत्ता) याचा भंग झाला आहे.

ही चार युनीट्स खंडित करण्याच्या तारखेला त्यांची पुढे नेलेला खर्च आणि संचित घसारा आणि अकार्यान्वित केल्यानंतर मत्तांमधे भर करणे / घसारा तरतूद करणे अशी कृती केली असेल तर त्यांची नोंद नाही. म्हणून त्याचे वित्तीय विवरण पत्रकांवरील परिणामांचा अंदाज करता येत नाही.

**भाडेपट्टी (टिपा क्र.४४) :**

१४. कंपनीने वित्तीय विवरण पत्रांत (टिपा क्र.५ (८)) नमूद केलेल्या जमिनीच्या भाडेपट्टीची रचनेचे वित्तीय भाडे असे वर्गीकरण तिच्या प्रारंभीच्या तारखेस केले जाते. कारण त्यामुळे भाडेपट्टीच्या काळासाठी सर्व जोखीमा व प्रासंगिक मोबदले यांची मालकी कंपनीकडे हस्तांतरित झाली असते. भारतीय लेखा मानक १७ (भाडेपट्टी) यानुसार, भाडेपट्टीची मुदत सुरू होण्यापासून भाडेकरु, भाडेपट्टी घेतलेला मालमत्तेच्या रास्त मूल्याच्या रक्कमेला ताळेबंदात भाग - दायित्त्वे यात मान्यता देईल किंवा किमान भाडेपट्टीचे विद्यमान मूल्य कमी असल्यास तशी मान्यता देईल. त्याची निश्चित भाडे सुरु होताना केली जाईल. किमान भाडेपट्टीचे भरलेले पैसे याचे विनियोजन वित्तीय आकार आणि थकीत दायित्त्व यांच्यामधून केले जाईल. भाड्याच्या प्रत्येक मुदतीसाठी वित्तीय आकार दिला जाईल. जेणेकरुन दायित्त्वाच्या उर्वरित रकमेवर एक कायमस्वरुपी व्याज दर निर्माण व्हावा. वित्तीय भाडेपट्टीद्वारे घसारा योग्य मत्तांसाठी घसारा तसेच प्रत्येक लेखा कालावधीसाठी वित्तीय खर्च यांचा उगम होतो.

कंपनीने उरण वायू औष्णिक वीज केंद्रासाठी सिडकोकडून भाडेपट्टीने जमीन संपादित केली आहे. त्यासाठी आगाऊ पूर्व हप्ता ₹ १०६.११ कोटी भरले आहेत. मात्र या भाड्याच्या जमिनीसाठी कंपनीने आवश्यक तो लेखा परिणाम दिलेला नाही. त्याऐवजी, भाडेपट्टीची सदर जमिनीचा लेखा 'मूर्त मत्ता' असा करणे चालू आहे. (भारतीय लेखा मानके अमलात आणण्यापूर्वी तसे केले जात होते.) ही कृती भारतीय लेखा मानक १७ आणि कंपनीचे लेखा धोरण यांचे उल्लंघन करणारी आहे. तसेच भारतीय लेखा मानक १७ नुसार विहित केलेली आणखी काही प्रकटने करणे कंपनीवर बंधनकारक आहेत, ती सुद्धा कंपनीने केलेली नाहीत.

**भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखा परिक्षक**
**यांचे साठी आणि त्यांच्यावतीने**

**सही /-**
**(एस.के.जैयपुरियार)**
**प्रधान महालेखापाल**
**(लेखापरिक्षण) तीन**

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : २८/१२/२०१८**

## वर्ष २०१७-१८ च्या शासकीय लेखा परिक्षणातील अभिप्रायास कंपनीची उत्तरे

| अनु. क्र. | शासकीय लेखा परिक्षणातील परिच्छेद | महानिर्मिती कंपनीचे उत्तर | सांविधिक लेखा परिक्षकांचे मत्ता |
|---|---|---|---|
| | **I) नफ्यासंबंधी अभिप्राय :** | | |
| १ | **खर्च**<br>**वापरलेल्या मालाचा खर्च (टिपा क्र. २५)**<br>**कोळसा ₹ १०,५४७.७८ कोटी**<br>इंधन पुरवठा करारातील अटी आणि शर्तीनुसार कंपनीने २०१७-१८ मधील कोळसा प्रापणाचे पैसे देण्यास विलंब केल्याबद्दल कोळसा कंपन्यांना ₹ १८.८१ कोटी व्याजासाठी[१] देणे होणे त्यासाठी तरतूद केली नसल्याने ''खर्च'' आणि ''वित्तीय दायित्त्वे ''(इतर चालू वित्तीय दायित्त्वे)'' यांचे तेवढ्या रकमेने कमी विविरण आणि नफ्याचे ₹ १८.८१ कोटीने जादा विवरण झालेले आहे. | कोळशाचे पैसे भरण्यास झालेल्या निलंबासाठी कोळसा कंपन्यांनी व्याजापोटी ₹ ४६१.५९ कोटीची मागणी महानिर्मितीकडे केली आहे. मात्र याविषयी महानिर्मितीने सुद्धा कोळसा कंपन्या विरोधात प्रतिदावे केले आहे. हे प्रकरण वादग्रस्त आहे. तसेच याबद्दल 'आकस्मिक दायित्त्व' म्हणून प्रकटन टिपा क्र.४२(१) मध्ये केले आहे. | व्यवस्थापनाने दिलेल्या मताशी आम्ही सहमत आहोत. |
| २ | **पाणी ₹ १९३.४९ कोटी**<br>कंपनीने एप्रिल २०१८ मधील पाण्याचा आकार नागपूर महानगरपालिकेला (मे २०१८) मधे भरला. त्याची लेखा नोंद चुकीने 'पूर्वी भरलेले खर्च' अशी वर्ष २०१७-१८ मधे करण्यात आली आहे. त्यामुळे 'खर्चाचे' तेवढे कमी विवरण झाले. तर ''चालू मत्ता (इत्तर चालू मत्ता - आधी भरलेले खर्च)'' आणि ''नफा'' यांचे ₹ ८३.३३ लाखाने जादा विवरण झालेले आहे. | महानिर्मिती कंपनी स्थानिक प्राधिकारी यांनी केलेल्या पाण्याच्या आकाराचे लेखे करते. यावर्षी कंपनीने नफा व तोटा पत्रकात पाणी आकार (औद्योगिक आणि घरगुती) ₹ २००.४१ कोटी नोंदला. मात्र नजरचुकीने पूर्वी केलेल्या खर्चात ₹ ८३.३३ लाख नोंदले गेले आहेत. ही चूक आगामी वर्षात दुरुस्त केली जाईल. | व्यवस्थापनाने दिलेल्या मताशी आम्ही सहमत आहोत. |
| ३ | कंपनीने (मार्च २०१३ मधे) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद या सोबत सामंजस्य करार केला. त्यानुसार परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या पाणी पुरवठ्यासाठी माजलगाव लिफ्ट योजनेचे बांधकाम करावयाचे होते. सामंजस्य कराराच्या अटी आणि शर्थीनुसार, कंपनीने भांडवली योगदान ₹ १९९.८६ कोटी जमा करण्यास संमती दिली. विद्यमान पाणी आकार प्रमाणशीर हप्त्यात कमी होणार होता. कंपनीने (जून २०१३ ते जानेवारी २०१५) याचे योगदान ₹ १४२ कोटी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडे भरले आणि ही योजना महाराष्ट्र शासनाने (सप्टेंबर २०१५) तहकूब केली. त्यामुळे कंपनीने जमा केलेल्या रकमेला गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाला दिलेली अग्रिम असे मानले. त्यामुळे संपूर्ण रक्कम पून्हा परत मिळण्यास योग्य होती. ज्याअर्थी सदर भांडवली योगदान हे महाराष्ट्र शासनाकडून पून्हा मिळण्यास / परतावा घेण्यास योग्य असल्याचे मानल्याने पाण्याचा आकार डब्ल्यू आणि डी च्या देयकाप्रमाणे पूर्णपणे भरावयास हवा होता. भरलेला भांडवली योगदानाच्या प्रमाणात कपात करावयास नको होती. सदर कंपनीने मात्र सवलतीच्या दराने एकतर्फी देयके भरली त्यामुळे, ₹.३७.८८ कोटीचा कमी भरणा झाला; त्याला आकस्मिक दायित्त्वे असे प्रकट केले. हे चुकीचे होते. यामुळे ''खर्चाचे'' आणि ''वित्तीय दायित्त्वे'' (इतर चालू वित्तीय दायित्त्वे) यांचे ₹३७.८८ कोटी कमी विवरण तर परिणामी नफ्याचे तेवढेच जादा विवरण झाले. | या प्रकरणी, महाराष्ट्र शासन माजल गांव लिफ्ट पाटबंधारे योजनेची अमलबजावणी जी एम आय डी सी मार्फत करणार होते. यासाठी कंपनीने ₹ १४२ कोटी अग्रिम दिला होता. परंतु ही योजना महाराष्ट्र शासनाने खंडित केली. कंपनी महाराष्ट्र शासनाकडून परतावा मागीत आहे. या प्रकरणी कोणत्याही भांडवली मत्ता निर्माण झालेल्या नाहीत. किंवा कोणत्याही होणाऱ्या मत्तांसाठी कंपनीने योगदान दिलेले नाही; त्यामुळे अशी योगदाने / मत्ता निर्लेखित करण्याचा प्रश्न उद्भवणार नाही. सदर अग्रिमाची वसूली प्रलंबित असल्याने पैशाचे वेळेनुरूप मूल्य यासाठीचा अपेक्षित पत हानी यासाठी इतर या समान येण्यांप्रमाणे लेखा वह्यात तरतूद नोंदविली आहे. याशिवाय कंपनीने यापूर्वीच्या वर्षाच्या पाणी वापराच्या देयकांत जी सवलत कापली, तिचे योग्य लेखे चालू वर्षात खर्च म्हणून करण्यात आले आहेत. | व्यवस्थापनाने दिलेल्या मताशी आम्ही सहमत आहोत. |

१. एस.बी.आय.च्या प्राईम लोडींग रेट या दराने आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | नाशिक औष्णिक विद्युत केंद्राच्या प्रकरणी जल संसाधन विभागाने (मार्च २०१८) ₹ ४५.६७ कोटीची मागणी केली. (यात मूळ पाणी आकार आणि उपकर याचे ₹ ३०.३६ कोटी अधिक दंड / व्याज / आश्वासित आकार याचे ₹ १५.३१ कोटी) कंपनीने (जुलै २०१८) ₹ ३०.३६ कोटी (मुद्दल रक्कम) जल संसाधन विभागाकडे[२] भरले. दंड, व्याज आणि आश्वासन आकार सोडून द्यावा यासाठी सदर प्रकरण महाराष्ट्र शासनाकडे पाठवावे असा निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी वर्ष २०१७-१८ च्या वित्तीय विवरण पत्रात आवश्यक तरतूद केली नव्हती. यामुळे ''खर्च'' आणि इतर ''वित्तीये दायित्वे'' (इतर चालू वित्तीय दायित्वे) यांचे कमी विवरण झाले तर ''नफ्याचे'' तेवढेच म्हणजे ₹ ३०.३६ कोटीचे जादा विवरण झाले आहे. | जल संसाधन विभागाने पाणी पुरवठा संबधात दंड / व्याज / आश्वासित आकार यांच्या दिलेल्या देयकांवर वाद होता. सदर देयके निषेध नोंदवून द्यावीत' असा निर्णय जुलै २०१८ मधे घेण्यात आला. वादग्रस्त असल्याने वित्तीय वर्ष २०१७-२०१८ मधे खर्चाची तरतूद नाही या परिणामाची आकस्मिक दायित्त्व प्रकट केले आहे. | व्यवस्थापनाने दिलेल्या मताशी आम्ही सहमत आहोत. |
| | **II.** वित्तीय स्थितीवर अभिप्राय | | |
| ५ | **मत्ता**<br>**चालू नसलेल्या मत्ता**<br>**मालमत्ता, कारखाने आणि साधने (टिपा क्र.१) : ₹ ४०,८१८.०९ कोटी**<br>यामधे कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या संदर्भात जो संचालक मंडळाने मान्य केलेल्या एका कंत्राटदाराच्या जादा दाव्याची (फेब्रुवारी २०१८) रक्कम ₹ २८.१२ कोटी समाविष्ट नाही. यामुळे चालू नसलेल्या मत्तांचे (मालमत्ता, कारखाने आणि साधने) आणि ''चालू वित्तीय दायित्तवे'' (इतर वित्तीय दायित्वे) यांचे ₹ २८.१२[३] कोटीने कमी विवरण झाले आहे. | संचालक मंडळाने एका कंत्राटदाराची ₹ २८.१२ कोटीची जादा मागणी मंजुरी केली असली तरी वित्तीय मागणी आणि काम चालू ठेवण्याची व पूर्ण करण्याची असमर्थता यामुळे मे.एलआयटीएल यांना दिलेले कंत्राट खंडित केले. महानिर्मिती आणि कंत्राटदार या दोघांचे उर्वरित कामातील जोखीमा व मोबदले आणि खर्चाविषयी दावे होते. त्या दरम्यान देणी आणि येणी यांचा विविध दाव्याबद्दल अंतिम फैसला होत नाही तोपर्यंत मान्यता स्थगित ठेवणे अधिक योग्य होते. वित्तीय वर्ष २०१८-१९ मधे या विषयी अधिक सुस्पष्टता येईल आणि कंपनीला येणी व देणी या विषयी लेखा वह्यात दाव्यांना मान्यता देता येईल असे वाटते. | व्यवस्थापनाने दिलेल्या मताशी आम्ही सहमत आहोत. |
| ६ | **प्रगतीपथावरील भांडवली कामे : ₹ १३१६.४३ कोटी**<br>**वजा : निकामी मालासाठी तरतूद : ₹ (२४.२४ कोटी)**<br>**निव्वळ : प्रगतीपथावरील भांडवली कामे : ₹ १२९२.१९ कोटी**<br>यामधे एका युनीटचे (कोराडी औष्णिक विद्युत केंद्र) नुतनीकरण आणि आधुनिकीकरण यासाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे ₹ १.३८ कोटी समाविष्ट नाहीत. यामुळे ''खर्च'' (कर्मचारी लाभ खर्च)'', यांचे ₹ १.३८ कोटीने जादा विवरण झाले आहे. तर ''चालू नसलेल्या मत्ता (प्रगतीपथावरील भांडवली कामे)'' आणि ''नफा'' यांचे तेवढ्याच रकमेने कमी विवरण झालेले आहे. | आगामी वर्षात कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे भांडवलीकरण करण्याच्या नोंदीसंबंधी सुधारणा केली जाईल. | व्यवस्थापनाने दिलेल्या मताशी आम्ही सहमत आहोत. |

२. दंड, व्याज आणि आश्वासित आकार यांच्या उर्वरित रकमा सोडून देण्यासाठी हे प्रकरण महाराष्ट्र शासनाकडे नेले आहे.
३. मत्ता निहाय तपशील नसल्याने घसारा आणि नफ्यावरील प्रभाव याचा अंदाज करता येत नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | वरील बाबीत चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रात मार्च २०१८ या महिन्यात पूर्ण केलेल्या एका कामाची खर्च रक्कम ₹ १.२४ कोटी[४] समाविष्ट आहे. यामुळे या मत्तेच्या पूर्ण कामाचे भांडवलीकरण झाले नसल्याने ''मूर्त मत्ता (मालमत्ता, कारखाने आणि साधने (ठोक))'' यांचे कमी विवरण झाले तसेच ''घसाऱ्याचे'' कमी विवरण झाले. परिणामी नफ्याचे ₹ ०.०७ लाखाने[५] जादा विवरण झाले आहे. | चंद्रपूर महा औष्णिक विद्युत केंद्राच्या युनीट क्र.५ व ६ मधील कोळसा गिरणीतील एक्स आर पी १०४३ ची मिल बॉडीच्या अंतर्गत खराब न होणारे अस्तर लावणे यासाठीची ₹ १.२४ कोटीची मत्ता वित्तीय वर्ष २०१७-१८ ऐवजी चालू वर्षी २०१८-१९ मधे निर्माण केली गेली. मात्र त्याच्या घसाऱ्याची रक्कम (₹०.०७ कोटी) खूप मोठ्या स्वरुपाची नाही. आगामी वर्षातील लेखा वह्यात आवश्यक नोंदी करण्यास मान्यता देण्यात येईल. | व्यवस्थापनाने दिलेल्या मताशी आम्ही सहमत आहोत. |
| ८ | **चालू नसलेली व्यापारी देणी**<br>**अप्रतिभूत, चांगली मानलेली : ₹ ५२४७.५५ कोटी.**<br>विलंब भरणा आकार या कारणास्तव होणारे उत्पन्न हे महिन्याच्या तत्त्वावर आधारलेले असते / तसा हिशेब केला जातो आणि हा आकार भरला नाही तरी त्याच्यावर दंडात्मक व्याज नव्हते. त्यानुसार कंपनीने अंगिकारलेल्या तरतूदीच्या मेट्रीक्सनुसार थकीत विलंब भरणा आकारावर अपेक्षित पत हानी याची तरतूद करावयास हवी होती. ती हिशेबानुसार ₹ १,०९०.५५ कोटी झाली आहे. कंपनीने मात्र अपेक्षित पत हानी साठी ₹ ९८२.२८ कोटीची तरतूद केली. ती १०८.२७ कोटीने कमी आहे. (चालू वर्षी ₹ ४३.४६ कोटी आणि मागील काळातील ₹ ६४.८१ आहे) यामुळे ''चालू नसलेली व्यापारी येणी'' यात रू.१०८.२७ कोटीचे जादा विवरण आणि वर्षातील ''खर्च'' ''अपेक्षित पत हानी साठी मत्ता'' याचे ₹ ४३.४६ कोटीने आणि पूर्व कालीन खर्चाचे ₹ ६४.८१ कोटीने कमी विवरण झाले. त्यामुळे वर्षाच्या नफ्याचे ₹ ४३.४६ कोटीने जादा विवरण आणि ''ठेवून घेतलेली मिळकत (नकारात्मक निगेटीव्ह)'', यांचे कमी विवरण झाले आहे. त्यामुळे ''समभाग'' यांचे ₹ ६४.८१ कोटीने जादा विवरण झाले. | वित्तीय वर्ष २०१६-१७ पूर्वी विलंब भरणा अधिभाराची डीपीएस देयके दरमहा / त्रैमासिक स्वरुपात दिली जात होती. वित्तीय वर्ष २०१६-१७ पासून डी पी एस देयके वर्षातून एकदा दिली जातात आणि त्यानुसार व्यापारी येणी म्हणून बीजकात दर्शविली जातात. देयकाच्या पद्धतीनुसार इसीएल चा मेट्रीक्स तयार करण्यात आला कंपनीने संबंधित वर्षातील विमागणिती अहवाल स्वीकारून त्यात गेलेल्या वेळेचा घटक व सवलतीचा घटक विचारात घेऊन अपेक्षित पत हानीचा हिशेब केला. ही कृती 'भारतीय लेखा मानक १०९ वित्तीय विलेख' यात दिलेल्या तत्त्वाशी सुसंगत आहे. ही कार्यपद्धती दि.१.०४.२०१५ पासून सातत्याने अनुसरली आहे. | व्यवस्थापनाने दिलेल्या मताशी आम्ही सहमत आहोत. |

४. युनीट ५ व ६ एक्स आर पी १०४३ कौल मिलच्या मिल बॉडीच्या आतील वेअर रेझिस्टंट लाईनरर्स यांचे उत्पादन, पुरवठा आणि रिट्रोफिटींग करणे.

५. ₹ १.२४ कोटी यावर एका महिन्यासाठी ५.२८ टक्के

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | **इतर चालू नसलेल्या मत्ता (टिपा - ५) : ₹ १०८८.९८ कोटी स्थगित भाडे (जलविद्यूत प्रकल्प) : ₹ ७००.०६ कोटी**<br>भारतीय लेखा मानक (भाडेपट्टी) यानुसार, प्रवर्तनीय भाडेपट्टी अंतर्गत भाडेपट्टीची भरलेली रक्कम याला सरळ रेषा पद्धतीने भाडेपट्टीच्या मुदतीसाठी खर्च म्हणून मान्यता दिली जाईल. (जर वापर कर्त्याच्या लाभाचा व वेळेसंबंधी अधिकार प्रतिनिधीत्त्व करणारी पद्धतशीर आधार नसला तर)<br>कंपनी ही जिच्याा दराचे नियमन केले जाते अशी संस्था आहे आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने, महाराष्ट्र शासनाच्या मालकीची जी विविध जलविद्युत केंद्रे कंपनीने चालविण्यासाठी भाड्याने घेतली आहेत, त्यांच्या वार्षिक भाड्यांची निश्चिती / मंजूरी केली आहे. (डिसेंबर २०१२ / एप्रिल २०१२). सदर मंजुरीत भाडे हा खर्च असून त्याची मागणी महावितरणकडून मासिक देयकात केली जाते. त्याचे लेखे वीज विक्रीच्या महसूलात केला जातो आणि तो कंपनीच्या वार्षिक महसूल आवश्यकता यांचा भाग असतात असे आयोगाचे नियमन आहे. कंपनीने मात्र, वित्तीय वर्ष २०१४-१५ ते २०१७-१८ या कालावधीत भाडेपट्टी खर्च सरळ रेषा पद्धतीने (₹ ४५२.०८ कोटी, प्रतीवर्षी) यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशाप्रमाणे देय भाडे खर्च ₹ ७००.०६ कोटी, (चालू वर्षासाठी ₹ ६२.४१ कोटी) यास खर्च मानण्याऐवजी ''स्थगित भाडे'' असे मानण्यात आले. यामुळे ''चालू नसलेल्या मत्ता (स्थगित भाडेपट्टीचे भाडे)'' यांचे ₹ ७००.०६ कोटीने जादा विवरण झाले आणि ''खर्च (जल विद्युत केंद्रे)'' यांचे कमी विवरण झाले. परिणामी वर्षाचा ''नफा'' याचे ₹ ६२.४१ कोटीने जादा विवरण झाले. तर ''ठेवून घेतलेल्या मिळकती (नकारात्मक)'' यांचे कमी विवरण होऊन ''समभागाचे'' ₹ ६३७.६५ कोटीने जादा विवरण झाले आहे. | भारतीय लेखा मानक १७ चा परिच्छेद क्र.१३ हा भाडेपट्टी संबधी आहे. त्यात म्हटले आहे की, *''जर भाड्याने देण्याचा (लेझर) अपेक्षित सर्वसाधारण चलनवाढीमुळे वाढणाऱ्या खर्चानुसार भाड्याचे पैसे मिळावेत अशी रचना जर केली नसेल तर, प्रवर्तनीय भाडेपट्टीतील भाड्यापोटी दिलेल्या रकमेला खर्च' अशी मान्यता 'सरळ रेषा पद्धतीने' देता येईल. मात्र जर भाड्याने देणाऱ्या व्यक्तीला सामान्य चलनवारी व्यतिरिक्त अन्य कारणांसाठी दिलेल्या पैशात बदल होत असेल तर ही अट लागू होणार नाही.''*<br>असे निरिक्षण आहे की, मंजूरीत भाडे हे सरळ रेषीय नाही किंवा भाड्याचे स्वरुप चलनवाढीचा कल दर्शवत नाही. वस्तूस्थिती तर अशी आहे की, आकारलेले भाडे, बऱ्याच प्रमाणात काही वर्षात कमी कमी होत गेले आहे. काही थोड्या प्रकरणात तर ते नकारात्मक झाले आहे. म्हणून कंपनीने भारतीय लेखा मानकातील परिच्छेद ३३ च्या गरजांची पूर्तता केली असून ''भाडेपट्टी'' आणि अचूकपणे सरळ रेषा पद्धती नुसार आकारणी केली आहे. याशिवाय भारतीय सनदी लेखापाल संघटनेने गठीत केलेला ''भारतीय लेखा मानकातील संक्रमण सुविधांसाठीचा गट'' याने त्याचे अंक क्र.७ या स्पष्टपणे म्हटले आहे की, *''जर भाड्याने देणाऱ्याला केलेल्या भाड्याच्या भरण्यात सामान्य चलनवाढी व्यतिरिक्त अन्य घटकांमुळे जर बदल होत असेल तर, भाड्याचे पैसे सरळ रेषा पद्धतीने द्यावेत''* | व्यवस्थापनाने दिलेल्या मताशी आम्ही सहमत आहोत. |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | **दायित्त्वे चालू दायित्त्वे आर्थिक दायित्त्वे इतर चालू आर्थिक दायित्त्वे (टिपा १९) - ₹ ७२०३.४७ कोटी**<br>**संबधितांची देणी : ₹ ६८९.८९ कोटी :**<br>"युसीएम कोल कंपनी लिमिटेड" ही संयुक्त साहस कंपनी (ऑक्टोबर २०१८ मधे) गठीत केली. तिचा उद्देश चेंदी पाडा या मिळालेल्या कोळसा खाणीच्या जागेचा विकास व कार्य करणे असा असून त्यात महानिर्मितीचे १८.५३ टक्के शेअर्स आहेत. यासाठी "अंदानी एंटरप्रायझेस लिमिटेड" या कंपनीची खाण विकासक व कार्य प्रवर्तक म्हणून निवड (फेब्रुवारी २०११ मधे) झाली. त्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयाने (सप्टेंबर २०१४) कोळसा खाण जागेचे वाटप रद्द केले. अदानी कंपनीने लवादाच्या मार्फत युसीएमसीसीएल विरोधात ₹ ४९४.७६ कोटीचा दावा केला. तसेच (ऑक्टोबर २०१६ मधे) लवादाकडे अर्ज करुन ₹ ७३.९४ कोटीची अंतरिम साह्य प्रतिवादीने देण्याची मागणी केली. ती लवादाने मान्य केली. यामुळे अदानी कंपनी लिमिटेड ला ₹ १३.८६ कोटी (१८.७५ टक्के) चे आपले योगदान देण्याचे दायित्त्व कंपनीवर आहे. त्यासाठी वित्तीय विवरण पत्रात आवश्यक तरतूद केलेली नाही.<br>यामुळे "चालू वित्तीय दायित्त्वे" आणि "वित्तीय मत्ता (उपकंपन्या, संयुक्त साहसी व सहयोगी - कंपन्या यांच्यात क्वासी इक्विटी गुंतवणूक करणे)" याचे ₹ १३.८६ कोटीने कमी विवरण झाले. | यू सी एम कोल इंडिया लि. आणि मेसर्स ए इ एल यांच्यातील वादावर प्रक्रीया चालू आहे. अंतिम निकालाची प्रतिक्षा आहे. याशिवाय हा निकाल हंगामी स्वरुपाचा असल्याने त्याला पून्हा आव्हान दिले जाण्याची शक्यता आहे. महानिर्मिती भागधारक असल्याने तिचे भांडवलातील योगदान यापूर्वीच दिले आहे. अंतरीम निर्णयावर कोणताही निर्णय यू सी एम कोल कंपनीने घ्यावयाचा आहे. जर यु सी एम ने महानिर्मितीकडे जादा योगदानाची मागणी केली तर त्यावेळी निर्णय केला जाईल. प्रकरण प्रलंबित असल्याने यावेळी तरतूद अनावश्यक आहे. | व्यवस्थापनाने दिलेल्या मताशी आम्ही सहमत आहोत. |
| ११ | **इतर चालू दायित्त्वे (टिपा क्र.२०) ₹ २३.०० कोटी**<br>**सांविधिक देय : ₹ २३ कोटी**<br>११.अ) यामधे "कोराडी, चंद्रपूर आणि परळी येथील नवीन प्रकल्पाच्या बांधकामासाठीच्या खर्चावरील कामगार उपकराची" महाराष्ट्र शासनास देय असलेला ₹ १५५.८० कोटी[६] समाविष्ट नाही. ती ३१ मार्च १८ रोजी देय होती. यामुळे "चालू दायित्त्वे (सांविधिक देणी)" आणि "खर्च" याने ₹ १५५.८० कोटीने कमी विवरण झाले आहे आणि नफ्याचे तेवढे जादा विवरण झाले.<br>**III) सांविधिक लेखापरिक्षकांचे अहवालावर अभिप्राय :**<br>**११** ब) स्वतंत्र लेखापरिक्षकांचे अहवालाचे जोडपत्र क्र.२ यामधे उपरोक्त वस्तूस्थितीवर प्रकाश टाकलेला नाही. यामुळे लेखापरिक्षकांचा अहवाल हा वास्तविकरित्या त्या मर्यादित चुकीचा / सदोष व उणिवायुक्त आहे. | कामगार उपकराचे परिक्षण करण्यात येत आहे. त्याच्या अंतिम फलनिष्पत्ती नुसार आवश्यक लेखा नोंदी करुन त्यांना आगामी वर्षात लेखा वह्यात मान्यता देण्यात येतील. | व्यवस्थापनाने दिलेल्या मताशी आम्ही सहमत आहोत. |

६. कोराडी, चंद्रपूर आणि परळी येथील बी टी जी आणि बी ओ पी कंत्राटदारांना दिलेल्या ₹ १५,५८०.२२ कोटीच्या एकूण भरण्याच्या एक टक्के झाली.

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | **इतर अभिप्राय :**<br>**महसूल**<br>**प्रवर्तनातील महसूल**<br>**वीज विक्री (टिपा क्र.२२) : ₹ १९,०११.०३ कोटी**<br>भारतीय लेखा मानक १० नुसार कंपनीने अहवाल कालावधीच्या[८] नंतरच्या घटनांचे समायोजन[७] करुन त्या रकमा वित्तीय विवरण पत्रात दाखवायच्या असतात. कंपनीच्या ३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वर्षाची वित्तीय विवरण पत्रके दि.२८ सप्टेंबर २०१८ रोजी मंजूर करण्यात आली आहेत.<br>महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने त्या वित्तीय वर्षात २०१५-१६ (अंतिम), २०१६-१७ (अंतिम) आणि २०१७-१८ (हंगामी) यांच्या वार्षिक महसूल आवश्यकतांचे समायोजना संबधीचा आदेश दि.०१/०९/२०१८ यात नमूद केले आहे की, महानिर्मितीने महावितरणला ₹ १२७५.१२ कोटी इतके जास्त देयक आकारले होते. त्याचे समायोजन वित्तीय वर्ष २०१८-१९ मधील महावितरणच्या महसूलात करावे. या वस्तूस्थितीचे प्रकटन वित्तीय विवरण पत्रात नाही, ही बाब भारतीय लेखा मानक - १०च्या तरतुदीच्या विरोधात आहे. | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने प्रकरण क्र.१९६ वर्ष २०१७ याच्या आदेशाप्रमाणे वित्तीय वर्ष २०१८-१९ चे वीज दर निश्चित केले. त्यामध्ये आयोगाचे यापूर्वीचे आदेश आणि मागील वर्षांची (वित्तीय वर्ष २०१३-१४ ते वित्तीय वर्ष २०१६-१७ पर्यंत वित्तीय वर्ष २०१७-१८ हंगामी समायोजन) समायोजने याचा संलग्नपणे समावेश आहे. महानिर्मितीवर हा वीज दर आदेश १/१०/१८ रोजी बजावण्यात आले. नंतर संचालक मंडळाने त्याचा अंगिकार केला. आयोगाच्या वरील आदेशातील कलम ७.१.६ यात नमूद केले की, आयोग महावितरणच्या वित्तीय वर्ष २०१८-१९ ची वार्षिक महसूल आवश्यकतांचे समायोजन करतांना ₹ १२७५.१२ कोटी लागू करील. यास प्रतिसाद म्हणून असाच प्रभाव महानिर्मितीच्या वित्तीय वर्ष २०१८-१९ च्या वार्षिक महसूलाच्या आवश्यकता यामधे दिसण्याची गरज आहे. त्यानंतर कंपनीने या विरोधात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे आढावा विनंती अर्ज दाखल केला. त्यापैकी काही विनंत्या आयोगाने दि.३/१२/१८ रोजीच्या आदेशात मंजूर केल्या यामुळे वित्तीय वर्ष २०१७-१८ च्या लेखावर कोणताही परिणाम झालेला नाही. म्हणून उपरोक्त व्यवहाराला भारतीय लेखा मानक १० लागू नाही. | व्यवस्थापनाने दिलेल्या मताशी आम्ही सहमत आहोत. |
| १३ | **विक्री / विल्हेवाटीच्या मत्तांचे वर्गीकरण (टिपा १ बी) : ₹ २०७.३१ कोटी :**<br>दि.३१ मार्च २०१८ रोजी कंपनीच्या अकार्यान्वित केलेल्या दोन युनीटस् (भुसावळ युनीट क्र.२ आणि राधानगरी जलविद्युत केंद्र) यांचा पुढे नेलेला खर्च मत्तांमधून (मालमत्ता, कारखाने आणि साधने) यातून अमान्य केलेला नव्हता. ही कृति भारतीय लेखा मानक १६ चा भंग करणारी आहे. यापैकी एक युनीट विकणे / विल्हेवाट लावणे यासाठी कंपनीने निर्णय घेतला होता (जून २०१८) त्याचा समावेश विक्री / विल्हेवाटी साठी वर्गवारी केलेल्या मत्तांमधे नाही. यामुळे भारतीय लेखा मानक १०५ (विक्री / विल्हेवाटीसाठी काढलेल्या आणि प्रवर्तन खंडित केलेल्या मत्ता) याचा भंग झाला आहे.<br>ही चार युनीट्स खंडित करण्याच्या तारखेला त्यांची पुढे नेलेला खर्च आणि संचित घसारा आणि अकार्यान्वित केल्यानंतर मत्तांमधे भर करणे / घसारा तरतूद करणे अशी कृती केली असेल तर त्यांची नोंद नाही. म्हणून त्याचे वित्तीय विवरण पत्रकांवरील परिणामांचा अंदाज करता येत नाही. | या संबंधात भुसावळ युनीट नं.२ आणि राधानगरी जल विद्युत केंद्र यांच्या मत्तांचे वित्तीय वर्ष २०१८-१९ मधे ''विक्रीसाठीच्या मत्ता'' असे पूनवर्गीकरण केले जाईल आणि आवश्यक त्या लेखा नोंदी सुधारणा मंजूर केल्या जातील. | व्यवस्थापनाने दिलेल्या मताशी आम्ही सहमत आहोत. |

७. अहवाल कालावधीनंतर घटना म्हणजे, अहवालाची मुदत संपल्यानंतर मंडळाने मंजूर करण्यापर्यंतच्या काळात घडलेल्या अनुकूल आणि प्रतिकूल घटना.
८. अहवाल कालावधीनंतरच्या घटनांचे समायोजन म्हणजे, अहवाल वर्ष मुदतीच्या अखेरीस असलेल्या स्थितीचे पुरावे देतात अशी समायोजने.

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | **भाडेपट्टी (टिपा क्र.४४) :**<br>कंपनीने वित्तीय विवरण पत्रांत (टिपा क्र.५ यात) नमूद केलेल्या जमिनीच्या भाडेपट्टीची रचनेचे वित्तीय भाडे असे वर्गीकरण तिच्या प्रारंभीच्या तारखेस केले जाते. कारण त्यामुळे भाडेपट्टीच्या काळासाठी सर्व जोखीमा व प्रासंगिक मोबदले यांची मालकी कंपनीकडे हस्तांतरित झाली असते. भारतीय लेखा मानक १७ (भाडेपट्टी) यानुसार, भाडेपट्टीची मुदत सुरू होण्यापासून भाडेकरु, भाडेपट्टी घेतलेला मालमत्तेच्या रास्त मूल्याच्या रक्कमेला ताळेबंदात भाग - दायित्त्वे यात मान्यता देईल किंवा किमान भाडेपट्टीचे विद्यमान मूल्य कमी असल्यास तशी मान्यता देईल. त्याची निश्चित भाडे सुरु होताना केली जाईल. किमान भाडेपट्टीचे भरलेले पैसे याचे विनियोजन वित्तीय आकार आणि थकीत दायित्त्व यांच्यामधून केले जाईल. भाड्याच्या प्रत्येक मुदतीसाठी वित्तीय आकार दिला जाईल. जेणेकरुन दायित्त्वाच्या उर्वरित रकमेवर एक कायमस्वरुपी व्याज दर निर्माण व्हावा. वित्तीय भाडेपट्टीद्वारे घसारा योग्य मत्तांसाठी घसारा तसेच प्रत्येक लेखा कालावधीसाठी वित्तीय खर्च यांचा उगम होतो.<br>कंपनीने उरण वायू औष्णिक वीज केंद्रासाठी सिडकोकडून भाडेपट्टीने जमीन संपादित केली आहे. त्यासाठी आगाऊ पूर्व हप्ता ₹ १०६.११ कोटी भरले आहेत. मात्र या भाड्याच्या जमिनीसाठी कंपनीने आवश्यक तो लेखा परिणाम दिलेला नाही. त्याऐवजी, भाडेपट्टीची सदर जमिनीचा लेखा 'मूर्त मत्ता' असा करणे चालू आहे. (भारतीय लेखा मानके अमलात आणण्यापूर्वी तसे केले जात होते.) ही कृती भारतीय लेखा मानक १७ आणि कंपनीचे लेखा धोरण यांचे उल्लंघन करणारी आहे. तसेच भारतीय लेखा मानक १७ नुसार विहित केलेली आणखी काही प्रकटने करणे कंपनीवर बंधनकारक आहेत, ती सुद्धा कंपनीने केलेली नाहीत. | कंपनीने उरण वायू औष्णिक विद्युत केंद्रासाठी सिडको कडून भाडेपट्टीने जमीन संपादन केली. त्यासाठी एकूण भाडेपट्टीच्या प्रिमियमचे आगाऊ पेमेंट केले. या जमिनींचे मत्तांच्या यादीमधे ''भाडेपट्टीची धारण केलेली जमीन'' असे केली आहे. यासाठी भविष्यात कोणतीही किमान भाडेपट्टी नाही. म्हणून अशा पैशासाठी विद्यमान मूल्याचा हिशेब किंवा भरलेल्या पैशाचे वित्तीय आकारात विनियोजन करणे आणि थकीत दायित्त्वे कमी करणे आदि बाबी उद्‌भवत नाहीत. म्हणून कंपनीने उरण येथील भाडेपट्टी जमिनीचे अचूक लेखे केले आहेत आणि या विषयी आणखी कोणत्याही नोंदी / प्रकटने करण्याची आवश्यकता नाही. | व्यवस्थापनाने दिलेल्या मताशी आम्ही सहमत आहोत. |

## स्वतंत्र लेखापरिक्षक यांचा अहवाल

प्रति, मा.सदस्य,
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती)

**स्वायत्त वित्तीय विवरणपत्रके याविषयी भारतीय लेखा मानके यानुसार अहवाल देणे:**

१. आम्ही, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती कंपनी) या कंपनीची येथे सोबत जोडलेल्या स्वायत्त वित्तीय विविरणपत्रकाचे भारतीय लेखा मानकांनुसार लेखापरिक्षण केले आहे. या विवरणपत्रकात दि.३१ मार्च २०१८ रोजीचे ताळेबंदपत्रक, याच तारखेला संपलेल्या वर्षामधील कंपनीचे नफा व तोटा पत्रक (यात इतर सर्वकष उत्पन्न अंतर्भूत आहे.) रोकडता प्रवाह विवरणपत्रक आणि या वर्षाच्या समभागातील बदलांचे पत्रक यांचा समावेश आहे. तसेच कंपनीच्या महत्त्वाच्या लेखा धोरणांचा सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती ही सुद्धा दिली आहे. (यापुढे याचा उल्लेख स्वायत्त भारतीय लेखा मानक यानुसार वित्तीय विवरणपत्रके असा केला आहे.)

**स्वायत्त भारतीय लेखा मानकानुसार वित्तीय विवरणपत्रके याबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी**

२. कंपनी अधिनियम २०१३ यातील कलम १३४ (५) (सदर अधिनियम) यानुसार कंपनीच्या वित्तीय स्थितीचे सत्य व योग्य दर्शन घडविणारी उपरोलिखित स्वायत्त भारतीय लेखा मानकानुसार वित्तीय विवरणपत्रके तयार करणे आणि त्यासोबत इतर सर्वकष उत्पन्न अंतर्भूत असलेली कंपनीच्या वित्तीय कामगिरी, रोकडता प्रवाह, कंपनीच्या समभागातील बदलांचे विवरणपत्रके या सर्व बाबीची विवरणपत्रके सादर करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदरी आहे. याशिवाय भारतामध्ये सर्वसाधारणपणे स्वीकारली जाणारी लेखा तत्त्वे यानुसार आणि कायद्याचे कलम १३३ अंतर्गत कंपन्यांसाठी (भारतीय लेखा मानके) नियमावली २०१५ यात विनिर्देशित केलेली भारतीय लेखा मानके यांचे पालन करणारी वित्तीय विवरणपत्रके तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे.

या जबाबदारीमध्ये पुढील बाबींचा समावेश आहे. त्या म्हणजे कंपनीच्या मतांची सुरक्षितता राखण्यासाठी आणि लबाडी व इतर अनियमितता शोधण्यासाठी लेख्यांचे योग्य व पुरेसे दस्तऐवज यांचे जतन करणे, योग्य लेखा धोरणे निवडणे व ती अमलात आणणे, योग्य व न्याय निर्णय घेणे, लेख्यांच्या दस्तऐवज अचूक व परिपूर्ण रितीने तयार करण्यासाठी उचित व सूज्ञ अंदाज बांधणे, आणि कंपनीचे रास्त दर्शन घडविणारी आणि कोणत्याही लबाडी किंवा चूका यापासून मुक्त असलेली 'स्वायत्त भारतीय लेखा मानकानुसार वित्तीय विवरणपत्रके' सादर करणे.

**लेखापरिक्षकांची जबाबदारी**

३. स्वायत्त भारतीय लेखा मानकानुसार वित्तीय विवरणपत्रके यांचे बाबत आमच्या लेखापरिक्षणावर आधारलेली आमची मते व अभिप्राय व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही लेखापरिक्षण करताना कायद्याच्या तरतुदी, लेख्यांची व लेखापरिक्षणाची मानके आणि कायद्यातील तरतुदीनुसार व त्याअंतर्गत केलेल्या नियमावलीनुसार लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट करणे आवश्यक असणारे इतर विषय या सर्व बाबी विचारात घेतल्या आहेत.

कायद्याचे कलम १४३ (१०) यामधे विनिर्देशित केलेल्या लेखामानकांना अनुसरून आम्ही सदर स्वायत्त भारतीय लेखा मानकानुसार वित्तीय विवरणपत्रके यांचे लेखा परिक्षणाचे संयोजन केले. ही लेखा मानके आणि त्यांची अधिघोषणा यानुसार आम्ही नैतिक गरजांचे अनुपालन करणे आवश्यक असते. तसेच ही स्वायत्त भारतीय लेखा मानकानुसार वित्तीय विवरणपत्रके कोणत्याही प्रत्यक्ष गैर माहिती देण्यापासून मुक्त आहेत किंवा कसे याचे योग्य प्रकारे हमी मिळविण्याच्या उद्देशाने आम्ही आमच्या लेखापरिक्षणाचे नियोजन व कार्यपालन करतो.

या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रामधील रकमा आणि प्रकटने याविषयी लेखापरिक्षणात्मक पुरावे मिळविण्याच्या दृष्टीने लेखा परिक्षणाचे काम केले जाते. यासाठी निवडलेली कार्यपद्धती लेखापरिक्षकांच्या न्याय्य निर्णयावर अवलंबून असते. त्यामधे या स्वायत्त भारतीय लेखा मानकांनुसार तयार केलेल्या वित्तीय विवरणपत्रकात लबाडीने किंवा अनवधनाने प्रत्यक्षरित्या गैरमाहिती देण्याचा धोक नाही याची खात्री करावी लागते. अशा धोक्याचे निर्धारण करतांना, कंपनीने या विवरणपत्रातून कंपनीचे वस्तूस्थितीदर्शक व रास्त दृश्य दिसावे यासाठी कंपनीची संबंधित अंतर्गत लेखा नियंत्रणांचा विचार लेखापरिक्षक करतात. तसेच परिस्थितीनुरूप योग्य कार्यपद्धतीची रचना करतात. कंपनीत उपयोगात आणलेली लेखा धारणे तसेच कंपनीच्या संचालकांचे लेखा विषयक अंदाज यांच्या योग्यतेचे व या स्वायत्त वित्तीय लेखा विवरण पत्रांचे सर्वंकष सादरीकरण या बाबींचे मुल्यांकन लेखा परिक्षणात करण्यात येते.

आमचा विश्वास आहे की, भारतीय लेखा मानकानुसार केलेल्या या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रांबाबत आमचे लेखापरिक्षणाविषयीक पात्र मते देण्यासाठी आम्ही पुरेसे आणि योग्य पुरावे मिळविले आहेत.

**पात्र मतांचा आधार:**

*४(१) महानिर्मित्ती कंपनीने, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण (महावितरण) कंपनी सोबत केलेल्या वीज खरेदी करारातील अटीनुसार विलंबाने भरलेल्या रकमेचे व्याज ₹ २,०४७.३१ कोटी (मागील वर्षी ₹ १,६९७.६४ कोटी) या उत्पन्नाला "ग्राहकांच्या अधिभाराचे उत्पन्न" या लेखा शीर्षाखाली मान्यता दिली. महावितरण कंपनीने या अधिभाराची एकूण रक्कम ₹ ७,४८५.६१ कोटी (मागील वर्षी*

₹ ५,४३८.३० कोटी) भरलेली नाही. दि.३१ मार्च २०१८ पर्यंत ती थकीत आहे. महावितरणने मागील बऱ्याच वर्षात भरणा केलेला नसल्याने या थकीत रकमेची वसुली निश्चित नाही.

४(२) वरील अनिश्चिती विचारात घेऊन महानिर्मितीच्या व्यवस्थापनाने यावर्षी अंदाजित, अपेक्षित पत तोटा म्हणुन ₹ २८५.९६ कोटीची तरतूद केली आहे. आणि त्याची आजपावेतो सदर तरतूद एकूण ₹ ९८२.२८ कोटी झाली आहे.

उपरोक्त व्यापारी येण्याची वसूलीची क्षमता आणि त्यासाठी अपेक्षित पत तोटा यामधे केलेल्या अंदाजित तरतूद पुरेशी असणे किंवा कसे यावर कोणतेही भाष्य करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

५. वित्तीय विवरणपत्रातील स्थगित कर दायित्त्वाची (निव्वळ) ₹ ८८५.४४ कोटी या मागील वर्षीच्या चुकीचे पुनर्निवेदन कंपनीने त्या वर्षाच्या अखेरीस म्हणजे ३१/०३/२०१७ रोजी केलेले नाही. मागील वर्षाच्या चालू करांचा हिशेब करताना कंपनीने पात्र गुंतवणूक भत्त्याची रक्कम ₹ २,५५८.४९ कोटी वजावट विचारात घेतली नव्हती. यामुळे मागील वर्षी तेवढ्या प्रमाणात आशोषित तोटा कमी नोंदला. तसेच या कारणासाठी मागील वर्षी स्थगित कर मत्ता ₹ ८८५.४४ कोटी निर्माण केली नव्हती. परिणामी मागील वर्षअखेर स्थगित कर मत्ता (निव्वळ) ही ₹ ८८५.४४ कोटीने जादा नोंदली गेली.

चालू वर्षाच्या 'नफा व तोटा पत्रकात' वरील स्थगित कर मत्तेची रक्कम ' ८८५.४४ कोटी मान्यता देऊन नोंदण्यात आली. त्यामुळे वर्षाचा करोत्तर नफा तेवढ्या रकमेने जादा नमूद केलेला आहे.

वरील लेखा प्रक्रीया ही 'भारतीय लेखा मानक क्र.८, 'लेखा धोरणे व लेखांचे अंदाज व चुका यांचे बदल' यातील आवश्यकतेनुसार नाही.''

६. कर्ज व अग्रिम, अनामती आणि व्यापारी देणी यांच्या शिल्लक रकमा या संबंधितांकडून कायम होणे आणि / किंवा प्रकरणानुसार मेळ करणे यांच्या अधीन आहेत. असे कायम आणि मेळ करणे प्रलंबित असल्याने त्याचे परिणामस्वरुप समायोजन करता आले नाही.

मात्र महानिर्मिती कंपनीने तिचे विक्रेते पुरवठादार यांना याबाबत पत्रे धाडली आहेत. अशी माहिती आम्हास देण्यात आली व या शिल्लकी कायम असल्याचे पत्रे मिळाल्यावर त्याचा मेळ केला जातो व मेळ करण्याची प्रक्रिया कंपनीत सतत चालू असते अशी माहिती आम्हास मिळाली.

लेखापरिक्षणासाठी पुरेसे व योग्य पुरावे नसल्याने या शिल्लकीची स्थिती व कंपनीचा वर्षाचा नफा (जर असल्यास) यावर होऊ शकणाऱ्या परिणामावर मत देण्यास आम्ही असमर्थ आहोत.

७. कंपनीची मालमत्ता, कारखाने आणि साधने या संदर्भात कंपनीचे लेखाधोरणे टिपा क्र.५(९), टिपा क्र.५ (१०) आणि ५(११) यांचेकडे तसेच घसारा व कर्ज परतफेड या संबंधीची टिपा ११ (बी) (३) याकडे लक्ष वेधण्यात येते. आमच्या लेखा परिक्षणात या लेखाधोरणापासून काहीसे विचलन झाले असल्याचे आमच्या निदर्शनास आले. विशेषतः (१) वस्तूमालाची सुची आणि मालमत्ता, कारखाने व साधने यांच्या व्याख्येनुसार सुटे भाग यांचे वर्गीकरण म्हणजेच ''मालमत्ता, कारखाने व साधने यांची परिभाषा पूर्ण करणाऱ्या गोष्टीचे वर्गीकरण'' ''वस्तू माल साठा'' यात केले असून त्यांचे कंपनीने ''भांडवलीकरण'' केलेले नव्हते. (२) बदललेल्या सुट्या भागांची नफा व तोटा पत्रकात आकारणी करणे यामधे कंपनीने बदललले जुने सुटे भाग ''मालमत्ता, कारखाने व साधने'' यांचे कमी होत गेलेले मूल्य याची मान्यता काढून घेतलेली नव्हती किंवा बदललेल्या भागाचा मूल्य खर्च नफा व तोटा पत्रकात आकारलेला नव्हता आणि त्यांची मान्यता काढल्यावरही काही बाबतीत त्यांचा दोघांच्या उर्वरित उपयुक्त आयुष्यासाठीचा घसारा काढणे चालू राहिले होते आणि (३) सुट्या भागांचे त्यांच्या कारखान्यासोबत संलग्नीकरण केलेले नव्हते. त्यामुळे संबंधित मालमत्ता, कारखाने व साधने यांच्याशी कोणताही संदर्भ न देता अशा सुट्टया भागांचा आणि मालमत्ता, कारखाने व साधनातील भरावरील घसाऱ्याची आकारणी करणे चालूच राहिले होते. याबाबत व्यवस्थापनाच्या परिपूर्ण व तपशीलवार कामाचा अभाव असल्याने, त्याचा कंपनीच्या वित्तीय विवरणपत्रांवर काय परिणाम होतो; यावर मत देण्यास आम्ही असमर्थ आहोत.

८. अ) आम्ही निवेदन करतो की, उपरोक्त परिच्छेद ६ व ७ यात वर्णलेल्या विषयाच्या संदर्भानुसार त्यांचा कंपनीच्या वर्षभरातील नफ्यावर आणि वर्षअखेर जमवलेल्या मिळकतीवर तसेच संबंधित मत्ता व दायित्त्वे यांच्यावर दि.३१ मार्च २०१८ रोजी होऊ शकणारे परिणाम याचा अंदाज करता आला नाही.

ब) जर उपरोक्त परिच्छेद ४ व ५ मधील विषय विचारात घेतले असते, (त्यांची निश्चिती / सांख्यिकीकरण करता येणे शक्य होते) तर त्यामुळे सोबतच्या वित्तीय विवरणपत्रकांतील त्यांच्यासंबंधिच्या विविध बाबींच्या अंतिम रकमा खालीलप्रमाणे असत्या

(₹ कोटीत)

| अनु. क्र. | तपशील | ३१/०३/२०१८ रोजी दिलेली | ३१/०३/२०१८ असू शकणारी | ३१/०३/२०१७ रोजी पूनर्निवेदन केलेला | ३१/०३/२०१७ रोजी असू शकणारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | महसूल - वर्षातील इतर प्रवर्तनाचा महसूल | २०५०.४५ | ३.१४ | १७३१.१५ | ३३.५१ |
| २ | व्यापारी येणी वित्तीय वर्षाच्या अखेरीस चालू नसलेली (अपेक्षीत पत तोट्याच्या तरतुदीनंतर निव्वळ) | ४२६५.२७ | ० | ३०४४.३४ | ० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | विनादेयकाचा महसूल इतर चालू वित्तीय मत्ता | २२०९.२२ | -२९.०५ | १७१०.७९ | १३.१५ |
| ४ | वर्षातील अपेक्षित पत तोट्याची तरतूद (नफा व तोटा पत्रकातील) | २८५.९६ | ० | १८०.६७ | ० |
| ५ | चालु वर्षाअखेरीस अपेक्षित पत तोट्याची तरतूद (ताळेबंद) | ९८२.२८ | ० | ६९६.३२ | ० |
| ६ | चालू करासाठी संचित तरतूद (भरलेल्या कराची निव्वळ) (ताळेबंद) | २२७.८६ | अनिश्चित | २११.६४ | अनिश्चित |
| ७ | वर्षासाठी स्थगित कर खर्च (नफा-तोटा पत्रक) | -६५४.३१ | २३१.१३ | -२५.९७ | -९११.४१ |
| ८ | स्थगित कर दायित्त्व (निव्वळ) - चालू वर्षाच्या अखेरचे (ताळेबंद) | ८५३.०३ | ८५३.०३ | १५०७.३४ | ६२१.९० |
| ९ | वर्षासाठीचे करोत्तर आणि इतर सर्वंकष उत्पन्नांसह नफा/(तोटा) | ७००.१८ | -११४६.६१ | -७७०.८८ | -१४०२.४० |
| १० | संचित नफा/(तोटा) - इतर समभाग नोंदलेल्या (अधिभार उत्पन्न अनिश्चित असल्याने त्यावरील चालू कराला वगळले आहे.) | -६५१४.९६ | -१३०१८.२९ | -७२१५.१४ | -११०७१.४५ |

**९. पात्र मत:**

*उपरिनिर्दिष्ट 'पात्र मतांच्या आधार' या शीर्षकाच्या परिच्छेदातील उप परिच्छेद क्र.४, ५, ६ आणि ७ यात नमूद केल्याप्रमाणे ज्याचे सांख्यिकीकरण करता येणार नाही असे संभाव्य परिणाम तसेच उपरोक्त वर्णीलेले परिणाम यांच्या अधीन राहून, आमचे सर्वोतपरी उत्कृष्ट ज्ञान, तसेच आम्हास दिलेली सर्वोत्कृष्ट स्पष्टिकरणे यानुसार आमचे मते यासोबत दिलेली स्वायत्त वित्तीय विवरणपत्रे ही भारतात सर्वसामान्यपणे स्विकारण्यात येणारी लेखा तत्त्वे व भारतीय लेखा मानकानुसार तयार केलेली असून, ती कंपनीच्या दि.३१ मार्च २०१८ रोजीच्या कामगीरीचे व कंपनीचा नफा (वित्तीय कामगीरी व इतर सर्वंकष उत्पन्न), कंपनीच्या रोकडता प्रवाह व समभाग रचनेतील बदल यांचे यथार्थ व रास्त दर्शन घडवितात.*

***१०. भर देण्याचे विषय:***

*आम्ही निम्नलिखित नोंदीकडे (टिपांकडे) लक्ष वेधतो :*

*अ) टिपा क्र.२९: ही नोंद भविष्यनिर्वाह निधी (सी पी एफ) याच्या अंशदानाच्या हंगामी लेख्यांच्या आधारे जर लेखांत तूट / जादा झाली असल्यास आणि भारतीय लेखा मानक १९ : 'कर्मचारी लाभ' अंतर्गत प्रकटने या विषयी आहे. कंपनीच्या सीपीएफ ट्रस्टकडून आवश्यक तपशील व माहिती उपलब्ध झाली नाही*

*ब) टिपा क्र.४४ ही टिपणी, ज्याची अंमलबजावणी अद्याप व्हायची आहे अशा विविध जल विद्युत निर्मिती सुविधा संबधी महाराष्ट्र शासनासोबत भाडेपट्टीचे करार करणे; याविषयी आहे वरील विषयावर आमची पात्र मते नाहीत.*

***११. इतर विषय:***

*आम्ही येथे निवेदन करतो की, मागील वर्षी या कंपनीची सांविधिक लेखा परिक्षण अन्य तीन संयुक्त लेखापरिक्षकांनी केले होते. कंपनीच्या विविध जागेवर असलेल्या तिच्या आस्थापनांच्या आरंभीच्या शिलकींची माहिती व्यवस्थापनाने दिली आणि ती आम्ही स्वीकारली कारण प्रत्येक जागा निहाय लेखापरिक्षण केलेले ताळेबंदाचे वेगवेगळे प्रमाणिकीकरण केलेले नव्हते.*

*वरील प्रकरणी आमचे पात्र मत नाही.*

**१२. इतर कायदेशीर व नियमन विषयीच्या आवश्यकतांवर अहवाल:**

*अ) कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (५) यातील गरजांनुसार आम्ही या अहवालाचे जोडपत्र - एक यामधे पुढील बाबी देत आहोत : भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांच्या आदेशातील सुचविलेल्या लेखापरिक्षणाच्या कार्यपद्धतीचे अनुपालन करुन व त्यानुसार कार्यवाही करुन तिचे कंपनीच्या लेख्यांवर आणि भारतीय लेखा मानकानुसार केलेल्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रांवर झालेल्या परिणामांचे विषयीचे निवेदन पत्र.*

*ब) भारत सरकारने अधिनियमाचे कलम १४३ यातील उपकलम (११) नुसार दिलेल्या कंपन्यांचे (लेखापरिक्षकांचा अहवाल) आदेश वर्ष २०१६ (सदर आदेश) यातील आवश्यकतांनुसार आणि कंपनीच्या लेखा वह्या आणि अभिलेख यांची उपरिनिर्दिष्ट आदेशानुसार तपासणी आम्हास योग्य वाटली आहे आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आम्ही उपरोक्त आदेशातील परिच्छेद ३ व ४ यात विनिर्देशीत केलेल्या विषयांवर एक निवेदनपत्र ''जोडपत्र -२'' यात दिले आहे.*

***१३. अधिनियमाचे कलम १४३ (३) यातील आवश्यकतांनुसार आम्ही खालीलप्रमाणे अहवाल देत आहोत:***

अ) आम्ही *वरील परिच्छेद मधे नमूद केल्याप्रमाणे, तिसऱ्या पक्षांकडील शिलकी कायम होणे व त्याचे, जर वित्तीय विवरण पत्रावर परिणाम होणार असतील तर ते त्यांचा अपवाद करता,* आमचे सर्वोतपरी व उत्कृष्ट ज्ञान व विश्वास यानुसार आमच्या लेखापरिक्षणाच्या हेतूसाठी आवश्यक असलेली सर्वोत्कृष्ट माहिती व स्पष्टीकरणे आम्ही मिळविली आहेत.

बी) आमच्या मते, *उपरिनिर्दिष्ट पात्रतेच्या मतांचा आधार या परिच्छेदात वर्णन केलेल्या परिणामांचा अपवाद करता* कंपनीने, कायद्यानुसार आवश्यक असणाऱ्या लेखा नोंद वह्या योग्यरितीने जतन केल्या आहेत; असे आम्ही केलेल्या लेखा नोंद वह्यांच्या परिरक्षणावरून दिसून आले.

सी) या अहवालासोबत जोडलेले ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, रोकडता प्रवाह आणि समभागातील बदल ही सर्व विवरणपत्रके कंपनीच्या लेखा नोंद वह्यांशी सुसंगत आहेत.

डी) वरील परिच्छेद ४,५,६ आणि ७ यातील आमच्या निरिक्षणांच्या अधीन राहुन, आमच्या मते वरील भारतीय लेखा मानकानुसार केलेली स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके, ही अधिनियमाचे कलम १३३-ज्याचे सहवाचन त्या अंतर्गत केलेल्या नियमावलींसोबत होते, त्या सर्वांचे अनुपालन करतात.

इ) भारत सरकारची अधिसूचना क्र.जी.एस.आर.४६३ (इ) दि.०५ जून २०१५, यानुसार 'महानिर्मिती' ही एक शासकीय कंपनी आहे. त्यामुळे कंपनी अधिनिमय २०१३ याचे कलम १६४(२) यात 'संचालकाची अपात्रता' याविषयीच्या तरतुदी महानिर्मिती कंपनीस लागू नाहीत.

एफ) आम्ही 'पात्रतेच्या मतांचा आधार' या परिच्छेदात नोंदलेली निरिक्षणे यांचा कंपनीच्या कार्यप्रणालीवर फार महत्त्वाचे विपरीत परिणाम होणार नाहीत; असे वाटते.

जी) कंपनीचा वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची योग्यता तसेच या नियंत्रणाचा प्रवर्तनीय प्रभाव या विषयी आमचा स्वतंत्र अहवाल 'जोडपत्र-३' पहावा.

एच) लेख्यांची सुव्यवस्था व त्यासंबंधीत इतर बाबी यांच्या पात्रतेबाबत आमचे मत उपरोक्त 'पात्र मताचा आधार' या परिच्छेदात नमूद केला आहे.

आय) कंपन्यांचे (लेखापरिक्षण व लेखापरिक्षक) नियमावली, २०१४ यातील नियम ११ यानुसार लेखापरिक्षकाच्या अहवालात समाविष्ट करण्याच्या इतर बाबी या विषयी आम्हास दिलेली सर्वोतपरी माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार आमची मते खालीलप्रमाणे आहेत:

१. कंपनी संबंधित न्याय प्रविष्ट प्रकरणांचा कंपनीच्या भारतीय लेखा मानकानुसार केलेल्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रांवर होऊ शकणारे परिणाम यावरून कंपनीने प्रकटन दिले आहे. यासाठी स्वायत्त वित्तीय विवरण पत्राची टिपा क्र.४२ पहावी.

२. भविष्यात ज्यामुळे तोटा होऊ शकेल अशा स्वरुपाचे कोणतेही दीर्घ मुदतीचे करार या कंपनीने केलेले नाहीत. त्यामुळे त्यासाठी तरतुद केलेली नाही. तसेच कंपनीने वायदे कंत्राट (डेरिव्हेटीव्ह कंत्राटे) केलेली नाहीत.

३. 'गुंतवणुकदारांचे शिक्षण व रक्षण निधी' यामध्ये स्थानांतरित करावा लागेल अशा कोणत्याही रकमा या कंपनीकडे नाहीत.

**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनी करिता**
सनदी लेखापाल
**एफ.आर.एन.१००१८६ डब्ल्यू**

**सी.ए.राजेश जोशी**
भागीदार
**आय्.सी.ए.आय्.एम्.नं.३८५२६**

**एस.सी.बापना ॲन्ड असोशिएटस करिता**
सनदी लेखापाल
**एफ.आर.एन.११५६४९ डब्ल्यू**

**सी.ए.प्रियांका डी.जखोटिया**
भागीदार
**आय्.सी.ए.आय्.एम्.नं.१५७४२६**

**आर.एस.व्ही.ए.ॲन्ड कंपनी करिता**
सनदी लेखापाल
**एफ.आर.एन.११०५०४ डब्ल्यू**

**सी.ए.शेखर कुलकर्णी**
भागीदार
**आय्.सी.ए.आय्.एम्.नं.०४६२८५**

स्थळ : मुंबई
दिनांक : २८ सप्टेंबर २०१८

**जोडपत्र क्र.१: महानिर्मिती कंपनी लि. च्या दि.३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वर्षाचे भारतीय लेखा मानकानुसार तयार केलेल्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रावर स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या मूळ अहवालाच्या परिच्छेद क्र.१२(अ) यातील संदर्भाप्रमाणे जोडपत्र क्र.१ खालीप्रमाणे आहे.**

**१. जर काही कर्जे / ऋणे / व्याज / उसनवारी इ. सोडून देणे / निर्लेखित करण्याची प्रकरणे असल्यास त्याचा अहवाल तसेच त्याची कारणे व त्यातील रक्कम याची माहिती.**

आमच्या लेखापरिक्षणाच्या कालावधीत तसेच आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टिकरणे यावरून वित्तीय वर्ष २०१७-१८ मधे कंपनीने कोणतीही कर्जे / ऋणे / व्याज / उसनवारी इ. सोडून देणे / निर्लेखित केली नाहीत.

**२. तिसऱ्या पक्षांकडे राहिलेल्या वस्तूमालाचे तसेच शासन किंवा अन्य प्राधिकरणे यांचेकडून देणगी रुपाने मिळालेल्या मत्ता यांचे योग्य अभिलेख जतन केले आहेत किंवा कसे ?**

कंपनी तिचा वस्तूमाल / साहित्य तिसऱ्या पक्षाकडे फक्त देखभाल / जोडणी करणे या कामांसाठी पाठविते. आम्हास दिलेल्या माहितीप्रमाणे भांडार विभाग (कक्ष) आणि सुरक्षा विभाग अशा प्रकारच्या वस्तूमाल साठ्याचे योग्यप्रकारे दस्तऐवज व नियंत्रण ठेवते. त्यासाठी त्या विभाग-कक्षात टिपणी केल्या जातात आणि परत केले जाणारे / न केले जाणारे प्रवेश पत्र (गेट पास) तयार केले जातात. त्याची माहिती सॅप प्रणालीच्या 'मटेरियल मोड्यूल' यामध्ये सुद्धा पाहता येते. तसेच आम्हास सांगण्यात आले की, यावर्षी शासन किंवा अन्य प्राधिकरणे यांचेकडून कोणत्याही मत्ता देणगी स्वरुपात मिळाल्या नाहीत.

**३. प्रलंबित न्यायालयीन वाद / न्यायाधिकरणाचे खटले यांचा वर्ष निहाय अहवाल देणे त्यात प्रलंबनाची कारणे आणि कायदेविषयक प्रकरणे (परदेशी व स्थानिक) यांच्यावरील खर्चावर लक्ष देणाऱ्या यंत्रणेचे अस्तित्त्व आणि प्रभाव या माहितीचा समावेश करावा.**

कंपनी प्रलंबित कायदेविषयक दावे / न्यायाधिकरणाकडील खटले यांची ओळख निश्चिती करुन त्याचे प्रकटन 'आकस्मिक दायित्वे' यात करीत असते. एकूण २७२ कायदेशीर / लवादातील खटल्यांचे त्यांचे वयानुसार वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

| प्रकरणाची वर्षे | प्रकरणांची संस्था |
|---|---|
| एका वर्षापेक्षा कमी | २८ |
| १ ते २ वर्षे | ६८ |
| २ ते ३ वर्षे | ५९ |
| ३ ते ५ वर्षे | ३१ |
| ५ वर्षापेक्षा जास्त | ८६ |
| **एकूण** | **२७२** |

आम्हास असे सांगण्यात आले की, वरील प्रकरणे प्रलंबित राहण्याची कारणे प्रत्येक प्रकरणात वेगवेगळी आहेत. तसेच आम्हाला अशी माहिती दिली की, कायदेशीर प्रकरणांचा खर्च हा वरील प्रकरणांमधे अभियोक्ता / सल्लागार यांच्या शूल्काच्या मंजुरीत रचनेप्रमाणे आहे. कंपनीकडून संबंधित माहिती उपलब्ध झाली नसल्याने प्रलंबनाच्या कारणाविषयी आता कायदेशीर खटल्यांच्या खर्चासंबंधीच्या विद्यमान यंत्रणेच्या प्रभावीपणा बाबत कोणतेही मत व्यक्त करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

**४. जर या कंपनीची निर्गुंतवणूक करण्यासाठी निवड झाली असेल तर (अमूर्त मत्ता व जमिनी यासह) मत्ता आणि दायित्वे यांचे (बांधिलकी व सामन्य राखीव यासह) मूल्यांकनाबाबत संपूर्ण स्थितीदर्शक अहवालाचे परिक्षण करावे. त्यात निर्गुंतवणूक प्रक्रीयेची कार्यपद्धती आणि विद्यमान स्थिती यांचा समावेश करावा.**

महानिर्मिती कंपनीची 'निर्गुंतवणूक' हेतूसाठी निवड झालेली नाही. म्हणून मागवलेली माहिती कंपनीस लागू नाही.

**कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(५) नुसार दिलेल्या उप-आदेशांपर अभिप्राय:**

**५. कंपनीने मागविलेल्या कोळशांची संख्या / दर्जा यांचा मेळ करण्यास कंपनीकडे योग्य यंत्रणा आहे काय ? आणि कोळशाचा दर्जा / त्याचा ओलसरपणा आणि विलंब आकार यांच्या लेखा वह्यात योग्य नोंदी केल्या जातात काय ?**

महानिर्मिती कंपनीने कोळसा कंपन्यांनी तयार केलेल्या आणि प्राप्त झालेल्या कोळशांच्या देयकांचा मेळ करण्यासाठी एक कार्यपद्धती केली. मागणी केलेला आणि प्रत्यक्ष मिळालेला कोळसा यांची संख्या / दर्जा यासाठी मेळ करण्याच्या विद्यमान कार्यपद्धतीस अधिक बळकटी देण्याची गरज आहे. महानिर्मिती कंपनीने कोळसा पृथःकरण करणाऱ्या एका मान्यता प्राप्त संस्थेची नियुक्ती केली आहे

तिचं नाव 'सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ मायनींग अँड फ्यूएल रिसर्च' असे आहे. (सी.आय.एम.एफ.आर.) ही संस्था कोळसा कंपनीचा माल भरण्याच्या जागेवर तांत्रिक पृथःकरण करते.

सी.आय.एम.एफ.आर. यांनी दिलेल्या पृथःकरण अहवालाच्या आधारे कोल ऑफिस, नागपूर बीजकात नमूद केलेला दर्जा आणि अहवालातील दर्जा यांचा मेळ करते आणि दर्जा घसरला असल्यास त्यांचे कोळसा कंपनीकडे दावे केले जातात.

कोळशा पुरवठादारांनी ₹.१५२२.१२ कोटीचे मागणी केली आहे. कमी माल उचलणे, कामगिरीसाठी प्रोत्साहन मत्ता आणि व्याज आदी कारणात्सव केलेल्या वरील रकमेच्या मागणी महानिर्मितीने वादग्रस्त असल्याचे सांगितले. याविषयी योग्य ते कागदोपत्री पुरावे नसल्याने मागणीची अचूकतेबाबत निष्कर्ष काढता येणे अवघड झाले आहे. कोळसा पुरवठादारांची ही मागणी कंपनीने दि.३१ मार्च २०१८ रोजी 'आकस्मिक दायित्व' म्हणून घोषित केली.

महानिर्मितीने कोळसा पुरवठादारांच्या विरोधात अपुरा माल देणे, ओलसर कोळसा देणे, कमी माल भरणे आणि व्याजाच्या मागणी इ. बाबत करारानुसार ₹ १३६३.०३ कोटीचे दावे दि.३१ मार्च२०१८ मधे अस्तित्त्वात होते. त्यांना दि.३१ मार्च २०१८ रोजी 'आकस्मिक मत्ता' म्हणून कंपनीने घोषित केले आहे.

**६. राज्य शासनाला देय असलेल्या विनामूल्य विजेचा वाटा किती आहे ? स्वीकृत लेखे प्रमाणकांनुसार व करारातील अटीनुसार त्याचा हिशेब करून तो लेखांमधे दाखविला जातो काय?**

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार कोणत्याही करारानुसार राज्य शासनाला विनामूल्य वीज पुरवठा केला जात नाही.

**७. वस्तूमाल सूचीमध्ये भंगार, निकामी साहित्य इत्यादी चे मूल्यासह योग्य वर्गीकरण केले आहे का ?**

कंपनीमध्ये भंगार आणि निकामी साहित्य यांची निश्चित ओळख केली जाते. मात्र अशी निश्चित ओळख करण्याच्या वेळी त्यांचे लेखे केले जात नाहीत. भंगाराचे मूल्य लेखावहीत नोंदले जात नाही आणि त्यांच्या वसूलीची लेखा नोंद जेव्हा लिलाव केला जातो तेव्हा होते. निकामी साहित्याचे मूल्यांकन ऐतिहासिक खर्चानुसार केले जाते. आणि त्याचवेळी निकामी, जुनाट साधनांसाठी लेखा वहीत १०० टक्के तरतूद केली जाते. अशाप्रकारे केलेल्या तरतुदीचे समायोजन सदर निकामी वस्तूच्या लिलावा सोबत केले जाते. कंपनी तांत्रिक मूल्यांकनाच्या आधारे वस्तूमाल निकामी झाल्याबद्दल ओळख निश्चिती करते. आमच्या लेखापरिक्षणाच्या कार्यपद्धतीच्या आधारे असे म्हणता येते की, वरील काही उणीवा वगळल्यास, कंपनीची वस्तूमाल सूचीचे वर्गीकरण करण्याची कार्यपद्धती योग्य आहे.

**८. लेखा परिक्षणात नमूद केलेला नफा / तोटा हा कंपनीच्या नफा आणि तोटा यांच्या लेखांप्रमाणे आहे किंवा कसे ?**

कंपनी अधिनियम २०१३ यात विहित केल्याप्रमाणे लेखा परिक्षण अहवालात वर्षाचा नफा/तोटा यांची आकडेवारी देण्याची आवश्यकता नसते. तरीसुद्धा आम्ही येथे निवेदन करतो की, या अहवालाच्या वर्षामधे महानिर्मिती कंपनीने ₹ ७००.१८ कोटी इतका नफा कमावला आहे. याबाबत आम्ही आमची ''पात्र केलेला लेखापरिक्षण अहवाल'' दि.२८ सप्टेंबर २०१८ रितसर दिलेला आहे.

**९. जल नियुक्त प्रकरणातील जैविक विविधता जतन करण्याचे धोरण / सूचना यानुसार पाणी सोडले जाते का? तसे केले नाही म्हणून जर काही दंड भरला असेल तर त्याची माहिती द्यावी.**

पाणी सोडण्याचे कार्य राज्य शासनाच्या जल संसाधन विभागामार्फत अंमलात येते. आम्हास दिलेल्या माहितीनुसार या कामात कंपनीची काहीही भूमिका नसते. यासाठी कोणताही दंड भरलेला नाही / देय नाही.

| | | |
|---|---|---|
| **के.एस.अय्यर ॲन्ड कंपनी करिता** | **एस.सी.बापना ॲन्ड असोशिएटस करिता** | **आर.एस.व्ही.ए.ॲन्ड कंपनी करिता** |
| सनदी लेखापाल | सनदी लेखापाल | सनदी लेखापाल |
| **एफ.आर.एन.१००१८६ डब्ल्यू** | **एफ.आर.एन.११५६४९ डब्ल्यू** | **एफ.आर.एन.११०५०४ डब्ल्यू** |
| **सी.ए.राजेश जोशी** | **सी.ए.प्रियांका डी.जखोटिया** | **सी.ए.शेखर कुलकर्णी** |
| भागीदार | भागीदार | भागीदार |
| **आय्.सी.ए.आय्.एम्.नं.३८५२६** | **आय्.सी.ए.आय्.एम्.नं.१५७४२६** | **आय्.सी.ए.आय्.एम्.नं.०४६२८५** |

स्थळ : मुंबई

दिनांक : २८ सप्टेंबर २०१८

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या दि.३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वर्षाची भारतीय लेखा मानकानुसार केलेल्या 'स्वायत्त' वित्तीय विवरण पत्रके या वरील स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या अहवालातील परिच्छेद क्र.१२ (ब) यामधील संदर्भानुसार: जोडपत्र क्र.२**

१. स्थिर मत्तांच्या संदर्भात:

अ) महानिर्मिती कंपनीने तिच्या स्थिरमत्तांच्या संख्यात्मक स्थितीचा तपशील देणाऱ्या माहितीच्या अभिलेखांचे योग्यरित्या जतन केले आहे. मात्र ज्या काही थोड्या ठिकाणी स्थिर मत्तांची बाब निहाय वैशिष्ट्ये आणि संहिताकरण यांचे स्थिर मत्ता नोंदवहीतील नोंदी सुसंगत मेळ करण्याची प्रक्रिया चालू आहे; त्यांचा अपवाद केला आहे.

ब) आम्हास दिलेल्या माहितीनुसार, स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी करण्याचे काम दर तीन वर्षाने करावे असे कंपनीचे धोरण आहे. त्यानुसार कंपनीने दि. वर्ष २०१६-१७ मधे असे फेरतपासणीचे काम पार पाडले होते. म्हणून कंपनीने यावर्षी स्थिरमत्तांची प्रत्यक्ष पडताळणी आयोजित केली नव्हती.

क) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे आणि आमचे अभिलेखांचे परिक्षण यानुसार सर्व स्थावर, अचल मालमत्ता या कंपनीच्या नावे आहेत किंवा कसे याची निश्चिती करण्यासाठी त्यांचे मालमत्ता नावाचे विलेख (टायटल डिड्स) मिळविण्याची प्रक्रीया कंपनीने चालू केली आहे. उपलब्ध माहितीनुसार खालील प्रकरणी टायटल डिड्स कंपनीच्या नावे धारण केलेली नाहीत.

(१) ४ लेखा (अकांऊट) युनीट्सचा संबंध असलेली मालकीची जमीन, जिचे प्रचलीत मूल्य वर्षांच्या अखेरीस ₹ ४५.६२ कोटी होते, ती आणि अन्य एका लेखा युनीट्सची भाडेपट्टीची जमीन, जिचे प्रचलीत मूल्य वर्षाच्या अखेरीस ₹ ९२.९८ कोटी होते, या सर्व जमीनी अद्यापही पूर्वीच्या ''महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ'' यांच्याच नावे आहेत. आम्हाला असे सांगण्यात आले की, या जमीनी हस्तांतरण योजनेनुसार आणि महाराष्ट्र शासनाच्या आदेशातील अटींनुसार कंपनीकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत.

२) दोन लेखा युनीटस् संबंधित मालकीच्या जमिनी, ज्यांचे एकूण ठोक मूल्य, ₹ ३९६.५१ कोटी आहे, या ''महानिर्मिती'' आणि ''महाराष्ट्र थर्मल पॉवर स्टेशन'' या नावे धारण केलेल्या आहेत. त्या कंपनीच्या संस्थापन समयलेखानुसार कंपनीला दिलेल्या आणि रजिस्ट्रार ऑफ कंपनी, मुंबई यांचेकडे नोंदणी केलेल्या नावावर नाहीत.

२. वस्तूमालाच्या संबंधी:

अ) आम्हास असे स्पष्टीकरण देण्यात आले की, वर्षभरात वस्तूमाल सूचीनुसार माल साठ्याची प्रत्यक्ष पडताळणी व्यवस्थापनाने योग्य कालावधीनुसार केली. ही प्रत्यक्ष पडताळणी व्यवस्थापनाने नियुक्त केलेल्या बाहेरच्या सनदी लेखापालांच्या संस्थातर्फे करण्यात आली.

ब) आमच्या मते, आणि वस्तूमाल साठ्यांच्या अभिलेखांचे आम्ही केलेल्या परिक्षणाच्या आधारे, कंपनीने वस्तूसूचींचे अभिलेख योग्य प्रकारे जतन केलेले आहेत. वस्तूसूचीची प्रत्यक्ष पडताळणी करुन तिची तूलना अभिलेखानुसार केल्यावर काही किरकोळ विसंगती आढळल्या त्या फारशा महत्त्वाच्या नव्हत्या. त्यांचे योग्य ते समायोजन लेखा नोंदवहीत करण्यात आले आहे.

३. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार ज्या अन्य कंपन्या, फार्म्स किंवा इतर व्यक्ति, संस्था यांचा समावेश कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १८९ नुसार तयार केलेल्या यादीत केला आहे, अशांना यावर्षी महानिर्मितीने कोणतीही प्रतिभूत किंवा अप्रतिभूत कर्जे मंजूर केलेली नाहीत. यामुळे संबंधित आदेशातील परिच्छेद क्र.३ यामधील खंड (३) अंतर्गत (ए), (बी), आणि (सी) यातील तरतुदी कंपनीला लागू नाहीत.

४. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार, कंपनीने कर्जे, गुंतवणूकी आणि हमी या विषयी सदर अधिनियमाचे कलम १८५ व १८६ यातील तरतुदींचे पालन केले आहे.

५. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार, कंपनी अधिनियम २०१३ यातील कलम ७३ ते ७६ यातील तरतुदींच्या अर्थानुसार महानिर्मिती कंपनीने जनतेकडून अनामत रकमा अथवा ठेवी स्वीकारलेल्या नाहीत.

६. केंद्र सरकारने, कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४८(१) यानुसार, खर्च अभिलेखाचे जतन कंपन्यांनी केले पाहिजे असे विहित केले आहे. आम्ही या कंपनीतील या संबंधीत अभिलेखांचा स्थूल आढावा घेतला आणि आमच्या मते आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार अशा विहित अभिलेखांचे जतन कंपन्यांनी केले पाहिजे असे विहित केले आहे. आम्ही या कंपनीतील या संबंधीत अभिलेखांचा स्थूल आढावा घेतला. आणि आमच्या मते आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार अशा विहित

अभिलेखांचे जतन केले आहे असे प्रथमदर्शनी दिसून येते. मात्र कंपनीज् (कॉस्ट अकाऊंटींग रेकॉर्ड्स) नियमावली २०१४ नुसार जतन केल्या जाणाऱ्या खर्चाचे अभिलेख अचूक आणि परिपूर्ण आहेत किंवा कसे याचे परिक्षण आम्ही केलेले नाही.

७. सांविधिक देण्याच्या संबंधी :

अ) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आणि लेखा वह्या व दस्तऐवज यानुसार कंपनीने सामान्यतः निर्विवाद स्वरुपाच्या सांविधिक देणी नियमितपणे योग्य प्राधिकाऱ्यांकडे जमा करीत असते. यामधे भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, आयकर, विक्री कर, सेवा कर, सीमा शूल्क, उत्पादन शूल्क, मूल्य वर्धित कर, वस्तू व सेवा कर (जीएसटी) व उपकर याशिवाय इतर सांविधिक देणी आदींचा समावेश होतो. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार या वर्षी अखेरीपर्यंत म्हणजे दि.३१ मार्च २०१८ रोजी पुढील कोणत्याही सांविधिक देण्यांचा भरणा ती देय झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यापेक्षा अधिक काळ थकीत नव्हती. यामधे भविष्य निर्वाह निधी, आयकर, विक्री कर, सेवा कर, सीमा शूल्क, उत्पादन शूल्क, मूल्य वधीत कर, जीएसटी व उपकर आदि समाविष्ट आहेत.

ब) आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार आयकर, संपत्तीकर, विक्री कर, सेवा कर, सीमा शूल्क, उत्पादन शूल्क, मूल्य वर्धीत कर, जीएसटी व उपकर यांची खालील काही वादग्रस्त प्रकरणे वगळता, अन्य कुठलीही सांविधिक देणी शिल्लक राहिली नव्हती. वादग्रस्त प्रकरणांची यादी खालीलप्रमाणे आहे:

(₹ कोटीत)

| सविधानाचे नांव | देण्याचे स्वरुप | देय रक्कम ₹ कोटीत | रकमेचा संबंधित कालावधी | जेथे वाद प्रलंबित आहे त्या मंचाचे नांव |
|---|---|---|---|---|
| आयकर अधिनियम | दंड (वादग्रस्त रक्कम ₹ २४९.८५ कोटी) कलम १४३ (३) नुसार | २४९.८५ | निर्धारण वर्ष २००७-०८ | ए.ओ.मुंबई |
| आयकर अधिनियम | दंड (वादग्रस्त रक्कम ₹ १५.०४ कोटी) कलम १४३ (३) नुसार | १५.०४ | निर्धारण वर्ष २०१४-१५ | ए.ओ.मुंबई |
| आयकर अधिनियम | डिमांड ॲपिअरींग ऑन ट्रेस (टी आर ए सी ई) | ५.६० | निर्धारण वर्ष २००८-०९ ते २०१८-१९ | ए.ओ.मुंबई |
| केंद्रिय उत्पादन शूल्क अधिनियम | स्ट्रक्चरल स्टिल आयटेम्सच्या जोडणीवर लावलेले शूल्क | ३.२५ | १९९१-१९९२ ते १९९४-१९९५ | सी इ एस टी ए टी, मुंबई |
| केंद्रिय विक्रीकर अधिनियम | एम वॅट | ०.३५ | निर्धारण वर्ष २००५-०६ | विक्रीकर आयुक्त (नागपूर) |
| आयकर अधिनियम | दंड (वादग्रस्त रक्कम ₹ ०.७३ कोटी) कलम १४३(३) नुसार | ०.७३ | निर्धारण वर्ष २००८-०९ | ए.ओ. मुंबई |
| आयकर अधिनियम | दंड (वादग्रस्त रक्कम ₹ ०.२८ कोटी) कलम १४३(३) नुसार | ०.२८ | निर्धारण वर्ष २०११-१२ | ए.ओ.मुंबई |
| आयकर अधिनियम | दंड (वादग्रस्त रक्कम ₹ ०.२२ कोटी) कलम १४३(३) नुसार | ०.२२ | निर्धारण वर्ष २०१०-११ | ए.ओ.मुंबई |
| आयकर अधिनियम | सेवा करावर टी डी एस | ०.०९ | निर्धारण वर्ष २००९-१० | आय टी ए टी पुणे आयकर (बेंच) |
| आयकर अधिनियम | दंड (वादग्रस्त रक्कम ₹ ०.०१ कोटी) कलम १४३(३) नुसार | ०.०१ | निर्धारण वर्ष २०१३-१४ | ए ओ मुंबई |
| आयकर अधिनियम | दंड (वादग्रस्त रक्कम ₹ ४३०६०) कलम १४३(३) नुसार | ०.०० | निर्धारण वर्ष २०१२-१३ | ए.ओ.मुंबई |
| | | **२७५.४४** | | |

८. आमच्या मते आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार महानिर्मिती कंपनीने बँका, वित्तीय संस्था आणि शासन यांची कर्जे किंवा उसनवारी यांची परतफेड करण्यात कसूर केलेला नाही. कंपनीने ऋणपत्र (डिबेचर्स) मार्फत कोणतीही रकम उसनी घेतली नाही.

९. कंपनीने यावर्षी इनिशियल आणि / किंवा त्यापुढील पब्लिक ऑफर (यात कर्जे साधने समाविष्ट आहेत) याद्वारे कोणताही निधी उभारला नाही. वर्षभरात घेतलेली मुदतीची कर्जे त्या त्या कारणांसाठीच वापरण्यात आली.

१०. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार यावर्षी लेखापरिक्षणाच्या कालावधीत कंपनीकडून किंवा कंपनी संबंधीत तिचे अधिकारी किंवा कर्मचारी यांचेकडून कोणतीही लबाडी झाल्याचे आढळले नाही किंवा तशी माहिती नाही.

११. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार महानिर्मिती ही दि.०५ जून २०१५ रोजी अधिसूचना जी एस आर ४६३ इ. नुसार एक शासकीय कंपनी आहे. त्यामुळे अधिनियमाचे कलम १९७ च्या तरतुदी तिला लागू नाहीत.

१२. आमच्या मते आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून महानिर्मिती ही निधी कंपनी नाही. त्यामुळे संबंधित आदेशातील खंड - १२ हा लागू नाही.

१३. आम्हास दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या कंपनीच्या अभिलेख परिक्षण यावरून कंपनीने संबंधितांशी केलेले सर्व व्यवहार हे कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १७७ व १८८ यांचे अनूपालन करणारे आहेत. लागू होणाऱ्या लेखा मानकांच्या आवश्यकतेप्रमाणे सर्व व्यवहाराचे प्रकटीकरण भारतीय लेखा मानकानुसार केलेल्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकात करण्यात आलेले आहे.

१४. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे तसेच आम्ही केलेले कंपनीच्या अभिलेखांचे परिक्षण यावरून असे दिसते की, या वर्षी कंपनीने शेअर्सचे किंवा परिवर्तनीय ऋण विमोचन पत्र (कन्व्हर्टीबल डिबेंचर्स) यांचे पूर्ण किंवा अंशतः स्वरुपाचे पसंतीनुसार वितरण किंवा खाजगी वाटप केलेले नाही त्यामुळे आदेशाचे खंड १४ लागू होत नाही.

१५. आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे तसेच आम्ही केलेल्या कंपनीच्या अभिलेखापरिक्षण यानुसार कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १९२ यानुसार संबंध असलेले संचालक किंवा व्यक्ती यांचे सोबत कोणतेही बिन रोखीचे व्यवहार केलेले नाहीत. त्यामुळे आदेशाचे खंड - १५ लागू नाही.

१६. भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ चे विभाग ४५-आय ए यानुसार नोंदणी करण्याची महानिर्मिती कंपनीला आवश्यकता नाही.

**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनी करिता**
सनदी लेखापाल
**एफ.आर.एन.१००१८६ डब्ल्यू**

**एस.सी.बापना ॲन्ड असोशिएटस करिता**
सनदी लेखापाल
**एफ.आर.एन.११५६४९ डब्ल्यू**

**आर.एस.व्ही.ए.ॲन्ड कंपनी करिता**
सनदी लेखापाल
**एफ.आर.एन.११०५०४ डब्ल्यू**

**सी.ए.राजेश जोशी**
भागीदार
**आय्.सी.ए.आय्.एम्.नं.३८५२६**

**सी.ए.प्रियांका डी.जखोटिया**
भागीदार
**आय्.सी.ए.आय्.एम्.नं.१५७४२६**

**सी.ए.शेखर कुलकर्णी**
भागीदार
**आय्.सी.ए.आय्.एम्.नं.०४६२८५**

स्थळ : मुंबई
दिनांक : २८ सप्टेंबर २०१८

## महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेडच्या ३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वर्षाची भारतीय लेखा मानकानुसार केलेल्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रके वरील स्वतंत्र लेखापरिक्षकाच्या अहवालाचे परिच्छेद १३ (फ) यात संदर्भ दिल्याप्रमाणे जोडपत्र - ३

**कंपनी अधिनियम २०१३ (''सदर कायदा'') चे कलम १४३ यातील उपकलम ३ च्या खंड (१) अंतर्गत आर्थिक नियंत्रणाबाबत अहवाल:**

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या (कंपनी) दि.३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वर्षाच्या भारतीय लेखा मानकानुसार केलेल्या स्वायत्त वित्तीय विविरणपत्रके यांचे लेखापरिक्षण करून त्यासोबत कंपनीचे वित्तीय अहवाल देताना अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखापरिक्षण करण्याचे काम आम्हाला दिले होते.

**अंतर्गत वित्तीय नियंत्रणासंबंधी व्यवस्थापनाची जबाबदारी**

भारतीय सनदी लेखापालांच्या संस्थेने (''आय्.सी.ए.आय्.'') वित्तीय अहवाल लेखासंदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखी परिक्षण करणे या विषयावर, एक मार्गदर्शक टिपणी (''सदर मार्गदर्शक टिपणी'') दिली आहे. त्यामधे दिलेल्या 'अंतर्गत नियंत्रणाचे आवश्यक घटक' विचारात घेऊन कंपनीने निश्चित केलेल्या वित्तीय अहवाल देण्याबाबतचे निकषावर आधारित अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची स्थापना करून त्याची कार्यवाही करणे याची जबाबदारी कंपनीच्या व्यवस्थापनाची असते. या जबाबदारीमधे पुढील कार्ये समाविष्ट असतात, ती अशी :- अंतर्गत नियंत्रणाची संकल्प रचना चित्र तयार करणे, कंपनीच्या औद्योगिक व्यवहारात शिस्त आणि कार्यक्षमता यांची हमी देणे, कंपनीच्या धोरणांना धरुन राहणे, तिचा मत्ता सूरक्षित ठेवणे, लबाडी व चूका शोधणे व त्यांना आळा घालणे, लेख्यांचे अभिलेख अचूक व परिपूर्ण ठेवणे आणि कंपनी अधिनियम २०१३ नुसार आवश्यक अशी वित्तीय माहिती विश्वासपूर्णरित्या वेळेवर पूर्ण करून देणे.

**लेखापरिक्षकांची जबाबदारी**

वत्तीय अहवाल देण्यासाठी कंपनीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणावर आमच्या लेखापरिक्षणाच्या आधारे मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी असते. कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(१०) यात विहित केलेली लेखा मानके आणि वित्तीय अहवालासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखापरिक्षण यासंबंधीची मार्गदर्शक टिपणी (''मार्गदर्शक टिपणी'') यानुसार लागु होणाऱ्या मर्यादेत आम्ही अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण केले. उपरोक्त लेखा मानके व मार्गदर्शक टिपणी यांच्या आवश्यकतेनुसार आम्ही नैतिक गरजांचे अनुपालन करणे आणि वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी आहेत किंवा कसे याची योग्य व कारणयुक्त हमी मिळविणे या उद्दिष्टाने आम्हाला लेखापरिक्षणाची योजना करून ते पूर्ण करावे लागते, तसेच ही नियंत्रणे प्रत्यक्षात प्रभावीरित्या कार्यरत आहेत किंवा नाही आणि ती सुस्थापित असून त्याचे पालन केले जात आहे याची खातरजमा करावी लागते.

वित्तीय अहवाल देण्यासाठी असलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी असल्याबाबत आणि ही नियंत्रणे परिणामकारकरित्या कार्यरत असल्याबद्दल लेखापरिक्षणातून पुरावे मिळावेत यादृष्टीने लेखापरिक्षणाच्या कार्यपद्धतीद्वारे कार्य करावे लागते. यामधे सदर अंतर्गत वित्तीय नियंत्रणे समजून घेणे, प्रत्यक्ष कार्यवाहीत अस्तित्त्वात असलेल्या दुर्बल जागा व त्यातील धोके याचे निर्धारण करणे या निर्धारीत धोक्यांच्या आधारे अंतर्गत वित्तीय नियंत्रणांची रचना व त्याची परिणामकारकता यांचे परिक्षण आणि मूल्यमापन करणे या दृष्टीने आमचे लेखापरिक्षण केले जाते. यासाठी निवडलेली कार्यपद्धती लेखापरिक्षकांच्या न्याय निर्णयशक्तीवर अवलंबून असते. भारतीय लेखा मानकांनुसार तयार केलेल्या कंपनीच्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रकांमधे लबाडी किंवा चुका यामुळे काही गैरमाहिती देण्याच्या धोक्यांचे निर्धारण करणे याचासुद्धा अंतर्भाव लेखापरिक्षणात केला जातो.

या कंपनीमधे वित्तीय अहवालासाठीची अंतर्गत वित्तीय नियंत्रणे, पुरेशी व योग्य प्रमाणात असल्याबद्दल आम्ही मिळविलेले पुरावे कंपनीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणावर आमचे मत व्यक्त करण्यासाठी तात्त्विक आधार देत आहेत; असा आम्हाला विश्वास आहे.

**वित्तीय अहवालाकरिता असलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा अर्थ:**

कंपनीच्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची रचना कंपनीच्या वित्तीय अहवालाच्या विश्वसनीयते संबंधी आणि ही वित्तीय विवरणपत्रे तयार करण्याचे कार्य हे भारत देशात सर्वसाधारणपणे स्वीकारल्या गेलेल्या लेखा मानकांशी सुसंगत असल्याची रास्त हमी देण्यासाठी आहे. वित्तीय अहवाल देण्यासाठीच्या कंपनीने अंतर्गत वित्तीय नियंत्रणामधे धोरणे व कार्यपद्धती यांचा समावेश असतो त्याचे उद्देश खालील प्रमाणे असतात:

१. अभिलेख/दस्तऐवज जतन करणे, त्यात कंपनीचे व्यवहार आणि मत्ता कामी लावणे याबद्दल तपशीलवार अचूक व योग्य माहिती असावी.

२. भारतीय लेखा मानकांनुसार स्वायत्त वित्तीय विवरणपत्रे तयार करण्यासाठी आवश्यक सर्व व्यवहारांची नोंद करणे आणि कंपनीचे सर्व आय आणि खर्च हे कंपनीच्या संचालक व व्यवस्थापनाच्या अधिकाराने होत आहेत याबद्दल योग्य खात्री करणे आणि ती भारतातील सर्वमान्य लेखा तत्त्वाला धरुन असल्याची हमी मिळविणे.

३. भारतीय लेखा मानकांनुसार केलेल्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रांवर ज्याच्या प्रत्यक्ष परिणाम होऊ शकेल अशा कंपनीच्या मत्तांची अनधिकृत संपादने, वापर किंवा विल्हेवाट होण्यास आळा घातला जातो किंवा तसे व्यवहार वेळीच शोधून काढले जातात याबद्दल रास्त हमी मिळविणे.

**अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या अंगभूत मर्यादा**

वित्तीय अहवाल देण्यासाठी केलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या काही मर्यादा आहेत. या मर्यादांमध्ये व्यवस्थापनाद्वारे नियंत्रणाना ओलांडून किंवा त्यांच्याशी संघर्ष करण्याची शक्यता असणे, चुका व लबाडीने गैरमाहिती मांडली जाणे आणि तिचा न शोध घेणे आदिंचा समावेश असतो. तसेच भविष्य काळासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रण यंत्रणेकडून जे अंदाज केले जातात ते काही जोखीमा, धोके यांच्या अधीन असतात. परिस्थिती बदलल्यामुळे किंवा काही बदल झाल्यामुळे असे भविष्यातील अंदाज अपूरे ठरतात. तसेच धोरणे किंवा कार्यपद्धती यांच्या पूर्तता कमी प्रमाणात होऊ शकतात.

**पात्र मत्तांचा आधार:**

आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे आणि आमच्या लेखापरिक्षणाच्या आधारे दि.३१ मार्च २०१८ रोजी खालील दुर्बल जागा आढळल्या.

१. कंपनीच्या स्थिर मत्तांचे वेळेवर भांडवलीकरण करणे आणि त्यांच्या परिसमापनातील नुकसानांचे समायोजनाचे लेखे करणे याबाबत अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचे कार्य प्रभावी नाही. या दुर्बलतेमुळे कंपनीच्या स्थिर मत्ता, प्रगतीपथावरील कामांचे भांडवलीकरण, घसारा आणि खर्च याचे प्रत्यक्षात गैर विवरण होण्याची शक्यता आहे.

२. कंपनीचे साहित्य प्रापण व त्यांचे लेखेकरण, कर्मचारी व भांडार याच्या उप-अहवालांचे जतन करणे, पुरवठादारांच्या अग्रिमांचे आणि दायित्वाचे वेळेवर समायोजन करणे, सूक्ष्म, लघु, व मध्यम उद्योजकांचे व्याज देणे याबाबत अंतर्गत वित्तीय नियंत्रणे प्रभावीपणे कार्यरत नाहीत. कोळशाच्या पुरवठ्यातील विलंब आणि अपूरी प्राप्ती यांचे हिशेब व लेखेकरण पुरेसे नाहीत. या परिणामकारक दुर्बलतेमुळे कंपनीची दायित्वे व मत्ता यांचे सदोष मूल्यांकन होऊ शकते.

३. कंपनीतील वस्तूसूचीचे अभिलेख जतन करणे, वित्तीय खात्यासोबत मेळ करणे आणि वस्तुमालाचे मुल्यांकन यासाठी अंतर्गत नियंत्रणे परिणामकारक नाहीत. या दुर्बलतेमुळे वस्तुसूची मुल्यांचे गैर विवरण होण्याची शक्यता आहे.

४. चालू कर आणि स्थगित कराची मोजणी करण्याविषयी कंपनीची अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे काम प्रभावीपणे होत नाही. आणि आयकर दाखले भरतेवेळी कराची मोजणी बदलते. या दुर्बलतेमुळे वित्तीय विवरणपत्रात चालू कर व स्थगितकर यांचे गैरविवरण होऊ शकते.

वित्तीय अहवाल देण्यासाठीचे अंतर्गत नियंत्रण पद्धतीमधील परिणामकारक दुर्बलता ही एक उणीव किंवा बऱ्याच उणीवांचे मिश्रण असते. अशा उणीवांमुळे कंपनीचे वार्षिक किंवा अंतरीम वित्तीय विविरणपत्रकातील गैर माहिती देण्यास आळा घातला जात नाही किंवा त्यातील चूका वेळीच शोधता येत नाहीत.

**पात्र मत**

महानिर्मिती कंपनी हा एक शासकीय उपक्रम आहे. त्यामुळे वित्तीय अहवाल देण्यासाठीच्या अंतर्गत नियंत्रण कार्यपद्धतीची रचना विविध प्रकारचे हस्तपुस्तिका, नियमावली, परिपत्रके आणि वेळोवेळी दिले जाणारे आदेश या आधारे केली जाते. त्यामुळे व्याख्यांकित केलेल्या वित्तीय अहवालासाठी अंतर्गत नियंत्रण प्रक्रीयेवर आमचे मत आधारित आहे. वित्तीय विविरणपत्रकाच्या आमच्या लेखापरिक्षणांच्या काळात, आम्ही प्रायोगिक तत्त्वावर परिक्षण केले आणि त्यातून अंतर्गत नियंत्रण कार्यप्रणालीच्या योग्यतेचा आढावा घेतला. त्यातून आम्ही नियंत्रण प्रक्रीयेची रचना आणि तिची परिणामकारकता या दोन्हीमधे काही कमतरता ओळखल्या. त्याविषयीचा अहवाल आम्ही उपरोक्त ''पात्र मत्तांचा आधार'' या शीर्षकाच्या परिच्छेदातून नमूद केला आहे.

*आमच्या मते 'नियंत्रणाच्या निकषांची उद्दिष्टे' या विषयी वरील परिच्छेद आणि 'पात्र मत्तांचा आधार' यात वर्णन केलेल्या प्रत्यक्ष दुर्बल जागांचे परिणाम / संभाव्य परिणाम याचा अपवाद करता, कंपनीची वित्तीय अहवालाचासाठीची अंतर्गत नियंत्रणे ही दि.३१ मार्च २०१८ रोजी प्रभावीपणे कार्यरत होती आणि त्यासाठी ती सर्वोतोपरीने योग्यस्थितीत काम करीत होती.*

*आम्ही प्रत्यक्ष व महत्त्वाच्या उणिवा शोधून त्यावर विचार केला व त्याचा वरिलप्रमाणे अहवाल दिला आहे. या नियंत्रणाचे स्वरुप, वेळ,*

*प्रायोगिक लेखा परिक्षणाच्या मर्यादा - या बाबी दि.३१ मार्च २०१८ रोजी कंपनीने भारतीय लेखा मानकानुसार तयार केलेल्या वित्तीय विववरणपत्रकांत जशा दिसल्या त्याचा अहवाल दिला आहे.*

वरील 'पात्र मतांचा आधार' या परिच्छेद क्र.(४) मधे चालू व स्थगित करावरील अंतर्गत नियंत्रणातील प्रत्यक्ष दोष यामुळे कंपनीच्या या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रकावरील आमच्या मतास बाधा आली आहे. आणि आमच्या मुख्य लेखापरिक्षण अहवालात एक पात्र मत दिले आहे.

वरील 'पात्र मतांचा आधार' यातील परिच्छेद (१,२ आणि ३) यात नमूद केलेले इतर प्रत्यक्ष दोष यामुळे या भारतीय लेखा मानकानुसार तयार केलेल्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रावरील आमच्या मतांना बाधा येत नाही.

**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनी करिता**
सनदी लेखापाल
**एफ.आर.एन.१००१८६ डब्ल्यू**

**एस.सी.बापना ॲन्ड असोशिएटस करिता**
सनदी लेखापाल
**एफ.आर.एन.११५६४९ डब्ल्यू**

**आर.एस.व्ही.ए.ॲन्ड कंपनी करिता**
सनदी लेखापाल
**एफ.आर.एन.११०५०४ डब्ल्यू**

**सी.ए.राजेश जोशी**
भागीदार
**आय्.सी.ए.आय्.एम्.नं.३८५२६**

**सी.ए.प्रियांका डी.जखोटिया**
भागीदार
**आय्.सी.ए.आय्.एम्.नं.१५७४२६**

**सी.ए.शेखर कुलकर्णी**
भागीदार
**आय्.सी.ए.आय्.एम्.नं.०४६२८५**

स्थळ : मुंबई
दिनांक : २८ सप्टेंबर २०१८

## ३१ मार्च २०१८ रोजीचे ताळेबंद पत्रक (स्वायत्त)

(₹.कोटीत)

| तपशील | संख्या क्र. | ३१-०३-२०१८ | ३१-०३-२०१७ पुनर्लिखित |
|---|---|---|---|
| मत्ता | | | |
| **चालू नसलेल्या मत्ता** | | | |
| मत्ता, कारखाने व साधने | १ | ४०,८१८.०९ | ४२,८७७.९६ |
| प्रगतीपथावरील भांडवली कामे | २ | १,३१६.४३ | १,२०१.१५ |
| वजा-जुनाट, निकामी बाबींसाठी तरतूद | | (२४.२४) | (२४.०१) |
| निव्वळ - प्रगतीपथावरील कामे | २ | १,२९२.१९ | १,१७७.१४ |
| अर्मुत मत्ता | १ँ | ५.६३ | १२.२२ |
| विकसित होत असलेल्या अमूर्त मत्ता | २ | १३२.५५ | १२९.७७ |
| वित्तीय मत्ता | | | |
| उपकंपन्या, सहयोगी संस्था संयुक्त कंपन्या यातील गुंतवणूकी | ३ | १.०८ | ०.२६ |
| व्यापारी येणी | ४ | ४,२६५.२७ | ३,०४४.३४ |
| इतर चालू नसलेल्या मत्ता | ५ | १,०८८.९८ | १,०२२.३८ |
| **एकुण चालू नसलेल्या मत्ता** | | **४७,६०३.७९** | **४८,२६४.०७** |
| **चालू मत्ता** | | | |
| वस्तूमाल सूची | ६ | ९३३.४२ | १,४१३.६९ |
| वित्तीय मत्ता | | | |
| व्यापारी येणी | ७ | ८,७१५.६२ | ७,६२७.६० |
| रोख व रोख समतूल्य | ८ | ०.०३ | ३४.०६ |
| कर्जे | ९ | १३.०९ | ५४.३९ |
| इतर वित्तीय मत्ता | १० | २,७३६.१४ | २,४०३.८० |
| इतर चालू मत्ता | ११ | १,७०१.७१ | १,९६९.२९ |
| विक्री / विल्हेवाट असे वर्गीकरण केलेल्या मत्ता | १ँ | २०७.३१ | २९०.५० |
| **एकुण चालू मत्ता** | | **१४,३०७.३२** | **१३,७९३.३३** |
| **एकुण मत्ता** | | **६१,९११.११** | **६२,०५७.४०** |
| **समभाग आणि दायित्त्वे** | | | |
| **समभाग** | | | |
| समभाग भांडवल | १२ | २५,२४७.१३ | २४,८५४.३४ |
| इतर समभाग | १३ | (६,४७७.९६) | (६,८२२.३४) |
| **एकुण समभाग** | | **१८,७६९.१७** | **१८,०३२.००** |
| **दायित्त्वे** | | | |
| **चालू नसलेली दायित्त्वे** | | | |
| वित्तीय दायित्त्वे | | | |
| कर्जे | १४ | २४,२५०.६९ | २४,४९७.९५ |
| तरतुदी | १५ | ८६५.०१ | ७९७.६९ |
| स्थगित कर दायित्त्व (निव्वळ) | १५ँ | ८५३.०३ | १,५०७.३४ |
| इतर चालू नसलेली दायित्त्व | १६ | ६१.८९ | ५३.६३ |
| **एकुण चालू नसलेली दायित्त्व** | | **२६,०३०.६२** | **२६,८५६.६१** |
| **चालू दायित्त्वे** | | | |
| वित्तीय दायित्त्वे | | | |
| कर्जे | १७ | ८,१६९.८१ | ८,८१९.२६ |
| व्यापारी देणी | १८ | १,४३८.४५ | १,७०६.३९ |
| इतर वित्तीय देणी | १९ | ७,२०३.४७ | ६,३९३.४२ |
| इतर चालू दायित्त्वे | २० | २३.०० | ११.५२ |
| तरतुदी | २१ | २७६.५९ | २३८.२२ |
| **एकुण चालू दायित्त्व** | | **१७,१११.३२** | **१७,१६८.८०** |
| **एकुण समभाग आणि दायित्त्व** | | **६१,९११.११** | **६२,०५७.४०** |

आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार
**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनी साठी**
सनदी लेखापाल
(एफ.आर.एन. १००१८६ डब्ल्यु)

सी.ए.राजेश जोशी
भागीदार (आयसीएआयएम नं.३८५२६)

**एस.सी.बापना ॲन्ड असोशिएट्स साठी**
सनदी लेखापाल,
(एफआरएन ११५६४९ डब्ल्यू)

सी.ए.प्रियांका जखोटीया
भागीदार (आयसीएआयएम नं.१५७४२६)

**आरएसव्हीए ॲन्ड कंपनी साठी**
सनदी लेखापाल,
(एफआरएन - ११०५०४ डब्ल्यू)

सी.ए.शेखर कुलकर्णी
भागीदार, (आयसीएआयएम नं.०४६२८५)
मुंबई, दि.२८ सप्टेंबर २०१८.

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड करिता**

संतोष आंबेरकर
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन.नं.०५१७३६०७

बिपीन श्रीमाळी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन नं.०३२७२१३५

पंकज शर्मा
मुख्य महाव्यवस्थापक (लेखे)

राहूल दुबे
कंपनी सेक्रेटरी
एम नं.ए१४२१३

## ३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वर्षाचे नफा व तोटा पत्रक (स्वायत्त)

(₹.कोटीत)

| तपशील | टिपा क्र. | २०१७-२०१८ | २०१६-२०१७ पुनलिखित |
|---|---|---|---|
| **महसूल** | | | |
| प्रवर्तनापासून महसूल | | | |
| **वीज विक्री** | **२२** | **१९०११.०३** | **१६६२३.७७** |
| इतर प्रवर्तनाचे महसूल | २३ | २०५०.४५ | १७३१.१५ |
| इतर उत्पन्न | २४ | २५६.२० | १९९.९० |
| **एकूण उत्पन्न** | | **२१३१७.६८** | **१८५५४.८१** |
| **खर्च** | | | |
| वापरलेल्या साधनांचा खर्च | २५ | ११५६०.८५ | ११०२२.६६ |
| कर्मचारी लाभ खर्च | २६ | १४०७.८४ | १२३८.९२ |
| वित्त खर्च | २७ | ३३२१.११ | २९०६.६१ |
| घसारा | १ व १ अ | २६५५.८५ | २१०७.२२ |
| इतर खर्च | २८ | २२९०.७८ | २०१८.१३ |
| **एकूण खर्च** | | **२१२३६.४३** | **१९२९३.५५** |
| **नफा - अपवादात्मक बाबी व कर यापूर्वीचा** | | **८१.२५** | **(७३८.७४)** |
| **करपूर्व नफा/ (तोटा)** | | **८१.२५** | **(७३८.७४)** |
| **कर खर्च:** | | | |
| कर खर्च (इतर सर्वकष उत्पन्नावरील) | | १२.२४ | २०.११ |
| स्थगित कर खर्च / (प्राप्ती) | १५ अ | (६५४.३१) | (२५.९७) |
| **एकूण कर खर्च** | | **(६४२.०७)** | **(५.८६)** |
| **कालावधीतील नफा / (तोटा)** | | **७२३.३२** | **(७३२.८८)** |
| इतर सर्वकष उत्पन्न कालावधीतील नफा / (तोटा) | | | |
| ज्यांचे नफा किंवा तोटा यात वर्गीकरण झालेले नाही | | | |
| व्याख्यांकित लाभ योजनांचे पूनर्मापन | २६ अ | (३५.३८) | (५८.११) |
| इतर सर्वकष उत्पन्नावरील चालू कर खर्च लाभ/(व्यय) | | १२.२४ | २०.११ |
| कालावधीतील इतर सर्वकष उत्पन्न (करांची निव्वळ) | | (२३.१४) | (३८.००) |
| कालावधीतील एकूण सर्वकष उत्पन्न (करांची निव्वळ) | | ७००.१८ | (७७०.८८) |
| प्रतिभाग मिळकत (मूळ) | | ०.२९ | (०.२९) |
| प्रतिभाग मिळकत (सौम्यकृत - प्रतिभाग) | | ०.२९ | (०.२९) |

आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार
**के.एस.अय्यर अँन्ड कंपनी साठी**
सनदी लेखापाल
(एफ.आर.एन. १००१८६ डब्ल्यु)

सी.ए.राजेश जोशी
भागीदार (आयसीएआयएम नं.३८५२६)

**एस.सी.बापना अँन्ड असोशिएट्स साठी**
सनदी लेखापाल,
(एफआरएन ११५६४९ डब्ल्यू)

सी.ए.प्रियांका जखोटीया
भागीदार (आयसीएआयएम नं.१५७४२६)

**आरएसव्हीए अँन्ड कंपनी साठी**
सनदी लेखापाल,
(एफआरएन - ११०५०४ डब्ल्यू)

सी.ए.शेखर कुलकर्णी
भागीदार, (आयसीएआयएम नं.०४६२८५)
मुंबई, दि.२८ सप्टेंबर २०१८.

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड करिता**

संतोष आंबेरकर
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन.नं.०५१७३६०७

बिपीन श्रीमाळी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन नं.०३२७२१३५

पंकज शर्मा
मुख्य महाव्यवस्थापक (लेखे)

राहूल दुबे
कंपनी सेक्रेटरी
एम नं.ए१४२१३

## दि.३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वर्षाचे रोकडता विविरण पत्रक

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | २०१७-२०१८ | २०१६-२०१७ पुनलिर्खित |
|---|---|---|
| **अ) प्रवर्तन कार्यापासूनचा रोकडता प्रवाह** | | |
| निव्वळ नफा - करोत्तर | ७००.१८ | (७७०.८८) |
| **कर पूर्व नफा आणि प्रवर्तन कार्यात वापरलेल्या रोख रकमेचा मेळ करण्यासाठीची समायोजने:** | | |
| मत्ता, कारखाने, साधने व अमूर्त मत्ता यांचा घसारा / कमी करणे | २,६५५.८५ | २,१०७.२२ |
| गुंतवणूकीचे मूल्य कमी करणे | | |
| वीत्त खर्च | ३,३२१.११ | २,९०६.६१ |
| विनिमय दरातील वसूल न झालेला फरक | ४०.८२ | (४७.१९) |
| अपेक्षीत पत तोट्याची तरतुद | ९.०३ | २०४.५२ |
| व्याज उत्पन्न | (०.४०) | (०.५०) |
| निकामी वस्तूमालासाठी तरतूद | २०.१५ | (७१.१५) |
| **खेळत्या भांडवलातील बदला पूर्वीचा प्रवर्तनातील नफा (उपबेरीज -१)** | **६,७४६.७३** | **४,३२८.६४** |
| **खेळत्या भांडवलातील हालचाल** | | |
| व्यापारी येण्यातील (वाढ) / घट | (२,३१७.९९) | १४.०५ |
| कर्ज, अग्रिमे व इतर मत्ता यातील (वाढ) / घट | (६.८५) | (१,३५३.४१) |
| वस्तूमालातील (वाढ) / घट | ४६०.१२ | ५५९.९७ |
| दायित्वे व इतर देय यातील (वाढ) / घट | (५५९.३७) | (३८०.९१) |
| **उपबेरीज (२)** | **(२,४२४.१०)** | **(१,१६०.३१)** |
| **प्रवर्तनातून निर्माण केलेली रोकड (१), (२)** | **४,३२२.६३** | **३,१६८.३३** |
| वजा - प्रत्यक्ष कर / एफ बी टी परतावा / भरणा - निव्वळ | | |
| **प्रवर्तन कार्यापासून निव्वळ रोख (अ)** | **४,३२२.६३** | **३,१६८.३३** |
| | | |
| **(ब) गुंतवणूक कार्यातून रोकडता प्रवाह** | | |
| मालमत्ता, कारखाने व साधने खरेदी (प्रगतीपथावरील भांडवली कामे समाविष्ट करून, मालमत्ता, कारखाने व साधनांची विक्री वगळून) | (७०७.२२) | (१,१९०.६५) |
| उपकंपन्यातील गुंतवणूकी | (०.८२) | ३३.४५ |
| मिळालेले व्याज | ०.४० | ०.५० |
| **गुंतवणुक कार्यातून (वापरलेले) रोकडता प्रवाह निर्मिती (ब)** | **(७०७.६४)** | **(१,१५६.७०)** |
| | | |
| **क) वित्तीय कर्जातून रोकडता प्रवाह** | | |
| दीर्घ मुदतीचे कर्जापासून मिळकत | २,१९८.७२ | ६,२१६.२१ |
| दीर्घ मुदतीच्या कर्जाची परतफेड | (२,१६१.४७) | (५,४४९.४७) |
| समभाग वितरणातील मिळकत | ३७.०० | ३९२.७९ |
| अल्प मुदतीची कर्जे उभारणी / (परतफेड) | (६६४.७७) | (६५०.६९) |
| भरलेले वित्त खर्च | (३,०७३.८२) | (२,६६०.७२) |

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | २०१७-२०१८ | २०१६-२०१७ पुनलिर्खित |
|---|---|---|
| **ब) वित्तीय कार्यातून निर्माण केलेला / (वापरलेला) निव्वळ रोकड प्रवाह (क)** | **(३,६६४.३४)** | **(२,१५१.८८)** |
| | | |
| **रोख व रोख समतूल्य यातील वाढ / (घट) (अ+ब+क)** | **(४९.३५)** | **(१४०.२५)** |
| वर्षाच्या आरंभीचा रोख व रोख समतूल्य | ३४.०६ | १४४.३३ |
| वर्षाच्या अखेरीस रोख व रोख समतूल्य | (१५.२९) | ४.०८ |
| **वर्षाच्या अखेरीस रोख व रोख समतूल्य यांचा तपशील:** | | |
| असलेले रोख व रोख समतूल्य | | |
| बँकांमधील शिल्लक: | | |
| - चालू खात्यास | - | ३३.९९ |
| - अप्रवर्तनीय चालू खात्यात | | |
| ओव्हर ड्राफ्ट | (१५.३१) | (२९.९८) |
| हातातील शिल्लक | ०.०३ | ०.०७ |
| **वर्षाअखेरीस रोख व रोख समतूल्य** | **(१५.२९)** | **४.०८** |

आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार
**के.एस.अय्यर अँन्ड कंपनी साठी**
सनदी लेखापाल
(एफ.आर.एन. १००१८६ डब्ल्यु)

सी.ए.राजेश जोशी
भागीदार (आयसीएआयएम नं.३८५२६)

**एस.सी.बापना अँन्ड असोशिएट्स साठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन ११५६४९ डब्ल्यू)

सी.ए.प्रियांका जखोटीया
भागीदार (आयसीएआयएम नं.१५७४२६)

**आरएसव्हीए अँन्ड कंपनी साठी**
सनदी लेखापाल,
(एफआरएन - ११०५०४ डब्ल्यू)

सी.ए.शेखर कुलकर्णी
भागीदार, (आयसीएआयएम नं.०४६२८५)
मुंबई, दि.२८ सप्टेंबर २०१८.

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड करिता**

संतोष आंबेरकर
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन.नं.०५१७३६०७

बिपीन श्रीमाळी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन नं.०३२७२१३५

पंकज शर्मा
मुख्य महाव्यवस्थापक (लेखे)

राहूल दुबे
कंपनी सेक्रेटरी
एम नं.ए१४२१३

## समभाग भांडवलाचे विवरणपत्र

### १. समभाग भांडवल

| तपशील | रक्कम ₹ कोटीत |
|---|---|
| **दि.०१/०४/२०१६ रोजी** | **२४,०९८.३६** |
| समभाग भांडवलीतील बदल | ७५५.९८ |
| **दि.०१/०४/२०१७ रोजी** | **२४,८५४.३४** |
| समभाग भांडवलीतील बदल | ३९२.७९ |
| **दि.३१.०३.२०१८ रोजी** | **२५,२४७.१३** |

### २. इतर समभाग

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | वाटप प्रलंबित असलेल्या शेअर ॲप्लीकेशन मनी | ठेवलेली मिळकत | इतर सर्वंकष उत्पन्न | एकूण इतर समभाग |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| **दि.०१/०४/२०१६ रोजी** | **७५५.९८** | **(६,४०८.४१)** | **(३५.८४)** | **(५,६८८.२७)** |
| वर्षाची नफा किंवा तोटा | | (७३२.८८) | | (७३२.८८) |
| वर्षातील इतर सर्वंकष उत्तन्न | | | (३८.००) | (३८.००) |
| | | | | |
| शेअर ॲप्लीकेशन मनीमधे झालेली भर | ३९२.७९ | | | ३९२.७९ |
| वर्षभरात वितरण केलेले शेअर्स | (७५५.९८) | | | (७५५.९८) |
| **१/०४/२०१७ रोजी** | **३९२.७९** | **(७,१४१.२९)** | **(७३.८४)** | **(६,८२२.३४)** |
| वर्षातील नफा किंवा तोटा | | ७२३.३२ | | ७२३.३२ |
| वर्षातील इतर सर्वंकष उत्पन्न | | | (२३.१४) | (२३.१४) |
| | | | | |
| शेअर ॲप्लीकेशन मनी मधील भर | ३७.०० | | | ३७.०० |
| वर्षभरात वितरण केलेले शेअर्स | (३९२.७९) | | | (३९२.७९) |
| **३१/०३/२०१८ रोजी** | **३७.००** | **(६,४१७.९८)** | **(९६.९७)** | **(६,४७७.९५)** |

आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार
**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनी साठी**
सनदी लेखापाल
(एफ.आर.एन. १००१८६ डब्ल्यु)

सी.ए.राजेश जोशी
भागीदार (आयसीएआयएम नं.३८५२६)

**एस.सी.बापना ॲन्ड असोशिएट्स साठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन ११५६४९ डब्ल्यू)

सी.ए.प्रियांका जखोटीया
भागीदार (आयसीएआयएम नं.१५७४२६)

**आरएसव्हीए ॲन्ड कंपनी साठी**
सनदी लेखापाल,
(एफआरएन - ११०५०४ डब्ल्यू)

सी.ए.शेखर कुलकर्णी
भागीदार, (आयसीएआयएम नं.०४६२८५)
मुंबई, दि.२८ सप्टेंबर २०१८.

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड करिता**

संतोष आंबेरकर
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन.नं.०५१७३६०७

बिपीन श्रीमाळी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन नं.०३२७२१३५

पंकज शर्मा
मुख्य महाव्यवस्थापक (लेखे)

राहूल दुबे
कंपनी सेक्रेटरी
एम नं.ए१४२१३

## दि.३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरणपत्रावर टिपा
## कंपनीचे स्वरुप आणि महत्त्वाची लेखा धोरणे

**अ) कंपनीची माहिती**

'महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी, मर्यादित "सदर कंपनी" ही एक पब्लीक लिमिटेड कंपनी असून तिची संस्थापना कंपनी अधिनियम १९५६ नुसार झाली आहे आणि ती भारतातील निवासी कंपनी आहे. ही कंपनी काही सूची वरील कंपनी नाही आणि तीचे सर्व शेअर्स म्हणजे १०० टक्के शेअर्स महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी लिमिटेड या कंपनीने धारण केले आहेत. कंपनी वीज निर्मिती करते यासाठी औष्णिक, जलविद्युत, वायू आणि सौर या स्त्रोतावर आधारीत कंपनीची वीज निर्मिती केंद्रे महाराष्ट्र राज्यभरात आहेत. महानिर्मिती कंपनीने निर्माण केलेली वीज प्रामुख्याने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) या सहोदर उपकंपनीला पुरविते. यासाठीचे वीज दर पत्रक महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग या नियमाक संस्थेतर्फे निश्चित केले जात असते.

**महत्त्वाची लेखा धोरणे :**

महानिर्मितीचे स्वायत्त वित्तीय विवरणपत्रके तयार करण्यासाठी आणि सादरीकरण्यासाठी खालील महत्त्वाची लेखा धोरणे अंगिकारण्यात आलेली आहेत.

**ब) वित्तीय विवरणपत्रके तयार करण्यासाठीचे आधारभूत तत्त्व:**

**१. भारतीय लेखा मानके यांचे अनुपालन केल्याचे निवेदन**

ही स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके सर्वार्थाने भारतीय लेखा मानके (यापुढे ह्याचा उल्लेख भारतीय लेखा मानक असा केला जाईल) यांचे अनुपालन करुन तयार केली आहेत. ही भारतीय लेखा मानके कंपनी अधिनियम २०१३ (कायदा) यातील कलम १३३, ज्याचे सहवाचन 'कंपन्यासाठी (भारतीय लेखा मानके) नियमावली २०१५', यातील नियम क्र.३, आणि कंपन्यांची (भारतीय लेखा मानके) दुरुस्त केलेली नियमावली २०१६ यासोबत होते. त्यानुसार अधिसूचित केल्याप्रमाणे तसेच कंपनी अधिनियम २०१३ च्या संबंधित तरतुदीचे अनुपालन करतात.

कंपनीने सादरीकरणासाठी 'भारतीय रुपया' हे चलन वापरले आहे. तसेच तिच्या व्यवहाराचे चलनसुद्धा 'भारतीय रुपया' हेच आहे. वित्तीय विवरण पत्रकातील सर्व रकमांच्या आकडेवारीचे त्याजवळच्या कोटी रुपयामधे रुपांतरण केले आहे. (जेथे इतर काही निर्देश असेल त्याला अपवाद) ही वित्तीय विवरण पत्रके वितरीत करण्यासाठी महानिर्मितीच्या संचालक मंडळाने दि.२८/०९/२०१८ रोजीच्या ठरावाने मंजुरी दिली आहे.

**२. चालू / चालू नसलेल्या मत्ता व दायित्त्वे यांचे वर्गीकरण**

कंपनी अधिनियम २०१३ ची सूची क्र.तीन (III) यात दिलेले निकष आणि कंपनीचे सामान्यतः कार्यचक्र यानुसार कंपनीच्या मत्ता व दायित्त्वे यांचे वर्गीकरण 'चालू' आणि चालू नसणाऱ्या या प्रकारांमधे केले आहे. स्थगित कर मत्ता आणि दायित्त्वे यांचे त्यांच्या निव्वळ तत्त्वावर 'चालू नसणाऱ्या' यामधे वर्गीकरण केले आहे.

वरील हेतुसाठी कंपनीने तिचे कार्यचक्र बारा महिन्यासाठी निश्चित केले आहे. तसेच ते उत्पादनाचे स्वरुप आणि उत्पादनासाठी लागणारे निवेश साहित्य यांचे संपादन करण्यासाठी लागणारा वेळ व त्यांचे रोख आणि रोख समतूल्य यात रुपांतरण यावर आधारलेले असते. या कंपनीवर विद्युत अधिनियम २००३ चा अंमल आहे. विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदींचे त्यातील नियमावली सोबत सहवाचन केले जाते आणि जेव्हा त्या कंपनी अधिनियम २०१३ च्या लागू होणाऱ्या तरतुदींशी सुसंगत होत नसतील तेव्हा विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १७४ च्या अटींनुसार विद्युत अधिनियम २००३ आणि त्याची नियमावली अभिभावी होतील.

**३. ऐतिहासिक खर्च संकेतावर टिपा**

ऐतिहासिक खर्च संकेतानुसारवित्तीय विवरण पत्रके तयार करण्यासाठी कंपनी ही 'सतत कार्यरत संस्था' असल्याचे मानले आहे. तसेच वित्तीय विवरण पत्रके उपार्जन तत्त्वावर आधारित आहेत. मात्र त्याला खालील बाबींचा अपवाद आहे.

अ) काही वित्तीय विलेख आणि

ब) कर्मचारी व्याख्यांकित लाभ योजना आणि

क) विक्रीसाठी काढलेल्या मत्ता - ज्यांचे मापन त्यांच्या चालू रकमांपेक्षा कमी झाले आहे आणि रास्त मूल्य वजा विक्रीचा खर्च असे केले आहे, त्यांचे मापन प्रत्येक अहवाल कालावधीच्या अखेरीस रास्त मूल्याने केले जाते; याबाबतचे स्पष्टीकरण खाली दिलेल्या लेखा धोरणात केले आहे.

## ४. सुज्ञ निर्णय आणि अंदाज याचा उपयोग करणे

कंपनीची वित्तीय विवरण पत्रके तयार करण्यासाठी व्यवस्थापनाला काही न्याय निर्णय, अंदाज करावी लागतात तसेच गृहिते धरावी लागतात. त्याचा परिणाम अहवालात दिलेल्या महसूल, खर्च, यांच्या रकमांवर तसेच मत्ता व दायित्त्वे यावर आणि सोबतची प्रकटने व आकस्मिक दायित्त्वे यांच्यावर होत असतो. सदर गृहिते आणि अंदाज अनिश्चित असल्यास प्रत्यक्ष निकाल यांचे समायोजन करावे लागते. भविष्याबाबत मत्ता व दायित्त्वे यांच्यावर काय परिणाम होऊ शकतील याबाबत त्यांच्या रकमांचे समायोजन केले जाते. अंदाज व गृहिते यांचे कंपनी सर्वोतपरी उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे मूल्यमापन करते.

विशेषत: लेखा धोरणे लागू करताना महत्त्वाच्या क्षेत्रातील अंदाज व न्याय निर्णय यांच्या माहितीचे वित्तीय विवरण पत्रातील मान्य रकमांवर होणारे महत्त्वाचे परिणाम खाली दिले आहेत.

- मालमत्ता, कारखाने, साधने आणि अमूर्त मत्ता यांचे उपयुक्त आणि उर्वरित आयुष्य याविषयीचे अंदाज करणे,
- वित्तीय मत्ता कमी करणे
- वित्तीय विलेखांच्या रास्त मुल्यांची मोजणी
- व्याख्यांकित लाभ बंधनाचे व  महत्त्वाच्या विमागणिती गृहितांचे मापन
- तरतूदी आणि आकस्मिक परिस्थिती
- स्थगित कर मत्ता यांच्या वसुली योग्यतेचे मूल्य मापन

लेखांचे अंदाजामधे सुधारणा केल्यास वित्तीय विवरण पत्राच्या कालावधीकरिता भविष्यातील परिणाम विचारात घेऊन त्यांना प्रक्षेपाने मान्यता दिली जाते. जर भविष्यातील काळात बाधा येणार असेल तर संबंधित लेखा मानकानुसार त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने समजणे आवश्यक असेल तशी मान्यता देण्यात येते.

## ५. मत्ता, कारखाने आणि साधने

१. मालकीची जमीन प्रचलीत किमतीप्रमाणे धरली जाते. मत्ता, कारखाने आणि साधने या त्यांच्या किमती, संचीत परिस्थितीची निव्वळ आणि जर काही कमी करण्याचे संचीत तोटे असतील तर त्याप्रमाणे नमूद केले जातात.

कोणत्याही मत्तेच्या प्रारंभिक खर्चात पुढीलबाबी समाविष्ट असतात. खरेदीची किंमत किंवा मत्ता उभारणीचे खर्च (यामधे आयात शूल्क, माल वाहतूक भाडे, परतावा न मिळणारे कर यांचा अंतर्भाव असतो.) याशिवाय सदर मत्ता तिच्या जागेवर आणण्यासाठी प्रत्यक्ष केलेले खर्च, ती इच्छित कामासाठी संचलीत करण्यासाठी केलेले खर्च आणि पात्र मत्ताचे (ज्या मत्ता इच्छित वापरासाठी तयार करण्यात आवश्यक कालावधी घेतात.) कर्ज खर्च इत्यादी

मत्तेचे खरेदी मूल्य म्हणजे एकत्रित दिलेली रक्कम आणि सदर मत्ता संपादनासाठी विचारात घेतलेल्या इतर बाबींचे रास्त मूल्य होय. यंत्राच्या खर्चात यंत्र प्रायोगिक तत्त्वावर चालविण्याचे खर्च (प्रायोगित तत्त्वावर चालविण्याच्या कालावधीत उत्पादित केलेल्या कोणत्याही वस्तू विकण्यापासून प्राप्त होणारी रक्कम कमी केल्यानंतर) आणि चालू करण्याचे इतर खर्च म्हणजे वाहतूक खर्च, स्थापन करण्याचे आकार, बांधकाम, उभारणी कालावधीतील इतर उत्पत्तीची निव्वळ रक्कम इ. यांचाही समावेश केला जातो. ज्या प्रकल्पांचे काम चालू आहे त्यांचा प्रचलीत खर्च धरला जातो. त्यात थेट खर्च, संबंधित प्रवर्तन पूर्व प्रासंगिक खर्च, आणि देय व्याज यांचा समावेश असतो. जर एखाद्या बाबीपासून कंपनीला भविष्यात आर्थिक लाभ मिळणे संभवनीय असेल आणि अशा मत्तांचा खर्च जर विश्वसनीयरित्या मोजता येत असेल तरच असे नंतरचे खर्च त्या मत्तांच्या प्रचलीत रकमेत समाविष्ट केले जातात किंवा त्यांना योग्य स्वतंत्र मत्ता म्हणून मान्यता देण्यात येते.

२. जर कंपनीने केलेल्या भांडवली खर्चातून, जिच्यावर कंपनीची मालकी किंवा नियंत्रण नाही अशी मत्ता निर्माण केली जात असेल तर असे खर्च मत्तांचे बांधकाम चालू असे पर्यंत प्रगतीपथावरील भांडवली कामे यामधे दाखविले जातात. आणि त्याच्या समतूल्य रक्कम अप्रचलीत मत्ता खर्च म्हणून वजा केली जाते आणि ती ज्या वर्षी खर्च केली त्यावर्षाच्या नफा तोटा पत्रकात आकारली जाते. बांधकाम पूर्ण झाल्यावर वरील भांडवली खर्चाचे भांडवलीकरण केले जाईल आणि त्याचे समायोजन कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्ता यांच्या तरतुदीत केले जाईल. कंपनीची मालकी नसलेल्या मत्ता आणि कंपनीच्या सामाजिक जबाबदाऱ्याच्या कार्यासाठी दिलेले अंशदान जेव्हा खर्च होईल तेव्हा त्याची आकारणी नफा-तोटा पत्रकात केली जाईल.

४. मत्ता धोरण समर्थ करणे : (प्रकरण निहाय तत्त्वानुसार) कंपनीस तिच्या अन्य काही मत्ता द्वारे भविष्यात आर्थिक लाभ मिळविण्यासाठी कारखाने, मालमत्ता कारखाने व साधने यातील काही उपयुक्त बाबी संपादन कराव्या लागतात (या बाबी

स्वतः भविष्यात आर्थिक लाभ मिळवून देतीलच असे नसते) अशा बाबींना 'मत्ता' म्हणून मालमत्ता - कारखाने व साधने यात पात्रता द्यावी लागते. कारण त्यातून कंपनीला भविष्यात अन्य संबंधित मत्तांद्वारे आर्थिक लाभ मिळविता येतात. या बाबी संपादन केल्या नसत्या तर असे जादा आर्थिक लाभ मिळू शकले नसते. मात्र कंपनी या मत्तांचे त्यांच्या व्यक्तीशः प्रकरणनिहाय स्वरुपाची पडताळणी केल्यानंतर त्यांचे भांडवलीकरण करते.

५. प्रगतीपथावरील भांडवली कामांमधे कंत्राटदाराचे देयकाचे अंतिमीकरण करणे राहिले आहे, त्यांचे भांडवलीकरण हंगामी तत्त्वावर केले जाते. मात्र ते अंतिम चुकते होण्याच्या वर्षात समायोजन करण्याचे अधीन असते.

६. भांडवली कंत्राटाच्या किमतीच्या विचलनाच्या दाव्यांच्या प्रकरणी कंपनीने दावे स्वीकारले तरच त्यांचे लेखे केले जातात.

७. जेव्हा 'मत्ता, कारखाने व साधने' यात मान्यता दिलेली एखादी बाब किंवा तिचा महत्त्वाचा भाग याची विल्हेवाट केल्यास, त्याची मान्यता काढून घेतली जाते किंवा जर अशा मत्ताच्या वापरातून भविष्यात कोणतेही आर्थिक लाभ मिळण्याची अपेक्षा नसते तेव्हा त्यांची मान्यता काढून घेतली जाते. मान्यता काढल्यानंतर होणारी प्राप्ती किंवा हानी यांचा समावेश नफा-तोटा पत्रकात समाविष्ट केली जाते.

८. जमिनीच्या भाडेपट्टीची व्यवस्था ज्या तारखेला केली जाईल त्या दिवसापासून तिचे वर्गीकरण 'वित्तीय भाडे' असे केले जाते. या भाडेपट्टीच्या कालावधीत अशा जमिनी संबधीच्या सर्व जोखीमा आणि मोबदले कंपनीकडे हस्तांतरित केल्या जातात.

९. मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्या आवश्यक सुट्ट्या भागाचे मूल्य त्यांच्या युनिट विहित मर्यादांपेक्षा जास्त असले तर त्यांचे भांडवलीकरण 'मालमत्ता, कारखाने आणि साधने' यामधे केले जाते. अन्य प्रकरणी सुटे भाग संपादन केल्याबरोबर त्या वस्तूमालसाठा सुचीमधे समाविष्ट केल्या जातात आणि त्या वापरल्यानंतर त्यांची आकारणी नफा व तोटा पत्रकात केली जाते.

१०. यंत्रांचे जे सुटे भाग ज्यावर्षी निकामी होतात आणि ते बदलले जातात, त्यावर्षी त्यांचे कमी केलेले लिखित मूल्य नफा-तोटा पत्रकात आकारले जाते. जर जुने भाग दुरुस्त करून पूनर्वापरासाठी योग्य झाले तर त्या दोन्ही भागांचे त्यांच्या उर्वरित उपयुक्त आयुष्याच्या काळासाठी घसारा करण्यात येईल. जुन्या संबंधित भागांच्या दुरुस्तीच्या खर्चाची आकरणी नफा-तोटा पत्रकात होईल.

११. जेव्हा मत्ता किंवा भांडवली सुटे भाग बदलण्यात आला आणि अशा मूळ मत्ता /भाग यांची कमी झालेली मुल्य माहिती नसेल तर, मत्ता/यंत्र यांच्या नव्या भागाची/भांडवली सुट्ट्या भागाची किमत/निव्वळ पुस्तकी मूल्य निर्लेखित केले जाईल.

१२. कंपनीने पूर्वीच्या सर्वसामान्य मान्य केलेली लेखातत्त्वानुसार मालमत्ता, कारखाने यांचे चालू मूल्य हेच भारतीय लेखा मानकाच्या संक्रमण तारखेला अभिदत्त मूल्य म्हणून मानण्याचे ठरविले आहे.

## ६. अमूर्त मत्ता

अमूर्त मत्ता या त्यांच्या संचित घसारानंतरची आणि जर काही असेल तर कमी करण्याची संचित हानी त्यांच्या निव्वळ किंमतीनुसार पुढे नेण्यात येतात. अमूर्त मत्तासाठी (सॉफ्टवेअर व्यतिरिक्त) त्यांच्या उपयुक्त आयुष्यासाठी सरळ रेषा पद्धतीने घसाऱ्याची तरतूद केली जाते. सॉफ्टवेअरची घसारा तरतूद महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विहित केलेल्या आयुष्यासाठी केली जाते. अमूर्त मत्तांचा घसारा खर्च आणि कमी करण्याची हानी यांना नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

कंपनीने अस्तित्त्वातील अमूर्त मत्तांचे मूल्य हेच भारतीय लेखा मानकात संक्रमण करण्याच्या तारखेचे अभिदत्त मूल्य मानण्याचे ठरविले आहे.

## ७. प्रगतीपथावरील भांडवली कामे

१. मालमत्ता, कारखाने व साधने यातील नवे प्रकल्प / विस्तार कार्यान्वित होण्याच्या तारखेपर्यंत संबंधित खर्च व कर्जाचे मूल्य यांचे भांडवलीकरण केले जाते.

२. कंपनीने प्रकल्प व नियोजनासाठी त्यांच्या कालावधीत केलेले कार्यालयीन खर्चासह सर्व खर्च यांचे विनियोजन संबधित प्रकल्पाची 'प्रगतीपथावरील भांडवली कामे' यांच्या लेख्यात त्यासाठी मत्तांचा बांधकामाच्या संचित शिलकीच्या आधारे केले जाते.

## ८. परिसमापनातील नुकसानाचे ज्यावर्षी आकार घेईल त्या वर्षीच्या मालमत्ता, कारखाने व साधने यांच्या खर्चात समायोजित करण्यात येईल.

**९. कर्जाचे खर्च**

निधी कर्जाने घेतल्यावर त्यासंबधीचे केलेले इतर खर्च आणि व्याज यांचा कर्जाच्या खर्चात समावेश होतो. ज्या मत्ता त्यांच्या इच्छित वापरासाठी तयार होण्यासाठी बराच वेळ घेतात, त्यांच्या संपादनासाठी केलेले कर्जाचे थेट खर्चाचे भांडवलीकरण, ज्या महिन्यात या मत्ता तयार होतील, तोपर्यंतच्या खर्चाचा भाग म्हणून केले जाते. भांडवली मत्ता संपादन किंवा उभारणी याच्याशी संबंधित नसलेले इतर उसनवारीचे खर्च यांना त्यांच्या कालावधीमधे खर्च म्हणून मान्यता दिली जाते.

**१०. अवित्तीय मत्ता कमी करणे**

वस्तूसूची, स्थगित कर मत्ता आणि विक्रीला काढलेल्या म्हणून वर्गीकरण केलेल्या चालू नसलेल्या मत्ता या व्यतिरिक्त अवित्तिय मत्तांचा ताळेबंदाच्या तारखेस आढावा घेऊन त्या कमी करण्याची चिन्हे दिसतात का याचा आढावा घेण्यता येतो.

जर अशी काही चिन्हे दिसली तर, किंवा जर मत्ता कमी करण्यासाठी वार्षिक परिक्षणाची गरज असेल तर कंपनी त्या मत्तापासून वसूल होऊ शकणाऱ्या रकमेचा अंदाज करते. अशी वसूली योग्य किंमतही अशा मत्तांपासून रोख निर्मिती वजा त्यांच्या विल्हेवाटीचा खर्च आणि वापराचा खर्च यापेक्षा जास्त असावी. ज्या मत्तांची रोकडता अंतप्रवाह इतर मत्ता किवां मत्तांचा गट यापासून मोठ्या प्रमाणात स्वतंत्र असेल तर त्या वगळून प्रत्येक मत्तांची वसूली योग्य रक्कम ठरविली जाते.

जी मत्ता चालू ठेवण्याचा खर्च किंवा तिची रोख निर्मितीची क्षमता वसूल होण्याजोग्या रकमेपेक्षा जास्त असते तेव्हा ती कमी करण्याचा विचार केला जातो व त्या वसुली योग्य किमती इतके तिचे कमी मूल्य लिहिले जाते.

वापरातील मूल्य ठरविण्यासाठी भविष्यातील अंदाजे रोख प्रवाह तिच्या विद्यमान मूल्य इतका कमी केला जातो. यासाठी चालू बाजारातील पैशाचे वेळेनुरूप मूल्य दर्शक करपूर्व सवलत दर वापरला जातो आणि मत्तेचे निश्चित धोकेही विचारात घेतले जातात. रास्त मूल्य वजा विल्हेवाटीचा खर्च निश्चित करण्यासाठी बाजारातील अलीकडचे व्यवहार विचारात घेतले जातात. असे व्यवहार अनुपलब्ध असल्यास, मूल्यांकनाचे योग्य प्रारुप वापरले जाते.

**११. घसारा / कर्ज फेडीची तरतूद**

**अ) भाडेपट्टीच्या जमिनीसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग नियमनान विहित केलेल्या सरळ रेखा तत्त्व पद्धतीनुसार ३.३४ टक्के दराने कर्जफेडीची तरतूद केली जाते.**

**ब) मत्ता, कारखाने आणि साधने**

१. कंपनी ही दर नियमन असणारी संस्था असल्याने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विहीत केल्याप्रमाणे घसाऱ्याचे दर, कार्यपद्धती आणि मत्तांचे आयुष्य मापन अनुसरण्यात येतात. त्याचनुसार कंपनी सरळ रेषा पद्धतीनुसार मत्ताच्या खर्चाच्या ९० टक्के पर्यंत घसारा आकारते.

२. वर्षभरात मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्यातील दर/विल्हेवाट / काढून टाकणे यासाठीचा घसारा वरील कृतींच्या महिन्यात 'यथा प्रमाण' तत्त्वाने केला जातो. ग्रीन फिल्ड/ब्राऊन फिल्ड यांचे वाणिज्यिक कार्य सुरु होण्याच्या तारखेपासून त्यांचे भांडवलीकरण नफा-तोटा पत्रकात आकारले जाते.

३. ज्या मत्तांच्या (खालील परिच्छेद ४ यात नमूद केलेल्या मत्ता वगळून) कार्यान्वयानंतर घसारा ७० टक्क्यांपर्यंत आकारलेला नाही; त्यांच्या ठोक किमतीवर घसाऱ्याची आकरणी ७० टक्के होण्याचा वर्षापर्यंत येथे खाली दिलेल्या घसारा दराने केली जाते. ७० टक्के घसारा झाल्यानंतर उर्वरित उपयुक्त आयुष्यासाठी कंपनी ९० टक्के दराने घसारा आकारते. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार औष्णिक व वायू आधारीत वीज निर्मिती केंद्रासाठी २५ वर्षे आणि जल विद्युत केंद्रासाठी ३५ वर्षे असे उपयुक्त आयुष्य विहित केले आहे.

| **मत्तांचा प्रकार** | **घसारा टक्केवारी** |
|---|---|
| जल विद्युत, वाफ वीज, वायू आधारीत वीज निर्मिती केंद्रातील कारखाने व यंत्रे, कुलींग टॉवर्स, जलविद्युत बांधकामे, ट्रान्स्फॉर्मर्स व इतर स्थापित साधने, पारेषणाच्या तारा, केबल नेटवर्क इ. | ५.२८% |
| इमारती आणि इतर स्थापत्य कामे | ३.३४% |

४. खालील मत्तांच्या साठी सरळ रेषा पद्धतीने मत्ताच्या मूल्यांचा ९०% पर्यंत घसारा खालील दराने आकारला जातो.

| **मत्तांचा प्रकार** | **घसारा टक्केवारी** |
|---|---|
| फर्नीचर जोडणी व कार्यालयाचे साहित्य | ६.३३% |
| वाहने | ९.५०% |
| माहिती तंत्रज्ञान साधने | १५.००% |

५. मालमत्ता, कारखाने व साधने यातील ज्या वस्तू नगांचा खर्च कंपनीने विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त नाही; त्यांचा घसारा संपादन वर्षात १०० टक्के केला जातो. मोबाईल फोन खर्चाचे भांडवलीकरण आणि त्यांचा १०० टक्के घसारा, खरेदी वर्षात केला जातो. यासाठी कंपनीची विहित मर्यादा विचारात घेतली जात नाही.

**क) अमूर्त मत्ता:**

नवीन ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर खरेदी केल्याचा भांडवली खर्च, बाह्य तृत्तीय पक्ष सल्लागाराकडून केलेली या सॉफ्टवेअरची अंमलबजावणी, परवान्याचे खरेदी या खर्चाचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विहित केल्याप्रमाणे खालील दराने घसारा आकारला जातो.

| मत्तांचा स्वरुप | घसारा टक्केवारी |
|---|---|
| सॉफ्ट वेअर | ३० टक्के |

## १२. चालू नसलेल्या मत्तांची विक्री करणे

चालू नसलेल्या ज्या मत्ता वापरात ठेवण्यापेक्षा विकल्यास त्यांच्या प्रचलीत रकमा वसूल होऊ शकते त्यांचे वर्गीकरण 'विक्री योग्य चालू मत्ता' असे केले जाते. जर विक्रीची चांगली शक्यता असेल आणि मत्ता विद्यमान स्थितीत तात्काळ विक्रीसाठी उपलब्ध असेल तर वरील अट पूर्ण झाली असे मानले जाते. अशा विक्री योग्य चालू नसणाऱ्या मत्तांची मोजणी त्यांच्या कमी झालेल्या प्रचलीत रकमेनुसार केली जाते आणि रास्त मूल्यातून विक्रीचा खर्च वजा केला जातो. ज्या मालमत्ता कारखाने व साधने आणि अमूर्त मत्ता विक्रीसाठी काढल्या जातात; त्यांचा घसाऱ्याची तरतूद केली जात नाही.

## १३. वस्तूसूची

भांडारातील सामान, सुटे भाग यासह मालसाठ्याचे मूल्यांकन त्यांच्या खर्च आणि त्यांचे वसुली योग्य मूल्य यापैकी जे कमी असेल त्यानुसार केले जाते आणि खर्च हा वेटेड ॲव्हरेज कॉस्ट मेथडने निश्चित केला जातो. मात्र, वीज निर्मितीसाठीचे साहित्य व इतर बाबी यांचे लेखन किमतीपेक्षा कमी दराने केले जात नाही. कारण विजेची विक्री निर्मिती खर्चा इतक्या किंवा त्यापेक्षा जास्त दराने केली जाते. खर्चामध्ये खरेदी खर्च (मिळण्याजोग्या इनपूट टॅक्स क्रेडीटची निव्वळ) आणि त्या वस्तू त्यांच्या सध्याच्या जागी व स्थितीत आणण्याचा इतर खर्च समाविष्ट असतात. भांडारातील सेवेस निरुपयोगी व निकामी झालेल्या वस्तूंचा आढावा घेऊन त्याबाबतच्या तोट्याची लेख्यात तरतूद केली जाते.

## १४. महसूल मान्यता

१. विजेच्या विक्रीतून मिळणाऱ्या महसुलाचा लेखा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वर्षाच्या सुरूवातीस पूर्वनिर्धारित केलेल्या वीज दर पत्रकाच्या आधारे केले जातात. त्यात इंधन समायोजन आकार समाविष्ट असतो.तसेच लेख्यांच्या आधारे कालावधीच्या अखेरीस उपार्जित झालेला विनादेयकाचा महसूल सुद्धा समाविष्ट केला जातो. मात्र तो त्यापुढील वर्षात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने केलेल्या समायोजनाच्या प्रक्रीयेच्या अधीन असतो.

२. महावितरण सोबत केलेल्या वीज खरेदी कराराच्या अटींनुसार, कंपनी विलंबित भरणा आकार १.२५ टक्के दराने प्रति महिना आकारण्यास मान्यता आहे. पताच्या मुदतीनंतर ऊर्जेच्या देयकाची रक्कम भरल्यास तो उपार्जन तत्त्वाने आकारला जातो.

३. व्याजाचे उत्पन्न हे मुद्दल / थकबाकी आणि लागू होणारा व्याज दर यानुसार मान्य केले जाते.

४. फ्लाय ॲश (राख) विक्रीचा लेखा ग्राहकाने मान्य केलेला दराने केला जातो. त्याची रकम 'फ्लाय ॲश वापर निधी' या वेगळ्या लेखा शीर्षात आणि पर्यावरण व वन मंत्रालयाने दि.३१.११.२००९ रोजी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार केला जातो. या निधीचा वापर राख वापराच्या प्रोत्साहनासाठी करावयाच्या खर्चासाठी केला जातो.

५. अन्य उत्पनाला उपार्जन तत्त्वावर मान्यता दिली जाते. भंगार व नाकारलेला कोळसा इत्यादीची विक्री जेव्हा खरेदीदार कंपनीच्या जागेतून करतो व कंपनी त्याची बीजके तयार करते, तेव्हाच त्याचा लेखा होतो. परिसमापनातील नुकसान जेव्हा ते प्रत्यक्ष ओळखले जातात त्यावर्षी आणि त्याची आकारणी झाल्यावर त्यांच्या वसुलीचे समायोजन प्रकल्पाच्या खर्चा समवेत केले जाते. त्यातून प्रकल्पाचे जादा खर्च काही प्रमाणात कमी होतात. प्रकल्पाच्या कंत्राटदारांना दिलेल्या अग्रिमांच्या समायोजन जेव्हा उपार्जन होईल त्याप्रमाणे प्रकल्प खर्चात केले जाते. इतर सर्व प्रकरणी, परिसमापनातील नुकसान इतर उत्पन्नात जमा केले जाते.

६. विक्री झाली नाही अशा ऊर्जा बचतींच्या प्रमाणपत्रांच्या मूल्याला कंपनी वित्तीय वर्षाच्या अखेरीस मान्यता देते व ते उपार्जन तत्त्वानुसार महसूलात जमा करते. ही प्रमाणपत्रे विकल्यास त्याचे उपार्जन मूल्य आणि प्रत्यक्ष मूल्य याचे समायोजन करुन ते प्रत्यक्ष विक्रीच्या वर्षाच्या नफा-तोटा पत्रकात दाखविले जाते.

**१५. खर्च आणि उत्पन्न यांचे लेखे करणे / वर्गीकरण करणे**

जर मागील काही वर्षातील एकत्रित उत्पन्न / खर्च प्रारंभीच्या विहित मर्यादेपेक्षा जास्त असेल तर ते पूर्वलक्षी प्रभावाने दुरुस्त केले जाईल. विम्याचे दावे स्विकारल्यानंतरच त्यांचे लेखे केले जातील.

इतर सर्व दावे / हक्क यांचे लेखे प्रत्येक प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार केले जातील.

**१६. उपकंपन्या आणि संयुक्त कंपन्या यातील गुंतवणूकी**

उपकंपन्या, संयुक्त साहसी कंपन्या तसेच सहयोगी कंपन्या यांच्या समभागातील गुंतवणूकीची नोंदणी खर्च वजा संचित कमी केलेल्या बाबी (जर काही असेल तर) याप्रमाणे केली जाते आणि प्रत्येक अहवाल तारखेला गुंतवणूकीच्या कमतरतेसाठी पुनरावलोकन केले जाते. कंपनीने जेव्हा पूर्वीच्या सर्वसामान्यपणे मान्य केलेल्या लेखा पद्धतीतून भारतीय लेखा मानक पद्धतीत संक्रमण केले त्यावेळी उपकंपन्या, सहयोगी आणि संयुक्तकंपन्या यातील गुंतवणूकीला त्यांच्या प्रचलीत विद्यमान मूल्यानुसार मान्यता देण्याचे ठरविले होते.

**१७. परकीय चलनातील व्यवहार**

परकीय चलनातील व्यवहार प्रारंभी त्यांच्या व्यवहाराच्या तारखेला प्रचलीत असलेल्या संबधित विनिमय दराने नोंदवले जातात.

परकीय चलनानुसार असलेली पैशातील मत्ता व पैशामधील दायित्त्वे यांचे रुपांतरण अहवाल तारखेला असलेल्या विनिमयाच्या स्पॉटरेट नुसार केले जाते. हिशेबानंतर किंवा पूनर्लेखनानंतर विनिमयात उद्भवलेले फरकांना नफा व तोटा पत्रकात 'विनिमय दर विचलन' किंवा 'वित्त खर्च' (कर्जाच्या खर्चाचे समायोजन म्हणून विचारात घेतलेल्या मर्यादेपर्यंत) म्हणून मान्यता दिली जाते.

**१८. कर्मचारी लाभ**

**अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ**

कर्मचाऱ्यांनी ज्यावर्षी सेवा दिल्या, त्यावर्षीच्या नफा-तोटा पत्रकात अल्पकालिन कर्मचारी लाभ यांना खर्चाच्या विना सवलत रकमेला मान्यता देण्यात येते.

**व्याख्यांकित लाभ योजना**

अ) भविष्य निर्वाह निधी या वेगळा विश्वस्त संस्थेत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ गटातील कंपन्याच्या अंशदानाचे व्यवस्थापन होते, त्यामधे कंपनी पूर्व निश्चित दराचे तिचे आणि कर्मचाऱ्यांचे अंशदान भरते. या निधीची गुंतवणूक परवानगी प्राप्त प्रतिभूतीमधे केले जाते. या निधीत केलेले प्रत्येक कालावधीतील अंशदान यास 'व्यय' म्हणून मान्यता दिली जाते आणि त्याची आकारणी नफा-तोटा पत्रकात केली जाते.

ब) उपदान या सारख्या व्याख्यांकित कर्मचारी लाभाचे दायित्त्व विमागणित शास्त्राच्याा मूल्यांकनानुसार ठरविले जाते. हे मूल्यांकन स्वतंत्र विमागणित तज्ञांकडून वर्षाच्या अखेरीला प्रोजेक्टेड युनीट क्रेडिट मेथड वापरून करून घेण्यत येते. पुनर्मापन केलेल्या निव्वळ व्याख्यांकित लाभ दायित्त्वांना इतर सर्वंकष उत्पन्न यामध्ये मान्यता दिली जाते. या दायित्त्वामधे विमागणिती प्राप्ती व हानी, नियोजन मत्तांचा परतावा (व्याज वगळून) आणि मत्ता मर्यादा (जर काही असेल तर व्याजाशिवाय) यांचा समावेश होतो.

क) इतर दीर्घ मुदतीचे कर्मचारी लाभ

इतर दीर्घ मुदतीचे लाभ म्हणजे रजेचे रोखीकरण याचे दायित्त्व या 'प्रोजेक्टेड युनीट क्रेडीट मेथड' ही पद्धत वापरून स्वतंत्र विमागणित तज्ञांकडून विमागणिती मूल्यांकनानुसार ठरविले जातात.

ड) सानुग्रह अनुदान

कर्मचाऱ्यांकरिता सानुग्रह अनुदान जसे आणि जेव्हा जाहीर होईल तेव्हा कंपनी याचा व्यय लेखा वह्यांमधे उपार्जित करते.

**१९. भाडेपट्टी**

**वित्तीय भाडेपट्टी**

ज्या मत्ता वित्तीय भाडेपट्टीने संपादित केल्या असून त्यामधे कंपनीकडे मालकी हक्काच्या सर्व जोखीमा व मोबदले आलेले आहेत. अशा मत्तांच्या भाडेपट्टीच्या आरंभापासून रास्त मूल्यांच्या कमी दराने किंवा विद्यमान भाडेपट्टीच्या किमान मूल्याच्या पैशातील भरणा या दराने भांडवलीकरण केले जाते. आणि तत्समान रकमेचे दायित्त्व निर्माण केले जाते. भाडेपट्टीची भरलेली भाड्याची रक्कम याची वाटणी दायित्त्व व व्याज खर्च यामधे केली जाते. त्यातून प्रत्येक कालावधीच्या थकीत दायित्त्वावर स्थिर मुदतीच्या दराने नित्य व्याज मिळावे असा उद्देश असतो.

**प्रवर्तनातील भाडेपट्टी**

ज्या भाडेपट्टीचा वित्तीय भाडेपट्टी अशा प्रकारे वर्गीकरण केलेले नसते त्याचा 'प्रवर्तनातील भाडेपट्टी' म्हणून विचार केला जातो. सामान्यतः प्रवर्तनीय भाडेपट्टीच्या भाड्यास नफा व तोटा पत्रकात सरळ रेषा पद्धतीने भाडेपट्टीच्या मुदतीसाठी मान्यता दिली जाते. (अपवाद जर भाडेपट्टीच्या रकमेच्या वाढीची रचना महागाईच्या वाढीप्रमाणे असेल) जलविद्युत निर्मिती सुविधांसह महाराष्ट्र शासनासोबत भाडेपट्टीचे करार केलेले नाहीत.

**२०. शासकीय अनुदान**

शासकीय अनुदानाबाबत जेव्हा त्या मिळण्याची योग्य हमी असेल आणि जेव्हा संलग्न शर्तीचे अनुपालन करण्यात येते; तेव्हाच त्याला मान्यता देण्यात येते.

जेव्हा अनुदान एखाद्या खर्चाच्या बाबीशी निगडीत असते; तेव्हा त्या संबंधित खर्चाच्या मुदतीसाठी आणि त्याच्या हेतुच्या भरपाईसाठी खर्च करण्यात येते तेव्हा तिला नफा व तोटा पत्रकात सुयोग्य पद्धतीच्या आधारे मान्यता दिली जाते.

जेव्हा अनुदान मालमत्ता, कारखाना आणि साधने याच्याशी संबंधित असते, तेव्हा ती मालमत्ता, कारखाना व साधन यांचा खर्च ठोक मूल्यात दर्शविला जातो आणि त्याचे अनुदानाला दायित्त्व (स्थगित उत्पन्न) मानण्यात येते, आणि नफा-तोटा पत्रकात सुयोग्य पद्धतीच्या आधारे आणि सदर मत्तेच्या उपयुक्त आयुष्यासाठी जमा केले जाते.

**२१. तरतुदी, आकस्मिक दायित्त्वे व आकस्मिक मत्ता**

जेव्हा एखाद्या भूतकालिन घटनेमुळे सद्यस्थितीत काही बंधने आली असतील तर त्या बंधनाच्या तरतुदींना मान्यता देण्यात येते. अशा बंधनामुळे आर्थिक लाभांची शक्यता असावी आणि ही बंधने पूर्ण करण्यासाठी संसाधनांचे बहिर्गमन होणे संभवनीय असावे. या बंधनातील रकमांचे विश्वासनीय अंदाज केलेले असावेत.

जेव्हा पैशाच्या वेळेच्या मूल्याचा परिणाम महत्त्वाचा असतो; तेव्हा योग्य कपातीच्या दराने तरतुदीमधे कपात केली जाते. आकस्मिक दायित्त्वे म्हणजे संभाव्य बंधने ज्यावर कंपनीचे संपूर्ण नियंत्रण नाही अशा घटना भविष्यात घडल्या तरच अशा आकस्मिक दायित्त्वांचे अस्तिव कायम होईल किंवा ज्यासाठी संसाधनाचे बहिर्गमन आवश्यक असेल अशी शक्यता नाही किंवा ज्या बंधनातील रकमांचे मोजमाप पुरेशा विश्वासर्हतेने करता येत नाही. आकस्मिक दायित्वांना वित्तीय विवरणपत्रात मान्यता नसते. जर आर्थिक संसाधनाचे बहिर्गमन होण्याची शक्यता खूप कमी किंवा दुरची नसेल तरच आकस्मिक दायित्त्वे प्रगट केली जातात.

ज्या बाबी प्रत्येक प्रकरणातील कंपनीने विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त होतात तेव्हा त्या बाबतची आकस्मिक दायित्त्वे आणि भांडवली बांधिलकी प्रगट केले जाते.

विहित मत्तां पेक्षा जास्त असलेल्या आकस्मिक मत्ता यांना वित्तीय विविरणपत्रात मान्यता दिली जात नाही. परंतु जर आर्थिक लाभ मिळण्याची शक्यता असेल तर त्या प्रगट केल्या जातात.

**२२. रास्त मूल्याची मोजणी करणे**

बाजारपेठेत सहभागी होणाऱ्यांमधे मत्ता विक्रीसाठी किंवा दायित्त्व हस्तांतरणासाठी, यापैकी जसे काही असेल त्या कायदेशीर व्यवहारात मूळ मापनाच्या तारखेला मिळणाऱ्या किमतीला किंवा तसे नसल्यास कंपनीला सहजप्राप्त असणाऱ्या सर्वात लाभदायक बाजारपेठेला रास्त मूल्य म्हणतात.

कंपनी,मत्ता / दायित्त्वे यांचे रास्त मूल्य मोजण्यासाठी बाजारपेठेतील निरिक्षण योग्य माहिती मिळवून तिचा उपयोग करते.

मूल्यमापनाच्या तंत्रात वापरल्या जाणाऱ्या निविष्टी यांच्या आधारे रास्त मूल्याच्या क्रमावरीमधील श्रेणी यामध्ये खालीलप्रमाणे स्तर असतात.

स्तर १ - समान मत्ता / दायित्त्वे यांच्या कार्यशील बाजारपेठेतील उद्भूत केल्या जाणाऱ्या किमती (असमायोजित)

स्तर २ - मत्ता / दायित्त्वे यांच्या वरील स्तर -१ मधील उद्भूत किमती व्यतिरिक्त अन्य निविष्टी शोधून त्यांचे प्रत्यक्ष (किमतीचे) किंवा अप्रत्यक्ष (किमती व्यतिरिक्त अन्य) निरीक्षण करणे.

स्तर ३ - मत्ता / दायित्त्वे यांच्या बााजार माहिती निरिक्षणांवर आधारलेल्या नाहीत; अशा निविष्टी विचारात घेणे, (ज्यांचे निरिक्षण करता येत नाही अशा)

वित्तीय विवरणपत्रात मत्ता व दायित्त्वे यांना आवर्ती तत्त्वावर मान्यता दिली जाते. त्यासाठी कंपनी श्रेणीकरणाचे पूननिर्धारण करते आणि त्याद्वारे श्रेणीमधे स्थानांतरण झाले आहे किंवा कसे; (सर्वव्यापी रास्त मूल्य मोजणीसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या सर्वात खालच्या निविष्टीच्या आधारे) याचे प्रत्येक अहवालात कालावधीच्या अखेरीस निश्चिती करते.

**२३. वित्तीय विलेख**

जेव्हा कंपनी एखाद्या कंत्राटातील विलेखाच्या तरतूदीमधे एका बाजूला पक्ष असते तेव्हा वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्त्वे यांना मान्यता दिली जाते. कंपनीच्या वित्तीय मत्तात खालील बाबींचा समावेश असतो:

१) चालू वित्तीय मत्ता यात व्यापारी येणी, रोख व रोख सममूल्य आणि बँकातील शिल्लक, अल्प मुदतीच्या ठेवी.

२) चालू नसलेल्या मत्ता यात प्रामुख्याने उपकंपन्यातील समभाग गुंतवणूक व त्यांना कर्जे आणि ते दीर्घ मुदतीची येणी इत्यादी.

**वित्तीय मत्ता:**

**अ) प्रारंभिक मत्ता व मोजणी:**

सर्व वित्तीय नफा (नफा व तोटाद्वारे रास्त मूल्यांमधे त्याची नंतर मोजणी केली जात नाही) यांना प्रारंभी त्याचे रास्त मूल्य अधिक त्या संपादनासाठी केलेल्या व्यवहाराचे खर्च यानुसार मान्य करण्यात येतात. वित्तीय मत्तांचे व्यवहाराचे खर्च हे 'नफा व तोटा'यातील रास्त मूल्य यानुसार काढून ते नफा-तोटा पत्रकात खर्च म्हणून दाखविले जातात.

**ब) नंतर केलेली मोजणी:**

संबंधित वित्तीय मत्ताच्या वर्गीकरणाच्या संदर्भानुसार नंतरची मोजणी केली जाते.

कंपनी वित्तीय मत्तांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करते:

अ) कर्जफेडीच्या खर्चानुसार नंतर मोजणी करणे

ब) आर्थिक मालमत्ता मोजणी

१) इतर सर्वंकष उत्पन्नामार्फत रास्त मूल्य किंवा

२) नफा किंवा तोटा द्वारे रास्त मूल्य.

वित्तीय मत्तांचे व्यवस्थापनासाठी कंपनीचे बिझनेस मॉडेलच्या आणि वित्तीय मत्तांच्या कंत्राटातील वैशिष्ट्यानुसार केलेल्या रोकडता प्रवाहाच्या आधारे.

**कर्जफेडीच्या तरतुदींचे खर्च**

कर्जाचे विलेख याच्या कर्जफेडीच्या तरतुदीची मोजणी खालील दोन्ही अटींची पूर्तता झाली तरच केली जाते.

अशी मत्ता बिझनेस मॉडेलमधे खालील उद्दिष्टासाठी धारण केली असावी :

- कंत्राटानुसार रोकडता प्रवाह गोळा करण्यासाठी मत्ता धारण करणे आणि
- मत्तांच्या कंत्राटातील अटींमुळे रोकडता प्रवाहात निश्चित तारखा दिल्या जातात. त्या तारखांना थकीत मुद्दल रकमेचे आणि व्याज याचे संपूर्ण देणे भरावे लागते.

प्रारंभिक मान्यतेनंतर अशा वित्तीय मत्ता पुन्हा कर्जफेडीच्या तरतुदीच्या खर्चासाठी मोजल्या जातात. यासाठी परिणामकारक व्याजदर पद्धती वापरली जाते आणि अशा कर्जफेडी तरतुदींना नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

**कर्ज विलेख नफा तोटाद्वारे रास्त मूल्यानुसार:**

नफा व तोटा याद्वारे काढलेले रास्त मूल्य हे कर्ज विलेखाच्या मोजणीसाठी उर्वरित श्रेणीचे आहे. प्रारंभिक मोजणीनंतर रास्त मूल्यामध्ये बदल झाल्यास त्यास नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. या बदलामधे व्याजाचे उत्पन्न कमी करण्याचा तोटा व इतर निव्वळ प्राप्ती व तोटे समाविष्ट असतात.

**समभागातील गुंतवणूकी:**

भारतीय लेखा मानक क्र.१०९ याच्या व्याप्तीत अंतर्भाव होणाऱ्या समभागातील सर्व गुंतवणूकींची मोजणी रास्त मूल्याने केली जाते. समभागाचे जे विलेख व्यापारासाठी धारण केले जातात; त्यांचे वर्गीकरण नफा व तोटा द्वारे रास्त मूल्य नुसार केले जाते. इतर सर्व समभागांच्या विलेखांच्या वर्गीकरणासाठी कंपनीने इतर सर्वंकष उत्पन्नाद्वारे रास्त मूल्य किंवा नफा तोटा पत्रकातील रास्त मूल्य अशाप्रकारे वर्गीकरण करण्याबाबत कंपनी निर्णय घेते. हे वर्गीकरण प्रारंभीक मान्यतेवर केले जाते आणि ते अपरिवर्तनीय असते. यानुसार वर्गीकरण केलेल्या समभागांच्या विलेखाच्या रास्त मूल्यातील सर्व बदलांना, (लाभांश वगळून) यांना इतर सर्वंकष उत्पन्न यात मान्यता दिली जाते. इतर सर्वंकष उत्पन्न या रकमांचा नफा व तोटा पत्रकामधे पूनर्चक्रीकरण केले जात नाही. अशा गुंतवणूकींची विक्री झाली तरी तसे केले जात नाही. नफा व तोटा द्वारे रास्त मुल्य या श्रेणीत समाविष्ट केलेल्या समभाग विलेखांचे मापन रास्त मूल्याच्या बदलानुसार केले जाते. त्यांना नफा - तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. उपकंपन्या, सहयोगी व संयुक्त कंपन्या आदि संस्थांच्या समभाग विलेखातील गुंतवणूकी खर्च वजा कमी करणे यानुसार पुढे नेल्या जातात.

**वित्तीय मत्ता कमी करणे:**

भारतीय लेखा मानक १०९ नुसार ज्या वित्तीय मत्तांची मोजणी कर्जफेडीच्या खर्चानुसार होते आणि ज्या इतर सर्वंकष उत्पन्नाद्वारे रास्त

मुल्यानुसार नोंदविल्या जातात, त्या मत्ता कमी करण्याची मोजणी करणे व त्याला मान्यता देणे यासाठी कंपनी ''अपेक्षित पत तोटा'' हे प्रारुप लागू करते.
व्यापारी येणी यासाठीच्या तोटा भरपाईचे मापन करण्यासाठी ''सोपी पद्धती'' ही पद्धती अनुसरली जाते. प्रत्येक अहवाल तारखेला त्याच्या पूर्ण आयुष्याच्या ''अपेक्षित पत तोटा'' च्या समान रक्कम यानुसार मापन केले जाते.

**वित्तीय मत्तांची मान्यता रद्द करणे:**
कंपनीची एखादी वित्तीय मत्ता (किंवा जेव्हा लागू असेल तेव्हा वित्तीय मत्तांचा एक भाग किंवा तत्सम वित्तीय मत्तांच्या गटांचा भाग) हा प्राथमिकरित्या पुढील कारणांकरिता रद्द करण्यात येतो :-
जेव्हा या मत्तांद्वारे रोकडता प्रवाह मिळण्याचे हक्क संपले असतील किंवा जर कंपनीने अशा मत्तांकडून रोकडता प्रवाह मिळण्याच्या हक्काचे हस्तांतरण केले असेल किंवा मिळालेले रोकडता प्रवाह संपूर्णपणे आणि प्रत्यक्ष विलंबाशिवाय तिसऱ्या पक्षाकडे पाठविण्याचे बंधन एखाद्या 'पास थ्रू' व्यवस्थेद्वारे स्वीकारले असेल आणि किंवा

(अ) कंपनीने या मत्तेच्या सर्व जोखीमा व मोबदले भरीवपणे हस्तांतरित केले असतील किंवा

(ब) जर कंपनीने या मत्तेच्या सर्व जोखीमा आणि मोबादले भरीवपणे त्याच स्वरुपात हस्तांतरित केल्या नसतील तर किंवा स्वतःकडे ठेवल्या नसतील, मात्र या मत्तेचे नियंत्रण हस्तांतरित असेल तर वित्तीय मत्तांची मान्यता रद्द केल्यानंतर, चालू असलेले मूल्य आणि मिळालेला वाटा यांच्यातील फरकाला नफा तोटा पत्रकात मान्यता मिळते.

**वित्तीय दायित्त्वे:**
**वित्तीय दायित्त्वे आणि समभाग विलेख :**
**कर्ज किंवा समभाग असे वर्गीकरण:**
कंपनी जेव्हा एखादया विलेखाचे वितरण करते; तेव्हा व्यवस्थेच्या त्या विषयाच्या कंत्राटाच्या किंवा कराराच्या भरीवपणानुसार आणि वित्तीय दायित्त्व आणि समभाग विलेख यांच्या व्याखेनुसार त्यांचे वर्गीकरण करण्यात येते.

**समभाग विलेख:**
कंत्राटातील समभाग विलेख म्हणजे ज्यात संबंधित अस्तित्त्वात असलेल्या संस्थेची सर्व दायित्त्वे वजा केल्यानंतर उरलेला हिताच्या भागाचा पुरावा दाखविला जाणारा भाग होय.

**वित्तीय दायित्त्वे:**
कंपनीच्या विद्यमान वित्तीय दायित्त्वामधे प्रामुखाने (अ) कर्जे (ब) व्यापारी देणी (क) भांडवली खर्चाची दायित्त्वे (ड) सुरक्षा अनामती आणि (इ) इतर देणी यांचा समावेश होतो.

**प्रारंभिक मान्यता आणि मोजणी:**
सर्व वित्तीय दायित्त्वे (नफा किंवा तोटा यांच्या रास्त मूल्यानुसार मोजणी केलेली नाही अशा) यांना प्रारंभी त्यांच्या संबधित वित्तीय दायित्त्वाला थेट लागू असणाऱ्या व्यवहार खर्चाच्या रास्त मूल्यानुसार मान्यता दिली जाते. कंपनीच्या वित्तीय दायित्त्वात व्यापारी आणि इतर देणी, कर्जे आणि उसनवारी यांचा समावेश आहे.

**नंतरची मोजणी:**
वित्तीय दायित्त्वांची मोजणी त्यांच्या खालीप्रमाणे केलेल्या वर्गीकरणावर अवलंबून असते.

१) **कर्जे:**

कर्जे सुरवातीला रास्त मूल्ये व केलेल्या व्यवहार खर्चाची निव्वळ याप्रमाणे त्यास मान्यता दिली जाते. नंतर उसनवारी कर्जाच्या कर्ज फेडी साठीच्या खर्चानुसार कर्जाची मोजणी केली जाते. उत्पन्न (व्यवहार खर्चाचा निव्वळ रक्कम) व विमोचन रक्कम यात जो काही फरक असेल त्याला परिणामकारक व्याज दराची पद्धत वापरून कर्जाच्या मुदतीसाठी नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. कर्ज सुविधा स्थापित करण्यासाठी दिलेल्या शुल्काला कर्जाचा व्यवहार म्हणून मान्यता दिली जाते. मात्र या सुविधा काही प्रमाणात किंवा संपूर्णपणे काढून घेतल्या जाऊ शकतात, हे गृहित धरुन त्यांच्या मर्यादेत ही मान्यता असते. अशा प्रकरणी सदर सुविधा काढून टाकण्यापर्यंत शूल्क स्थगित ठेवले जाते.

जेव्हा कर्जाच्या करारामधे काही बंधने विनिर्दिष्ट असतात; तेव्हा अशी बंधने चुकती /रद्द करणे किंवा मुदत संपणे यामुळे ती ताळेबंदातून

काढून घेतली जाऊ शकतात. संपलेल्या वित्तीय दायित्त्वाची रक्क्म आणि त्याची चुकती केलेली रक्कम यातील फरक नफा-तोटा पत्रकात इतर प्राप्ती / (तोटे) या प्रमाणे मान्य केला जातो.

जर कंपनीला एखादया दायित्त्वाचा चुकता अहवाल काळापासून किमान बारा महिने स्थगीत ठेवण्याचा विनाअट हक्क नसला, तर त्या दायित्त्वाचे 'चालू दायित्त्वे' असे वर्गीकरण केले जाते. जर कंपनीला एखाद्या दीर्घ मुदतीच्या कर्ज व्यवस्थेतील महत्त्वाच्या तरतुदींचा भंग अहवाल मुदत संपतात किंवा यापूर्वी झाला असला आणि ते दायित्त्व मागणीनुसार अहवालाच्या तारखेला देय होत असेल आणि जर संबंधित कर्जदार अहवाल तारखेनंतर आणि वित्तीय विवरणपत्रकांच्या देण्याची मंजुरी घेण्यापूर्वी संमती दिली असेल तर त्याचे वर्गीकरण 'चालू दायित्त्वे' असे केले जात नाही. मात्र तरतुदीच्या भंगाबद्दल मागणी केलेली नसावी.

**२) व्यापारी व इतर देणी:**

यामधे वित्तीय मुदत संपण्यापूर्वी कंपनीला पुरविलेल्या माल व सेवा यांच्या दायित्त्वाच्या न दिलेल्या रकमा यांचा समावेश होतो. या रकमा अप्रतिभूत असतात व त्या निर्देशित केल्यानंतर बारा महिन्यात दिल्या जातात. व्यापारी व इतर देणी जर अहवालाच्या मुदतीनंतर बारा महिन्यात देय नसल्या असे नसेल तर त्यांना चालू दायित्त्व समजले जाते. त्यांना प्रारंभी त्यांच्या रास्त मूल्यांनुसार मान्यता दिली जाते आणि नंतर परिणामकारक व्याज दर वापरून कर्जफेडीचे खर्च म्हणून त्याची मोजणी केली जाते.

**मान्यता काढून घेणे:**

जेव्हा एखाद्या वित्तीय दायित्त्वाचे बंधन चुकते केले जाते किंवा रद्द केले जाते किंवा त्याची मुदत संपते तेव्हा त्या वित्तीय दायित्त्वाची मान्यता काढून घेण्यात येते. जेव्हा एका विद्यमान दायित्त्वाची जागा, त्याच कर्जदाराने वेगळ्या अटीनुसार दिलेले दुसरे दायित्त्वे घेते किंवा जर विद्यमान दायित्त्वाच्या अटींमधे महत्त्वाचे रुपभेद सुधारणा केले जातात. अशावेळी मूळ दायित्त्वाची मान्यता काढून घेतली आहे आणि नवीन दायित्त्व मान्य केले आहे असे मानण्यात येते. यामुळे पुस्तकी रकमेतील फरकाला स्वायत्त नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

**वित्तीय विलेखांची भरपाई:**

वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्त्व हे भरपाई योग्य असतात. जर कायदेशीर हक्काच्या अंमलबजावणीमुळे एखादी भरपाई चालू काळात द्यावी लागणार असेल आणि जर अशा प्रकरणी समझोता होऊन ती निव्वळ तत्त्वावर द्यावी लागणार असेल तसेच त्याच कालावधीत एखादी मत्ता वसूली होऊन दायित्त्वासाठी समझोता होणार असेल तर त्या बाबी ताळेबंद पत्रकात नमूद केल्या जातात.

**२४. रोख आणि रोख समतूल्य बाबी**

रोख आणि रोख समतूल्य बाबीमधे हातातील रोख रक्कम, बँकेतील शिल्लक, इतर अल्पमुदतीचे व चांगल्या प्रकारची रोकड सुलभता असलेल्या आणि तीन किंवा कमी महिन्यात मुदतपूर्ण होणाऱ्या मूळ गुंतवणूकी, तात्काळ रोखीत रूपांतर होऊ शकतील अशा आणि तसे करताना मूल्यात फारसा फरक पडणार नाही अशा बाबी समाविष्ट असतात.

**२५. रोकडता प्रवाह विवरण पत्रक**

भारतीय लेखा मानक क्र.७ हे रोकडता प्रवाह विवरण पत्रकासंबंधी असून त्यानुसार ते तयार केले जाते. त्याच्या हेतुसाठी वरती व्याख्यांकित केलेल्या रोख व रोख समतूल्य बाबी विचारात घेण्यात येतात. तसेच बँकेच्या थकीत ओव्हरड्राफ्टची निव्वळ रक्कमही हिशेबात घेतली जाते कारण ती बँकेच्या अंतर्गत रोकड व्यवस्थापनाचा भाग असते.

**२६. प्रतिभाग मिळकत**

करोत्तर नफा / तोटा या रकमेला वर्षभरातील वेटेड ॲव्हरेज इक्विटी शेअर या संख्येने भागून प्रतिभाग हिशेब केला जातो. सौम्यकृत प्रतिभाग मिळकत शोधून काढण्यासाठी करोत्तर नफा /तोटाच्या रकमेचे लाभांश, व्याज आणि सौम्यकृत संभाव्य समभागासंबंधीत इतर आकाराचे व्यय किंवा उत्पन्नाचे समायोजन केले जाते. सर्व संभाव्य समभागाचे रूपांतर केल्यानंतर जे सौम्यकृत भाग वितरित केले गेले असते अशा वेटेड ॲव्हरेज इक्विटी शेअर्सची संख्या विचारात घेतली जाते.

प्रतिभाग मिळकतीच्या हिशेबासाठी वाटप प्रलंबित असलेली शेअर अर्ज निधी हा वाटप योग्य आहे असे विचारात घेतले आहे.हा निधी महाराष्ट्र शासनाने दिलेल्या बांधिलकीनुसार सूत्रधारी कंपनीमार्फत आणि निश्चितपणे वाटपासाठी मिळणार आहे.

**२७. कर**

आयकराच्या खर्चात चालू कर खर्च आणि वर्षभरातील स्थगित कर मत्ता किंवा दायित्त्व यातील निव्वळ बदल यांचा समावेश होतो. चालू आणि स्थगित कर यांना नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. मात्र जेव्हा त्यांचा संबंध इतर सर्वकष उत्पन्नातील बाबींशी असतो किंवा थेट समभागाशी असतो, अशा प्रकरणी अपवाद करून चालू आणि स्थगित कर या दोन्ही बाबींना अनुक्रमे इतर सर्वकष उत्पन्न आणि प्रत्यक्ष समभागात मान्यता दिली जाते.

**(अ) चालू कर:**

आयकर कायदा १९६१ यातील तरतुदींनुसार वर्षातील परवानगी योग्य कर सवलती, कपाती / अमान्य करणे इत्यादी विचारात घेऊन करपात्र उत्पन्नावर चालू कर निश्चित केला जातो. अहवालाच्या वेळी कराचे दर आणि कराचे कायदे यांचा तसेच जे कायदे तयार झाले आहेत किंवा प्रामाणिकपणे होणार आहेत यांचा विचार करून अहवालाच्या वर्षाचे कराचे हिशेब केले जातात. ज्यावेळी आयकर कायदा १९६१ चे कलम ११५ जे बी किमान पर्यायी कर नुसार चालू कर आकारला जातो तेव्हा अशा कर भरण्याचा लाभ नंतरच्या पंधरा (१५) कर-निर्धारण वर्षात उपलब्ध असतो. त्यामुळे तो जेव्हा प्रत्यक्ष वसूल केला जाईल तेव्हा त्याला मान्यता देण्यात येईल.

**(ब) स्थगित कर:**

ताळेबंदाच्या दृष्टीकोनातून स्थगित कराला मान्यता दिली जाते. मत्ता व दायित्त्वे यांचा कर आधारित आणि त्यांच्या पुस्तकी मूल्यातील कपात आणि यात उद्भवणारे तात्पुरते करपात्र फरक यानुसार स्थगित कर मत्ता आणि दायित्त्वे यांना मान्यता दिली जाते.

स्थगित कर दायित्त्वे यातील सर्व तात्पुरते करपात्र फरक मान्य केले जातात.

सर्व कपात योग्य हंगामी फरकाच्या रकमा, वापर न केलेल्या कराच्या जमा रकमा आणि जर काही वापर न केलेले कराचे तोटे असले तर त्यासाठी स्थगित कर मत्तांना मान्यता दिली जाते. कपात योग्य हंगामी फरक, वापर न केलेले कर जमांच्या रकमा आणि न वापरलेल्या कर तोट्यांच्या रकमा यासाठी करपात्र नफ्यातून वसूली करण्यास परवानगी मिळेल याची शक्यता असल्यास त्या मर्यादेत मान्यता दिली जाते.

प्रत्येक अहवाल तारखेला स्थगित कर मत्तांच्या पुढे न्यावयाच्या रकमांचा आढावा घेण्यात येतो आणि स्थगित कर मत्ता संपूर्णपणे किंवा तिचा काही भाग वापरण्यास करपात्र नफा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याची शक्यता असल्यास त्या मर्यादेत स्थगित कर मत्तांच्या पुढे न्यावयाच्या रकमांमधे कपात केली जाते. प्रत्येक अहवाल तारखेला अमान्य केलेल्या स्थगित कर मत्तांचा आढावा घेण्यात येतो आणि जर स्थगित कर मत्तांची भविष्यातील करपात्र नफ्यातून वसूली करण्यास परवानगी मिळेल याची शक्यता असल्यास त्या मर्यादेत मान्यता दिली जाते.

वर्षभरात जेव्हा मत्ता, वसूली किंवा दायित्त्वे चुकती केली जातात त्यावेळी लागू होणाऱ्या अपेक्षित कर दराने स्थगित कर मत्ता आणि दायित्त्वे यांची मोजणी केली जाते. त्यासाठी तोपर्यंत कायद्यानुसार मंजूर झालेले कराचे दर (आणि करांचे कायदे) किंवा अहवाल तारखेपर्यंत केले जाणारे कायदे यांचा आधार घेतला जातो.

जर चालू कर मत्ता व चालू कर दायित्त्वे या समवेत चुकता करण्याचा कायदेशिर अमंलबजावणी योग्य हक्क असला आणि स्थगित कर संबधित कराची अस्तित्त्वातील बाबींशी सलग्न असेल आणि त्या समान कर प्राधिकरणाकडे असतील तर स्थगित कर दायित्त्व आणि स्थगित कर मत्ता यांची भरपाई करता येते.

**२८. भारतीय लेखा मानक ११५ यातील नव्याने लागू झालेल्या लेखा विषयक अधिघोषणा**

महानिर्मिती ही जिचे दराचे नियमक संस्थेकडून नियमन केले जाते अशी कंपनी असल्याने वरील लेखा मानकाचा महानिर्मितीच्या वित्तीय विवरण पत्रकावर कोणताही मोठा परिणाम होत नाही.

**२९. व्यापारी येणी**

व्यापारी येणी त्यांच्या बिजकातील मूळ रक्कम वजा अपेक्षित पत तोट्याची तरतूद याप्रमाणे पुढे नेण्यात येतात. इतर वित्तीय मत्ता कमी करण्यातील तोट्याला मान्यता देण्यासाठी कंपनी त्यांच्या प्रारंभिक मान्यतेनंतर पत जोखीमेने मोठी वाढ झाली आहे किंवा कसे यांचे मूल्यमापन करते. जर पत जोखीम मोठ्याप्रमाणात वाढली नसली तर कमी करण्यातील तोट्याच्या तरतुदीसाठी बारा (१२) महिन्याचा अपेक्षीत पत तोट्याची तरतूद वापरण्यात येतो.

**३०. किमान पर्यायी कर**

कंपनी चालू कर किमान पर्यायी कर या स्वरुपात जमा करीत असते. तिला अजून चालू कराच्या अमलात प्रवेश करावयाचा आहे. ज्यावर्षी कंपनी तिचे सर्व संचित कर तोटे/अशोषित घसारे संपुष्टात आणेल, आणि जर चालू कर भरण्याचे शिल्लक असेल, तर कंपनी त्यावर्षीच्या 'किमान पर्यायी कर' क्रेडीटला मान्यता देईल. अशा परिस्थितीत चालू कर दायित्त्वाचे उपलब्ध किमान पर्यायी कर क्रेडीटच्या मर्यादेत समायोजन करता येईल. जर काही किमान पर्यायी कर क्रेडीट उरले असेल तर त्याचे समायोजन पुढील वर्षी करता येईल.

## टिपा क्र. १: मालमत्ता, कारखाने आणि साधने

रक्कम ₹ कोटीत

| किंमत | मत्ता | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जमीन (विकासासह) | | इमारती | | हायड्रॉलिक कामे | इतर स्थापत्य कामे | | कारखाना यंत्रे व साधने | लाईन व केबल नेटवर्क | वाहने | फर्निचर व जोडणी | कार्यालयीन साधने | कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्तांसाठी भांडवली खर्च | एकूण मूर्त मत्ता | वजा: घसारा भांडवली करण | नफा तोटा पत्रकात आकारलेला घसारा |
| | मालकीची | भाड्याची | कारखान्याच्या इमारती | इतर | | रेल्वे लाईन साईडींग | रस्ते व इतर | | | | | | | | | |
| **दि.३१/३/१६ च्या वार्षिक लेख्यांप्रमाणे** | **१,५६९.०७** | **१०६.११** | **६९४.९६** | **८३८.४९** | **१,६५२.५६** | **१,२०४.०५** | **४४१.१६** | **२२,१८०.२३** | **२४३.७१** | **५.०१** | **२२.१८** | **१५.६२** | **५८.८३** | **२९०३१.९७** | | |
| भर | २६.१८ | - | २३८.७६ | १५४.६८ | ८५९.४६ | १६८.९० | १८.४५ | १५,७७६.०१ | २४८.६३ | ३.५८ | ३.१५ | ५.३२ | - | १७५०३.१४ | | |
| कपात | - | - | ३१.३० | २.०० | २१.३९ | १८.४८ | ४३.७५ | ५७४.४३ | ७.१४ | ०.५१ | २.०० | ०.७४ | ०.४४ | ७०२.१९ | | |
| **दि.३१/३/१७ ची शिल्लक** | **१,५९५.२५** | **१०६.११** | **९०२.४३** | **९९१.१७** | **२४९०.६४** | **१३५४.४६** | **४१५.८६** | **३७३८१.८१** | **४८५.२०** | **८.०७** | **२३.३३** | **२०.२०** | **५८.३८** | **४५८३२.९२** | | |
| भर | २.६८ | - | ६.६५ | १९.९० | २१.३९ | १७९.१६ | ९.८५ | २५९.७२ | ९.३१ | ११.७७ | ३.१४ | ५.३२ | - | ५२८.८९ | | |
| कपात | ०.१३ | - | २५.६० | ०.९९ | २४.१७ | ७४.६८ | ०.०१ | २३५.३६ | ४.१२ | १.७४ | ०.८१ | २.११ | ०.९० | ३७०.६१ | | |
| **३१/३/१८ ची शिल्लक** | **१,५९७.७९** | **१०६.११** | **८८३.४८** | **१,०१०.०८** | **२,४८७.८६** | **१,४५८.९४** | **४२५.७१** | **३७,४०६.१७** | **४९०.३९** | **१८.११** | **२५.६६** | **२३.४१** | **५७.४९** | **४५९९१.२०** | | |
| **संचित घसारा व कमी करणे** | | | | | | | | | | | | | | | | |
| **दि.३१/३/१६ च्या वार्षिक लेख्यांप्रमाणे** | **-** | **४.३८** | **२२.२०** | **३४.२८** | **७१.५१** | **९३.३६** | **१६.४२** | **१,०६८.८१** | **१८.०८** | **०.३२** | **२.००** | **२.६८** | **४.५४** | **१३३८.५८** | | |
| भर | - | ४.३८ | ३२.६७ | ८३.८१ | १५४.०४ | ७८.२० | १९.७४ | १,६९१.३० | २४.८६ | ०.६७ | १.८४ | २.३९ | ४.५४ | २०९८.४४ | १.५४ | २०९६.९० |
| कपात | - | - | २७.३१ | १.०३ | १३.५९ | ४०.२१ | १६.८८ | ४०७.१४ | ३.९२ | ०.४२ | १.५५ | ०.२१ | ०.३८ | ५१२.६५ | | |
| **३१/३/१७ च्या वार्षिक लेख्यांप्रमाणे शिल्लक** | **-** | **८.७५** | **२७.५६** | **११७.०६** | **२११.९५** | **१३१.३५** | **१९.२८** | **२,३५२.९७** | **३९.०२** | **०.५६** | **२.२९** | **४.८६** | **८.७०** | **२,९२४.३७** | | |
| भर | - | ४.३८ | ३६.७० | ४४.१५ | १४८.७३ | ५७.८६ | २०.४५ | २,२९५.११ | २९.७४ | १.२९ | २.२४ | ३.३६ | ४.५४ | २६४८.५२ | १.७७ | २६४६.७६ |
| कपात / समायोजन | - | - | २३.०४ | ०.९५ | १९.७० | ६५.३२ | ०.०१ | ३१३.४२ | ३.७१ | १.५६ | ०.७१ | १.८५ | ०.४६ | ४३०.७३ | | |
| **३१/३/१८ रोजी शिल्लक** | **-** | **१३.१३** | **४१.२३** | **१६०.२५** | **३४०.९८** | **१२३.८८** | **३९.७२** | **४३३४.६६** | **६५.०५** | **०.३०** | **३.८२** | **६.३७** | **१२.७८** | **५१४२.१७** | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| ३१/३/१६ रोजी निकामी मालासाठी तरतूद | - | - | ०.४० | ०.०० | ०.३० | ०.०० | ०.२८ | २२.६६ | ६.७९ | ०.११ | ०.०० | ०.०१ | ०.०५ | ३०.६० | | |
| **३१/३/२०१६ रोजी** | १,५६९.०७ | १०१.७३ | ६७२.३६ | ८०४.२१ | १५८०.७५ | १११०.६८ | ४२४.४६ | २१०८८.७६ | २१८.८४ | ४.५८ | २०.१८ | १२.९२ | ५४.२४ | २७६६२.७९ | - | |
| ३१/३/१७ रोजी निकामी मालासाठी तरतूद | - | - | ०.४० | ०.०० | ०.३० | ०.०० | ०.२८ | २२.६५ | ६.७९ | ०.११ | ०.०० | ०.०१ | ०.०५ | ३०.५९ | | |
| **३१/३/२०१७ रोजी** | **१,५९५.२५** | **९७.३५** | **८७४.४७** | **८७४.११** | **२२७८.३८** | **१२२३.११** | **३९६.३०** | **३५००६.१८** | **४३९.४०** | **७.४०** | **२१.०४** | **१५.३३** | **४९.६४** | **४२८७७.९६** | | |
| ३१/३/१७ रोजी निकामी मालासाठी तरतूद | - | - | ०.४० | ०.०० | ०.३० | ०.०० | ०.२८ | २३.०० | ६.७९ | ०.११ | ०.०० | ०.०१ | ०.०५ | ३०.९४ | | |
| **३१/३/२०१८ रोजी** | १,५९७.७९ | ९२.९८ | ८४१.८६ | ८४९.८३ | २१४६.५८ | १३३५.०६ | ३८५.७१ | ३३०४८.५१ | ४१८.५५ | १७.७० | २१.८३ | १७.०३ | ४४.६६ | ४०८१८.०९ | - | |

### टिपा क्र.-१अ अमूर्त मत्ता

रक्कम ₹ कोटीत

| खर्च | सॉफ्टवेअर परवाना |
|---|---|
| **दि.३१/०३/२०१६ च्या वार्षिक लेख्यांप्रमाणे** | **१८.८४** |
| भर | ६.५२ |
| कपात | - |
| **३१/०३/२०१७ रोजीची शिल्लक** | **२५.३६** |
| भर | २.५१ |
| कपात | - |
| **दि.३१/०३.२०१८ रोजीची शिल्लक** | **२७.८७** |
| संचित घसारा | - |
| **दि.३१/०३/२०१६ च्या वार्षिक लेख्यांप्रमाणे** | **२.६६** |
| भर | १०.४७ |
| कपात | - |
| **दि.३१/०३/२०१७ च्या वार्षिक लेख्यांनुसार शिल्लक** | **१३.१३** |
| भर | ९.०९ |
| कपात/ समायोजने | - |
| **३१/०३/२०१८ रोजीची शिल्लक** | **२२.२२** |
| **निव्वळ पुढे नेण्याची रक्कम** | |
| **३१ मार्च २०१६ रोजी** | **१६.१८** |
| **३१ मार्च २०१७ रोजी** | **१२.२३** |
| **३१ मार्च २०१८ रोजी** | **५.६५** |

### टिपा क्र.-१ ब विक्रीसाठी योग्य असे वर्गीकरण केलेल्या मत्ता

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | ३१.०३.१८ | ३१.०३.१७ पुनलिर्खित |
|---|---|---|
| विक्रीसाठी योग्य अशा चालू नसलेल्या मत्ता | | |
| कारखाने व यंत्रसामग्री | १५३.२४ | २५०.०५ |
| कारखाना इमारती व इतर | ९.३४ | ७.१७ |
| हायड्रॉलिक कामे | ८.१८ | ६.९४ |
| रेल्वे साईडींग रोड व इतर | २६.२५ | १६.८९ |
| लाईन व केबलचे नेटवर्क | ८.८४ | ८.४३ |
| वाहने | ०.३२ | ०.२२ |
| फर्नीचर व जोडण्या | ०.३६ | ०.२७ |
| कार्यालयीन साधने | ०.७१ | ०.४६ |
| इतर संकीर्ण मत्ता | ०.०७ | ०.०७ |
| **एकूण** | **२०७.३१** | **२९०.५०** |

**सूचना:** कोराडी औ.वि.केंद्रातील युनीट क्र.५ आणि परळी औ.वि.केंद्रातील युनीट क्र.३ यांचे कार्य वित्तिय वर्ष २०१६-१७ मधे खंडित करण्यात आले. या मत्ता काढून टाकण्याची प्रक्रिया कंपनीने सुरु केली आहे. दि.३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वर्षात कंपनीने वरील मत्तांचे पुनर्वर्गीकरण 'विक्रीसाठी योग्य मत्ता' असे केले. कंपनीची अपेक्षा आहे की, मत्तांचे रास्त मूल्य वजा तिच्या विक्रीचा खर्च ही रक्कम मत्तांच्या दि.३१ मार्च २०१८ रोजीच्या प्रचलीत मूल्यांपेक्षा जास्त असेल (अंदाज या मत्ता समान इतर मालमत्ताच्या अलीकडील बाजार मूल्यांवर आधारीत आहे.)

## टिपा क्र. २ प्रगतीपथावरील भांडवली कामे

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | एकूण मूर्त सीडब्ल्यू आयपी | सीडब्ल्यू आयपी मालकीच्या जमिनीवर | सीडब्ल्यू आयपी कारखाने इमारती | सीडब्ल्यू आयपी इतर इमारती | सीडब्ल्यू आयपी रस्ते व इतर | सीडब्ल्यू आयपी कारखाने व यंत्रसामुग्री | सीडब्ल्यू आयपी वाहने | सीडब्ल्यू आयपी फर्नीचर व जोडणी | सीडब्ल्यू आयपी कार्यालयीन साहित्य | सीडब्ल्यू आयपी अमूर्त मत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३१/०३/२०१६ रोजी | १७,३२८.२३ | १४.८१ | २,६५५.५५ | ०.८५ | ३.१६ | १४,६४२.५० | ०.०० | - | ११.३५ | १२०.७८ |
| भर | ८,०६०.३२ | २.७० | २,०६८.३४ | २.०४ | २.०४ | ५,९४२.९१ | ०.७७ | ०.३४ | ४१.१७ | १०.३४ |
| कपात | २४,१८७.३९ | ३.१२ | ४,१६९.२५ | २.८९ | ०.१० | १९,९७३.०४ | ०.७७ | ०.३४ | ३७.८८ | १.३५ |
| ३१/०३/२०१७ रोजी | १,२०१.१५ | १४.३९ | ५५४.६४ | - | ५.१० | ६१२.३७ | ०.०० | ०.०१ | १४.६४ | १२९.७७ |
| भर | ३४४.६५ | ०.०९ | ८०.१६ | ०.२१ | २८.२७ | २३५.८७ | ०.०६ | ०.०० | ०.०० | २.७८ |
| कपात | २२९.३८ | | १०२.६९ | | ५.०७ | १०८.५१ | | ०.०१ | १३.०९ | |
| **३१/०३/२०१८ रोजी** | **१,३१६.४३** | **१४.४९** | **५३२.११** | **०.२१** | **२८.३०** | **७३९.७२** | **०.०६** | **०.००** | **१.५५** | **१३२.५५** |
| **निव्वळ: प्रगतीपथावरील भांडवली कामे** | | | | | | | | | | |
| वजा - निकामी मालासाठी तरतूद | २४.०१ | | | | | २४.०१ | | | | |
| ३१/०३/२०१७ रोजी | १,१७७.१४ | १४.३९ | ५५४.६४ | - | ५.१० | ५८८.३६ | ०.०० | ०.०१ | १४.६४ | १२९.७७ |
| वजा - निकामी मालासाठी तरतूद | २४.२४ | | | | | २४.२४ | | | | |
| ३१/०३/२०१८ रोजी | १,२९२.१९ | १४.४९ | ५३२.११ | ०.२१ | २८.३० | ७१५.४८ | ०.०६ | ०.०० | १.५५ | १३२.५५ |

(सुचना: अमूर्त मत्तासंबधीच्या प्रगतीपथावरील भांडवली कामात गारेपालमा खाण विकासासाठी मिळविलेल्या परवान्यांचा समावेश आहे.)

## टिपा क्र.३ उप कंपन्या, संयुक्त साहसी कंपन्या आणि सहयोगी कंपन्यातील गुंतवणूकी

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | ३१.०३.१८ | ३१.०३.१७ पुनलिर्खित |
|---|---|---|
| **समभाग विलेखातील गुंतवणूकी - किंमत वजा त्यातील घट यानुसार** | | |
| उद्घृत न केलेल्या | | |
| महाजनको ॲश मॅनेजमेंट सर्विसेस (पुर्वीची धुळे पॉवर)<br>५०,००० (मागील वर्षी ५०,०००) समभाग प्रत्येकी ₹ १०/- चे पूर्ण भरणा केलेले | ०.०५ | ०.०५ |
| धोपावे कोस्टल पॉवर कंपनी लिमिटेड<br>५०,००० (मा.वर्षी ५०,०००) समभाग प्रत्येकी ₹ १०/- चे पूर्ण भरणा केलेले | ०.०५ | ०.०५ |
| युसीएम कोल कंपनी लिमिटेड ३०,००० समभाग प्रत्येकी ₹ १०/- चे पूर्ण भरणा कलेले | ०.०३ | ०.०३ |
| महागूज कोलायरीज लिमिटेड -३०,००० समभाग प्रत्येकी ₹ १०/- चे पूर्ण भरणा केलेले | ०.०३ | ०.०३ |
| उपकंपन्यातील समभागात समकक्ष गुंतवणूक (अग्रीमाच्या स्वरुपात) | ४७.१५ | ४५.१९ |
| **एकूण** | **४७.३१** | **४५.३५** |
| वजा - अपेक्षित पत तोटा आणि गुंतवणूकीच्या मूल्यातील घट यासाठी तरतूद | **(४६.२३)** | **(४५.१०)** |
| **एकूण** | **१.०८** | **०.२५** |

## टिपा क्र.-४ चालू नसलेली: व्यापारी येणी

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | ३१.०३.१८ | ३१.०३.१७ पुनलिर्खित |
|---|---|---|
| अप्रतिभूत - चांगली मानलेली | ५२४७.५५ | ३७४०.६६ |
| वजा : अपेक्षित तोट्यासाठी तरतूद | (९८२.२८) | (६९६.३२) |
| **एकूण** | **४२६५.२७** | **३०४४.३४** |

## टिपा क्र.-५ इतर चालू नसलेल्या मत्ता

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | ३१.०३.१८ | ३१.०३.१७ पुनलिर्खित |
|---|---|---|
| संचालन व सुव्यवस्था यासाठी पुरवठा / इंधन / वसुली योग्य यांची अग्रीमे | २५२.०० | २४३.८५ |
| वजा - अपेक्षित तोट्यासाठी तरतूद | (२५२.००) | (२४३.८५) |
| | - | - |
| सांविधिक प्राधिकरणाकडून वसुलीयोग्य शिलकी | ०.०० | ०.१६ |
| वजा - अपेक्षित तोट्यासाठी तरतूद | ०.०० | (०.१६) |
| | - | - |
| सिंचन विभाग महाराष्ट्र शासन यांना अग्रिम | १४२.०० | १३८.२१ |
| वजा अपेक्षित तोट्यासाठी तरतूद | (३९.१०) | (२८.०८) |
| | १०२.९० | ११०.१३ |
| आयकर परतावा योग्य (तरतुदींची निव्वळ) | २२७.८६ | २११.६४ |
| कर्मचारी वृंदाला अग्रिमे | १.८३ | २.७४ |
| भांडवली अग्रिमे | ५६.३३ | ६०.२२ |
| स्थगित भाडे (जल विद्युत प्रकल्प) | ७००.०६ | ६३७.६५ |
| **एकूण** | **१०८८.९८** | **१०२२.३८** |

## टिपा क्र.-६ चालू मत्ता : वस्तुमाल सूची

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | ३१.०३.१८ | ३१.०३.१७ पुनलिर्खित |
|---|---|---|
| कच्चा माल (कोळसा) | १९३.०२ | ६३८.०१ |
| इंधन तेल - एल डी ओ इत्यादी | १८२.२४ | १७१.५१ |
| प्रवासातील मालसाठा (कोळसा) | ४२.८८ | ४९.०० |
| भांडारमाल व सुटे भाग | ८६७.८७ | ९१४.०५ |
| वजा - निकामी माल व सुटे भागांसाठी तरतूद | (३०२.७२) | (३२२.८७) |
| वजा - चौकशी प्रलंबित असलेल्या साहित्यातील तुटीसाठी तरतूद | (४९.८७) | (३६.०१) |
| **एकूण** | **९३३.४२** | **१४१३.६९** |

## टिपा क्र.-७ चालू मत्ता : व्यापारी येणी

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | ३१.०३.१८ | ३१.०३.१७ पुनलिर्खित |
|---|---|---|
| अप्रतिभूत : चांगली मानलेली | ८७१५.६२ | ७६२७.६० |
| संशयास्पद | २६.६० | ९७.४९ |
| वजा - अपेक्षित तोट्यासाठी तरतूद | (२६.६०) | (९७.४९) |
| **एकूण** | **८७१५.६२** | **७६२७.६०** |

## टिपा क्र.-८ चालू मत्ताः रोख व रोख समतूल्य

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | ३१.०३.१८ | ३१.०३.१७ पुनलिर्खित |
|---|---|---|
| **शेड्यूल बँकातील शिल्लकी** | | |
| चालू खाती | ०.०० | ३३.९९ |
| हातातील शिल्लक | ०.०३ | ०.०७ |
| **एकूण** | **०.०३** | **३४.०६** |

**टिपा क्र.-९ चालू मत्ता: चालू कर्जे**

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | ३१.०३.१८ | ३१.०३.१७ पुनलिर्खित |
|---|---|---|
| **अप्रतिभूत चांगली मानलेली** | | |
| कर्मचारी कर्जे व अग्रिमे | ११.२७ | १२.४९ |
| सी पी एफ ट्रस्ट कडील वसूली योग्य | १.८२ | ४०.७३ |
| अप्रतिभूत चांगली मानलेली | | |
| इतर अग्रिमे | ०.०० | १.१७ |
| **एकूण** | **१३.०९** | **५४.३९** |

**टिपा क्र.-१० इतर चालू वित्तीय मत्ता**

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | ३१.०३.१८ | ३१.०३.१७ पुनलिर्खित |
|---|---|---|
| **अप्रतिभूत, चांगली मानलेली** | | |
| कर्मचाऱ्यांकडून वसुली योग्य | १७.३१ | २.१२ |
| विनादेयक येणी | २२०९.२२ | १७१०.७९ |
| मूल्य वर्धीत कर यासह कराचे दावे | ३२८.८५ | ५८४.३४ |
| भाडे - येणी | ०.१४ | ०.६३ |
| दावे - येणी | १३६.४९ | १८.४८ |
| कंत्राटदारांकडून वसूली योग्य रक्कम | ४४.१३ | ८७.४४ |
| **एकूण** | **२७३६.१४** | **२४०३.८०** |

**टिपा क्र.-११ चालू मत्ता: इतर मत्ता**

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | ३१.०३.१८ | ३१.०३.१७ पुनलिर्खित |
|---|---|---|
| आगाऊ खर्च | ४७.७२ | ३८.६९ |
| संचालन व सुव्यवस्था पुरवठा / कामे याची अग्रिमे | ८३८.२७ | १४८१.१० |
| कोळसा / इंधने पुरवठ्याची अग्रिमे | ९०५.७५ | ५३९.५३ |
| वजा : अपेक्षित तोट्यासाठी तरतूद | (९०.०३) | (९०.०३) |
| **एकूण** | **१७०१.७१** | **१९६९.२९** |

**टिपा क्र.-१२ भाग व भांडवल**

**१) अधिकृत भांडवल**

| शेअरचा वर्ग | सममूल्य | ३१.०३.२०१८ रोजी | | ३१.०३.२०१७ रोजी | |
|---|---|---|---|---|---|
| | | शेअर्सची संख्या | रक्कम ₹ कोटीत | शेअर्सची संख्या | रक्कम ₹ कोटीत |
| समभाग | १० | ४०,०००,०००,००० | ४०,०००.०० | ४०,०००,०००,००० | ४०,०००.०० |

**२) दिलेले, अभिदत्त आणि भरलेले भांडवल (पूर्ण भरणा केलेले)**

| शेअरचा वर्ग | सममूल्य | ३१.०३.२०१८ रोजी | | ३१.०३.२०१७ रोजी | |
|---|---|---|---|---|---|
| | | शेअर्सची संख्या | रक्कम ₹ कोटीत | शेअर्सची संख्या | रक्कम ₹ कोटीत |
| समभाग | १० | २५,२४७,१२६,१२६ | २५,२४७.१३ | २४,८५४,३३६,७८८ | २४,८५४.३४ |

### ३) शिलकी शेअरचा मेळ

| शेअरचा वर्ग | ३१.०३.२०१८ रोजी | | ३१.०३.२०१७ रोजी | |
|---|---|---|---|---|
| | समभाग | | समभाग | |
| | शेअर्सची संख्या | रक्कम ₹ कोटीत | शेअर्सची संख्या | रक्कम ₹ कोटीत |
| वर्षारंभीची थकीत | २४,८५४,३३६,७८८ | २४,८५४.३४ | २४,०९८,३५६,७८८ | २४,०९८.३६ |
| कालावधीतील भर | ३९२,७८९,३३८ | ३९२.७९ | ७५५,९८०,००० | ७५५.९८ |
| वर्षा अखेरीस थकीत | २५,२४७,१२६,१२६ | २५,२४७.१३ | २४,८५४,३३६,७८८ | २४,८५४.३४ |

### ४) हक्क, पसंती, निर्बंध, लाभांश वितरण आणि भांडवलाची परतफेड समाविष्ट

१. कंपनीचे फक्त एकाच वर्गातील भाग आहेत. तो म्हणजे समभाग त्याचे नाममात्र किंमत ₹ १०/- प्रति शेअर अशी आहे.

२. ही कंपनी मराविमं सुत्रधारी कंपनी लि. ची उपकंपनी आहे. या कंपनीच्या प्रत्येक समभाग धारकाला, त्याने धारण केलेल्या प्रत्येक शेअरसाठी एक मत देण्याचा अधिकार आहे. संचालक मंडळाने प्रस्तावित केलेला लाभांश (अंतरीम लाभांश वगळता) हा वार्षिक सर्वसाधारण सभेत भागधारकांच्या मंजुरीच्या अधीन आहे.

३. असा लाभांश जेव्हा मंजुर होईल तेव्हा प्रत्येक भाग धारकास त्याने धारण केलेल्या समभागाच्या प्रमाणात लाभांश मिळण्याचा हक्क आहे.

४. जर कंपनीचे परिमापन झाले तर, कंपनीच्या सर्व पतदारांना मत्तांचे वितरण / परतफेड झाल्यानंतर, समभाग धारकांना उर्वरित मत्ता मिळविण्याचा हक्क राहील. प्रत्येक समभाग धारकांनी धारण केलेल्या समभाग संख्येच्या प्रमाणात त्याची विभागणी करण्यात येईल.

### ५) सूत्रधारी कंपनीने धारण केलेले प्रत्येक वर्गातील समभाग

| भाग धारकाचे नाव | ३१.०३.२०१८ रोजी समभाग | ३१.०३.२०१८ रोजी समभाग |
|---|---|---|
| मराविमं सूत्रधारी कंपनी लिमिटेड (संख्या) | २५,२४७,१२६,१२६ | २४,८५४,३३६,७८८ |
| मराविमं सूत्रधारी कंपनी लिमिटेड (रक्कम ₹ कोटीत) | २५,२४७.०८ | २४,८५४.३४ |

### ६) ५ टक्के पेक्षा जास्त शेअर धारण करणारा प्रत्येक भागधारक आणि सूत्रधारी कंपनीचे याचा तपशील

| भाग धारकाचे नाव | ३१.०३.२०१८ रोजी | | ३१.०३.२०१७ रोजी | |
|---|---|---|---|---|
| | समभाग | % शेअर | समभाग | % शेअर |
| मराविमं सूत्रधारी कंपनी लिमिटेड | २५,२४७,१२६,१२६ | १००.०० | २४,८५४,३३६,७८८ | १००.०० |

### टिपा क्र.-१३ इतर समभाग (अ) राखीव आणि अधिक्रम

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | ३१.०३.१८ | ३१.०३.१७ पुनर्लिखित |
|---|---|---|
| **ठेवलेली मिळकत** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | **(७,२१५.१४)** | **(६४४४.२५)** |
| अधिक वर्षाचा नफा / तोटा | ७००.१८ | (७७०.८८) |
| | **(६,५१४.९६)** | **(७२१५.१३)** |
| **इतर समभाग (ब) इतर राखीव** | | |
| इतर सर्वकष उत्पन्नाद्वारे समभागाचे विलेख | | |
| वाटप प्रलंबित असलेला शेअर ॲप्लीकेशन मनी | ३७.०० | ३९२.७९ |
| **एकूण बेरीज** | **(६४७७.९६)** | **(६८२२.३४)** |

### टिपा क्र.-१४ चालू नसलेली कर्जे

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | ३१.०३.१८ | ३१.०३.१७ पुनर्लिखित |
|---|---|---|
| **मुदतीची कर्जे** | | |
| **प्रतिभूत** | | |
| मुदतीची कर्जे - वित्तीय संस्थांची | २१५५७.६१ | २१५७३.८९ |

| | | |
|---|---|---|
| मुदतीची कर्जे - बँकांची | १८१३.२८ | २००३.०३ |
| **अप्रतिभूत** | | |
| मुदतीची कर्जे - वित्तीय संस्थांची | ०.०० | ४६.४८ |
| जागतिक बँकेचे कर्ज | १८७.८८ | १५९.२० |
| सी एस एस ई पी एल कडून कर्जे (बारामती प्रकल्प) | १९६.७२ | २०१.०५ |
| के एफ डब्ल्युचे कर्ज | ४९५.२० | ५१४.३० |
| **एकूण** | **२४२५०.६९** | **२४४९७.९५** |

## टिपा क्र.-१५ चालू नसलेली तरतुदी

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | ३१.०३.१८ | ३१.०३.१७ पुनर्लिखित |
|---|---|---|
| अंशदानासाठी तरतूद | ४४६.०५ | ३७५.२१ |
| रजा रोखीकरणासाठी तरतूद | ४१८.९६ | ४२२.४८ |
| **एकूण** | **८६५.०१** | **७९७.६९** |

## टिपा क्र.-१५अ स्थगित कर दायित्वे (निव्वळ)

### अ) नफा व तोटा यात मान्यता दिलेल्या रकमा

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | ३१.०३.२०१८ रोजी संपलेल्या वर्षासाठी | ३१.०३.२०१७ रोजी संपलेल्या वर्षासाठी |
|---|---|---|
| **चालू कर खर्च** | | |
| चालू वर्ष | **१२.२४** | **२०.११** |
| मागील वर्षासंबंधातील अंदाजाचे बदल | - | - |
| | **१२.२४** | **२०.११** |
| **स्थगित कर खर्च** | | |
| मूळ केलेले आणि उलट फिरवलेले हंगामी फरक | (६५४.३२) | (५३.८५) |
| कर दरातील बदल | - | २७.८८ |
| मागील वर्षासंबंधातील अंदाजाचे बदल | - | - |
| | **(६५४.३२)** | **(२५.९७)** |
| **आयकर विवरणपत्रकात मान्य केलेले कर** | **(६४२.०७)** | **(५.८६)** |

### (ब) इतर सर्वकष उत्पन्नात मान्य केलेल्या कर खर्च

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | ३१.०३.२०१८ रोजी संपलेल्या वर्षासाठी | | |
|---|---|---|---|
| | कर पूर्व | कर खर्च / (लाभ) | निव्वळ कर |
| **नफा किंवा तोटा यात वर्गीकरण होणार नसलेल्या बाबी**<br>व्याख्यांकित लाभ योजनांचे पुर्नमापन | (३५.३८) | १२.२४ | (२३.१४) |
| **एकूण** | **(३५.३८)** | **१२.२४** | **(२३.१४)** |

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | ३१.०३.२०१७ रोजी संपलेल्या वर्षासाठी | | |
|---|---|---|---|
| | कर पूर्व | कर खर्च / (लाभ) | निव्वळ कर |
| **नफा किंवा तोटा यात वर्गीकरण होणार नसलेल्या बाबी** | | | |
| व्याख्यांकित लाभ योजनांचे पुर्नमापन | (५८.११) | २०.११ | (३८.००) |
| **एकूण** | **(५८.११)** | **२०.११** | **(३८.००)** |

## (क) परिणामाकारक कर दराचा मेळ करणे

रक्कम ₹ कोटीत

| तपशील | ३१.०३.२०१८ रोजी संपलेल्या वर्षासाठी | ३१.०३.२०१७ रोजी संपलेल्या वर्षासाठी |
|---|---|---|
| **कर पूर्व नफा** | **८१.२५** | **(७३८.७४)** |
| लागू होणारा कर दर | **३४.६१%** | **३४.६१%** |
| कंपनीचा देशांतर्गत कर दरानुसार कर | **२८.१२** | **(२५६)** |
| **कर दारातील बदल** | | २७.८८ |
| **कराचा खालील बाबींवर परिणाम** | | |
| ज्यात कपात होत नाही असे खर्च | ११.५३ | १४.६३ |
| खालील बाबींसाठी वेळेतील फरक | | |
| - घसारा व इतर बाब | ६९९.३७ | १५०.८० |
| - वित्तीय मत्तेतील घट | १०५.३५ | (४०.३२) |
| - प्रत्यक्ष देण्याच्या तत्त्वावर मान्य होणारे खर्च | ९.४० | (१.३१) |
| मागील वर्षातील स्थगीत कराचे समायोजन | (१,५११.६१) | ७४.७४ |
| कपात न होणारा सी एस आर खर्च | ३.५३ | ३.२७ |
| इतर सर्वकष उत्पन्नातील बाबी | १२.२४ | २०.११ |
| **कर खर्च** | **(६४२.०७)** | **(५.८६)** |
| परिणामकारक कर दर | **-७९०.२६%** | **०.७९%** |

## (ड) स्थगित कर शिलकीचे स्थलांतर

रक्कम ₹ कोटीत

| | ३१.०३.२०१८ रोजी संपलेल्या वर्षासाठी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| तपशील | निव्वळ शिल्लक ०१ एप्रिल २०१७ | नफा किंवा तोटा यात मान्यता | इतर सर्वकष उत्पन्नामधे मान्यता | निव्वळ | स्थगित कर मत्ता | स्थगित कर दायित्त्व |
| **स्थगित कर मत्ता** | | | | | | |
| मालमत्ता, कारखाने व साधने | (४,१५४.१७) | (१,११२.७२) | - | (५,२६६.९०) | - | (५,२६६.९०) |
| गुंतवणूकी | १३.४२ | २.५७ | - | १६.०० | १६.०० | - |
| वस्तू सूची | १११.७४ | (१११.७४) | - | - | - | - |
| व्यापारी येणी | २४०.९८ | ९८.९६ | - | ३३९.९५ | ३३९.९५ | - |
| तरतूदी | ३५८.५१ | २४.३४ | १२.२४ | ३९५.०९ | ३९५.०९ | - |
| अपशोषित घसारा | १,९८१.५१ | १,७८२.५० | - | ३,७६४.०१ | ३,७६४.०१ | - |
| कर्जे व अग्रीमे | (५९.३२) | (४१.८५) | - | (१०१.१७) | (१०१.१७) | - |
| **कर मत्ता (दायित्त्वे)** | **(१,५०७.३४)** | **६४२.०७** | **१२.२४** | **(८५३.०२)** | **४,४१३.८८** | **(५,२६६.९०)** |

| | ३१.०३.२०१७ रोजी संपलेल्या वर्षासाठी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| तपशील | निव्वळ शिल्लक ०१ एप्रिल २०१६ | नफा किंवा तोटा यात मान्यता | इतर सर्वकष उत्पन्नामधे मान्यता | निव्वळ | स्थगित कर मत्ता | स्थगित कर दायित्त्व |
| **स्थगित कर मत्ता** | | | | | | |
| मालमत्ता, कारखाने व साधने | (२,९४४.४७) | (१,२०९.७१) | - | (४,१५४.१७) | - | (४,१५४.१७) |
या कंपन्यांच्या संबंधित संचालक मंडळाकडे असलेल्या जबाबदाऱ्यांमधे पुढील बाबींचा समावेश होतो. त्या म्हणजे कायद्यातील तरतुदीनुसार पुरेसा लेखा अभिलेखांचे जतन करणे, गटाच्या मत्तांचे रक्षण करणे आणि लबाडी व इतर अनियमिततांना आळा घालणे व त्या शोधणे त्यासाठी योग्य अशी लेखा धोरणे निवडून त्यांची अंमलबजावणी करणे, योग्य आणि सूक्ष्म असे न्याय निर्णय व अंदाज करणे, त्याची संरचना करणे योग्य व पुरेशा प्रमाणात अंतर्गत वित्तीय नियंत्रणे अमलात आणून त्यांची अंमलबजावणी करणे आणि त्यामधे लेख्यांच्या दस्तऐवजात अचूकता व परिपूर्णता आणणे, त्याद्वारे लबाडी किंवा अनवधानाने होऊ शकणाऱ्या गैरविवरण यापासून मुक्त असलेली आणि कंपनी गटाच्या वित्तीय स्थितीची रास्त दर्शन घडविणारी एकत्रित वित्तीय विवरणपत्रके सादर करणे. यामुळे महानिर्मिती सूत्रधारी कंपनीच्या संचालकांना भारतीय लेखा मानकाप्रमाणे वरील प्रमाणे एकत्रित भारतीय लेखा मानकानुसार वित्तीय विवरणपत्रके तयार करण्यास उपयोग होईल.

**लेखापरिक्षकांची जबाबदारी**

३. भारतीय लेखा मानकानुसार असलेल्या या एकत्रित वित्तीय विवरणपत्रकांवर आम्ही लेखापरिक्षण करून त्यावर आधारित मते आणि अभिप्राय व्यक्त करणे ही आम्हा लेखा परिक्षकांची जबाबदारी आहे. आम्ही लेखा परिक्षण करताना कायद्याच्या तरतुदी, लेख्यांची व लेखा परिक्षणाची मानके विचारात घेतली आहेत. तसेच कायद्यातील तरतुदी व त्या अंतर्गत केलेली नियमावली यांचेनुसार जे इतर विषय लेखा परिक्षणात समाविष्ट करणे आवश्यक आहेत, त्यांचाही विचार केला आहे.

कायद्याचे कलम १४३ (१०) यामधे विनिर्देशित केलेल्या लेखामानकांना अनुसरून आम्ही भारतीय लेखा मानकानुसार केलेल्या सदर एकत्रित वित्तीय विवरणपत्रकांच्या लेखा परिक्षणाचे संयोजन केले. ही लेखा मानके आणि त्याची अधिघोषणा यानुसार आम्ही नैतिक गरजांचे अनुपालन करणे आवश्यक असते, तसेच ही एकत्रित वित्तीय विवरणपत्रके कोणतीही प्रत्यक्ष गैरमाहिती देण्यापासून मुक्त आहेत किंवा कसे याची योग्य प्रकारे हमी मिळविण्यासाठीच्या उद्देशाने आम्ही आमच्या लेखा परिक्षणाच्या कामाचे नियोजन व कार्यपालन केले आहे.

या एकत्रित वित्तीय विवरणपत्रातील रकमा आणि प्रकटने यातील लेखा परिक्षणातील पुरावे मिळविण्याच्या दृष्टीने लेखा परिक्षण केले जाते. यासाठी निवडलेली कार्यपद्धती लेखा परिक्षकांच्या न्यायनिर्णयावर अवलंबून असते. या एकत्रित वित्तीय विवरणपत्रकामधे लबाडीने किंवा अनावधनाने प्रत्यक्षरित्या गैरमाहिती दिली गेल्याचा धोका नाही याची खात्री करावी लागते. अशा धोक्यांचे निर्धारण करण्यासाठी परिस्थितीस अनुरुप अशा लेखा परिक्षणाची रचना ठरविताना, लेखा परिक्षक गटाचे सत्य व रास्त दर्शन घडविणारी एकत्रित वित्तीय विवरणपणे तयार करण्यासाठी सुत्रधारी कंपनीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा विचार करतात. सूत्रधारी कंपनीतल्या संचालक मंडळाने ठरविलेला लेखा धोरणांची अचुकता तसेच लेख्यांचे अंदाज यांचे मूल्यामापन लेखापरिक्षणात केले जाते तसेच भारतीय लेखा मानकांनुसार केलेल्या या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांचे सर्वव्यापी सादरीकरण याचे मूल्यमापन केले जाते.

आमचा विश्वास आहे की, आम्ही तसेच इतर लेखापरिक्षकांनी जे लेखापरिक्षणात्मक पुरावे मिळविले त्यामधे येथे खाली नमूद केलेला ''इतर प्रकरणे'' हा परिच्छेद यातील संदर्भ भारतीय लेखा मानकानुसार केलेल्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रावर आमचे लेखापरिक्षणाचे मतासाठी पुरेसे व योग्य आधार देतात.

**पात्र मतांचा आधार:**

४. (१) सुत्रधारी कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) सोबत केलेल्या वीज खरेदी करारातील अटीनुसार 'ग्राहकांकडून अधिभाराचे उत्पन्न' या लेखाशीर्षाखाली या वर्षभरात विलंबाने भरलेल्या रकमेवरील व्याजाची रक्कम ₹ २०४७.३१ कोटी यास अधिभार म्हणून मान्यता दिली. (मागील वर्षी ₹.१६९७.६४ कोटी) महावितरणने ३१ मार्च २०१८ पर्यंत या अधिभाराची रक्कम ₹ ७४८५.६१ कोटी (मागील वर्षी ₹ ५४३८.३० कोटी) भरलेली नव्हती.
मागील काही वर्षापासून देयकांचा स्वीकार न करणे आणि त्याची रक्कम न भरणे याबद्दल महावितरणकडून ही थकीत रकमेची वसूली होण्याची अनिश्चिती आहे.

४. (२) वरती नमुद केलेल्या अनिश्चितीमुळे, सूत्रधारी कंपनीने या वर्षासाठी अंदाजे ₹ २८५.९६ कोटीचा अपेक्षित तोट्यासाठी आणि आजपावेते एकत्रित तोट्यांसाठी ₹ ९८२.२८ कोटीची तरतूद केली आहे.

५. *सूत्रधारी कंपनीने मागील वर्षअखेरची तारीख म्हणजे दि.३१/०३/२०१७ पर्यंत स्थगित कर दायित्त्व (निव्वळ) संबधीत मागील काळातील चुकासंबधीची रक्कम ₹ ८८५.४४ कोटी याचे पुनर्लेखन मागील वर्षाच्या वित्तीय विवरणपत्रात केले नव्हते. सूत्रधारी कंपनीने मागील वर्षाचा चालू कराचा हिशेब करताना पात्र गुंतवणूक भरपाईचे ₹ २५५८.४९ कोटी वजा केले नव्हते. यामुळे मागील वर्षाअखेर अशोषित तोटे तेवढ्या रकमेने कमी झाल्याचे दिसले आणि या कारणास्तव मागील वर्षाच्या अखेरीस स्थगित कर मत्ता ₹ ८८५.४४ कोटी निर्माण केली नाही. परिणामी मागील वर्षीअखेर स्थगित कर दायित्त्व (निव्वळ) हे ₹ ८८५.४४ कोटीने जास्त नमुद करण्यात आले होते.*
*या स्थगित कर मत्तेची रक्कम ₹ ८८५.४४ कोटी याला चालू वर्षी मान्यता देऊन ती या वर्षाच्या नफा-तोटा पत्रकात जमा केली आहे. त्यामुळे वर्षाचा नफा त्या रकमेइतका जादा नोंदला गेला.*
*वरील लेखा प्रक्रिया ही ''भारतीय लेखा मानक क्र.८ लेखा धोरणे लेखा अंदाजातील बदल व चुका'' यातील आवश्यकतेनुसार नाही.*

६. *सूत्रधारी कंपनीच्या प्रकरणात, कर्जे व अग्रीमे, अनामती व्यापारी देणी यांच्या शिलकी या संबधिताकडून कायम होणे आणि / किंवा त्यांचे मेळ करणे यांच्या अधीन असतात. असे कायम होणे मेळ करणे प्रलंबित असल्याने त्यांचे अंतिम समायोजन केले नाही.*
*मात्र आम्हास माहिती देण्यात आली की, सूत्रधारी कंपनीने तिचे विक्रेते किंवा जे कुणी आहेत त्यांना शिलकी खात्री पटविण्याची पत्रे दिली आहेत आणि जेव्हा ती कायम केल्याबद्दल पत्र प्राप्त होते तेव्हा मेळ केला जातो. तसेच आम्हाला सांगण्यात आले की, असे मेळ करणे ही प्रक्रीया सूत्रधारी कंपनीमधे सतत चालू असते.*
*वरील परिस्थितीचा शिलकींवर आणि सूत्रधारी कंपनीच्या तसेच कंपनी गटाच्या नफ्यावर जर काही परिणाम होणार असला तर त्याबद्दल मत व्यक्त करण्यास आम्ही असमर्थ आहोत.*

७. *कंपनी गटाच्या लेखा धोरणातील 'मालमत्ता, कारखाना व साधने' या संबधीच्या टिपा क्र.४(९), टिपा ४(१०) आणि ४(११) या विषयी तसेच 'घसारा व कर्जफेडीची तरतूद' या संबधीची टिपा क्र. १०ब(३) याकडे लक्ष वेधण्यात येते. कंपनीने अनुसरलेल्या या लेखा धोरणाला धरून जाताना काही विचलने आणि विसंगती झाल्याचे आम्हास आढळले. त्या पुढील संदर्भात आहेत. (१) वस्तूसूची आणि मालमत्ता, कारखाने व साधने यांच्या सुटे भागांच्या वर्गीकरणाबाबत. म्हणजेच 'मालमत्ता, कारखाने व साधने' याची व्याख्या पूर्ण करणाऱ्या सुटे भागाचे वर्गीकरण वस्तूसूची मधे केले गेले आणि त्याचे भांडवलीकरण कंपनीने केले नाही. (२) बदललेल्या सुट्ट्या भागाची आकारणी नफा-तोटा पत्रकात केली म्हणजे कंपनीने बदललेले सुटे भाग मालमत्ता, कारखाने व साधने यांच्या 'कमी केलेले मुल्य' यांची मान्यता काढली नाही. तसेच बदललेल्या भागाची किमत नफा-तोटा पत्रकात आकारलेली नव्हती आणि दोन्हीचा त्यांच्या उर्वरित आयुष्यासाठी घसारा आकारणी मान्यता काढल्यानंतरही चालू ठेवत होती आणि सूट्या भागांचे उपयुक्त आयुष्य यांची जोडणी त्यांच्या कारखान्या सोबत केलेली नव्हती. यामुळे सुटे भाग आणि मालमत्ता, कारखाने व साधने यातील भर केलेली साधने यांचा घसारा संबंधित मुख्य मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्या संदर्भाशिवाय आकारला गेला. परिणामी माहिती अभावी त्याचा सुत्रधारी कंपनी आणि त्यांच्या कंपन्यांचा गट यांच्या वित्तीय विवरणपत्रकांवर होणाऱ्या परिणामावर मत व्यक्त करण्यास आम्ही असमर्थ आहोत.*

८. *(अ) वरील परिच्छेद क्र.६ व ७ यात नमूद केलेल्या विषयांचा ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या नफ्यावर किंवा ठेवून घेतलेली मिळकत आणि संबंधित मत्ता किंवा दायित्त्वे यांच्यावर होणारे परिणाम अनिश्चित आहेत.*

*(ब) वरील परिच्छेद क्र.४ व ५ मधील बाबींचे परिणाम जर विचारात घेतले असते तर आणि त्यांची निश्चिती / संख्या काढली असती तर भारतीय लेखा मानकानुसारच्या वित्तीय विवरण पत्रकातील खालील विविध घटकांच्या रकमांवर खालीलप्रमाणे परिणाम झाले असते.*

₹ कोटीत

| अनु. क्र. | तपशील | ३१/०३/२०१८ रोजीचा अहवाल | ३१/०३/२०१८ रोजी खालीलप्रमाणे हवी होती | ३१/०३/२०१७ पूनर्लेखनानंतर अहवालात दिलेत | ३१/०३/२०१७ रोजी खालीलप्रमाणे हवी होती |
|---|---|---|---|---|---|
| १ | महसूल वर्षातील इतर प्रवर्तन उत्पन्न | २०५०.४५ | ३.१४ | १७३१.१५ | ३३.५१ |
| २ | व्यापारी येणी चालू नसलेली वित्तीय वर्ष अखेर | ४२६५.२७ | - | ३०४४.३४ | - |
| ३ | विना देयक महसूल - इतर चालू वित्तीय मत्ता | २२०९.२२ | -२९.०५ | १७१०.७९ | १३.१५ |
| ४ | अपेक्षित पत तोट्याची वर्षासाठी तरतूद (नफा व तोटा पत्रकातील) | २८५.९६ | - | १८०.६७ | - |
| ५ | चालू वित्तीय वर्षा अखेरीस अपेक्षित पत तोटा तरतूद (ताळेबंद पत्रक) | ९८२.२८ | - | ६९६.३२ | - |
| ६ | चालू करासाठी संचित तरतूद (भरलेल्या कराची निव्वळ) | २२७.८६ | अनिश्चित | २११.६४ | अनिश्चित |
| ७ | वर्षासाठी स्थगित कर खर्च (मालमत्ता, कारखाने व साधने) (नफा-तोटा पत्रक) | -६५४.३१ | २३१.१३ | -२५.९७ | -९११.४१ |
| ८ | स्थगित कर दायित्त्व (निव्वळ) वर्षाअखेर (ताळेबंद पत्रक) | ८५३.०३ | ८५३.०३ | १५०७.३४ | ६२१.९० |
| ९ | वर्षातील करोत्तर नफा इतर सर्वंकष उत्पन्नानंतर | ६९७.५३ | -१९४९.२६ | -७७१.८८ | -१४०३.४० |
| १० | संचित नफा/(तोटा) इतर समभाग (अधिभार उत्पन्नात अनिश्चित असल्याने त्याचा चालू करांवरील परिणाम वजा करून मात्र अनियंत्रित समभाग धारकांचा वाटा विचारात घेतला आहे.) | -६५२७.५४ | -१३०३०.८७ | -७५२५.३८ | -११०८१.७० |

**९. पात्र करण्याचे मत:**

*वर दिलेले परिणाम आणि वरील पात्र करण्याच्या मत्ताचा आधार या शीर्षकाच्या मजकूरातील परिच्छेत क्र.४,५,६ आणि ७ यात संख्येमधे सांगता येणार नाहीत अशा बाबी (जर काही असल्यास) यांच्या आधीन राहून, आमच्या मते आणि आम्हास मिळालेली सर्वोतपरी माहिती आणि आम्हास दिलेली स्पष्टीकरणे तसेच उपकंपन्या आणि सहयोगी कंपन्या यांच्या वेगळ्या वित्तीय विवरण पत्रावर इतर लेखापरिक्षकांनी दिलेल्या अहवालांचा व इतर वित्तीय माहिती यांच्या आधारे, आमचे मत असे आहे की, उपरोक्त भारतीय लेखा मानका प्रमाणे तयार केलेली एकत्रित वित्तीय विवरण पत्रे कायद्यानुसार आवश्यक तशी आणि हव्या त्या पद्धतीमधे माहिती देतात आणि भारतात सर्वसाधारणपणे स्विकारलेल्या लेखा तत्त्वांना अनुरूप ठरतील अशाप्रकारे कंपनी गटाची दि.३१ मार्च २०१८ रोजीच्या एकत्रित वित्तीय स्थितीचे सत्य व योग्य चित्र दाखवितात. तसेच कंपनीगटाचे नफा (इतर सर्वंकष उत्पन्नासह वित्तीय कामगिरी) एकत्रित रोकडता प्रवाह व वर्षाअखेरचे एकत्रित समभागातील बदल यांची माहिती देतात.*

**१०. भर देण्याची प्रकटणे:**

आम्ही खालील टिपांकडे लक्ष वेधतो :

सूत्रधारी कंपनी**:** महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड (महानिर्मिती)

**(अ) टिपा क्र.२९:** भारतीय लेखा मानक १९ - 'कर्मचारी लाभ' या अंतर्गत आणि भविष्य निर्वाह निधींचे (सी पी एफ) हंगामी लेखे यावर आधारित जर काही तूट / आधिक्य असले तर त्यांचे लेखे करणेबाबत, कंपनी गटाच्या अंशदान भविष्य निर्वाह निधी ट्रस्ट कडून आवश्यक तपशील व माहिती उपलब्ध नाही.

**(ब) टिपा क्र.४४:** विविध जल विद्युत निर्मिती सुविधांची कार्यवाही संबंधित महाराष्ट्र शासनासोबत भाडेपट्टी करार करणे बाकी आहे.

**(क) उपकंपनी - महागूज कोलयरीज लिमिटेड :**

आम्ही, लेख्यांच्या टिपा मधील टिपा क्र.११ - महत्त्वाची लेखा धोरणे याकडे लक्ष वेधू इच्छितो. या टिपणीनुसार ही कंपनी कार्यरत असलेली कंपनी या तत्त्वावर भारतीय लेखा मानकानुसार वित्तीय विवरण पत्रके तयार करण्यात आली आहेत. मात्र वित्तीय वर्ष २०१७-१८ मधे या कंपनीला ₹ १,६६,४३,७७०/- इतका तोटा झाला आणि तिचे नकारात्मक राखीव निधी ₹ ३,७३,८२,३६९/- असून ते भाग भांडवलापेक्षा जास्त झाले आणि दि.३१ मार्च २०१८ पर्यंत संपूर्णपणे कमी झाले. या कंपनीचा उपरोक्त आधार हा कोळसा मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून भरपाई मिळेल यावर अवलंबून आहे. त्यासाठी मच्छकटा - महानदी कोळसा खाणीच्या जागा नव्या संस्थेला देणे आणि त्यानंतर (पूर्वी कंपनीच्या प्रवर्तकांना जी जागा दिली होती) त्याचे कागदपत्रांचे आणि हक्कांचे हस्तांतरण करावे लागेल. यामधे भौगोलिक अहवाल, खाण खोदणे व नंतर बंद करण्याच्या योजना इ. बाबींचा समावेश असून भारत सरकारचे कोळसा मंत्रालय त्याची भरपाई ठरविणार आहे.

**(ड) उपकंपनी : धोपावे कोस्टल पॉवर कं.लि. :**

या उपकंपनीचे लेखे 'चालू असलेली संस्था' या तत्त्वानुसार केले नाहीत कारण व्यवस्थापनाने ती बंद करण्याचे ठरविले आहे आणि त्यासाठी शासनाची परवानगीची प्रतिक्षा आहे.

वरील विषयावर आमचे पात्र मत दिलेले नाही.

**११. इतर विषय:**

अ) आम्ही नमूद करतो की, मागील वर्षी सूत्रधारी कंपनीचे लेखे परिक्षण इतर तीन संयुक्त लेखापरिक्षकांनी केले होते. यावर्षी कंपनीच्या विविध जागेवरील आरंभीच्या शिलकीची माहिती व्यवस्थापनाने आम्हास दिली आणि आम्ही ती स्विकारली आहे. त्यामुळे व्यक्तिशः प्रत्येक जागेचे लेखा परिक्षण केलेले तेरीज पत्रक स्वतंत्रपणे प्रमाणित केलेले नाही.

ब) १. आम्ही तीनही उपकंपन्याचे वित्तीय विवरणपत्रे / माहिती याचे लेखा परिक्षण केलेले नाही. या उपकंपन्याचे दि.३१ मार्च २०१८ रोजी एकत्रित मत्ता ₹ ६२.९८ कोटी, एकूण महसूल ₹ ०.०१ कोटी आणि निव्वळ रोकडता प्रवाह (त्या तारखेला संपलेल्या वर्षी) ₹ ०.१६ कोटी होता असे त्यांच्या वित्तीय विवरण पत्रांवरुन दिसते. त्याप्रमाणे या रकमा एकत्रित वित्तीय विवरण पत्रकात दाखविल्या आहेत.

२. एकत्रित वित्तीय विवरण पत्रकात कंपनी गटाचा दि.३१ मार्च २०१८ रोजीचा एकूण तोट्यातील वाटा ₹ ०.१७ कोटी (यात इतर सर्वंकष उत्पन्न समाविष्ट) असा घेतला आहे. तो एका सहयोगी कंपनीचा असून त्या कंपनीच्या वित्तीय विवरण पत्रांचे लेखापरिक्षण आम्ही केलेले नाही.

क) उपरोक्त तीन उपकंपन्या आणि एक सहयोगी कंपनी यांचे वित्तीय विवरण पत्रकांचे लेखा परिक्षण इतर लेखापरिक्षकांनी केलेले आहे. त्याचे अहवाल सूत्रधारी कंपनीच्या व्यवस्थापनाने आम्हास दिले. एकत्रित वित्तीय विवरण पत्रातील या उपकंपन्या व सहयोगी कंपनी यांच्या संबंधित रकमा आणि प्रकटने यावरील आमची मते व आमचा अहवाल कायद्याचे कलम १४३(३) आणि (११) यातील अटीप्रमाणे, पूर्णपणे इतर लेखा परिक्षकांच्या अहवालावर आधारीत आहेत. त्यासाठी आम्ही "लेखापरिक्षणाची मानके (एस ए ६००) इतर लेखा परिक्षकांचे कामाचा वापर करणे प्रत्यक्ष माहितीसह" यात दिलेल्या आवश्यकता पूर्ण केल्या.

भारतीय लेखा मानकानुसार केलेल्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांवर आमचे मत आणि खालील कायदेशीर व नियामक आवश्यकता यावर आमचा अहवाल वरीलप्रमाणे इतरांच्या कामावर अवलंबून केला आहे. त्यासाठी व्यवस्थापनाने प्रमाणित केलेले वित्तीय विवरण पत्रके / वित्तीय माहिती त्यावर आधारीत आहे. त्यामुळे त्यावरील आमची मते पात्रता धारण करीत नाहीत.

**१२. इतर कायदेशीर आणि नियमनांच्या आवश्यकता:**

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (५) यातील आवश्यकतेनुसार आम्ही भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी दिलेल्या आदेशाबाबत एक निवेदन 'जोडपत्र-एक' यात देत आहोत. त्यांनी लेखापरिक्षणासाठी सुचविलेल्या कार्यपद्धतीचे अनुपालन आम्ही केले आहे. त्यांच्या आदेशानुसार केलेली कृती आणि त्यांचे कंपन्यांच्या गटाची भारतीय लेखा मानका प्रमाणे केलेली एकत्रित वित्तीय विवरण पत्रके यांच्यावर होणारे परिणाम विचारात घेतले आहेत.

**१३. अधिनियमाचे कलम १४३(३) यातील आवश्यकतांसाठी आमचे लेखापरिक्षण तसेच इतर लेखापरिक्षकांचे अहवाल यांचे संदर्भ वरती 'इतर विषय' या परिच्छेदात दिले आहेत. लागू होणाऱ्या मर्यादेनुसार आम्ही खालीलप्रमाणे अहवाल देत आहोत.**

अ) आम्ही आमचे सर्वोतपरी उत्कृष्ट ज्ञान व विश्वास यानुसार आमच्या लेखापरिक्षणासाठी आवश्यक असणारी सर्व माहिती व स्पष्टीकरणे मिळविली आहेत. *मात्र याला वरील परिच्छेद क्र.६ यात नमूद केल्याप्रमाणे सूत्रधारी कंपनीच्या बाबत तिसऱ्या व्यक्ती / संस्था यांचेकडून*

*शिलकी कायम करणे - या बाबीचे भारतीय लेखा मानक एकत्रित वित्तीय विवरण पत्रे यांच्यावर होऊ शकणारे परिणाम अनिश्चित आहेत. याचा अपवाद आहे.*

ब) आमच्या मते, *वरील 'पात्र मतांचा आधार' या परिच्छेदात वर्णन केलेल्या बाबी वगळता* सूत्रधारी कंपनीने कायद्याने आवश्यक असणाऱ्या लेख्यां वह्या योग्यप्रकारे जतन केलेल्या आहेत, असे आम्ही केलेल्या सदर लेखा वह्यांच्या तपासणीमधे आढळले.

क) या अहवालांशी संबधित एकत्रित ताळेबंद, एकत्रित नफा-तोटा पत्रक, एकत्रित रोकडता प्रवाह पत्रक (सर्वंकष इतर उत्पन्नासह) आणि एकत्रित समभाग बदलाचे निवेदन ही कागदपत्रे लेखा वह्यांशी सुसंगत आहेत.

ड) *वरील परिच्छेत क्र.४,५,६ आणि ७ मधील आमच्या निरिक्षणांच्या अधीन राहून,* आमच्या मते वरील भारतीय लेखा मानकानुसार केलेली एकत्रित वित्तीय विवरण पत्रे ही कायद्याच्या कलम १३३ व त्या अंतर्गत केलेल्या संबंधित नियमावलींचे अनुपालन करतात.

इ) महानिर्मित्ती ही एक शासकीय कंपनी आहे. त्यामुळे भारत सरकारची अधिसूचना क्र. जी एस आर ४६३ (इ) दि.५ जुन २०१५ यानुसार कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम १६४(२) यातील ''संचालकांची अपात्रता'' या संबधीच्या तरतुदी महानिर्मितीला लागू होत नाहीत.

फ) आम्ही 'पात्र मतांचा आधार' या परिच्छेदातील विषयासंबधी नोंदलेली निरिक्षणे कंपनी गटाच्या कामावर विपरीत आघात करतील एवढी महत्त्वाची नाही.

जी) सूत्रधारी कंपनी, तिच्या उपकंपन्या आणि सहयोगी कंपन्या यांच्या वित्तीय अहवालासाठीची अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी असणे या नियंत्रणांच कार्यावर प्रभाव असणे, या विषयी आमचा स्वतंत्र वेगळा अहवाल 'जोडपत्र - दोन' पहावा.

एच) लेख्यांच्या देखभाली संबंधीची पात्रता आणि त्याचे संलग्न इतर बाबी याविषयी वरील 'पात्र मत्तांचा आधार' या परिच्छेदात नमूद केलेले आहे.

आय) कंपनी (लेखा परिक्षण व लेखा परिक्षक) नियमावली २०१४, यातील नियम ११ नुसार लेखा परिक्षकांच्या अहवालात समाविष्ट करण्याच्या इतर बाबी या संबंधी आम्हास दिलेली सर्वोतपरी उत्तम माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार आम्ही खालीलप्रमाणे अभिप्राय देतो.

१. सूत्रधारी कंपनीने तिच्या भारतीय लेखा मानकानुसार केलेल्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रामधे एकूण कंपनीच्या गटाच्या आर्थिक स्थितीवर ज्या प्रलंबित न्यायालयीन खटल्यांचा परिणाम होऊ शकेल त्याची माहिती प्रकट केली आहे. त्यासाठी टिपा क्र.४१ पहावी.

२. ज्या करारांमुळे भविष्यात कंपनीच्या प्रत्यक्ष अंदाजित तोटा होईल व त्यासाठी तरतूद करावी लागेल असे कोणतेही दीर्घ मुदतीचे करार या गटाने केलेले नाहीत.

३. गुंतवणूकीदारांचे शिक्षण आणि रक्षण निधी यामधे स्थानातंरण करण्याजोगी कोणतीही रक्कम या कंपनी गटामधे नाही.

| | | |
|---|---|---|
| **के.एस.अय्यर ॲन्ड कंपनी करिता** | **एस.सी.बापना ॲन्ड असोशिएटस करिता** | **आर.एस.व्ही.ए.ॲन्ड कंपनी करिता** |
| सनदी लेखापाल | सनदी लेखापाल | सनदी लेखापाल |
| **एफ.आर.एन.१००१८६ डब्ल्यू** | **एफ.आर.एन.११५६४९ डब्ल्यू** | **एफ.आर.एन.११०५०४ डब्ल्यू** |
| **सी.ए.राजेश जोशी** | **सी.ए.प्रियांका डी.जखोटिया** | **सी.ए.शेखर कुलकर्णी** |
| भागीदार | भागीदार | भागीदार |
| **आय्.सी.ए.आय्.एम्.नं.३८५२६** | **आय्.सी.ए.आय्.एम्.नं.१५७४२६** | **आय्.सी.ए.आय्.एम्.नं.०४६२८५** |

स्थळ : मुंबई
दिनांक : २८ सप्टेंबर २०१८

## महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेडच्या दि.३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वर्षासाठी भारतीय लेखा मानकांनुसार तयार केलेल्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रांवर स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या अहवालाचे जोडपत्र - १

**१. जर काही कर्जे / ऋणे / उसनवारी / व्याज इ. सोडून देणे / निर्लेखित करणे याची प्रकरणे असल्यास, त्याची कारणे व त्यातील रक्कम यांची माहिती देणे.**

आमच्या लेखा परिक्षणाच्या काळात आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार वित्तीय वर्ष २०१७-१८ मधे या कंपनी गटातील कर्जे / ऋणे / व्याज इ. सोडून देणे / निर्लेखित करणे अशी प्रकरणे नव्हती.

**२. तिसऱ्या पक्षांकडे राहिलेला वस्तूमाल तसेच शासन आणि अन्य प्राधिकरणे यांचेकडून देणगी रुपाने मिळालेल्या मत्ता यांचे योग्य अहवाल आहेत.**

सूत्रधारी कंपनी, तिचा वस्तूमाल / साहित्य हे तिसऱ्या पक्षाकडे फक्त देखभालीसाठी किंवा जोडणीसाठी पाठविते. आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार भांडारे आणि सुरक्षा विभाग अशा वस्तूमालाचे योग्य अभिलेख जतन करतात. आणि त्यासाठीचे प्रवेश परवाने परत करण्याजोगे / न करण्याजोगे याप्रमाणे तयार करतात. तसेच त्याचे साहित्याचे अभिलेख सॅप मोड्यूल मधे पाहता येतात. आम्हास सांगण्यात आले की, कंपन्यांना शासन / इतर प्राधिकरणे यांचेकडून यावर्षी कोणत्याही मत्ता देणगी स्वरुपात मिळालेल्या नाहीत. तीन उपकंपन्यांचाही कोणत्याही वस्तू तिसऱ्या पक्षाकडे पडून राहिलेल्या नाहीत.

**३. प्रलंबित न्यायालयीन / न्यायाधिकरणे खटल्यांचा वर्ष निहाय व कारणास्तव विश्लेषण दर्शक अहवाल द्यावा. तसेच कायदेविषयक बाबींवर होणाऱ्या खर्चाकडे (परदेशातील / स्थानिक) लक्ष देणारी यंत्रणा अस्तित्त्वात / प्रभावीपणे कार्यरत आहे किंवा कसे याचीही माहिती द्यावी.**

सुत्रधारी कंपनी प्रलंबित कायदेविषयक दावे / न्यायाधिकरणाकडील खटले यांची ओळख निश्चित करून त्याचे प्रकटन 'आकस्मिक दायित्वे' यात करीत असते. एकूण २७२ कायदेशीर लवादातील खटल्यांचे त्याच्या वयानुसार वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

| तपशील | खटल्यांची संख्या |
|---|---|
| एक वर्षापेक्षा कमी | २८ |
| १ ते २ वर्षे | ६८ |
| २ ते ३ वर्षे | ५९ |
| ३ ते ५ वर्षे | ३१ |
| ५ वर्षापेक्षा अधिक | ८६ |
| **एकूण** | **२७२** |

'महागूज' कोलायरीज लिमिटेड या उपकंपनीने ओळख निश्चित केलेल्या कायदेशीर / न्यायाधिकरणाकडील प्रकरणांना आकस्मिक दायित्व म्हणून प्रकट केले आहे. त्यांचा एकूण ९ खटल्यांचे वर्ष निहाय विश्लेषण खालीलप्रमाणे :

| तपशील | खटल्यांची संख्या |
|---|---|
| १ ते ५ वर्षे | ४ |
| ५ वर्षी पेक्षा जास्त | ५ |
| **एकूण** | **९** |

आम्हास सांगण्यात आले की, या प्रत्येक खटल्यांची प्रलंबित असण्याची कारणे वेगवेगळी आहेत. तसेच आम्हास माहिती देण्यात आली की, कायदेविषयक प्रकरणांचा खर्च त्या खटल्यांसाठी नियुक्त केलेले सल्लागार /वकील यांच्या मंजूर मानधनाच्या रचनेप्रमाणे आहेत. कंपनी गटा कडून संबंधित माहिती उपलब्ध नसल्याने प्रलंबनाची कारणे आणि उपलब्ध यंत्रणेचा प्रभाव यावर भाष्य करण्यास आम्ही असमर्थ आहे.

**४. जर कंपन्याची निर्गुंतवणूक करण्यासाठी निवड झाली असेल तर (अमूर्त मत्ता आणि जमिनी यासह) संपूर्ण मत्ता आणि दायित्त्व (बांधिलकी व सर्वसाधारण राखीव यासह) याच्या मुल्यांकनाचा संपूर्ण स्थितीदर्शक अहवालाचे परिक्षण करावे; त्यामधे निर्गुंतवणूक संबधीची कार्यपद्धती आणि तिचा विद्यमान टप्पा यांचा समावेश करावा.**

या कंपनी गटातील कोणत्याही कंपनीची निर्गुतवणूकीसाठी निवड झालेली नाही. त्यामुळे मागीतलेली माहिती देणे ही बाब या कंपनी गटाला लागू नाही.

**कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (५) यातील उपआदेशावर अभिप्राय:**

५. **कंपनीने मागविलेल्या व मिळालेल्या कोळशाची संख्या / दर्जा याचा मेळ करण्यासाठी कंपनीकडे योग्य यंत्रणा आहे काय ? कोळशाचा दर्जा / ओलसरपणा आणि विलंब आकार इत्यादी यांचे लेखा वाट्यात योग्य नोंद केली जाते काय ?**

कोळसा कंपन्यांकडून तयार केलेली देयके आणि महानिर्मिती कंपनीला प्रत्यक्ष मिळालेली देयके यांचा मेळ करण्याची कार्यप्रणाली सूत्रधारी कंपनीमधे आहे. मात्र मागणी केलेल्या कोळशाचा दर्जा / संख्या आणि प्रत्यक्षात मिळालेल्या कोळशाचा दर्जा / संख्या यांचा मेळ करण्याची विद्यमान प्रक्रिया अधिक बळकट करण्याची गरज आहे. सूत्रधारी कंपनीने 'केंद्रीय खाण आणि इंधन संशोधन केंद्र' या मान्यता प्राप्त संस्थेची नियुक्ती केली आहे. ही संस्था कोळसा कंपनीच्या माल भरण्याच्या जागेवर कोळशाच्या दर्जाचे तांत्रिक पृथःकरण करते. केंद्रीय खाण आणि इंधन संशोधन केंद्राच्या सदर पृथःकरणाचे अहवालानुसार सूत्रधारी कंपनीचे नागपूर येथील कार्यालय बीजकात नमूद केलेल्या कोळशाच्या दर्जाचा मेळ करते आणि त्यात दर्जा घसरल्याचे आढळल्यास कोळसा कंपनीकडे त्याचे दावे करते.

कोळसा कंपन्यांनी महानिर्मितीकडे अल्पकाळात साहित्य उचलणे, कामगिरीच्या प्रोत्साहनाची रक्कम आणि व्याज यासाठी ₹ १५२२.१२ कोटी मागणी केली. मात्र महानिर्मितीने ती मागणी वादग्रस्त सांगून नाकारली. याबाबत कुठल्या बाजूचा दावा निर्दोष आहे याचा निष्कर्ष काढणे अवघड आहे. महानिर्मितीने कोळसा पुरवठादार कंपन्यांच्या या दाव्याला दि. ३१ मार्च २०१८ रोजीची 'आकस्मिक दायित्त्वे' म्हणून प्रकट केले आहे.

तसेच महानिर्मितीने सुद्धा कोळसा पुरवठादारांवर कमी पुरवठा करणे, कोळसा ओला असणे, कमी माल देणे आणि व्याज याबद्दल करारातील अटीनुसार ३१ मार्च २०१८ पर्यंत ₹ १३६३.०३ कोटीचे दावे केले आहे. याचा कोळसा कंपन्यांसोबत वाद असल्याने महानिर्मितीने लेखे केलेले नाहीत. त्यांना ३१ मार्च २०१८ रोजी 'आकस्मिक मत्ता' असे प्रकट केले आहे.

कायद्यातील उपरोक्त कलम हे तीन उपकंपन्या आणि एक सहयोगी कंपनी यांना लागू नाही.

६. **राज्य शासनाला देय असलेला विनामूल्य विजेचा वाटा किती आहे ? संमत अटींनुसार त्याचा हिशेब करून तो स्वीकृत लेखा प्रमाणकांनुसार तो लेख्यांमध्ये दाखविला जातो काय ?**

सूत्रधारी कंपनी आणि तिच्या तीन उपकंपन्या यांनी दिलेल्या माहितीनुसार कोणत्याही करारात राज्य शासनाला विनामूल्य वीज वाटा दिला जात नाही.

७. **वस्तूसूचीमधे भंगार, निकामी साहित्य इत्यादीचे मूल्यासह वर्गीकरण आहे का ?**

कंपनी, भंगार आणि निकामी साहित्याची ओळख निश्चिती करते. मात्र त्याचे लेखे ओळख निश्चितीच्या वेळी केले जात नाही. भंगाराचे मूल्यांकन लेखा वह्यात केले जात नाही आणि जेव्हा आणि जसा त्यांचा लिलाव होईल तेव्हा त्यांच्या वसूलीचा लेखा केला जातो. निकामी साहित्याचे मूल्य ऐतिहासिक किमती एवढे केले जाते आणि त्याच वेळी लेखा वह्यात निकामी साधनांसाठी १०० टक्के तरतूद केली जाते. अशाप्रकारे निर्माण केलेल्या तरतूदीचे समायोजन निकामी मालाच्या लिलावाच्या समवेत केले जाते. आम्ही संचालीत केलेल्या लेखा परिक्षण प्रक्रियेच्या आधारे, कंपनीमधे वस्तू मालसूचीचे वर्गीकरणाची योग्य कार्यपद्धती कार्यरत आहे. मात्र वरती दिलेल्या उणीवांचा त्याला अपवाद आहे.

संबधित कायद्यातील खंड तीन उपकंपन्यांना लागू नाही.

८. **लेखा परिक्षण अहवालात नमूद केलेला नफा/तोटा हा कंपनीच्या नफा आणि तोटा लेखे याप्रमाणे आहे किंवा कसे?**

कंपनी अधिनियम २०१३ यात विहित केल्याप्रमाणे, लेखा परिक्षण अहवालात वर्षातील नफा/तोटा यांची आकडेवारी देण्याची आवश्यकता नसते. मात्र आम्ही नमूद करतो की, अहवाल वर्षासाठी कंपनी गटाला ₹ ६९७.५३ कोटी एवढा नफा झाला. त्याबाबत आम्ही आमचे पात्रतेचा लेखापरिक्षण अहवाल दि.२८ सप्टेंबर २०१८ रोजी दिला.

९. **जल विद्युत निर्मिती प्रकल्पांच्या प्रकरणात जैविक विविधता जतन करण्याचे धोरणानुसार / सूचनांनुसार पाणी सोडले जाते. तसे केले नसल्यास काही दंड भरला / भरावयाचा असेल त्याची माहिती द्यावी.**

पाणी सोडण्याबाबत राज्य शासनाच्या जल संसाधन विभागाचा अंमल असतो. आणि आम्हास दिलेल्या माहितीनुसार यामधे गटातील कंपन्यांना काहीही भूमिका नसते. गटाने पाणी सोडण्याबाबत कोणताही दंड भरलेला नाही / देय नाही.

**१०. या कंपन्यांमधे काही करारातील अटीप्रमाणे महसूलाची वसुली करण्याची प्रभावी कार्यपद्धती आहे किंवा कसे? अशा महसूलाचे लागू होणाऱ्या लेखा मानकांनुसार योग्य लेखे लेखा वह्यात नोंदले जातात काय ?**

हा प्रश्न सूत्रधारी कंपनी आणि महागूज कोलायरीज लि. यांच्या प्रश्नावलीचा भाग होत नाही

धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड : होय.

महाजनको ॲश मॅनेजमेंट सर्विसेस लिमिटेड - होय तिच्या अल्प गुंतवणूकीचे व्याज हेच एकमेव उत्पन्न आहे.

**११. नवीन प्रकल्पांच्या स्थापनेसाठी जमिनीचे संपादन करावे लागते काय ? यातील सर्व प्रकरणात थक बाकी त्वरीत चुकती केली जाण्याबाबत कामे पारदर्शक पद्धतीने झाले काय ? याचा अहवाल द्यावा. जेथे विचलन झाले असेल त्याचा तपशील द्यावा.**

हा प्रश्न धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड सोडून इतर गट कंपन्यांच्या प्रश्नावलीचा भाग होत नाही.

धोपाावे कोस्टल पॉवर लिमिटेड : ही कंपनी कार्यरत नसल्याने लागू नाही.

**१२. कंपनीचे वित्तीय विवरण पत्राचे लेखे हे पूर्नवसन प्रक्रिया व खाण बंद योजनेच्या प्रवाहासाठी योग्यरित्या केले आहे काय ?**

सन्माननीय सर्वोच्च न्यायालयाने ऑगस्ट २०१४ मधे महागुज कोलायरीज लिमिटेड या उपकंपनीला मिळालेले कोळसा खाणी वाटप रद्द केले. उपकंपनीकडे ३१ मार्च २०१८ रोजी कोणतीही कोळसा खाण नसल्यामुळे पुर्नवसन प्रक्रिया व खाण बंद योजनेचे ३१ मार्च २०१८ रोजीच्या भारतीय लेखा मानकानुसार केलेल्या वित्तीय विवरण पत्रामधे लेखे केलेले नाहीत.

**१३. कंपनीने खाणकाम आणि पर्यावरणीय नियम व कायद्याअंतर्गत आवश्यक सांविधानी नियमांचे पालन केले आहे का ?**

महागूज कोलायरीज लिमिटेड ह्या उपकंपनीकडे ३१ मार्च २०१८ रोजी कोणतीही कोळसा खाण नाही. म्हणूनच खाणकाम आणि पर्यावरणीय नियम व कायद्यांतर्गत आवश्यक सांविधानीक नियमांचे पालन करण्याची आवश्यकता नाही.

**१४. कंपनीने खाणीचे विघटनाने वापर बंद केला आहे काय ? आणि जर असल्यास त्या संबंधितचे मृत भाड्याचे देणे तपासून घेतले काय ?**

महागूज कोलायरीज लिमिटेड ह्या उपकंपनीने ३१ मार्च २०१८ रोजी कोणत्याही खाणीचे विघटन आणि वापर बंद केला नाही. म्हणून ३१ मार्च २०१८ रोजी त्यासंबंधीचे मृत भाड्याचे देणे नाही.

**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनी करिता**
सनदी लेखापाल
**एफ.आर.एन.१००१८६ डब्ल्यू**

**सी.ए.राजेश जोशी**
भागीदार
**आय्.सी.ए.आय्.एम्.नं.३८५२६**

**एस.सी.बापना ॲन्ड असोशिएटस करिता**
सनदी लेखापाल
**एफ.आर.एन.११५६४९ डब्ल्यू**

**सी.ए.प्रियांका डी.जखोटिया**
भागीदार
**आय्.सी.ए.आय्.एम्.नं.१५७४२६**

**आर.एस.व्ही.ए.ॲन्ड कंपनी करिता**
सनदी लेखापाल
**एफ.आर.एन.११०५०४ डब्ल्यू**

**सी.ए.शेखर कुलकर्णी**
भागीदार
**आय्.सी.ए.आय्.एम्.नं.०४६२८५**

स्थळ : मुंबई
दिनांक : २८ सप्टेंबर २०१८

## महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेडच्या दि.३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वर्षाच्या भारतीय लेखा मानकानुसार तयार केलेल्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकावरील स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या अहवालाचे जोडपत्र क्र.२

### कंपनी अधिनियम २०१३ (''कायदा'') यातील कलम १४३ चे उपकलम क्र.३ मधील खंड क्र.(१) नुसार अंतर्गत वित्तीय नियंत्रणावरील अहवाल

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड (यापुढे ''सूत्रधारी कंपनी'' असा उल्लेख केला आहे) आणि तिच्या सर्व उपकंपन्या आणि तिची सहयोगी कंपनी - या सर्व भारतात संस्थापित झालेल्या कंपन्या असून त्यांच्या दि.३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वर्षाचा वित्तीय अहवाल देण्यासाठी आम्ही अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचे लेखे परिक्षण पूर्ण केले. हे काम आम्ही या कंपनींच्या एकत्रित लेखा परिक्षणाचे लेखा परिक्षण करताना त्यासोबत पार पाडते.

**अंतर्गत वित्तीय नियंत्रणासंबंधी व्यवस्थापनाची जबाबदारी :**

भारतीय सनदी लेखापालांच्या संस्थेने (''आय सी ए आय'') वित्तीय अहवाल लेखनासंदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखापरिक्षण करावे या विषयावर एक मार्गदर्शक टिपणी (सदर मार्गदर्शक टिपणी) दिली आहे. त्यामधे दिलेल्या अंतर्गत नियंत्रणाचे आवश्यक घटक विचारात घेऊन कंपनीने निश्चित केलेल्या वित्तीय अहवाल देण्याबाबतचे निकषावर आधारित अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची स्थापना करून त्याची कार्यवाही करणे याची जबाबदारी सूत्रधारी कंपनीच्या आणि उपकंपनीच्या संबंधित संचालक मंडळाची असते. या जबाबदारीमधे पुढील कार्ये समाविष्ट असतात. ती अशी : अंतर्गत नियंत्रणाची संकल्प रचना चित्र तयार करणे, कंपनीच्या औद्योगिक व्यवहारात शिस्त आणि कार्यक्षमता यांची हमी देणे, कंपनीच्या धोरणांना धरून राहणे, तिच्या मत्ता सुरक्षित ठेवणे, लबाडी व चूका शोधणे व त्यांना आळा घालणे, लेख्यांचे अभिलेख अचूक व परिपूर्ण ठेवणे आणि कंपनी अधिनिमय २०१३ नुसार आवश्यक अशी वित्तीय माहिती विश्वासपूर्णरित्या वेळेवर पूर्ण करून देणे.

### लेखापरिक्षकांची जबाबदारी

वित्तीय अहवाल देण्यासाठी कंपनीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणावर आमच्या लेखापरिक्षणाच्या आधारे मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी असते. कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (१०) यात विहित केलेली लेखा मानके आणि वित्तीय अहवालासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण या संबंधीची मार्गदर्शक टिपणी (मार्गदर्शक टिपणी) यानुसार लागू होणाऱ्या मर्यादित आम्ही अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण केले. उपरोक्त लेखा मानके व मार्गदर्शक टिपणी यांच्या आवश्यकतेनुसार आम्ही नैतिक गरजांचे अनुपालन करणे आणि वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी आहेत किंवा कसे याची योग्य व कारणयुक्त हमी मिळविणे या उद्दिष्टाने आम्हाला लेखा परिक्षणाची योजना करून ते पूर्ण करावी लागते. तसेच ही नियंत्रणे प्रत्यक्षात प्रभाविरित्या कार्यरत आहेत किंवा नाही आणि ती सुस्थापित असून त्याचे पालन केले जात आहे याची खातरजमा करावी लागते.

वित्तीय अहवाल देण्यासाठी असलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी असल्याबद्दल आणि ही नियंत्रणे परिणामकारकरित्या कार्यरत असल्याबद्दल लेखापरिक्षणातून पुरावे मिळावेत यादृष्टीने आम्हाला लेखापरिक्षणाच्या कार्यपद्धतीद्वारे कार्य करावे लागते. यामधे सदर अंतर्गत वित्तीय नियंत्रणे समजून घेणे, प्रत्यक्ष कार्यवाहीत अस्तित्त्वात असलेल्या दूर्बळ जागांची व त्यातील धोके याचे निर्धारण करणे या निर्धारित धोक्यांच्या आधारे अंतर्गत वित्तीय नियंत्रणांची रचना व त्याची परिणामकारकता याचे परिक्षण आणि मूल्यमापन करणे, यादृष्टीने आमचे लेखापरिक्षण केले जाते. यासाठी निवडलेली कार्यपद्धती लेखापरिक्षकांच्या न्याय निर्णय शक्तीवर अवलंबून असते. भारतीय लेखा मानकांनुसार तयार केलेल्या कंपनीच्या एकत्रित वित्तीय विविरणपत्रकांमधे लबाडी किंवा चुका यामुळे काही गैरमाहिती देण्याच्या धोक्यांचे निर्धारण करणे याचा सुद्धा अंतर्भाव लेखापरिक्षणात केला जातो.

आमचा विश्वास आहे की, आम्ही आमच्या लेखा परिक्षणातून मिळविलेले पुरावे तसेच, खाली दिलेल्या 'इतर विषय' या परिच्छेदातील संदर्भानुसार उपकंपन्याचे (ह्या कंपन्या भारतात समाविष्ट आहेत) लेखापरिक्षण करणारे अन्य लेखा परिक्षक यांनी लेखा परिक्षणात्मक मिळविलेले पुरावे हे सूत्रधारी व तिच्या सर्व उपकंपन्या यांचे वित्तीय अहवाल देण्यासाठी केलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणालीचे लेखापरिक्षण करून त्यावर आमचा लेखापरिक्षणाचा अभिप्राय देण्यास पुरेसा आणि योग्यप्रकारे आधार देतात.

### वित्तीय अहवालाकरिता असलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा अर्थ

कंपनीच्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची रचना कंपनीच्या अहवालाच्या विश्वसनीयतेसंबंधी आणि हि वित्तीय विवरणपत्रे तयार करण्याचे कार्य हे भारत देशात सर्वसाधारणपणे स्वीकारल्या गेलेल्या लेखा मानकांशी सुसंगत असल्याची रास्त हमी देण्यासाठी आहेत.

वित्तीय अहवाल देण्यासाठीच्या कंपनीने केलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणांमधे खालील धोरणे व कार्यपद्धती यांचा समावेश असतो :

१. अभिलेख / दस्तऐवज जतन करणे, त्यात कंपनीचे व्यवहार आणि मत्ता कामी लावणे याबद्दल तपशीलवार व अचूक माहिती असावी.

२. भारतात सर्वसाधारणपणे स्वीकृत लेखा तत्त्वानुसार व भारतीय लेखा मानका नुसार एकत्रित वित्तीय विवरण पत्रे तयार करण्यासाठी सर्व व्यवहार नोंदले आहेत आणि सर्व आय व व्यय कंपनीचे व्यवस्थापन व संचालकांच्या अधिकाराने झाले याची हमी मिळविणे.

३. भारतीय लेखा मानकांनुसार केलेल्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रांवर ज्याचा प्रत्यक्ष परिणाम होऊ शकेल अशा कंपनीच्या मत्तांची अनधिकृत संपादने, वापर किंवा विल्हेवाट होण्यास आळा घातला जातो किंवा तसे व्यवहार वेळीच शोधून काढले जातात याबद्दल रास्त हमी मिळविणे.

**अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची अहवाल देण्यातील अंगभूत मर्यादा**

वित्तीय अहवाल देण्यासाठी केलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या काही मर्यादा आहेत. या मर्यादांमधे व्यवस्थापनाद्वारे नियंत्रणांना ओलांडून किंवा त्याच्याशी संघर्ष करण्याची शक्यत असणे, चुका व लबाडीने गैरमाहिती मांडली जाणे आणि तिचा शोध न घेणे आदिंचा समावेश असतो. तसेच भविष्यकाळासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रण यंत्रणेकडून जे अंदाज केले जातात ते काही जोखीमा, धोके याच्या अधीन असतात. परिस्थिती बदलल्यामुळे किंवा काही बदल झाल्यामुळे असे भविष्यातील अंदाज अपूरे ठरतात. तसेच धोरणे किंवा कार्यपद्धती यांच्या पूर्तता करण्यात अडथळे येतात.

**पात्र मत्ताचा आधार / अभिप्रायांविषयी दावे नसणे**

आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे आणि आमच्या लेखा परिक्षणाच्या आधारे दि.३१ मार्च २०१८ रोजी सूत्रधारी कंपनी, म्हणजे महानिर्मितीच्या बाबत खालील दुर्बल जागा आढळल्या.

१. कंपनीच्या स्थिर मत्तांचे वेळेवर भांडवलीकरण करणे आणि त्याच्या परिसमापनातील नुकसानांचे समायोजनाचे लेखे करणे याबाबत अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे कार्य प्रभावी नाही. या दुर्बलतेमुळे कंपनीच्या स्थिर मत्ता, प्रगतीपथावरील कामांचे भांडवलीकरण, घसारा आणि खर्च यांचे प्रत्यक्षात गैरविवरण होण्याची शक्यता आहे.

२. कंपनीचे साहित्य प्रापण व त्याचे लेखेकरण, कर्मचारी व भांडारे यांच्या उप-अहवालांचे जतन करणे, पुरवठादारांच्या अग्रिमांचे वेळेवर समायोजन, दायित्त्वांचे समायोजन यामधे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांचे व्याज देणे याबाबत अंतर्गत वित्तीय नियंत्रणे प्रभावीपणे कार्यरत नाहीत. कोळशाच्या पुरवठ्यातील विलंब आणि अपुरी प्राप्ती यातील दंडाचे हिशेब आणि त्याचे लेखेकरण पुरेसे नाहीत. या दुर्बलतेमुळे कंपनीची दायित्त्वे व मत्ता यांचे सदोष मुल्यांकन होऊ शकते.

३. कंपनीतील वस्तूसूचींचे अभिलेख जतन करणे, वित्तीय खात्यासोबत त्यांचा मेळ करणे आणि वस्तूमालांचे मुल्यांकन करणे यासाठी अंतर्गत नियंत्रणे पुरेशी परिणामकारक नाहीत. या दुर्बलतेमुळे वस्तूसूचीच्या मुल्यांचे गैरविवरण होण्याची शक्यता आहे.

४. चालू कर आणि स्थगित कर यांच्या मोजणीबाबत कंपनीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे काम परिणामकारक नाही आणि आयकर परतावे भरण्याच्यावेळी आयकर मोजणीत प्रत्यक्ष बदल होतात. या दुर्बलतेमुळे भविष्यातील वित्तीय विवरण पत्रात चालू व स्थगित करांचे गैरविवरण होण्याची शक्यता आहे.

अंतर्गत वित्तीय नियंत्रणामधे प्रत्यक्ष दुर्बलता ही एक किंवा बऱ्याच उणीवांचे मिश्रण असते. वित्तीय अहवाल देण्यासाठीच्या वित्तीय नियंत्रणाच्या पद्धतीमधील अशा उणीवांमुळे कंपनीच्या वार्षिक किंवा अंतरीय वित्तीय विवरण पत्रकातील चुका वेळेवर शोधणे किंवा त्यांना आळा घालणे शक्य होत नाही व गैरविवरण होऊ शकते.

महागूज कोलायरीज लिमिटेड या उपकंपनीचे आम्ही लेखापरिक्षण केलेले नाही. तिच्याबाबत अन्य लेखापरिक्षकांनी खालील अहवाल दिला आहे.

**'अभिप्रायावर दावा नाकारणे'**

आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने निकषानुसार वित्तीय अहवालांसाठी अंतर्गत 'वित्तीय नियंत्रणे स्थापित केली नाहीत किंवा भारतीय सनदी लेखापालांच्या संस्थेने वित्तीय अहवालांसाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे' यावर दिलेल्या मार्गदर्शक टिपणीमधे नमूद केलेल्या अंतर्गत नियंत्रणांच्या महत्त्वाच्या घटकांचा विचार केला नसावा. यामुळे या कंपनीमधे वित्तीय अहवालांसाठी पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे आहेत किंवा कसे आणि असल्यास ते ३१ मार्च २०१८ दरम्यान प्रभावीपणे कार्य करीत होती किंवा कसे याविषयी पुरेसे व योग्य लेखापरिक्षणाचे पुरावे मिळविण्यास आम्ही असमर्थ आहोत.

वरील दावा नाकारण्याच्या अहवालाचा आम्ही कंपनीच्या भारतीय लेखा मानकानुसार केलेल्या वित्तीय विवरण पत्रकांचे लेखापरिक्षण करताना त्यासाठी लागू करावयाच्या लेखा परिक्षणाच्या चाचण्यांची मर्यादा, त्यांचे स्वरुप आणि वेळ निश्चित करण्यासाठी विचार केला आहे आणि आमच्या मुख्य लेखापरिक्षण अहवालातील ''भर देण्याचे विषय'' या परिच्छेदातील मजकूराच्या अधीन राहून निवेदन देतो की, उपरोक्त दावा नाकारण्यामुळे कंपनीच्या भारतीय लेखा मानकाप्रमाणे तयार केलेल्या वित्तीय विवरण पत्रावरील आमच्या अभिप्रायास बाधा येत नाही.

**पात्र मत :**

सदर कंपनी ही एक शासकीय उपक्रम असल्याने वित्तीय अहवालांसाठी कंपनीची अंतर्गत नियंत्रणांच्या प्रक्रियांची रचना ही विविध प्रकारची मॅन्यूअल्स, नियमावल्या, परिपत्रके आणि वेळोवेळी दिले जाणारे आदेश यांच्या आधारे केली आहे. त्यामुळे वित्तीय अहवालासाठीची अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यावरील आमचे मत त्यातील व्याख्येंवर आधारले आहे. वित्तीय विवरण पत्रकाच्या आमच्या लेखापरिक्षणात आम्ही प्रायोगिक तपासणीच्या आधारे आणि वित्तीय अहवालासाठीचा अंतर्गत नियंत्रण प्रक्रियेच्या पुरेशी असल्याबाबत आम्ही घेतलेल्या आढाव्याच्या आधारे नियंत्रण प्रक्रीयेच्या रचनेच्या प्रमाणामधे काही उणींवा निश्चित केल्या आहेत तसेच प्रक्रियेच्या उपयुक्ततेबाबत वरील ''पात्र मतांचा आधार'' या परिच्छेदात माहिती दिली आहे.

वरील ''पात्र मतांचा आधार'' या परिच्छेदत वर्णन केलेल प्रत्यक्ष दुर्बल घटक यांचे नियंत्रण निकषांच्या उद्देशावर झालेले / होऊ शकणारे परिणाम वगळता, आमच्या मते व आमची सर्वोतपरी उत्कृष्ट माहिती व आम्हास दिलेली स्पष्टीकरणे तसेच येथे खाली दिलेल्या 'इतर विषय' या परिच्छेदात ज्यांचा संदर्भ दिला आहे ते इतर लेखापरिक्षकांचे अहवाल यांच्या आधारे या कंपनीमधे ३१ मार्च २०१८ रोजी वित्तीय अहवालासाठी अंतर्गत नियंत्रणे अस्तित्त्वात होती आणि ती प्रभावीपणे कार्यरत होती.

आम्ही ज्या दुर्बल घटकांची ओळख निश्चिती केली ती विचारात घेऊन त्याचा विचार केला. ३१ मार्च २०१८ रोजीचे आम्ही केलेले कंपनीचे भारतीय लेखा मानकाप्रमाणे तयार केलेली स्वायत्त वित्तीय विवरण पत्रे यांचे लेखापरिक्षण करताना आमच्या लेखापरिक्षणाच्या चाचण्यांची मर्यादा, स्वरुप व वेळ ठरविण्यासाठी दुर्बल घटक विचारात घेतले.

चालू व स्थगित करांसंबधी अंतर्गत नियंत्रणे या संदर्भात वरील पात्र मत्तांचा आधार या परिच्छेद (४) यामधे वरील दुर्बल घटक यांचा कंपनीच्या वित्तीय विवरण पत्रकांवर होऊ शकणारे परिणाम हे आम्ही आमच्या मुख्य लेखापरिक्षण अहवालात नमूद केले आहे व पात्र करण्याचे मत नोंदविले आहे.

वरील 'पात्र मत्तांचा आधार' यातील परिच्छेद (१,२ आणि ३) यात दिलेले इतर प्रत्यक्ष दुर्बल घटक यामुळे कंपनीच्या भारतीय लेखा मानका प्रमाणे केलेल्या वित्तीय विवरण पत्रांवरील आमच्या अभिप्रायास बाधा येत नाही.

**इतर विषय :**

कंपनी गटातील तीन उपकंपन्या आणि एक सहयोगी कंपनी या भारतात संस्थापित झालेल्या कंपन्या असून त्यांचे लेखापरिक्षकांनी संबधित अहवाल दिले आहेत. कायद्याचे कलम १४३ (३) (१) अंतर्गत आम्ही वित्तीय अहवालासाठीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणे याची पुरेशी योग्यता व प्रवर्तनातील प्रभाव यावर आम्ही दिलेला अहवाल वरील अन्य लेखापरिक्षकांच्या अहवालाशी संबधित आहे.

वरील विषयाबाबत आमचे पात्रतेचे मत दिलेले नाही.

आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार

| | | |
|---|---|---|
| **के.एस.अय्यर ॲन्ड कंपनी करिता** | **एस.सी.बापना ॲन्ड असोशिएटस करिता** | **आर.एस.व्ही.ए.ॲन्ड कंपनी करिता** |
| सनदी लेखापाल | सनदी लेखापाल | सनदी लेखापाल |
| **एफ.आर.एन.१००१८६ डब्ल्यू** | **एफ.आर.एन.११५६४९ डब्ल्यू** | **एफ.आर.एन.११०५०४ डब्ल्यू** |
| **सी.ए.राजेश जोशी** | **सी.ए.प्रियांका डी.जखोटिया** | **सी.ए.शेखर कुलकर्णी** |
| भागीदार | भागीदार | भागीदार |
| **आय्.सी.ए.आय्.एम्.नं.३८५२६** | **आय्.सी.ए.आय्.एम्.नं.१५७४२६** | **आय्.सी.ए.आय्.एम्.नं.०४६२८५** |

स्थळ : मुंबई

दिनांक : २८ सप्टेंबर २०१८

## दि.३१ मार्च २०१८ रोजीचे ताळेबंद पत्रक (एकत्रित)

(₹ कोटीत)

| तपशील | संख्या क्र. | ३१-०३-२०१८ | ३१-०३-२०१७(पुनर्लिखित) |
|---|---|---|---|
| **मत्ता** | | | |
| **चालू नसलेल्या मत्ता** | | | |
| मत्ता, कारखाने साधने | १ | ४०८१८.१० | ४२८७७.९७ |
| प्रगतीपथावरील भांडवली कामे | २ | १३२४.६६ | १२०९.३९ |
| वजा : निकामी मालासाठी तरतूद | | (३२.४८) | (३२.२५) |
| निव्वळ : प्रगतीपथावरील भांडवली कामे | | १२९२.१९ | ११७७.१४ |
| अमूर्त मत्ता | १अ | ५.६३ | १२.२२ |
| विकसित होणाऱ्या अमूर्त मत्ता | २ | १३२.५५ | १२९.७७ |
| वित्तीय मत्ता | | | |
| उपकंपन्या सहयोगी व संयुक्त साहस कंपन्यातील गुंतवणूकी | ३ | (४१.३०) | (४०.३३) |
| व्यापारी येणी | ४ | ४२६५.२७ | ३०४४.३४ |
| इतर चालू नसलेल्या मत्ता | ५ | ११४३.३८ | १०७६.७९ |
| **एकुण चालू नसलेल्या मत्ता** | | **४७६१५.८२** | **४८२७७.९०** |
| **चालू मत्ता** | | | |
| वस्तू माल सूची | ६ | ९३३.४२ | १४१३.७० |
| वित्तीय मत्ता | | | |
| गुंतवणूकी | | | |
| व्यापारी येणी | ७ | ८७१५.६३ | ७६२७.६० |
| रोख व रोख समतूल्य | ८ | ०.२० | ३४.०८ |
| कर्जे | ९ | १३.०९ | ५४.४८ |
| इतर वित्तीय मत्ता | १० | २७३६.२४ | २४०३.८९ |
| इतर चालू मत्ता | ११ | १७०१.७१ | १९६९.२९ |
| विक्री / विल्हेवाटसाठी धारण केलेल्या मत्ता (वर्गीकरण) | १ब | २०७.३१ | २९०.५० |
| **एकुण चालू मत्ता** | | **१४,३०७.६०** | **१३,७९३.५४** |
| **एकुण मत्ता** | | **६१,९२३.४२** | **६२,०७१.४४** |
| **समभाग आणि दायित्त्वे** | | | |
| समभाग | | | |
| समभाग भांडवल | १२ | २५२४७.१५ | २४८५४.३६ |
| इतर समभाग | १३ | (६४८७.६५) | (६८३०.०४) |
| **निर्णय नियंत्रण असलेल्या समभाग धारकांचा वाटा** | | **१८७५९.५०** | **१८०२४.३१** |
| निर्णय नियंत्रण नसलेल्या समभाग धारकांचा वाटा | | २१.६७ | २१.६९ |
| **एकुण समभाग** | | **१८,७८१.१७** | **१८,०४६.०१** |
| **दायित्त्वे** | | | |
| **चालू नसलेली दायित्त्वे** | | | |
| वित्तीय दायित्त्वे | | | |
| उसनवारी | १४ | २४,२५०.६९ | २४,४९७.९५ |
| तरतुदी | १५ | ८६५.०१ | ७९७.६९ |
| स्थगित कर दायित्त्वे (निव्वळ) | १५अ | ८५३.०३ | १,५०७.३४ |
| इतर चालू नसलेली दायित्त्वे | १६ | ६१.८९ | ५३.६३ |
| **एकुण चालू नसलेली दायित्त्वे** | | **२६०३०.६२** | **२६८५६.६०** |
| **चालू दायित्त्वे** | | | |
| वित्तीय दायित्त्वे | | | |
| उसनवारी | १७ | ८१६९.८१ | ८८१९.२६ |
| व्यापारी देणी | १८ | १४३८.५० | १७०६.४० |
| इतर वित्तीय दायित्त्वे | १९ | ७२०३.७३ | ६३९३.४४ |
| इतर चालू दायित्त्वे | २० | २३.०० | ११.५२ |
| तरतुदी | २१ | २७६.५९ | २३८.२२ |
| **एकुण चालू दायित्त्वे** | | **१७,१११.६३** | **१७,१६८.८३** |
| **एकुण समभाग आणि दायित्त्व** | | **६१,९२३.४२** | **६२,०७१.४४** |

आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार
**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनी साठी**
सनदी लेखापाल
(एफ.आर.एन. १००१८६ डब्ल्यु)

सी.ए.राजेश जोशी
भागीदार (आयसीएआयएम नं.३८५२६)

**एस.सी.बापना ॲन्ड असोशिएट्स साठी**
सनदी लेखापाल,
(एफआरएन ११५६४९ डब्ल्यू)

सी.ए.प्रियांका जखोटीया
भागीदार (आयसीएआयएम नं.१५७४२६)

**आरएसव्हीए अँन्ड कंपनी साठी**
सनदी लेखापाल,
(एफआरएन - ११०५०४ डब्ल्यू)

सी.ए.शेखर कुलकर्णी
भागीदार, (आयसीएआयएम नं.०४६२८५)
मुंबई, दि.२८ सप्टेंबर २०१८.

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड करिता**

संतोष आंबेरकर
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन.नं.०५१७३६०७

बिपीन श्रीमाळी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन नं.०३२७२१३५

पंकज शर्मा
मुख्य महाव्यवस्थापक (लेखे)

राहूल दुबे
कंपनी सेक्रेटरी
एम नं.ए१४२१३

## ३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वर्षाचे नफा व तोटा पत्रक (एकत्रित)

(₹.कोटीत)

| तपशील | संख्या क्र. | २०१७-२०१८ | २०१६-२०१७(पुनर्लिखित) |
|---|---|---|---|
| **महसूल** | | | |
| **प्रवर्तनापासून महसूल** | | | |
| वीज विक्री | २२ | १९०११.०३ | १६६२३.७७ |
| इतर प्रवर्तनाचा महसूल | २३ | २०५०.४५ | १७३१.१५ |
| **इतर उत्पन्न** | २४ | २५६.२१ | १९९.९२ |
| **एकुण महसूल** | | **२१३१७.६९** | **१८५५४.८४** |
| **खर्च** | | | |
| वापरलेल्या साहित्याचा खर्च | २५ | ११५६०.८५ | ११०२२.६६ |
| कर्मचारी लाभ खर्च | २६ | १४०८.५८ | १२३९.६८ |
| वित्त खर्च | २७ | ३३२१.११ | २९०६.६१ |
| घसारा | १ व १ अ | २६५५.८५ | २१०७.२३ |
| इतर खर्च | २८ | २२९२.५३ | २०१८.३२ |
| **एकुण खर्च** | | **२१,२३८.९३** | **१९,२९४.५१** |
| **सहयोगी व संयुक्त उपक्रम या कंपन्याचा नफ्याचा वाटा, अपवादात्मक बाबी व कर यापूर्वीचा नफा** | | **७८.७६** | **(७३९.६७)** |
| सहयोगी व संयुक्त उपक्रम या कंपन्यांच्या नफ्याचा वाटा | २४ अ | (०.१७) | (०.०६) |
| अपावादात्मक बाब | | | |
| **कर पूर्व नफा** | | **७८.५९** | **(७३९.७३)** |
| **कर खर्च** | | | |
| चालू कर | | १२.२४ | २०.११ |
| स्थगित कर | १५ अ | (६५४.३१) | (२५.९७) |
| मागील वर्षातील करांसाठीची निर्लेखित केलेली तरतूद (निव्वळ) | | ०.०० | ०.०० |
| **एकुण कर खर्च** | | **(६४२.०६)** | **(५.८६)** |
| **कालावधीतील नफा / तोटा** | | **७२०.६६** | **(७३३.८७)** |
| **इतर सर्वंकष उत्पन्न** | | | |
| **नफा किंवा तोट्यात पुन्हा वर्गीकृत न होणाऱ्या बाबी** | | | |
| (१) व्याख्यांकित लाभ योजनांची पूनर्मोजणी | | (३५.३८) | (५८.११) |
| इतर सर्वंकष उत्पन्ना बाबींचे कर खर्च | | १२.२४ | २०.११ |
| (२) सहयोगी व संयुक्त उपक्रम कंपन्याच्या इतर सर्वंकष उत्पन्नाचा वाटा | | ०.०० | ०.०० |
| **कालावधीतील इतर सर्वंकष उत्पन्न (करोत्तर)** | | **(२३.१४)** | **(३८.००)** |
| **कालावधीत एकुण सर्वंकष उत्पन्न (करोत्तर)** | | **६९७.५२** | **(७७१.८७)** |
| **संबधितांना देणे** | | | |
| निर्णय नियंत्रण असलेल्या समभाग धारकांचा वाटा | | **७२१.३३** | **(७३३.५२)** |
| निर्णय नियंत्रण नसलेल्या समभाग धारकांचा वाटा | | **(०.६७)** | **(०.३५)** |
| वर्षभराचा नफा | | **७२०.६६** | **(७३३.८७)** |
| संबंधितांना द्यावयाचे इतर सर्वंकष उत्पन्न | | | |
| निर्णय नियंत्रण असलेल्या समभाग धारकांचा वाटा | | **(२३.१४)** | **(३८.००)** |
| निर्णय नियंत्रण नसलेल्या समभाग धारकांचा वाटा | | - | - |
| इतर सर्वंकष उत्पन्न | | **(२३.१४)** | **(३८.००)** |
| संबधितांना द्यावयाचे एकुण सर्वंकष उत्पन्न | | | |
| निर्णय नियंत्रण असलेल्या समभाग धारकांचा वाटा | | **६९८.१९** | **(७७१.५२)** |
| निर्णय नियंत्रण नसलेल्या समभाग धारकांचा वाटा | | **(०.६७)** | **(०.३५)** |
| **एकुण सर्वंकष उत्पन्न** | | **६९७.५२** | **(७७१.८७)** |
| प्रतिभाग मिळकत (मूळ) | ४४ | ०.२९ | (०.३०) |
| प्रतिभाग मिळकत (सौम्य केलेला प्रतिभाग मिळकत) | | ०.२९ | (०.३०) |

आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार
**के.एस.अय्यर अँन्ड कंपनी साठी**
सनदी लेखापाल
(एफ.आर.एन. १००१८६ डब्ल्यु)

सी.ए.राजेश जोशी
भागीदार (आयसीएआयएम नं.३८५२६)

**एस.सी.बापना अँन्ड असोशिएट्स साठी**
सनदी लेखापाल,
(एफआरएन ११५६४९ डब्ल्यू)

सी.ए.प्रियांका जखोटीया
भागीदार (आयसीएआयएम नं.१५७४२६)

**आरएसव्हीए अँन्ड कंपनी साठी**
सनदी लेखापाल,
(एफआरएन - ११०५०४ डब्ल्यू)

सी.ए.शेखर कुलकर्णी
भागीदार, (आयसीएआयएम नं.०४६२८५)
मुंबई, दि.२८ सप्टेंबर २०१८.

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड करिता**

संतोष आंबेरकर
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन.नं.०५१७३६०७

बिपीन श्रीमाळी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन नं.०३२७२१३५

पंकज शर्मा
मुख्य महाव्यवस्थापक (लेखे)

राहूल दुबे
कंपनी सेक्रेटरी
एम नं.ए१४२१३

## दि.३१ मार्च २०१८ रोजीचे संपलेल्या वर्षाचे एकत्रित रोकडता विवरण पत्रक

(₹.कोटीत)

| तपशील | २०१७-२०१८ | २०१६-२०१७ पूनर्लिखित |
|---|---|---|
| **अ) प्रवर्तन कार्यापासूनचा रोकडता प्रवाह** | | |
| निव्वळ नफा कर आणि असाधारण बाबी पूर्वीचा | ६९७.७० | (७७१.८२) |
| | | |
| **कर पूर्व नफा आणि प्रवर्तन कार्यात वापरलेल्या रोख रकमेचा मेळ करण्यासाठीची समायोजने:** | | |
| मत्ता, कारखाने साधने व अमूर्त मत्ता यांचा घसारा / कमी करणे | २,६५५.८५ | २,१०७.२३ |
| गुंतवणूकीचे मूल्य कमी करणे | - | - |
| वीत्त खर्च | ३,३२१.११ | २,९०६.६१ |
| विनिमय दरातील वसूल न झालेला फरक | ४०.८२ | (४७.१९) |
| संशयीत कर्जे व येणीसाठी तरतूद | ९.०३ | २०४.५२ |
| व्याज उत्पन्न | (०.४१) | (०.५२) |
| निकामी वस्तूमालासाठी तरतूद | २०.१५ | (७१.१५) |
| **मत्ता व दायित्त्वे बदलापूर्वीचा प्रवर्तनीय नफा, (उपबेरीज-१)** | **६,७४४.२४** | **४,३२७.६९** |
| | | |
| **खेळत्या भांडवलातील हालचाल** | | |
| व्यापारी येण्यातील (वाढ) / घट | (२,३१७.९९) | १४.०५ |
| कर्ज, अग्रिमे व इतर मत्ता यातील (वाढ) / घट | (६.८६) | (१,३५३.४१) |
| वस्तूमालातील (वाढ) / घट | ४६०.१२ | ५५९.९७ |
| दायित्त्वे व इतर देय यातील (वाढ) / घट | (५५९.०९) | (३८०.९७) |
| उपबेरीज (२) | **(२,४२३.८३)** | **(१,१६०.३७)** |
| | | |
| **प्रवर्तनातून निर्माण केलेली रोकड (१) + (२)** | **४,३२०.४२** | **३,१६७.३२** |
| | | |
| वजा - प्रत्यक्ष कर / एफ बी टी रिफंड / भरणा निव्वळ | ०.०० | ०.०० |
| **प्रवर्तन कार्यापासून निव्वळ रोख (अ)** | **४,३२०.४२** | **३,१६७.३२** |
| | | |
| **(ब) गुंतवणूक कार्यातून रोकडता प्रवाह** | | |
| मालमत्ता, कारखाने व साधने खरेदी (प्रगतीपथावरील भांडवली कामे समाविष्ट करून / भांडवलीकरण केलेले व्याज वगळून) | (७०७.२२) | (१,१९०.६६) |
| मालमत्ता, कारखाने व साधनांची विक्री | ०.०९ | ०.०० |
| उपकंपन्यातील गुंतवणूकी | (०.८२) | ३३.४५ |
| मिळालेले व्याज | ०.४१ | ०.५१ |
| **गुंतवणूक कार्यातून (वापरलेले) रोकडता प्रवाह निर्मिती (ब)** | **(७०७.५४)** | **(१,१५६.७०)** |
| | | |
| **क) वित्तीय कर्जापासून रोकडता प्रवाह** | | |
| दीर्घ मुदतीची कर्जे - उभारलेली | २,२००.९९ | ६,२१७.२१ |
| दीर्घ मुदतीच्या कर्जांची परतफेड | (२,१६१.४७) | (५,४४९.४७) |

(₹.कोटीत)

| तपशील | २०१७-२०१८ | २०१६-२०१७ पूनर्लिखित |
|---|---|---|
| समभाग वितरणापासून उत्पन्न | ३७.०० | ३९२.७९ |
| अल्प मुदतीच्या कर्जाची उभारणी / (परतफेड) | (६६४.७७) | (६५०.६९) |
| वित्त खर्च - भरलेले | (३,०७३.८२) | (२,६६०.७३) |
| **वित्तीय कार्यातून निव्वळ रोकडता प्रवाह निर्मिती / (वापर) (क)** | **(३,६६२.०६)** | **(२,१५०.८८)** |
| | | |
| **रोकड व रोकडता प्रवाहातील निव्वळ वाढ / (घट) (अ+ब+क)** | **(४९.१९)** | **(१४०.२६)** |
| वर्षाच्या आरंभीची रोख व रोख समतूल्य | ३४.०८ | १४४.३५ |
| वर्षाच्या अखेरीस रोख व रोख समतूल्य यांचा तपशील | (१५.११) | ४.०९ |
| **वर्षाच्या अखेरीस रोख व रोख समतूल्य यांचा तपशील:** | | |
| असलेले रोख व रोख समतूल्य | | |
| बँकांमधील शिल्लक: | | |
| - चालू खात्यात | ०.१७ | ३४.०१ |
| - अप्रवर्तनीय चालू खात्यात | | |
| ओव्हर ड्राफ्ट | (१५.३१) | (२९.९८) |
| हातातील शिल्लक | ०.०३ | ०.०७ |
| | | |
| **वर्षाच्या अखेरीस रोख व रोख समतूल्य** | **(१५.११)** | **४.०९** |

आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार
**के.एस.अय्यर अँड कंपनी साठी**
सनदी लेखापाल
(एफ.आर.एन. १००१८६ डब्ल्यु)

सी.ए.राजेश जोशी
भागीदार (आयसीएआयएम नं.३८५२६)

**एस.सी.बापना अँडअसोशिएट्स**
सनदी लेखापाल,
(एफआरएन ११५६४९ डब्ल्यू)

सी.ए.प्रियांका जखोटीया
भागीदार (आयसीएआयएम नं.१५७४२६)

**आरएसव्हीए अँड कंपनी**
सनदी लेखापाल,
(एफआरएन - ११०५०४ डब्ल्यू)

सी.ए.शेखर कुलकर्णी
भागीदार, (आयसीएआयएम नं.०४६२८५)
मुंबई, दि.२८ सप्टेंबर २०१८.

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि.करिता**

संतोष आंबेरकर
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन.नं.०५१७३६०७

बिपीन श्रीमाळी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन नं.०३२७२१३५

पंकज शर्मा
मुख्य महाव्यवस्थापक (लेखे)

राहूल दुबे
कंपनी सेक्रेटरी
एम नं.ए१४२१३

## समभागातील बदलांचे विवरण पत्रक (एकत्रित)

### १. समभाग भांडवल

| तपशील | (₹.कोटीत) |
|---|---:|
| **दि.०१/०४/२०१६ रोजीची स्थिती** | **२४,०९८.३८** |
| समभाग भांडवलातील बदल | ७५५.९८ |
| **दि.०१/०४/२०१७ रोजीची स्थिती** | **२४,८५४.३६** |
| समभाग भांडवलातील बदल | ३९२.७९ |
| **दि.३१/०३/२०१८ रोजीची स्थिती** | **२५,२४७.१५** |

### २. इतर समभाग:

| तपशील | वाटप प्रलंबित असलेला शेअर ॲप्लीकेशन मनी | ठेवून घेतलेली मिळकत | इतर सर्वकष उत्पन्न | इतर समभाग | एकूण इतर समभाग | कंपनीच्या मालकास एकूण देय | अनियंत्रित समभाग धारकांचा वाटा | एकूण इतर समभाग |
|---|---:|---:|---:|---:|---:|---:|---:|---:|
| **दि.०१/०४/२०१६ रोजी** | ७५५.९८ | (६,४१८.०१) | (३५.८४) | ६२.८५ | (५,६३५.०२) | (५,६५६.२९) | २१.२८ | (५,६३५.०२) |
| **वर्षातील नफा किंवा तोटा** | - | (७३३.८७) | - | - | (७३३.८७) | (७३३.५२) | (०.३५) | (७३३.८७) |
| वर्षभरातील इतर सर्वंकष उत्पन्न | - | - | (३८.००) | - | (३८.००) | (३८.००) | - | (३८.००) |
| शेअर ॲप्लीकेशन मनी मधील भर | ३९२.७९ | - | - | (३८.२८) | ३५४.५१ | ३५३.७५ | ०.७६ | ३५४.५१ |
| वर्षात वितरीत केलेले भाग | (७५५.९८) | - | - | - | (७५५.९८) | (७५५.९८) | - | (७५५.९८) |
| **दि.०१/०४/२०१७ रोजी** | ३९२.७९ | (७,१५१.८८) | (७३.८४) | २४.५७ | (६,८०८.३५) | (६,८३०.०४) | २१.६९ | (६,८०८.३५) |
| **वर्षातील नफा किंवा तोटा** | - | ७२०.६६ | - | - | ७२०.६६ | ७२१.३३ | (०.६७) | ७२०.६६ |
| वर्षातील इतर सर्वंकष उत्पन्न | - | - | (२३.१४) | - | (२३.१४) | (२३.१४) | - | (२३.१४) |
| शेअर ॲप्लीकेशन मनी मधील भर | ३७.०० | - | - | ०.६३ | ३७.६३ | ३७.०६ | ०.५८ | ३७.६३ |
| वर्षात वितरीत केलेले भाग | (३९२.७९) | - | - | - | (३९२.७९) | (३९२.७९) | - | (३९२.७९) |
| **दि.३१/०३/२०१८ रोजी** | **३७.००** | **(६,४३१.२१)** | **(९६.९७)** | **२५.२१** | **(६,४६५.९८)** | **(६,४८७.६५)** | **२१.६७** | **(६,४६५.९८)** |

आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार
**के.एस.अय्यर ॲंड कंपनी साठी**
सनदी लेखापाल
(एफ.आर.एन. १००१८६ डब्ल्यु)

सी.ए.राजेश जोशी
भागीदार (आयसीएआयएम नं.३८५२६)

**एस.सी.बापना ॲंडअसोशिएट्स**
सनदी लेखापाल,
(एफआरएन ११५६४९ डब्ल्यू)

सी.ए.प्रियांका जखोटीया
भागीदार (आयसीएआयएम नं.१५७४२६)

**आरएसव्हीए ॲंड कंपनी**
सनदी लेखापाल,
(एफआरएन - ११०५०४ डब्ल्यू)

सी.ए.शेखर कुलकर्णी
भागीदार, (आयसीएआयएम नं.०४६२८५)
मुंबई, दि.२८ सप्टेंबर २०१८.

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि.करिता**

संतोष आंबेरकर
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन.नं.०५१७३६०७

बिपीन श्रीमाळी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन नं.०३२७२१३५

पंकज शर्मा
मुख्य महाव्यवस्थापक (लेखे)

राहूल दुबे
कंपनी सेक्रेटरी
एम नं.ए१४२१३

## ३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रांवर टिपा:

### १. कंपनीचे सर्वांगिण दर्शन आणि महात्त्वाची लेखा धोरणे:

**अ. कंपनीच्या रचनेची माहिती:**

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड (''सूत्रधारी कंपनी'') ही कंपनी अधिनियम १९५६ नुसार संस्थापित झालेली कंपनी आहे आणि भारत देशातील अधिवासी संस्था आहे. सदर सूत्रधारी कंपनी आणि तिच्या उपकंपन्या या सुचिबद्ध (लिस्टेड) कंपन्या नाहीत. त्यांचे १०० टक्के शेअर्स मराविम सूत्रधारी कंपनी लिमिटेड या कंपनीने धारण केलेले आहेत.

सदर सूत्रधारी कंपनी ही विजेची निर्मिती करण्याच्या व्यवसायात कार्यरत आहे त्यासाठी कंपनीचे महाराष्ट्र राज्यात सर्वत्र औष्णिक, जलविद्युत, वायू आधारीत आणि सौर ऊर्जेचे वीज निर्मिती केंद्रे आहेत. ती प्रामुख्याने तिची सहोदर उपकंपनी 'महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण)' या संस्थेला वीज पुरवठा करते. या विजेचे दराचे महाराष्ट्र वीज नियामक आयोग (एम इ आर सी) या नियामक संस्थेकडून नियमन केले जाते.

येथे जोडलेले एकत्रित वित्तीय विवरण पत्रके यामधे महानिर्मिती आणि तिच्या उपकंपन्यांच्या वित्तीय विवरणपत्रकांचा समावेश होतो. या सर्व समूहाला एकत्रितपणे ''कंपनी गट'' असे येथे संबोधले आहे. या गटाचे संयुक्त साहस कंपन्यात हितसंबंध आहेत.

एकत्रित गटातील समाविष्ट कंपन्यांची माहिती खाली दिली आहे.

| अनु. क्र. | नाव | स्थापनेचा देश | स्वरूप | मालकीचे हितसंबंधाचे प्रमाणे ३१/३/२०१८ रोजीचे |
|---|---|---|---|---|
| १. | धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड | भारत | उपकंपनी | १००% |
| २. | महाजनको ॲश मॅनेजमेंट सर्व्हिस लिमिटेड | भारत | उपकंपनी | १००% |
| ३. | महागूज कोलायरीज लिमिटेड | भारत | उपकंपनी | ६०% |
| ४. | यु सी एम | भारत | सहयोगी | १८.७५% |

**महत्त्वाची लेखा धोरणे:**

ही एकत्रित वित्तीय विवरणपत्रके तयार करणे व सादर करणे यासाठी खालील महत्त्वाची लेखा धोरणे अंगीकरण्यात आली आहेत.

**ब) वित्तीय विवरणपत्रके तयार करण्याची आधारभूत तत्त्वे:**

**१. भारतीय लेखा मानकांचे अनुपालन करण्यासंबधीचे निवेदन:**

ही एकत्रित वित्तीय विवरणपत्रके सर्वार्थाने 'भारतीय लेखा मानके याचे अनुपालन करून तयार केली आहेत. ही भारतीय लेखा मानके, कंपनी अधिनियम २०१३ (कायदा) यातील कलम १३३ (ज्याचे सहवाचन कंपन्यांसाठी (भारतीय लेखा मानके) नियमावली २०१५ यातील नियम ३ आणि कंपन्यांची (भारतीय लेखा मानके) दुरुस्त केलेली नियमावली २०१६ या सोबत होते.) त्यानुसार अधिसूचित केल्याप्रमाणे तसेच कंपनी अधिनियम २०१३ च्या तरतुदी यांचे अनुपालन करतात.

कंपनी गटाच्या सादरीकरणासाठी 'भारतीय रुपया' हे चलन वापरले आहे. तसेच तिच्या व्यवहाराचे चलन सुद्धा 'भारतीय रुपया' हेच आहे. वित्तीय विवरण पत्रकातील सर्व रकमांच्या आकडेवारीचे जवळच्या कोटी रुपयामधे (रु. कोटी) रुपांतरण केले आहे. (जेथे इतर काही निर्देश असेल त्याचा अपवाद)

ही एकत्रित वित्तीय विवरणपत्रके वितरीत करण्यासाठी महानिर्मितीच्या संचालक मंडळाने दि.२८/०९/२०१८ रोजीच्या ठरावाने मंजुरी दिली आहे.

**एकत्रीकरणाची तत्त्वे :**

**उपकंपन्या:**

उपकंपन्या म्हणजे कंपनीतर्फे नियंत्रित केल्या जातात अशा सर्व संस्था (यामधे विशेष हेतूसाठी अस्तित्त्वात आणलेल्या संस्थांचाही समावेश आहे.) जेव्हा अस्तित्त्वात आणलेल्या संस्था मधील गुंतवणूकीपासून सूत्रधारी कंपनीला परताव्याची अपेक्षा किंवा अधिकार असतो आणि संस्थेवर आपल्या शक्तीचा वापर करून त्या परताव्यांवर परिणाम करण्यासाठी सूत्रधारी कंपनीकडे सामर्थ्य असते तेव्हा ती नियंत्रणे कार्यरत आहेत असे मानले जाते. नियंत्रणाचे मूल्यांकन करण्यासाठी, जर हक्क सबल असतील तरच संभाव्य मतदानाचे हक्क विचारात घेतले जातात. नियंत्रण सुरु होण्याच्या तारखेपासून ते संपण्याच्या तारखेपर्यंतची वित्तीय विवरणपत्रके या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांमधे समाविष्ट केली आहेत. कंपनी, उपकंपन्या, व संयुक्त नियंत्रणातील संस्था यांचे एकत्रीकरण करण्यासाठी त्यांचे समान व्यवहार व समान परिस्थितीतील इतर घटना यासाठी 'समान लेखा धोरण' समान लेखे वापरले आहे

व त्यात नमूद केलेल्या पद्धतीचा उपयोग केला आहे. एकूण कंपनी गटाची एकत्रित वित्तीय विवरण पत्रके लाईन बाय लाईन या तत्त्वाने एकत्रित केली आहेत.

**सहयोगी / संयुक्त साहस कंपन्या (समाभागात गुंतवणूकीचे लेखे)**

संयुक्त साहस कंपनी म्हणजे अशी एक रचना असते ज्यात एका संमत कराराद्वारे कंपनीचे संयुक्त नियंत्रणे संस्थापित केलेली असतात आणि त्यातील वित्तीय व प्रवर्तनाच्या निर्णयासाठी सर्वानुमते संमती आवश्यक असते. संयुक्त नियंत्रणातील संस्थेतील गुंतवणूकीचे लेखे करण्यासाठी इक्विटी मेथड (इक्विटीमध्ये गुंतवणूकदारांचा समावेश) वापरली जाते व प्रारंभी तिला खर्चानुसार मान्यता दिली जाते. अशा संस्थेत जर नियंत्रण नसणाऱ्या हितसंबंधी धारणकर्त्यांकडे मोठ्या प्रमाणात सहभागी होण्याचे अधिकार असतील आणि त्यामुळे त्यांना संस्थेच्या सर्वसामान्य व्यवहारातील निर्णयामधे प्रभाव मिळत असेल तर कंपनी अशा संस्थांचे एकत्रीकरण करीत नाही. अशा संस्थेतील गुंतवणूकीचे लेखे - इक्विटी मेथड ऑफ अकाऊंटींग या प्रकारे केले जाते.

**एकत्रीकरणासाठी काही व्यवहार वगळणे:**

एकत्रित वित्तीय विवरण पत्रे तयार करताना कंपनी गटांतर्गत शिलकी, व्यवहार, वसूली न झालेले उत्पन्न व काही खर्च हे पूर्णपणे वगळले जातात. ज्यामधे गुंतवणूक केली आहे अशा इक्विटीमध्ये गुंतवणूकदारांचा समावेश असणाऱ्या संस्था यामधील व्यवहारातून वसूल न झालेली प्राप्ती किंवा तोटे हे कंपनीचे त्या संस्थेतील गुंतवणूकीच्या प्रमाणात वगळले जातात.

**अनियंत्रित समभाग धारकांचा वाटा**

अनियंत्रित समभाग धारकांच्या वाट्याचे मापन अशा हितसंबंधीकडे असलेल्या संपादनाच्या तारखेला ज्याची निवड ओळख निश्चिती करता येईल अशा मत्तांच्या भागाच्या प्रमाणात केली जाते. गटातील समभागांचे बदलाचा लेखे केले जातात.

**चालू / चालू नसलेल्या मत्ता व दायित्त्वे यांचे वर्गीकरण:**

कंपनी अधिनियम २०१३ ची सूची - क्र. तीन यात दिलेले निकष आणि कंपनीचे सामान्यतः कार्यचक्र यानुसार गटातील मत्ता व दायित्त्वे यांचे वर्गीकरण ‘चालू’ आणि ‘चालू नसणाऱ्या’ या प्रकारांमधे केले आहे. स्थगित कर मत्ता आणि दायित्त्वे यांचे त्यांच्या निव्वळ तत्त्वावर ‘चालू नसणाऱ्या’ यामधे वर्गीकरण केले आहे.

वरील हेतुसाठी कंपनी गटाने कार्यचक्र बारा महिन्यासाठी निश्चित केले आहे. तसेच ते उत्पादनाचे स्वरुप आणि उत्पादनासाठी लागणारे निवेश - साहित्य यांचे संपादन करण्यासाठी लागणारा वेळ व त्यांचे रोख आणि रोख समतूल्य यात रुपांतरण यावर आधारलेले असते.

सुत्रधारी कंपनीवर विद्युत अधिनियम २००३ चा अंमल आहे. विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदींचे त्यातील नियमावली सोबत सहवाचन केले जाते आणि जेव्हा त्या कंपनी अधिनियम २०१३ च्या लागू होणाऱ्या तरतूदींशी सुसंगत होत नसतील तेव्हा विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १७४ च्या अटींनुसार विद्युत अधिनियम २००३ आणि त्याची नियमावली अभिभावी होतील.

२. **ऐतिहासिक खर्च संकेतावर टिपा:**

ऐतिहासिक खर्च संकेतानुसार एकत्रित वित्तीय विवरण पत्रके तयार करण्यासाठी कंपनी ही ‘सतत कार्यरत संस्था’ असल्याचे मानले आहे. तसेच एकत्रित वित्तीय विवरण पत्रके उपार्जन तत्त्वावर आधारित आहेत. मात्र त्याला खालील बाबींचा अपवाद आहे.

अ) रास्त मूल्यावर आधारित काही वित्तीय विलेख

ब) कर्मचारी व्याख्यांकित लाभ योजना, आणि

क) विक्रीसाठी काढलेल्या मत्ता - ज्यांचे मापन त्यांच्या चालू रकमांपेक्षा कमी झाले आहे आणि रास्त मूल्य वजा विक्रीचा खर्च असे केले आहे, त्यांचे मापन प्रत्येक अहवाल कालावधीच्या अखेरीस रास्त मूल्याने केले जाते; याबाबतचे स्पष्टीकरण खाली दिलेल्या लेखा धोरणात केले आहे.

३. **सुज्ञ निर्णय आणि अंदाज यांचा उपयोग करणे:**

कंपनीची वित्तीय विवरण पत्रके तयार करण्यासाठी व्यवस्थापनाला काही न्याय निर्णय, अंदाज करावी लागतात तसेच गृहिते धरावी लागतात. त्याचा परिणाम अहवालात दिलेल्या महसूल, खर्च, यांच्या रकमांवर तसेच मत्ता व दायित्त्वे यावर आणि सोबतची प्रकटने व आकस्मिक दायित्त्वे यांच्यावर होत असतो. सदर गृहिते आणि अंदाज अनिश्चित असल्यास प्रत्यक्ष निकाल यांचे समायोजन करावे लागते. भविष्यकाळात मत्ता व दायित्त्वे यांच्यावर काय परिणाम होऊ शकतील याबाबत त्यांच्या रकमांचे समायोजन केले जाते. अंदाज व गृहिते यांचे कंपनी गटासाठी सर्वोतपरी उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे मूल्यमापन केले जाते.

विशेषतः लेखा धोरणे लागू करताना महत्त्वाच्या क्षेत्रातील अंदाज व न्याय निर्णय यांच्या माहितीचे वित्तीय विवरण पत्रातील मान्य रकमांवर होणारे महत्त्वाचे परिणाम खाली दिले आहेत.

- मालमत्ता, कारखाने व साधने तसेच अमूर्त मत्ता यांचे उपयुक्त आणि उर्वरित आयुष्य याविषयीचे अंदाज करणे,
- अ-वित्तीय मत्ता कमी करणे
- वित्तीय विलेखांच्या रास्त मूल्यांची मोजणी
- व्याख्यांकित लाभ बंधनाचे व महत्त्वाच्या विमागणिती गृहितांचे मापन
- तरतुदी आणि आकस्मिक परिस्थती
- स्थगित कर मत्ता यांच्या वसुली योग्यतेचे मूल्यमापन

लेखांच्या अंदाजामधे सुधारणा केल्यास वित्तीय विवरण पत्रांच्या कालावधीकरिता भविष्यातील परिणाम विचारात घेऊन त्यांना प्रेक्षपाने मान्यता दिली जाते. जर भविष्यातील काळात बाधा येणार असेल तर संबंधित लेखा मानकानुसार त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने समजणे आवश्यक असेल तशी मान्यता देण्यात येते.

**४. मत्ता, कारखाने आणि साधने:**

१. मालकीची जमीन प्रचलीत किमती प्रमाणे धरली जाते. मत्ता, कारखाने आणि साधने या त्यांच्या किमती, संचीत घसाऱ्याची निव्वळ आणि जर काही कमी करण्याची संचीत तोटे असतील तर त्याप्रमाणे नमूद केले जातात.

२. कोणत्याही मत्तांच्या प्रारंभिक खर्चात पुढील बाबी समाविष्ट असतात. खरेदीची किंमत किंवा मत्ता उभारणीचे खर्च (यामधे आयात शूल्क, माल वाहतूक भाडे, परतावा न मिळणारे कर यांचा अंतर्भाव असतो) याशिवाय सदर मत्ता तिच्या जागेवर आणण्यासाठी प्रत्यक्ष केलेले खर्च, ती इच्छित कामासाठी संचलीत करण्यासाठी केलेले खर्च आणि मत्ता पात्र करण्यासाठीचे कर्ज खर्च, मत्ता इच्छित वापरासाठी तयार करण्यास लागलेला वेळ इत्यादी.

मत्तेचे खरेदी मूल्य म्हणजे एकत्रित दिलेली रक्कम आणि सदर मत्ता संपादनासाठी विचारात घेतलेल्या इतर बाबींचे रास्त मूल्य होय. यंत्राच्या खर्चात यंत्र प्रायोगिक तत्त्वावर चालविण्योच खर्च आणि चालू करण्याचे इतर खर्च म्हणजे वाहतूक खर्च, स्थापन करण्याचे आकार, बांधकाम, उभारणी कालावधीतील इतर उत्पन्नाची निव्वळ रक्कम इत्यादी यांचा समावेश केला जातो. ज्या प्रकल्पांचे काम चालू आहे त्यांचा प्रचलीत खर्च धरला जातो. त्यात थेट खर्च, संबधित प्रवर्तन पूर्व प्रासंगिक खर्च आणि देय व्याज यांचा समावेश असतो.

जर एखाद्या बाबीपासून कंपनीला भविष्यात आर्थिक लाभ मिळणे संभवनीय असेल आणि अशा मत्तांचा खर्च जर विश्वसनीयरित्या मोजता येत असेल तरच असे नंतरचे खर्च त्या मत्तांच्या प्रचलीत रकमेत समाविष्ट केले जातात किंवा त्यांना योग्य स्वतंत्र मत्ता म्हणून मान्यता देण्यात येते.

३. जर कंपनीने केलेल्या भांडवली खर्चातून, जिच्यावर कंपनीची मालकी किंवा नियंत्रण नाही अशी मत्ता निर्माण केली जात असेल तर असे खर्च मत्तांचे बांधकाम चालू असे पर्यंत प्रगतीपथावरील भांडवली कामे यामधे दाखविले जातात आणि त्याच्या समतूल्य रक्कम अप्रचलित मत्ता खर्च म्हणून वजा केली जाते आणि ती ज्यावर्षी खर्च केली त्या वर्षाच्या नफा तोटा पत्रकात आकारली जाते. बांधकाम पूर्ण झाल्यावर वरील भांडवली खर्चाचे भांडवलीकरण केले जाईल आणि त्याचे समायोजन 'कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्ता' यांच्या तरतुदीत केले जाईल. कंपनीची मालकी नसलेला मत्ता आणि कंपनीच्या सामाजिक जबाबदाऱ्यांच्या कार्यासाठी दिलेले अंशदान जेव्हा खर्च होईल तेव्हा त्याची आकारणी नफा-तोटा पत्रकात केली जाईल.

४. मत्ता धोरण समर्थ करणे: (प्रकरण निहाय तत्त्वानुसार) कंपनीला तिच्या अन्य काही मत्तांद्वारे भविष्यात आर्थिक लाभ मिळविण्यासाठी मालमत्ता, कारखाने व साधने यातील काही उपयुक्त बाबी संपादन कराव्या लागतात. (या बाबी स्वतः भविष्यात आर्थिक लाभ मिळवून देतीलच असे नसते) अशा बाबींना 'मत्ता' म्हणून मालमत्ता, कारखाने व साधने यात पात्रता द्यावी) लागते. कारण त्यातून कंपनीला भविष्यात अन्य संबंधित मत्तांद्वारे आर्थिक लाभ मिळविता येतात. या बाबी संपादन केल्या नसत्या तर असे जादा आर्थिक लाभ मिळू शकले नसते. मात्र कंपनी या मत्तांचे त्यांच्या व्यक्तीशः प्रकरण निहाय स्वरुपाची पडताळणी केल्यानंतर त्यांचे भांडवलीकरण करते.

५. प्रगतीपथावरील भांडवली कामांमधे कंत्राटदाराचे देयकाचे अंतिमीकरण करणे राहिले आहे, त्यांचे भांडवलीकरण हंगामी तत्त्वावर केले जाते. मात्र ते अंतिम चुकते होण्याच्या वर्षात समायोजन करण्याचे अधीन असते.

६. भांडवली कंत्राटाच्या किमतीच्या विचलनाच्या दाव्यांच्या प्रकरणी कंपनीने दावे स्वीकारले तरच त्यांचे लेखे केले जातात.

७. जेव्हा 'मत्ता, कारखाने व साधने' यातील मान्यता एखादी बाब किंवा तिचा महत्त्वाचा भाग याची विल्हेवाट केल्यास, त्याची मान्यता काढून घेतली जाते किंवा जर अशा मत्ताच्या वापरातून भविष्यात कोणतेही आर्थिक लाभ मिळण्याची अपेक्षा नसते तेव्हा त्यांची मान्यता काढून घेतली जाते. ही मान्यता काढल्यानंतर होणारी प्राप्ती किंवा हानी यांचा समावेश नफा-तोटा पत्रकात समाविष्ट केली जाते.

८. जमिनीच्या भाडेपट्टीची व्यवस्था ज्या तारखेला केली जाईल त्या दिवसापासून तिचे वर्गीकरण 'वित्तीय भाडे' असे केले जाईल. या भाडेपट्टीच्या कालावधीत अशा जमिनी संबंधीच्या सर्व जोखीमा आणि मोबदले कंपनीकडे हस्तांतरीत केल्या जातात.

९. मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्या आवश्यक सुट्ट्या भागाचे मूल्य त्यांच्या प्रवेश मूल्याच्या मर्यादांपेक्षा जास्त असले तर त्यांचे भांडवलीकरण 'मालमत्ता, कारखाने आणि साधने' यामधे केले जाते. अन्य प्रकरणी सुटे भाग संपादन केल्याबरोबर त्या वस्तूमालसाठा सूचीमधे समाविष्ट केल्या जातात आणि त्या वापरल्यानंतर त्यांची आकारणी नफा व तोटा पत्रकात केली जाते.

१०. यंत्रांचे जे सुटे भाग ज्या वर्षी निकामी होतात; त्यावर्षी त्यांचे कमी केलेले लिखित मूल्य नफा-तोटा पत्रकात आकारले जाते. मात्र या जुन्या भागाच्या ऐवजी नवे भाग कार्यान्वित झाले पाहिजेत आणि जुने भाग निरूपयोगी झाले असले पाहिजेत. जर जुने भाग दुरुस्त करुन पुनर्वापरासाठी योग्य झाले तर त्या दोन्ही भागांचे त्यांच्या उर्वरित उपयुक्त आयुष्याच्या काळासाठी घसारा करण्यात येईल. जुन्या संबंधित भागांच्या दुरुस्तीच्या खर्चाची आकारणी नफा-तोटा पत्रकात होईल.

११. जेव्हा मत्ता किंवा भांडवली सुटे भाग बदलण्यात आला आणि अशा मुळ मत्ता / भाग यांची कमी झालेले मूल्य माहिती नसेल तर, मत्ता / यंत्र यांच्या नव्या भागाची / भांडवली सुट्या भागाची किंमत / निव्वळ पुस्तकी मूल्य निर्लेखित केले जाईल.

१२. कंपनीने पूर्वीच्या जी ए ए पी नुसार मालमत्ता, कारखाने यांचे चालू मूल्य हेच भारतीय लेखा मानकाच्या संक्रमण तारखेस अभिदत्त मूल्य म्हणून मानल्याचे ठरविणे आहे.

**५. अमूर्त मत्ताः**

अमूर्त मत्ता या त्यांच्या संचित घसारानंतरची निव्वळ किंमत आणि जर काही असेल तर, कमी करण्याची संचित हानी त्यांच्या निव्वळ किमतीनुसार पुढे नेण्यात येतात. अमूर्त मत्ता साठी सॉफ्टवेअर व्यतिरिक्त त्यांच्या उपयुक्त आयुष्यासाठी सरळ रेषा पद्धतीने घसारा तरतूद केली जाते. सॉफ्ट वेअरची घसारा तरतूद महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगामधे विहित केलेल्या आयुष्यासाठी केली जाते. अमूर्त मत्तांचा घसाराचा खर्च आणि कमी करण्याची हानी यांना नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. कंपनीने अस्तित्त्वातील अमूर्त मत्तांचे मूल्य हेच भारतीय लेखा मानकात संक्रमण करण्याच्या तारखेचे अभिदत्त मूल्य मानण्याचे ठरविले आहे.

**६. प्रगतीपथावरील भांडवली कामेः**

१. मालमत्ता, कारखाने व साधने यातील नवे प्रकल्प / विस्तार कार्यान्वित होण्याच्या तारखेपर्यंतचे संबधित खर्च व कर्जाचे मूल्य यांचे भांडवलीकरण कले जाते.

२. कंपनीने प्रकल्प व नियोजनासाठी त्यांच्या कालावधीसाठी केलेले कार्यालयीन खर्चासह सर्व खर्च यांचे विनियोजन संबधित प्रकल्पाची 'प्रगतीपथावरील भांडवली कामे' यांच्या लेख्यात त्यासाठी मत्तांचा बांधकामाच्या संचित शिलकीच्या आधारे केले जाते.

**७. परिसमापनातील नुकसानाचे ज्यावर्षी आकार घेईल त्या वर्षाच्या मालमत्ता, कारखाने व साधने यांच्या खर्चात समायोजित करण्यात येईल.**

**८. कर्जाचे खर्चः**

निधी कर्जाने घेतल्यावर त्या संबंधीचे केलेले इतर खर्च आणि व्याज यांचा कर्जाच्या खर्चात समावेश होतो. ज्या मत्ता त्यांच्या इच्छित वापरासाठी तयार होण्यसासाठी बराच वेळ घेतात, त्यांच्या संपादनासाठी केलेले कर्जाचे थेट खर्चाचे भांडवलीकरण, ज्या महिन्यात या मत्ता तयार होतील, तो पर्यंतच्या खर्चाचा भाग म्हणून केले जाते. भांडवली मत्ता संपादन किंवा उभारणी याच्याशी संबंधित नसलेले इतर उसनवारीचे खर्च यांना त्यांच्या कालावधीमधे मान्यता दिली जाते.

**९. अवित्तीय मत्ता कमी करणेः**

वस्तूसूची, स्थगित कर मत्ता आणि विक्रीला काढलेल्या म्हणून वर्गीकरण केलेल्या चालू नसलेल्या मत्ता या व्यतिरिक्त अवित्तीय मत्तांचा ताळेबंदाच्या तारखेस आढावा घेऊन त्या कमी करण्याची चिन्हे दिसतात का याचा आढावा घेण्यात येतो.

जर अशी काही चिन्हे दिसली तर, किंवा जर मत्ता कमी करण्यासाठी वार्षिक परिक्षणाची गरज असेल तर कंपनी त्या मत्तापासून वसूल होऊ शकणाऱ्या रकमेचा अंदाज करते. अशी वसूली योग्य किंमत ही अशा मत्तांपासून रोख निर्मिती वजा त्यांच्या विल्हेवाटीचा खर्च आणि वापराचा खर्च यापेक्षा जास्त असावी. ज्या मत्तांची रोकडता अंतप्रवाह इतर मत्ता किंवा मत्तांचा गट यापासून मोठ्या प्रमाणात स्वतंत्र असेल तर त्या वगळून प्रत्येक मत्तांची वसूली योग्य रक्कम ठरविली जाते.

जी मत्ता चालू ठेवण्याचा खर्च किंवा तिची रोख निर्मितीची क्षमता वसूल होण्याजोग्या रकमेपेक्षा जास्त असते तेव्हा ती कमी करण्याचा विचार केला जातो व त्या वसूलीयोग्य किमती इतके तिचे कमी मूल्य लिहिले जाते.

वापरातील मूल्य ठरविण्यासाठी भविष्यातील अंदाजे रोख प्रवाह तिच्या विद्यमान मूल्य इतका कमी केला जातो. यासाठी चालू बाजारातील पैशाचे वेळेनुरूप मूल्य दर्शक कर पूर्व सवलत दर वापरला जातो आणि मत्तेचे निश्चित धोकेही विचारात घेतले जातात. रास्त मूल्य वजा विल्हेवाटीचा खर्च निश्चित करण्यासाठी बाजारातील अलीकडचे व्यवहार विचारात घेतले जातात. असे व्यवहार अनुपलब्ध असल्यास, मूल्यांकनाचे योग्य प्रारुप वापरले जाते.

**१०. घसारा / कर्जफेडीची तरतूद**

**अ) भाडेपट्टीच्या जमिनीसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग नियमनान विहित केलेल्या सरळ रेषा तत्त्वपद्धतीनुसार ३.३४ टक्के दराने कर्जफेडीची तरतूद केली जाते.**

**ब) मत्ता, कारखाने आणि साधने:**

१) सूत्रधारी कंपनी ही दर नियमन करणारी संस्था असल्याने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विहीत केल्याप्रमाणे घसाऱ्याचे दर, कार्यपद्धती आणि मत्तांचे आयुष्य मापन अनुसरण्यात येतात. त्याचनुसार कंपनी सरळ रेषा पद्धतीनुसार मत्ताच्या खर्चाच्या ९० टक्के पर्यंत घसारा आकारते.

२) वर्षभरात मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्यातील भर / विल्हेवाट / काढून टाकणे यासाठीचा घसारा वरील कृतींच्या महिन्यात यथा प्रमाण तत्त्वाने केला जातो. ग्रीन फिल्ड / ब्राऊन फिल्ड यांचे वाणिज्यिक कार्य सुर होण्याच्या तारखेपासून त्यांचे भांडवलीकरण नफा-तोटा पत्रकात आकारले जाते.

३) ज्या मत्तांचा (खालील परिच्छेद (४) यात नमूद केलेल्या मत्ता वगळून) कार्यान्वयानंतर घसारा ७० टक्क्यांमार्फत आकारलेला नाही, त्यांच्या ठोक किमतीवर घसाऱ्याची आकारणी ७० टक्के होण्याचा वर्षापर्यंत येथे खाली दिलेल्या घसारा दराने केली जाते. ७० टक्के घसारा झाल्यानंतर उर्वरित उपयुक्त आयुष्यासाठी कंपनी ९० टक्के दराने घसारा आकारते. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार औष्णिक व वायू आधारीत वीज निर्मितीकेंद्रे २५ वर्षे आणि जल विद्युत केंद्रासाठी ३५ वर्षे असे उपयुक्त आयुष्य विहित केले आहे.

| **मत्ताचा प्रकार** | **घसारा %** |
|---|---|
| जल विद्युत, वाफ वीज, वायू आधारीत वीज निर्मिती केंद्रातील कारखाने व यंत्रे, कुलींग टॉवर्स, हायड्रॉलिक बांधकामे, ट्रान्फॉर्मर्स व इतर स्थापित साधने, पारेषणाच्या तारा, केबल नेटवर्क इत्यादी | ५.२८% |
| इमारती आणि इतर स्थापत्य कामे | ३.३४% |

४) खालील मत्तांच्यासाठी सरळ रेषा पद्धतीने मत्तांच्या मूल्यांचा ९० टक्के पर्यंत घसारा खालील दराने आकारला जातो.

| **मत्ताचा प्रकार** | **घसारा %** |
|---|---|
| फर्नीचर जोडणी व कार्यालयाचे साहित्य | ६.३३% |
| वाहने | ९.५०% |
| माहिती तंत्रज्ञान साधने | १५.००% |

५) मालमत्ता, कारखाने व साधने यातील ज्या वस्तूं नगांचा खर्च कंपनीने विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त नाही; त्यांचा घसारा संपादन वर्षात १०० टक्के केला जातो. मोबाईल फोनच्या खर्चाचे भांडवलीकरण आणि त्यांचा १०० टक्के घसारा, खरेदी वर्षात केला जातो. यासाठी कंपनीची विहित मर्यादा विचारात घेतली जात नाही.

**क) अमूर्त मत्ता:**

नवीन ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर खरेदी केल्याचा भांडवली खर्च, बाह्य वृत्तीय पक्ष सल्लागाराकडून केलेली या सॉफ्ट वेअरची अमलबजावणी परवानाची खरेदी या महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती आयोगाने विहित केल्याप्रमाणे खालील दराने घसारा आकारला जातो.

| मत्तांचे स्वरुप | घसारा % |
|---|---|
| सॉफ्ट वेअर | ३०% |

उपकंपन्याच्या मत्ता वरील घसारा हा कंपनी अधिनियम २०१३ सूची २ नुसार उपयुक्त आयुष्याकरिता सरळ रेषापद्धतीने आकारला जातो.

**११. चालू नसलेल्या मत्तांची विक्री करणे:**

चालू नसलेल्या ज्या मत्ता वापरात ठेवण्यापेक्षा विकल्यास त्यांच्या प्रचलीत रकमा वसूल होऊ शकते त्यांचे वर्गीकरण विक्री योग्य 'चालू मत्ता' असे केले जाते. जर विक्रीची चांगली शक्यता असेल आणि मत्ता विद्यमान स्थितीत तात्काळ विक्रीसाठी उपलब्ध असेल तर ही अट पूर्ण झाली असे मानले जाते. अशा विक्री योग्य चालू नसणाऱ्या मत्तांची मोजणी त्यांच्या कमी झालेल्या प्रचलीत रकमेनुसार केली जाते आणि रास्त मूल्यातून विक्रीचा खर्च वजा केला जातो.

ज्या मालमत्ता, कारखाने व साधने आणि अमूर्त मत्ता विक्रीसाठी काढल्या जातात; त्यांचा घसाऱ्याची तरतूद केली जात नाही.

**१२. वस्तूसूची:**

भांडारातील सामान, सुटे भाग यासह मालसाठ्याचे मूल्य त्यांच्या कमी झालेल्या मूल्यानुसार केले जाते आणि त्यांचे वसुली योग्य मूल्य आणि किंमत ही वेटेड ॲव्हरेज कॉस्ट मेथडने निश्चित केली जाते. मात्र, वीज निर्मितीसाठीचे साहित्य व इतर वस्तू यांचे लेखन किंमतीपेक्षा कमी दराने केले जात नाही कारण विजेची विक्री निर्मिती खर्चा इतक्या किंवा त्यापेक्षा जास्त दराने केली जाते. खर्चात खरेदी खर्च (मिळण्याजोग्या इनपूट टॅक्स क्रेडीटचा निव्वळ) आणि त्या वस्तू त्यांच्या सध्याच्या जागी व स्थितीत आणण्याचा इतर खर्च समाविष्ट असतात. भांडारातील सेवेस निरुपयोगी व निकामी झालेल्या वस्तूंचा आढावा घेऊन त्याबाबतच्या तोट्याची लेख्यात तरतूद केली जाते.

**१३. महसूल मान्यता:**

१) विजेच्या विक्रीतून मिळणारा महसूलाचा लेखा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने त्यापूर्वीच मंजूर केलेल्या वीज दर पत्रकाच्या आधारे केले जातात. त्यात इंधन समायोजन आकार समाविष्ट असतो. तसेच लेख्यांच्या आधारे कालावधीच्या अखेरीस उपार्जित झालेला विनादेयकाचा महसूलसुद्धा समाविष्ट केला जातो. मात्र तो त्यापुढील वर्षात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने केलेल्या समायोजनाच्या प्रक्रीयेच्या अधीन असतो.

२) महावितरण सोबत केलेल्या वीज खरेदी कराराच्या अटींनुसार, कंपनीला विलंबित भरणा आकार १.२५ टक्के दराने प्रति महिना आकारण्यास मान्यता आहे. पताच्या मुदतीनंतर ऊर्जेच्या देयकाची रक्कम भरल्यास तो उपार्जन तत्वाने आकारला जातो.

३) व्याजाचे उत्पन्न हे मुद्दल / थकबाकी आणि लागू होणारा व्याज दर यानुसार मान्य केले जाते.

४) फ्लाय ॲश (राख) विक्रीचा लेखा ग्राहकाने मान्य केलेल्या दराने केला जातो. त्याची रक्कम ''फ्लाय ॲश वापर निधी'' या वेगळ्या लेखा शिर्षात आणि पर्यावरण व वन मंत्रालयाने दि.३.११.२००९ रोजी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार केला जातो. या निधीचा वापर राख वापराच्या प्रोत्साहनासाठी करावयाच्या खर्चासाठी केला जातो.

५) अन्य उत्पन्नाला उपार्जन तत्त्वावर मान्यता दिली जाते. भंगार व नाकारलेला कोळसा इ. विक्री जेव्हा खरेदीदार कंपनीच्या जागेतून करतो व कंपनी त्याची बीजके तयार करते, तेव्हाच त्याचा लेखा होतो. परिसमापनातील नुकसानाच्या जेव्हा ते प्रत्यक्ष ओळखले जातात त्यावर्षी आणि त्याची आकारणी झाल्यावर त्यांच्या वसुलीचे समायोजन प्रकल्पाच्या खर्चासमवेत केले जाते. त्यातून प्रकल्पाचे जादा खर्च काही प्रमाणात कमी होतात. प्रकल्पाच्या कंत्राटदारांना दिलेल्या अग्रिमांचे समायोजन जेव्हा उपार्जन होईल त्याप्रमाणे प्रकल्प खर्चात केले जाते. इतर सर्व प्रकरणी, परिसमापनातील नुकसान इतर उत्पन्नात जमा केले जाते.

६) विक्री झाली नाही अशा उर्जा बचतीच्या प्रमाणपत्रांच्या मूल्याला कंपनी वित्तीय वर्षाच्या अखेरीस मान्यता देते व ते उपार्जन तत्त्वानुसार महसूलात जमा करते. ही प्रमाणपत्रे विकल्यास त्याचे उपार्जन मूल्य आणि प्रत्यक्ष मूल्य याचे समायोजन करून ते प्रत्यक्ष विक्रीच्या वर्षाच्या नफा-तोटा पत्रकात दाखविले जाते.

**१४. खर्च आणि उत्पन्न यांचे लेखे करणे / वर्गीकरण करणे:**

जर मागील काही वर्षातील एकत्रित उत्पन्न / खर्च प्रारंभीच्या विहित मर्यादेपेक्षा जास्त असेल तर, ते पूर्वलक्षी प्रभावाने दुरुस्त केले जाते.

विम्याचे दावे स्वीकारल्यानंतरच त्यांचे लेखे केले जातील.

इतर सर्व दावे / हक्क यांचे लेखे प्रत्येक प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार केले जातील.

**१५. उपकंपन्या आणि संयुक्त साहसी कंपन्या यातील गुंतवणूकी:**

उपकंपन्या, संयुक्त साहसी कंपन्या तसेच सहयोगी कंपन्या यांच्या समभागात गुंतवणूकी केल्या असुन त्यांची नोंदणी खर्च वजा (जर काही असेल तर) संचित कमी केलेल्या बाबी याप्रमाणे केली जाते आणि प्रत्येक अहवाल तारखेला गुंतवणूकी कमी करण्याच्या दृष्टीने आढावा घेतला जातो.

गटाने जेव्हा सामान्यतः स्वीकारल्या जाणाऱ्या लेखा धोरण पद्धतीतून भारतीय लेखा मानक पद्धतीने संक्रमण केले त्यावेळी उपकंपन्या, सहयोगी आणि संयुक्त कंपन्या यातील गुंतवणूकीला त्यांच्या प्रचलीत विद्यमान मूल्यानुसार मान्यता देण्याचे ठरविले होते.

**१६. परकीय चलनातील व्यवहार:**

परकीय चलनातील व्यवहार प्रारंभी त्यांच्या व्यवहाराच्या तारखेला प्रचलीत असलेल्या संबधित विनिमय दराने नोंदले जातात. परकीय चलनानुसार असलेली पैशातील मत्ता व पैशामधील दायित्त्वे यांचे रुपांतरण अहवाल तारखेला असलेल्या विनिमयाच्या स्पॉट रेटनुसार केले जाते; हिशेबानंतर किंवा पूनर्लेखनानंतर विनिमयत्ता उद्‌भवते. ह्या फरकांना नफा व तोटा पत्रकात ''विनिमय दर विचलन'' किंवा ''वित्तीय किंमत (कर्जाच्या खर्चाचे समायोजना प्रमाणे व त्या मर्यादिपर्यंत)'' म्हणून मान्यता दिली जाते.

**१७. कर्मचारी लाभ:**

**अल्पमुदतीचे कर्मचारी अंशदान:**

कर्मचाऱ्यांनी ज्यावर्षी सेवा दिल्या, त्या वर्षीच्या नफा-तोटा पत्रकात अल्पकालिन कर्मचारी लाभ यांना खर्चाच्या विनासवलत रकमेला मान्यता देण्यात येते.

**नोकरीनंतरचे लाभ:**

**अ) व्याख्यांकित अंशदान योजना :**

भविष्य निर्वाह निधी या वेगळ्या विश्वस्त संस्थेत इतर गटातील कंपन्याच्या अंशदानाचेही व्यवस्थापन होते, त्यामधे कंपनी पूर्व निश्चित दराने तिचे आणि कर्मचाऱ्यांचे अंशदान भरते. या निधीची गुंतवणूक परवानगी प्राप्त प्रतिभूतींमधे केले जाते. या निधीत केलेले प्रत्येक कालावधीतील अंशदान यास 'व्यय' म्हणून मान्यता दिली जाते आणि त्याची आकारणी नफा-तोटा पत्रकात केली जाते.

**ब) व्याख्यांकित लाभ योजना:**

**नोकरीनंतरचे लाभ :**

उपदान या सारख्या व्याख्यांकित कर्मचारी लाभाचे दायित्त्व विमागणित शास्त्राच्या मूल्यांकनानुसार ठरविले जाते. हे मूल्यांकन स्वतंत्र विमागणित तज्ञांकडून वर्षाच्या अखेरीला प्रोजेक्टेड युनीट क्रेडिट मेथड वापरून घेण्यात येते.

पूर्नमापन केलेल्या निव्वळ व्याख्यांकित लाभ दायित्त्वांना इतर सर्वंकष उत्पन्न यामध्ये मान्यता दिली जाते. या दायित्त्वामधे विमागणिती प्राप्ती व हानी नियोजन मत्तांचा परतावा (व्याज वगळून) आणि मत्ता मर्यादांचा (जर काही असेल तर व्याजाशिवाय) यांचा समावेश होतो.

**इतर दीर्घ मुदतीचे कर्मचारी लाभ:**

इतर दीर्घ मुदतीचे लाभ म्हणजे रजेचे रोखीकरण याचे दायित्त्व हे 'प्रोजेक्टेड युनीट क्रेडीट मेथड' ही पद्धत वापरुन स्वतंत्र विमागणित तज्ञांकडून विमागणिती मुल्यांकनानुसार ठरविले जातात.

**सानुग्रह अनुदान:**

कर्मचाऱ्यांकरिता सानुग्रह अनुदान जसे आणि जेव्हा जाहीर होईल तेव्हा कंपनी याचा व्यय लेखा वह्यांमधे उपार्जित करते.

**१८. भाडेपट्टी:**

**वित्तीय भाडेपट्टी**

ज्या मत्ता वित्तीय भाडेपट्टीने संपादित केल्या असून त्यामधे कंपनीकडे मालकी हक्काच्या सर्व जोखीमा व मोबदले आलेले आहेत. अशा मत्तांच्या भाडेपट्टीच्या आरंभापासून रास्त मूल्यांच्या कमी दराने किंवा विद्यमान भाडेपट्टीच्या किमान मूल्याच्या पैशातील भरणा या दराने भांडवलीकरण केले जाते आणि तत्समान रकमेचे दायित्त्व निर्माण केले जाते. भाडेपट्टीची भरलेली भाड्याची रक्कम याची वाटणी दायित्त्व व व्याज खर्च यामधे केली जाते. त्यातून प्रत्येक कालावधीच्या थकीत दायित्त्वावर स्थिर मुदतीच्या दराने नित्य व्याज मिळावे असा उद्देश असतो.

**प्रवर्तनातील भाडेपट्टी:**

ज्या भाडेपट्टीचा वित्तीय भाडेपट्टी अशा प्रकारे वर्गीकरण केलेले नसते त्याचा 'प्रवर्तनातील भाडेपट्टी' म्हणून विचार केला जातो. सामान्यतः प्रवर्तनीय भाडेपट्टीच्या भाड्यास नफा व तोटा पत्रकात सरळ रेषा पद्धतीने भाडेपट्टीच्या मुदतीसाठी मान्यता दिली जाते. अपवाद जर भाडेपट्टीच्या रकमेच्या वाढीची रचना महागाईच्या वाढीप्रमाणे असेल जलविद्युत निर्मिती सुविधांसह महाराष्ट्र शासनासोबत भाडेपट्टीचे करार केलेले नाहीत.

**१९. शासकीय अनुदान:**

शासकीय अनुदानाबाबत जेव्हा त्या मिळण्याची योग्य हमी असेल आणि जेव्हा संलग्न शर्तींचे अनुपालन करण्यात येते तेव्हाच त्याला मान्यता देण्यात येते.

जेव्हा अनुदान एखाद्या खर्चाच्या बाबीशी निगडीत असते; तेव्हा त्या संबंधित खर्चाच्या मुदतीसाठी आणि त्याच्या हेतुच्या भरपाईसाठी खर्च करण्यात येते तेव्हा तीला नफा व तोटा पत्रकात सुयोग्य पद्धतीच्या आधारे मान्यता दिली जाते.

जेव्हा अनुदान मालमत्ता, कारखाना आणि साधने याच्याशी संबंधित असते, तेव्हा ती मालमत्ता, कारखाना व साधन यांचा खर्च ठोक मूल्यात दर्शविली जातो आणि त्याचे अनुदानाला दायित्त्व (स्थगीत उत्पन्न) मानण्यात येते आणि ते नफा-तोटा पत्रकात सुयोग्य पद्धतीच्या आधारे आणि सदर मत्तेच्या उपयुक्त आयुष्यासाठी जमा केले जाते.

**२०. तरतुदी, आकस्मिक दायित्त्वे व आकस्मिक मत्ता:**

जेव्हा एखाद्या भूतकालिन घटनेमुळे सद्यस्थितीत काही बंधने आली असतील तर त्या बंधनाच्या तरतुदींना मान्यता देण्यात येते. अशा बंधनामुळे आर्थिक लाभांची शक्यता असावी आणि ही बंधने पूर्ण करण्यासाठी संसाधनांचे बहिर्गमन होणे संभवनीय असते. या बंधनातील रकमांचे विश्वासनीय अंदाज केलेले असावेत.

जेव्हा पैशाच्या वेळेच्या मूल्याचा परिणाम महत्त्वाचा असतो; तेव्हा योग्य कपातीच्या दराने तरतुदीमधे कपात केली जाते. आकस्मिक दायित्त्वे म्हणजे, संभाव्य बंधने ज्यावर कंपनीचे संपूर्ण नियंत्रण नाही अशा घटना भविष्यात घडल्या तरच अशा आकस्मिक दायित्त्वांचे अस्तित्त्व कामय होईल किंवा ज्यासाठी संसाधनाचे बहिर्गमन आवश्यक असेल अशी शक्यता नाही किंवा ज्या बंधनातील रकमांचे मोजमाप पुरेशा विश्वासार्हतेने करता येत नाही.

आकस्मिक दायित्त्वांना वित्तीय विवरणपत्रात मान्यता नसते. जर आर्थिक संसाधनाचे बहिर्गमन होण्याची शक्यता खुप कमी किंवा दुरची नसेल तरच आकस्मिक दायित्वे प्रगट केली जातात.

ज्या बाबी प्रत्येक प्रकरणातील कंपनीने विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त होतात तेव्हा त्या बाबतची आकस्मिक दायित्वे आणि भांडवली बांधिलकी प्रगट केली जाते.

विहित मर्यादेपेक्षा जास्त असलेल्या आकस्मिक मत्ता यांना वित्तीय विवरणपत्रात मान्यता दिली जात नाही. परंतु जर आर्थिक लाभ मिळण्याची शक्यता असेल तर त्या प्रगट केल्या जातात.

**२१. रास्त मूल्याची मोजणी करणे :**

बाजारपेठेत सहभागी होणाऱ्यांमधे मत्ता विक्रीसाठी किंवा दायित्त्व हस्तांतरणासाठी, यापैकी जसे काही असेल त्या कायदेशीर व्यवहारात मूळ मापनाच्या तारखेला मिळणाऱ्या किमतीला किंवा तसे नसल्यास कंपनीला सहजप्राप्त असणाऱ्या सर्वात लाभदायक बाजारपेठेला रास्त मूल्य म्हणतात.

कंपनी मत्ता / दायित्त्वे यांचे रास्त मूल्य मोजण्यासाठी बाजारपेठेतील निरिक्षण योग्य माहिती मिळवून तिचा उपयोग करते. मूल्यमापनाच्या तंत्रात वापरल्या जाणाऱ्या निविष्टी यांच्या आधारे रास्त मूल्याच्या क्रमवारीमधील श्रेणी यामध्ये खालील प्रमाणे स्तर असतात.

स्तर १ - समान मत्ता / दायित्त्वे यांच्या कार्यशील बाजारपेठेतील उद्धृत केल्या जाणाऱ्या किमती (असमायोजित)

स्तर २ - मत्ता / दायित्त्वे यांच्या वरील स्तर - १ मधील उद्धृत किमती व्यतिरिक्त अन्य निविष्टी शोधून त्यांचे प्रत्यक्ष (किमतीचे) किंवा अप्रत्यक्ष (किमती व्यतिरिक्त अन्य) निरिक्षण करणे.

स्तर ३ - मत्ता / दायित्त्वे यांच्या बाजार माहिती निरिक्षणांवर आधारलेल्या नाहीत; अशा निविष्टी विचारात घेणे. (ज्यांचे निरिक्षण करता येत नाही अशा)

वित्तीय विवरणपत्रात मत्ता व दायित्त्वे यांना आवर्ती तत्त्वावर मान्यता दिली जाते. त्यासाठी कंपनी श्रेणीकरणाचे पूनर्निर्धारण करते आणि त्याद्वारे श्रेणीमधे स्थानांतरण झाले आहे किंवा कसे; (सर्वव्यापी रास्त मूल्य मोजणीसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या सर्वात खालच्या निविष्टीच्या आधारे) याचे प्रत्येक अहवाल कालावधीच्या अखेरीस निश्चिती करते.

**२२. वित्तीय विलेख:**

जेव्हा गट एखाद्या कंत्राटातील विलेखाच्या तरतूदीमधे एका बाजूला पक्ष असतो तेव्हा वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्त्वे यांना मान्यता दिली जाते. गटाच्या वित्तीय मत्तात खालील बाबींचा समावेश असतो :-

१) चालू वित्तीय मत्ता यात व्यापारी येणी, रोख व रोख समतूल्य आणि बँकातील शिल्लक, अल्प मुदतीच्या ठेवी.

२) चालू नसलेल्या मत्ता यात प्रामुख्याने उपकंपन्यातील समभाग गुंतवणूक व त्यांना शुल्क कर्जे व अग्रिमे, दीर्घ मुदतीची येणी इत्यादी

**वित्तीय मत्ता :**

**अ) प्रारंभिक मत्ता व मोजणी:**

सर्व वित्तीय मत्ता यांना प्रारंभी त्याचे रास्त मूल्य अधिक त्या संपादनासाठी केलेल्या व्यवहाराचे खर्च यानुसार मान्य करण्यात येतात. वित्तीय मत्तांचे व्यवहाराचे खर्च हे 'नफा किंवा तोटा' यातील रास्त मूल्य यानुसार काढून ते नफा - तोटा पत्रकात खर्च म्हणून दाखविले जातात.

**ब) नंतर केलेली मोजणी:**

संबंधित वित्तीय मत्ताच्या वर्गीकरणाच्या संदर्भानुसार नंतरची मोजणी केली जाते.

कंपनी वित्तीय मत्तांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करते :

अ) कर्जफेडीच्या खर्चानुसार नंतर मोजणी करणे

ब) आर्थिक मालमत्ता मोजणे

क) इतर सर्वंकष उत्पन्नामार्फत रास्त मूल्य किंवा

ड) नफा किंवा तोटा द्वारे रास्त मूल्य.

वित्तीय मत्तांचे व्यवस्थापनासाठी कंपनीचे बिझनेस मॉडेलच्या आणि वित्तीय मत्तांच्या कंत्राटातील वैशिष्ट्यानुसार केलेल्या रोकडता प्रवाहाच्या आधारे.

**कर्जफेडीच्या तरतुदींचे खर्च:**

कर्जाचे विलेख याच्या कर्जफेडीच्या तरतुदीची मोजणी खालील दोन्ही अटींची पूर्तता झाली तरच केली जाते. अशा मत्ता बिझनेस मॉडेलमधे खलील उद्दिष्टासाठी धारण केली असावी:

- कंत्राटानुसार रोकडता प्रवाह गोळा करण्यासाठी मत्ता धारण करणे
- मत्तांच्या कंत्राटातील अटीमुळे रोकडता प्रवाहात निश्चित तारखा दिल्या जातात. त्या तारखांना थकीत मुद्दल रकमेचे आणि व्याज याचे संपूर्ण देणे भरावे लागते.

  प्रारंभिक मान्यतेनंतर अशा वित्तीय मत्ता पुन्हा कर्जफेडीच्या तरतुदीच्या खर्चासाठी मोजल्या जातात. यासाठी परिणामकारक व्याजदर पद्धती वापरली जाते आणि अशा कर्जफेडी तरतुदींना नफा - तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

**कर्ज विलेख: नफा तोटा द्वारे रास्त मूल्यानुसार:**

नफा तोटा याद्वारे काढलेले रास्त मूल्य हे कर्ज विलेखाच्या मोजणीसाठी उर्वरित श्रेणीचे आहे.

प्रारंभिक मोजणीनंतर रास्त मूल्यामधे बदल झाल्यास त्यास नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. या बदलामधे व्याजाचे उत्पन्न, कमी करण्याचा तोटा व इतर निव्वळ प्राप्ती व तोटे समाविष्ट असतात.

**समभगाातील गुंतवणूकी:**

भारतीय लेखा मानक क्र.१०९ याच्या व्याप्तीत अंतर्भाव होणाऱ्या समभागातील सर्व गुंतवणूकींची मोजणी रास्त मूल्याने केली जाते. समभागाचे जे विलेख व्यापारासासाठी धारण केले जातात:

त्यांचे वर्गीकरण नफा व तोटा द्वारे रास्त मूल्य नुसार केले जाते. इतर सर्व समभागांच्या विलेखांच्या वर्गीकरणासाठी कंपनीने इतर सर्वंकप उत्पन्नाद्वारे रास्त मूल्य किंवा नफा तोटा पत्रकातील रास्त मूल्य अशाप्रकारे वर्गीकरण करण्याबाबत कंपनी निर्णय घेते. हे वर्गीकरण प्रारंभीक मान्यतेवर केले जाते आणि ते अपरिवर्तनीय असते.

यानुसार वर्गीकरण केलेल्या समभागांच्या विलेखाच्या रास्त मूल्यातील सर्व बदलांना, (लाभांश वगळून) यांना इतर सर्वकष उत्पन्न यात मान्यता दिली जाते. इतर सर्वकष उत्पन्न या रकमांचा नफा व तोटा पत्रकामधे पूनर्चक्रीकरण केले जात नाही. अशा गुंतवणूकींची विक्री झाली तरी तसे केले जात नाही.

नफा व तोटा द्वारे रास्त मुल्य या श्रेणीत समाविष्ट केलेल्या समभाग विलेखांचे मापन रास्त मूल्याच्या बदलानुसार केले जाते. त्यांना नफा - तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

उपकंपन्या, सहयोगी व संयुक्त कंपन्या आदि संस्थांच्या समभाग विलेखातील गुंतवणूकी खर्च वजा कमी करणे यानुसार पुढे नेल्या जातात.

**वित्तीय मत्ता कमी करणे:**

भारतीय लेखा मानक १०९ नुसार ज्या वित्तीय मत्तांची मोजणी कर्जफेडीच्या खर्चानुसार होते आणि ज्या इतर सर्वंकष उत्पनाचे रास्त मुल्यानुसार नोंदविल्या जातात, त्या मत्ता कमी करण्याची मोजणी करणे व त्याला मान्यता देणे यासाठी कंपनी ''अपेक्षित पत तोटा'' हे प्रारुप लागू करते. व्यापारी येणी यासाठीच्या तोटा भरपाईचे मापन करण्यासाठी ''सोपी पद्धती'' ही पद्धती अनुसरली जाते. प्रत्येक अहवाल तारखेला त्याच्या पूर्ण आयुष्याच्या ''अपेक्षीत पत तोटा'' च्या समान रक्कम यानुसार मापन केले जाते.

**वित्तीय मत्तांची मान्यता रद्द करणे:**

कंपनीची एखादी वित्तीय मत्ता (किंवा जेव्हा लागू असेल तेव्हा वित्तीय मत्तांचा एक भाग किंवा तत्सम वित्तीय मत्तांच्या गटांचा भाग) हा प्राथमिकरित्या पुढील कारणांकरिता रद्द करण्यात येतो :-

जेव्हा या मत्तांद्वारे रोकडता प्रवाह मिळण्याचे हक्क संपले असतील किंवा

जर कंपनीने अशा मत्तांकडून रोकडता प्रवाह मिळण्याच्या हक्काचे हस्तांतरण केले असेल किंवा मिळालेले रोकडता प्रवाह संपूर्णपणे आणि प्रत्यक्ष विलंबाशिवाय तिसऱ्या पक्षाकडे पाठविण्याचे बंधन एखाद्या 'पास थ्रू' व्यवस्थेद्वारे स्वीकारले असेल आणि किंवा,

(अ) कंपनीने या मत्तेच्या सर्व जोखीमा व मोबदले भरीवपणे त्याच स्वरुपात हस्तांतरित केले असतील किंवा,

(ब) जर कंपनीने या मत्तेच्या सर्व जोखीमा आणि मोबादले भरीवपणे त्याच स्वरुपात हस्तांतरित केल्या नसतील तर किंवा स्वतःकडे ठेवल्या नसतील, मात्र या मत्तेचे नियंत्रण हस्तांतरित असेल

तर वित्तीय मत्तांची मान्यता रद्द केल्यानंतर, चालू असलेले मूल्य आणि मिळालेला वाटा यांच्यातील फरकाला नफा तोटा पत्रकात मान्यता मिळते.

**वित्तीय दायित्त्वे:**

**वित्तीय दायित्त्वे आणि समभाग विलेख:**

**कर्ज किंवा समभाग असे वर्गीकरण:**

कंपनी जेव्हा एखादया विलेखाचे वितरण करते; तेव्हा व्यवस्थेच्या त्या विषयाच्या कंत्राटाच्या किंवा कराराच्या भरीवपणानुसार आणि वित्तीय दायित्त्व आणि समभाग विलेख यांच्या व्याखेनुसार त्यांचे वर्गीकरण करण्यात येते.

**समभाग विलेख:**

कंत्राटातील समभाग विलेख म्हणजे ज्यात असलेल्या संस्थेची सर्व दायित्त्वे वजा केल्यानंतर उरलेला हिताच्या भागाचा पुरावा दाखविला जाणारा भाग होय.

**वित्तीय दायित्त्वे:**

कंपनीच्या विद्यमान वित्तीय दायित्त्वामधे प्रामुखाने (अ) कर्जे (ब) व्यापारी येणी (क) भांडवली खर्चाची दायित्त्वे (ड) सुरक्षा अनामती आणि (इ) इतर देणी यांचा समावेश होतो.

**प्रारंभिक मान्यता आणि मोजणी:**

सर्व वित्तीय दायित्त्वे (नफा किंवा तोटा यांच्या रास्त मूल्यानुसार मोजणी केलेली नाही अशा) यांना प्रारंभी त्यांच्या संबधित वित्तीय दायित्त्वाला थेट लागू असणाऱ्या व्यवहार खर्चाच्या रास्त मूल्यानुसार मान्यता दिली जाते. कंपनीच्या वित्तीय दायित्त्वात व्यापारी आणि इतर देणी, कर्जे आणि उसनवारी यांचा समावेश आहे.

**नंतर केलेली मोजणी:**

वित्तीय दायित्त्वांची मोजणी त्यांच्या खालीप्रमाणे केलेल्या वर्गीकरणावर अवलंबून असते.

**१) कर्जे:**

कर्जे सुरवातीला रास्त मूल्ये व केलेल्या व्यवहार खर्चाची निव्वळ याप्रमाणे त्यास मान्यता दिली जाते. नंतर उसनवारी कर्जाच्या कर्ज फेडी साठीच्या खर्चानुसार कर्जाची मोजणी केली जाते. उत्पन्न (व्यवहार खर्चाची निव्वळ रक्कम) व विमोचन रक्कम यात जो काही फरक असेल त्याला परिणामकारक व्याज दराची पद्धत वापरून कर्जाच्या मुदतीसाठी नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. कर्ज सुविधा स्थापित करण्यासाठी दिलेल्या शुल्काला कर्जाचा व्यवहार म्हणून मान्यता दिली जाते. मात्र या सुविधा काही प्रमाणात किंवा संपूर्णपणे काढून घेतल्या जाऊ शकतात, हे गृहित धरुन त्यांच्या मर्यादेत ही मान्यता असते. अशा प्रकरणी सदर सुविधा काढून टाकण्यापर्यंत शूल्क स्थगित ठेवले जाते. जेव्हा कर्जाच्या करारामधे काही बंधने विनिर्दिष्ट असतात; तेव्हा अशी बंधने चुकती /रद्द करणे किंवा मुदत संपणे यामुळे ती ताळेबंदातून काढून घेतली जाऊ शकतात. संपलेल्या वित्तीय दायित्त्वाची रक्कम आणि त्याची चुकती केलेली रक्कम यातील फरक नफा-तोटा पत्रकात इतर प्राप्ती / (तोटे) या प्रमाणे मान्य केला जातो.

जर कंपनीला एखादया दायित्त्वाचा चुकता अहवाल काळापासून किमान बारा महिने स्थगीत ठेवण्याचा विनाअट हक्क नसला, तर त्या दायित्त्वाचे 'चालू दायित्त्वे' असे वर्गीकरण केले जाते. जेव्हा एखाद्या दीर्घ मुदतीच्या कर्ज व्यवस्थेतील महत्त्वाच्या तरतुदींचा भंग अहवाल मुदत संपतात किंवा यापूर्वी झाला असला आणि ते दायित्त्व मागणीनुसार अहवालाच्या तारखेला देय होत असेल आणि जर संबंधित कर्जदार अहवाल तारखेनंतर आणि वित्तीय विवरणपत्रकांच्या देण्याची मंजुरी घेण्यापूर्वी संमती दिली असेल तर त्याचे वर्गीकरण 'चालू दायित्त्वे' असे केले जात नाही. मात्र तरतुदीच्या भंगाबद्दल मागणी केलेली नसावी.

**(२) व्यापारी व इतर देणी:**
यामधे वित्तीय मुदत संपण्यापूर्वी कंपनीला पुरविलेल्या माल व सेवा यांच्या दायित्त्वाच्या न दिलेल्या रकमा यांचा समावेश होतो. या रकमा अप्रतिभूत असतात व त्या निर्देशित केल्यानंतर बारा महिन्यात दिल्या जातात. व्यापारी व इतर देणी जर अहवालाच्या मुदतीनंतर बारा महिन्यात देय नसल्या असे नसेल तर त्यांना चालू दायित्त्व समजले जाते. त्यांना प्रारंभी त्यांच्या रास्त मूल्यांनुसार मान्यता दिली जाते आणि नंतर परिणामकारक व्याज दर वापरून कर्जफेडीचे खर्च म्हणून त्याची मोजणी केली जाते.

**मान्यता काढून घेणे:**
जेव्हा एखाद्या वित्तीय दायित्त्वाचे बंधन चुकते केले जाते किंवा रद्द केले जाते किंवा त्याची मुदत संपते तेव्हा त्या वित्तीय दायित्त्वाची मान्यता काढून घेण्यात येते. जेव्हा एका विद्यमान दायित्त्वाची जागा, त्याच कर्जदाराने वेगळ्या अटीनुसार दिलेले दुसरे दायित्त्वे घेते किंवा जर विद्यमान दायित्त्वाच्या अटींमधे महत्त्वाचे रुपभेद केले जातात तेव्हा असे बदल, सुधारणा, रूपभेद अशावेळी मूळ दायित्त्वाची मान्यता काढून घेतली आहे आणि नवीन दायित्त्व मान्य केले आहे असे मानण्यात येते. यामुळे पुस्तकी रकमेतील फरकाला स्वायत्त नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

**वित्तीय विलेखांची भरपाई:**
वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्त्व हे भरपाई योग्य असतात. जर कायदेशीर हक्काच्या अंमलबजावणीमुळे एखादी भरपाई चालू काळात द्यावी लागणार असेल आणि जर अशा प्रकरणी समझोता होऊन ती निव्वळ तत्त्वावर द्यावी लागणार असेल तसेच त्याच कालावधीत एखादी मत्ता वसूली होऊन दायित्त्वासाठी समझोता होणार असेल तर त्या बाबी ताळेबंद पत्रकात नमूद केल्या जातात.

**२३)रोख आणि रोख समतूल्य बाबी:**
रोख आणि रोख समतूल्य बाबीमधे हातातील रोख रक्कम, बँकेतील शिल्लक, इतर अल्पमुदतीचे व चांगल्या प्रकारची रोकड सुलभता असलेल्या आणि तीन किंवा कमी महिन्यात मुदतपूर्ण होणाऱ्या मूळ गुंतवणूकी, तात्काळ रोखीत रूपांतर होऊ शकतील अशा आणि तसे करताना मूल्यात फारसा फरक पडणार नाही अशा बाबी समाविष्ट असतात.

**२४) रोकडता प्रवाह विवरण पत्रक:**
भारतीय लेखा मानक क्र.७ हे रोकडता प्रवाह विवरण पत्रकासंबंधी असून त्यानुसार ते तयार केले जाते. त्याच्या हेतुसाठी वरती व्याख्यांकित केलेल्या रोख व रोख समतूल्य बाबी विचारात घेण्यात येतात. तसेच बँकेच्या थकीत ओव्हरड्राफ्टची निव्वळ रक्कमही हिशेबात घेतली जाते कारण ती बँकेच्या अंतर्गत रोकड व्यवस्थापनाचा भाग असते.

**२५) प्रतिभाग मिळकत:**
करोत्तर नफा / तोटा या रकमेला वर्षभरातील वेटेड ॲव्हरेज इक्विटी शेअर या संख्येने भागून प्रतिभाग हिशेब केला जातो. सौम्यकृत प्रतिभाग मिळकत शोधून काढण्यासाठी करोत्तर नफा /तोटाच्या रकमेचे लाभांश, व्याज आणि सौम्यकृत संभाव्य समभागासंबंधीत इतर आकाराचे व्यय किंवा उत्पन्नाचे समायोजन केले जाते. सर्व संभाव्य समभागाचे रूपांतर केल्यानंतर जे सौम्यकृत भाग वितरित केले गेले असते अशा वेटेड ॲव्हरेज इक्विटी शेअर्सची संख्या विचारात घेतली जाते.
प्रतिभाग मिळकतीच्या हिशेबासाठी वाटप प्रलंबित असलेली शेअर अर्ज निधी हा वाटप योग्य आहे असे विचारात घेतले आहे. हा निधी महाराष्ट्र शासनाने दिलेल्या बांधिलकीनुसार सूत्रधारी कंपनीमार्फत आणि निश्चितपणे वाटपासाठी मिळणार आहे.

**२६) कर:**
आयकराच्या खर्चात चालू कर खर्च आणि वर्षभरातील स्थगित कर मत्ता किंवा दायित्त्व यातील निव्वळ बदल यांचा समावेश होतो. चालू आणि स्थगित कर यांना नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. मात्र जेव्हा त्यांचा संबंध इतर सर्वकष उत्पन्नातील बाबींशी असतो किंवा थेट समभागाशी असतो, अशा प्रकरणी अपवाद करून चालू आणि स्थगित कर या दोन्ही बाबींना अनुक्रमे इतर सर्वकष उत्पन्न आणि प्रत्यक्ष समभागात मान्यता दिली जाते.

**(अ) चालू कर :**
आयकर कायदा १९६१ यातील तरतुदींनुसार वर्षातील परवानगी योग्य कर सवलती, कपाती / अमान्य करणे इत्यादी विचारात घेऊन करपात्र उत्पन्नावर चालू कर निश्चित केला जातो. अहवालाच्या वेळी कराचे दर आणि कराचे कायदे यांचा तसेच जे कायदे तयार झाले आहेत किंवा प्रामाणिकपणे होणार आहेत यांचा विचार करून अहवालाच्या वर्षाचे कराचे हिशेब केले जातात. ज्यावेळी आयकर कायदा १९६१ चे कलम ११५ जे बी किमान पर्यायी कर नुसार चालू कर आकारला जातो तेव्हा अशा कर भरण्याचा लाभ नंतरच्या पंधरा (१५) कर-निर्धारण वर्षात उपलब्ध असतो. त्यामुळे तो जेव्हा प्रत्यक्ष वसूल केला जाईल तेव्हा त्याला मान्यता देण्यात येईल.

**(ब) स्थगित कर :**

ताळेबंदाच्या दृष्टीकोनातून स्थगित कराला मान्यता दिली जाते. मत्ता व दायित्त्वे यांचा कर आधारित आणि त्यांच्या पुस्तकी मूल्यातील कपात आणि यात उद्भवणारे तात्पुरते करपात्र फरक यानुसार स्थगित कर मत्ता आणि दायित्त्वे यांना मान्यता दिली जाते.

स्थगित कर दायित्त्वे यातील सर्व तात्पुरते करपात्र फरक मान्य केले जातात.

सर्व कपात योग्य हंगामी फरकाच्या रकमा, वापर न केलेल्या कराच्या जमा रकमा आणि जर काही वापर न केलेले कराचे तोटे असले तर त्यासाठी स्थगित कर मत्तांना मान्यता दिली जाते. कपात योग्य हंगामी फरक, वापर न केलेले कर जमांच्या रकमा आणि न वापरलेल्या कर तोट्यांच्या रकमा यासाठी करपात्र नफ्यातून वसूली करण्यास परवानगी मिळेल याची शक्यता असल्यास त्या मर्यादेत मान्यता दिली जाते.

प्रत्येक अहवाल तारखेला स्थगित कर मत्तांच्या पुढे न्यावयाच्या रकमांचा आढावा घेण्यात येतो आणि स्थगित कर मत्ता संपूर्णपणे किंवा तिचा काही भाग वापरण्यास करपात्र नफा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याची शक्यता असल्यास त्या मर्यादेत स्थगित कर मत्तांच्या पुढे न्यावयाच्या रकमांमधे कपात केली जाते. प्रत्येक अहवाल तारखेला अमान्य केलेल्या स्थगित कर मत्तांचा आढावा घेण्यात येतो आणि जर स्थगित कर मत्तांची भविष्यातील करपात्र नफ्यातून वसूली करण्यास परवानगी मिळेल याची शक्यता असल्यास त्या मर्यादेत मान्यता दिली जाते.

वर्षभरात जेव्हा मत्ता, वसूली किंवा दायित्त्वे चुकती केली जातात त्यावेळी लागू होणाऱ्या अपेक्षित कर दराने स्थगित कर मत्ता आणि दायित्त्वे यांची मोजणी केली जाते. त्यासाठी तोपर्यंत कायद्यानुसार मंजूर झालेले कराचे दर (आणि करांचे कायदे) किंवा अहवाल तारखेपर्यंत केले जाणारे कायदे यांचा आधार घेतला जातो.

जर चालू कर मत्ता व चालू कर दायित्त्वे या समवेत चुकता करण्याचा कायदेशिर अमंलबजावणी योग्य हक्क असला आणि स्थगित कर संबधित कराची अस्तित्त्वातील बाबींशी सलग्न असेल आणि त्या समान कर प्राधिकरणाकडे असतील तर स्थगित कर दायित्त्व आणि स्थगित कर मत्ता यांची भरपाई करता येते.

**२७) भारतीय लेखा मानक ११५ यातील नव्याने लागू झालेल्या लेखा विषयक अधिघोषणा :**

महानिर्मिती ही जिचे दराचे नियामक संस्थेकडून नियमन केले जाते अशी कंपनी असल्याने वरील लेखा मानकाचा महानिर्मितीच्या वित्तीय विवरण पत्रकावर कोणताही मोठा परिणाम होत नाही.

**२८) व्यापारी येणी :**

व्यापारी येणी त्यांच्या बिजकातील मूळ रक्कम वजा अपेक्षित पत तोट्याची तरतूद याप्रमाणे पुढे नेण्यात येतात. इतर वित्तीय मत्ता कमी करण्यातील तोट्याला मान्यता देण्यासाठी कंपनी त्यांच्या प्रारंभिक मान्यतेनंतर पत जोखीमेने मोठी वाढ झाली आहे किंवा कसे यांचे मूल्यमापन करते. जर पत जोखीम मोठ्याप्रमाणात वाढली नसली तर कमी करण्यातील तोट्याच्या तरतुदीसाठी बारा (१२) महिन्याचा अपेक्षीत पत तोट्याची तरतूद वापरण्यात येतो.

**२९) किमान पर्यायी कर**

